◆ नोव्हेंबर १९९९
◆ वर्ष तिसरे
◆ अंक नववा
◆ दीपावली विशेषांक

# मेहता मराठी ग्रंथजगत

☐ संपादक
सुनील मेहता

☐ कार्यकारी संपादक
शंकर सारडा

☐ संपादन सहाय्य
सुनीता दांडेकर

☐ अंकाची किंमत २० रु.
वार्षिक वर्गणी ८० रु.

☐ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी
☐ प्रसिद्धी.
दरमहा १५ तारखेस

***संपादक-मुद्रक-प्रकाशक :***
**सुनील अनिल मेहता,**
मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६, सदाशिव पेठ,
पुणे-३०.
***मांडणी-अक्षरजुळणी :***
***मेहता पब्लिशिंग हाऊस***

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

| | |
|---|---|
| संपादकीय | २ |
| लेख - व. पु. काळे | ६ |
| फिनिक्स लायब्ररी - ओळख | ११ |
| आगामी पुस्तकांची ओळख | |
| नचसुंदरी करू कोपा | १९ |
| आठवणींचा मोहोर | २७ |
| रावीपार | ३७ |
| रेशीमगाठी | ४५ |
| मराठी रोमँटिक काव्य प्रतिभा | ५८ |
| मंदिरा | ६९ |
| सुंदरबनच्या जंगलात | ८७ |
| महात्मा | ९९ |
| नक्षत्रांच्या प्रकाशात | ११४ |
| इट इज ऑलवेज पॉसिबल | १२१ |
| आपले सौंदर्य | १३८ |
| मुंबई शिवसेना युती सरकार | १४९ |
| नवीन स्पर्धा | ५७ |
| शब्दकोडे | १३७ |
| स्पर्धा निकाल - ऑगस्ट | ११५ |
| स्पर्धा निकाल - सप्टेंबर | ४३ |



# दीपावलीचा संदेश

'मराठी ग्रंथजगत'चा हा तिसरा दिवाळी अंक रसिकवाचकांपुढे ठेवताना आनंद होत आहे. मराठी साहित्यविश्वातील ताज्या घडामोडींची नोंद घेऊन नवीन पुस्तकांकडे वाचकांचे लक्ष वेधण्याचा हा उपक्रम प्रकाशनक्षेत्रात व एकूणच ग्रंथव्यवहारात वैशिष्ट्यपूर्ण आणि पथप्रदर्शक ठरला आहे असे वाचकांच्या प्रतिक्रीयांवरून लक्षात येते.

आगामी वर्षात येणाऱ्या काही लक्षवेधक पुस्तकांची पूर्व झलक दाखवणारे साहित्य या दिवाळी अंकात देण्यात येत आहे विविध विषयांवरील आणि विविध वाङ्मयप्रकारातील दर्जेदार व वाचनीय पुस्तके प्रकाशित करण्याचा आमचा कटाक्ष असतो. त्यादृष्टीने नवीन पुस्तकांची निवड कसोशीने करण्यात येते. नवनवीन प्रयोगशील लेखनप्रकल्पांचे आणि विशिष्ट ज्ञानशाखेतील अभ्यासपूर्ण योगदानाचे साक्षेपी सादरीकरण मराठीत व्हावे यादृष्टीनेही आमचे लक्ष असते. या अंकातील लेख हे आमच्या संकल्पित पुस्तकांचा ट्रेलर दाखवणारे आहेत. वाचकांचे कुतूहल त्यामुळे नक्कीच चाळवले जाईल. आत्मचरित्र, व्यक्तिचित्र, कादंबरी, नाटक, कथा, समीक्षा, अग्रलेख, ललित गद्य अशा अनेक वाङ्मयप्रकारांचे आणि पर्यावरण, सौंदर्यसाधना व आरोग्यरक्षण, वगैरे विषयांचे आकर्षक दर्शन या अंकाद्वारे घडेल. आपल्या मराठी लेखकांप्रमाणेच सुनील गंगोपाध्याय, गुलजार यासारख्या भारतीय साहित्यकारांचेही लेखन या अंकात समाविष्ट झाले आहे. मराठी साहित्य हे देखील मराठीच्या सीमा ओलांडून भारतीय आणि जागतिक पातळीवर जायला हवे; तसेच मराठीतही देशा-परदेशातील दर्जेदार ताज्या कलाकृतींचे अनुवाद झपाट्याने येत राहावे ही आजच्या काळाचीच निकड आहे. त्या दिशेने मेहता पब्लिशिंग हाऊस अत्यंत जागरूकपणे वाटचाल करीत आहे; उत्तमोत्तम भारतीय व परदेशी साहित्याचा खजिना वाचकांसाठी खुला करीत आहे. वाचक ग्राहकही त्याला भरभरून प्रतिसाद देत आहेत. ही गोष्ट देखील कृतज्ञतापूर्वक नमूद करायला हवी. हा प्रतिसाद उत्साहवर्धक व प्रेरक आहे यात शंकाच नाही.

दूरदर्शन, केबल टीव्ही, इंटरनेट, सीडी-रॉम वगैरे इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या स्पर्धेमुळे ग्रंथव्यवहाराचे व वृत्तपत्रव्यवसायाचे प्रभुत्व कमी होत जाईल असा एक विचारप्रवाह आहे. परंतु गेल्या काही वर्षातील प्रत्यक्ष आकडेवारीवरून असे दिसते की एकूण ग्रंथव्यवहार हा वाढत चालला आहे; वृत्तपत्रांचे खपही वाढत आहेत. रजिस्ट्रॉरच्या ताज्या अहवालात



वृत्तपत्रांचा खप २० टक्के वाढल्याचा निर्देश करण्यात आला आहे. १९९८ मध्ये वृत्तपत्रांच्या १२ कोटी ६८ लाख प्रतींचा रोज खप होता; त्या आधीच्या वर्षात तो १० कोटी ५८ लाख होता १९९८ मध्ये देशात एकूण वृत्तपत्रे व नियतकालिके ४३८२४ निघत होती. १९९७ मध्ये हाच आकडा ४१७०५ एवढा होता. एकट्या हिंदी भाषेत १७, ८३६ नियतकालिके निघतात आणि त्यांच्या ५ कोटी ७३ लाख प्रती खपतात. टाइम्स ऑफ इंडियाच्या १४ लाख प्रती रोज खपतात तर मल्याळम मनोरमाच्या १२ लाख. मराठीत लोकसत्ता, लोकमत, सकाळ, महाराष्ट्र टाइम्स ही दैनिक सर्वाधिक खपतात.

पुस्तकांच्या खपाची अशी अधिकृत आकडेवारी गोळा करण्याची यंत्रणा भारतात नाही. तरीही इंग्रजी, हिंदी, मराठी, बंगाली वगैरे भाषांमध्ये पुस्तकांची विक्री वाढत आहे असे नॅशनल बुक ट्रस्टच्या पाहणीवरून दिसते.

आंतरराष्ट्रीय पातळीवरही ग्रंथव्यवहार सतत अधिक व्यापक होत चालला आहे. दुकाने, स्टॉल्स या पारंपारिक वितरण माध्यमांच्या जोडीला आता इंटरनेट आल्याने जगातले कुठलेही पुस्तक घर बसल्या मिळवण्याची सोय झाली आहे; त्यामुळेही ग्रंथविक्रीला अधिक चालना मिळाली आहे.

ॲमेझॉन कॉम या इंटरनेटद्वारे ग्रंथविक्री करणाऱ्या संस्थेची यशोगाथा विलक्षण थक्क करणारी आहे. चार वर्षापूर्वीच जेक बेझोस या तरुणाने इंटरनेटवर पुस्तक विक्री करण्याची योजना आखून 'ॲमेझॉन कॉम' या नावाने वेबसाइट सुरू केली. १९९७ साली या संस्थेने ४० कोटी डॉलर्सची पुस्तके विकली. १९९८ मध्ये हाच आकडा ६१ कोटी डॉलर्स झाला. आता तर संगीताच्या सीडी रॉमच्या विक्रीचीही व्यवस्था ॲमेझॉन कॉमने केली आहे आणि त्या क्षेत्रातही फक्त सहा महिन्यात ३ कोटी डॉलर्सची विक्री करून उच्चांक गाठला आहे. ६२ लाख ग्राहकांनी या माध्यमातून पुस्तके खरेदी केली. अमेरिकेतील सर्वात माठे ग्रंथविक्रेते म्हणून बार्नेस अँड नोबल (२७० कोटी डॉलर्स) आणि बॉर्डर्स (२३० कोटी डॉलर्स) यांचा क्रम लागतो. ॲमेझॉन कॉमने अत्यंत अल्प काळात त्यांच्या खालोखाल तिसरा क्रमांक पटकावला आहे. हाच वेग चालू राहिला तर त्या दोघांनाही मागे टाकायला फार काळ लागणार नाही. ग्राहकांना कार्यक्षम सेवा देणे हा आपला धर्म आहे अशी भावना ॲमेझॉन कॉमच्या सर्वच कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण व्हावी असा जेफ बोझेसचा आग्रह आहे आणि दुर्मिळातले दुर्मिळ पुस्तक देखील मिळवून देण्याचा प्रयत्न ही संस्था करीत असते. बेस्टसेलर्सच्या यादीत झळकणारी पुस्तके भरघोस सवलतीत देण्याचीही खास यंत्रणा ॲमेझॉन कॉमने सिद्ध केली आहे. कोणाही ग्राहकाला एक-दोनदा क्लिक करून हवे ते पुस्तक मागता यावे यादृष्टीने ऑर्डर देण्याच्या पद्धतीचे सुलभीकरण करून, येणाऱ्या

प्रत्येक ऑर्डरचा पाठपुरावा करून ग्राहकांचा अल्पावधीच विश्वास संपादन करण्यात या संस्थेने यश मिळवले. नवनवीन पुस्तकांसाठी त्यांनी आकर्षक सवलती जाहीर केल्या. आवृत्त्या संपलेली पुस्तकेही जुन्या पुस्तक विक्रीच्या दुकानांशी संपर्क साधून ग्राहकांना उपलब्ध करून देण्याचा चंग बांधला. 'पृथ्वीवरचे सर्वात मोठे ग्रंथ विक्रीकेंद्र' (अर्थस् बिगेस्ट बुकस्टोअर) असा सगळीकडे गाजावाजा केला. खरे सांगायचे तर ॲमेझॉनकडे एकही पुस्तक नसते. परंतु येणारी ऑर्डर त्या त्या प्रकाशकाकडे वा विक्रेत्याकडे पाठवून त्याजकडूनच परस्पर ग्राहकांकडे पुस्तक जात असते. क्रेडिटकार्डवर रक्कम ॲमेझॉन कॉमकडे जमा होते. योग्य ते कमिशन स्वतःसाठी ठेवून पुस्तकाचे मूल्य त्या त्या विक्रेत्याच्या खात्यात भरण्यात येते. ग्राहकांचा संतोष हात आमचा फायदा हे ब्रीदवाक्य प्रत्येक कर्मचाऱ्याच्या मनावर त्यांनी बिंबवलेले आहे. ''वर्क हार्ड, हॅव फन अँड मेक हिस्टरी.'' एका महान उपक्रमात आपण सहभागी असल्याचा अभिमान प्रत्येकाला उपभोगता आला पाहिजे. यासाठी जेफ बेझोस दक्ष असतो. ''आम्ही जग बदलू पाहत आहो, आमच्या परीने ते अधिक आनंदमय करू पाहत आहो; जगातील इतर कोठल्याही उद्योगव्यवसायापेक्षा अधिक वेगाने आम्ही पुढे जाऊ इच्छितो.'' असा चैतन्याचा व उत्साहाचा एक प्रचंड खजिनाच या संस्थेच्या प्रवर्तकामध्ये एकवटला आहे. जुलै १९९५ मध्ये ॲमेझॉन कॉमची वेबसाइट खुली झाली आणि ग्रंथविक्रीच्या क्षेत्रात नवे दालन उघडले. त्या आधी एक वर्षभर इंटरनेटवरील ग्रंथखरेदीविक्रीचे तंत्र विकसित करण्यात त्याने व्यतीत केले. 'वन क्लिक ऑर्डर' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली. त्यामुळे वाचक ग्राहकांना इंटरनेटवरून ग्रंथ मागवणे सोपे झाले. त्याचाच परिणाम म्हणजे पहिल्याच वर्षी वीस कोटी डॉलर्सची ग्रंथविक्री ॲमेझॉन कॉमच्या माध्यमातून झाली. बेझोस हा स्वतःला जगातील सर्वात अधिक महत्त्वकांक्षी आणि प्रगतशील व्यावसायिक असे मानतो; 'अमूक झाले तर– असे घडले तर-- यासारखे परिस्थितीपुढे शरणागती पत्करणारे शब्दप्रयोग वापरणे त्याला आवडत नाही. आपण हे करून दाखवायचेय– याबद्दल तो ठाम असतो आणि आपला हा निर्धार आपल्या सर्वच सहकाऱ्यांमध्येही असायला हवा म्हणून तो जागरूक असतो.

ॲमेझॉन कॉमचे यश हे एकूण ग्रंथव्यवहाराच्या उज्ज्वल भविष्यकाळाचे प्रतीक आहे. मराठी भाषेच्या भवितव्याबद्दल मराठी माणसेच साशंकता दाखवतात; उत्तम साहित्य मराठीत आले तर ते विश्वसाहित्यातही आपला प्रभाव गाजवू शकेल. ग्रंथ म्हणजे ज्ञान. त्या ज्ञानक्षेत्रात मराठी माणूस मागे राहून चालणार नाही. त्यादृष्टीने पाहिले तर मराठीत ग्रंथव्यवहार हा सतत वाढतच राहणे क्रमप्राप्त आहे. या शतकातील शेवटच्या दीपावलीच्या प्रसंगी हीच भावना मनात आहे. मराठी ग्रंथकर्तृत्वाचे आणि एकूण जागतिक ग्रंथव्यवहाराचे नवे नाते पुढच्या शतकात दृढ होत जाणार आहे. मराठी माणसाच्या ज्ञानाची, संशोधनाची,




कर्तृत्वाची क्षेत्रे अधिकाधिक व्यापक होत जाणार आहेत. मुद्रित शब्दाची जागा इलेक्ट्रॉनिक माध्यमे घेतील. पण ज्ञानाची गरज ही कायमच राहणार आहे. त्यामुळे ग्रंथव्यवहाराला कधीच मंदी येणे नाही.

ॲमेझॉन कॉमचे यश त्याची ग्वाही देत आहे.

नव्या सहस्रकाचे स्वागत करण्यासाठी आपण सगळे सज्ज होऊ या. या वर्षीच्या दीपावलीचा हाच संदेश आहे.

आमच्या सर्व वाचकांना, ग्राहकांना, लेखककवींना, विक्रेत्यांना, मुद्रक-बांधणीकारांना आणि ग्रंथव्यवहाराशी संबंधित असणाऱ्या सर्व बंधुभगिनींना ही दीपावली व नूतन वर्ष सुखसमृद्धीचे जावो ही प्रार्थना.



रौप्य महोत्सवी बँक

इचलकरंजी जनता सहकारी बँक लि;
हेड ऑफीस : जनता बँक भवन
मेन रोड, इचलकरंजी - ४१६११५ जि. कोल्हापूर.

बँकेचे असंख्य खातेदार, ठेवीदार व हितचिंतक यांना
दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा ...

कुटुंबाचा आधार बनुन जाणारी,
कुटुंबातल्या प्रत्येक घटकाच्या जिव्हाळ्याची बँक ...

इचलकरंजी जनता सहकारी बँक लि., इचलकरंजी

7 बँकेच्या मुंबई, पुणे, कोल्हापूर, गांधीनगर व इचलकरंजी येथील शाखांकडे फॅक्स सेवा उपलब्ध..!
7 मुख्य कचेरी, इचलकरंजी व पाच शाखांचे संपूर्ण कामकाज संगणकाद्वारे ...!
7 मुख्य शाखा - इचलकरंजी येथे २४ तास पैसे देवघेवीची (ए.टी.एम.) सुविधा उपलब्ध ...!
7 आम्ही आमच्या २१ शाखांसह आपल्या सेवेस सदैव तत्पर आहोत ...!

१. मुख्य शाखा - इचलकरंजी, २. भेंडे गल्ली - कोल्हापूर, ३. शिरोळ, ४. जयसिंगपूर, ५. पेठ वडगांव, ६. गांधीनगर, ७. शाहूपुरी - कोल्हापूर, ८. इंड. इस्टेट - इचलकरंजी, ९. काळबादेवी रोड - मुंबई, १०. पुणे, ११. हुपरी, १२. गारगोटी, १३. गडहिंग्लज, १४. आजरा, १५. कराड, १६. खणभाग - सांगली, १७. सुळकूड, १८. गांवभाग - इचलकरंजी, १९. मुलुंड (प.), २०, सोलापूर (चाटी गल्ली), २१. गणपती पेठ - सांगली.

जे. एन. शाळगांवकर — जनरल मॅनेजर
जी. टी. शिंदे — व्ही. चेअरमन
ए. बी. सौंदत्तीकर — चेअरमन



महावीर, बुद्ध, कृष्ण, लाओ-त्से, कोणीही असो.

एकच वाणी वेगवेगळ्या मुखांतून अवतरली.

ही अशी भव्य उंच शिखरं सातत्यानं डोळ्यासमोर असल्यामुळं, कुणीही मला वाकून नमस्कार केलेला मला आवडत नाही. तो नमस्कार मला नसतो, हे माहीत असलं तरीही त्या महान चैतन्याचं माध्यम होण्याची माझी पात्रता नाही. म्हणून मी वाकणाऱ्या रसिकाला थांबवतो.

आत्मा, परमात्मा या शब्दांची मी माझ्यापुरती एक व्याख्या तयार केली. 'आपण सारे अर्जुन' या लेखनानंतर चार वर्ष गप्प राहिलो . खरं तर 'आपण सारे अर्जुन' लिहिताना त्याचे दहा भाग लिहायचे होते. पण 'आत्मा' आणि 'परमात्मा' याचं आकलन झाल्याशिवाय पुढचं लेखन करणं शक्य नाही, हे ध्यानी आलं आणि मग त्यावर विचार सुरू झाला.

हा विचार करणं हे अविचाराचं लक्षण आहे. हे माहीत आहे.

प्रेमापासून क्रोधापर्यंतचे सगळे भाव अदृश्य आहेत आणि अदृश्य गोष्टींची ताकद अफाट असते. आपल्याला त्याचे परिणाम दिसतात.

चिडलेल्या नवऱ्यानं चहाचा ट्रे, जेवणाचं ताट भिरकावून दिलेलं किंवा पत्नीच्या तोंडात भडकवलं, (पहा– कोणताही हिंदी सिनेमा. संवादाच्या चढउतारावरून, याचा शेवट कुणीतरी दुसऱ्याला थोबाडीत मारून करणार हे कळतं.) तर त्या क्रोधाचं कृतीत रूपांतर झालेलं दिसतं. तेच इतर सर्व भाव-भावनांच्या बाबतीत म्हणता येईल.

तरीही माणसाची सगळी धडपड शब्द शोधण्यासाठी चालते.

'आता तुला नेमकेपणानं कोणत्या शब्दात सांगू' या स्वरूपाचे संवाद साध्या व्यवहारात, घराघरातून होतात. एकमेकांवर जिवापाड प्रेम करणारी प्रियकर-प्रेयसी 'भावरूपाचा'– 'अव्यक्ताचा' प्रत्यक्ष अनुभव घेतात. तरीही त्यांना 'प्रेमपत्रं' हवीशी वाटतात.

प्रेमपत्रं लिहिणं सोपं, पण ती संभाळणं म्हणजे अग्निदिव्य. अनेक संसार या लेखी पुराव्यापायी उद्ध्वस्त झाले. होत आहेत. नाटकं आणि चित्रपट याच विषयाभोवती फिरताहेत. तरीही माणसाला शब्द का हवे असतात?

'आत्मा-परमात्मा' यांना शब्दात शोधण्याचा मी चार वर्षे प्रयत्न का केला?

आज मी काहीसा माझ्यापुरताच मुक्त झालो आहे. 'आत्मा-परमात्मा' मी माझ्या शब्दकोशात शोधला आहे. केवळ एक तारेचं कुंपण मध्ये आलं.

पुढचा सगळा रस्ता केवळ एका कुंपणानं अडवावा?

आजवरचं जे आयुष्य जगलो. त्याचाही अर्थ समजला नसेल, तर पुढची चिंता का



करू?

मी जी संकल्पना मांडणार आहे तीसुद्धा मांडणारा मी कोण? कृष्ण, महावीर, येशू, बुद्धापासून ओशोपर्यंत सगळे– यांच्यापैकी कुणीतरी एकानं मला हे सुचवलं. हे सगळे म्हणजे माझा शब्दकोश.

'SUPPOSE, X = 2', असं म्हणतच, नंतरच्या सगळ्या आयुष्यात जो ऑलजिब्रा कधीही उपयोगी पडला नाही. तो ऑलजिब्रा मॅट्रिकच्या परीक्षेच्या वेळी कर्दनकाळासारखा छळून गेला ना?

'आज माझी नात, त्याच विषयासमोर थरथर कापते आहे.

माझीच नात. ती घाबरणारच. ती माझ्यामागे लपली तर मी असं म्हणून शकतो का? की, 'SUPPOSE ALGEBRA IS EASY; तर तिची भीती जाईल?

पण वरील वाक्यातल्या एका शब्दानं मात्र मला आयुष्यभर सावरलं.

'सपोज' हा एकमेव शब्द.

'प्रामाणिक आणि शुद्ध चारित्र्याचं सरकार या निवडणुकीनंतर सत्तेवर येईल'. या वाक्यामागे फक्त 'सपोज' हा शब्द लावायचा.

तुम्हीही प्रयत्न करा. म्हणा, 'सपोज, निवडणुकीत सेहचाळीस माणसं मेली नाहीत.' –इथपासून कोणतंही विधान.

मीही 'सपोज'चा आधार घेऊन ठरवलं,

'श्वास म्हणजे 'आत्मा' आणि 'तो' होत रहावा, घेणं आणि सोडणं ही क्रिया ज्याच्या कृपेनं होते. तो 'परमात्मा'.

गौतम बुद्धानं 'परमात्म्याला' 'धर्मापासून' मुक्त केलं. बुद्धानं जगाला एक धर्म दिला, आणि माणसाला एक दिशा दिली.

दिल है किसीके कदममोंपे, सर झुका हो न हो
बंदगी तो अपनी फितरत हो, खुदा हो या न हो.

म्हणजे नेमकं काय केलं?



तर त्यानं परमेश्वरापेक्षा, प्रार्थनेला खूप उंच स्थानावर नेलं.

''परमेश्वर-परमात्मा'' वगैरे आहे की नाही याची त्यानं चिकित्सा केली नाही.

हे दोन शब्द आणि त्याची संकल्पनाचा मांडली नाही.

माणसाचं मन जर प्रेम, माया, वात्सल्य यांनी ओसंडून जात असेल, तर बाकीच्या गोष्टी फजूल आहेत.



माणसाचं मन जर प्रार्थनेनं परिपूर्ण झालं असेल, तर सवालच संपला. परमात्मा आहे म्हणून जर कुणी प्रार्थना केली, तर प्रार्थना केलीच नाही.

प्रार्थना हा माणसाचा सहजधर्म व्हायला हवा, या एकाच संकल्पनेवर त्यानं भर दिला. परमात्म्याच्या भीतीनं किंवा तो कुठेतरी आहे, म्हणून प्रार्थना केली, तर त्या शक्तीला आपण 'लाच' दिली असं मानावं लागले.

प्रार्थना हा स्वभाव व्हायला हवा. कुणाला तरी हृदय अर्पण केलं, समर्पण केलं की तुम्ही जिंकलात.

'सर झुके या न झुके'.

इथं मस्तकाची फिकीर कोण करतो?

माणूस वाकतो. अनेकदा. सध्याच्या युतीच्या राज्यात तर कोण कुणासमोर वाकेल, याचा भरवसा रहायला नाही. आजची राजकारणी जमात आपली खोपडी कुणाच्याही पायावर ठेवतात.

अंतःकरणाचं समर्पण शक्यच नाही. जिथं हृदय असतं तिथं या लोकांच्या बाबतीत सत्ता आहे,

खुर्ची आहे.

कोण भारतमाता आणि कसलं वतन?

'ए मेरे वतन के लोगो' हे गाणं, ज्याचं मन भक्तीनं भारावलं होतं, त्यांच्यासाठी होतं. ते अमर गीत ऐकायला ते सुपुत्र हयात राहिले नाहीत. संधी मिळेल तेव्हा त्या गीताचं देशभक्तीचं नाटक करणारे नफ्फड नेते उरलेत, ते माथा झुकवण्यासाठी, अंतःकरण नाही.

आणि बुद्धानं अगदी या उलट संदेश दिला. 'अनुठी' भेट दिली. मन जर प्रेम आणि भक्तीनं वाहत असेल तर प्रार्थना करा.

परमात्मा, परमेश्वर असेल तर प्रार्थनेच्याच पथावर मिळेल. तुमच्या प्रार्थनेत आर्तता असेल तर तिथंच मंदिर आहे. काबा, दर्गा, मशीद, गुरुद्वारा तिथं निर्माण होईल.

शक्तीपुढे वाकलात तर ती राजनीती झाली.

सक्ती झाली म्हणून वाकलात, तर ती मजबुरी झाली.

झुकण्यापूर्वी, 'परमात्मा' आहे का?' –अशी चौकशी केलीत तर तो सौदा झाला.

झुकलो तर काहीतरी लाभ होईल, या लोभाचं दर्शन झालं.

तुम्ही परमात्म्यासमोर वाकलात आणि त्यानं काहीतरी देण्याऐवजी, तुमच्याकडे आहे,



तेही हिरावून घेतलं, तर तुम्ही वाकाल?

या एकाच विषयावर एक पुस्तक लिहिता येईल.

आत्मा-परमात्मा हे दोन शब्द वगळून, फक्त संसार, नोकरी, व्यवसाय, वडीलधारी माणसं, राज्यकर्त्यांपासून स्मगलर्सपर्यंत, फार कशाला, दूरदर्शनवर स्वतःची छबी काही क्षण दिसावी, म्हणून तिथल्या उद्धट अधिकाऱ्यांपुढे रांग लावणारी माणसं, उदाहरणासहित, एक पुस्तक होईल.

त्या दीर्घ लेखनातच बुद्धानं वेगळा धर्म कोणता दिला, ईश्वराचा उल्लेखही न करता किती जणांना 'ईश्वरत्ता' मिळवून दिली ते सांगता येईल.

जो स्वभावधर्म म्हणून वाकतो तो ईश्वर होतो.

ऐश्वर्य शब्दापासूनच ईश्वर शब्द निर्माण झाला.

आज ही फक्त एका मोठ्या ग्रंथाची प्रस्तावना. हे लेखन नियती माझ्याकडून लिहवून घेईल याची खात्री आहे.

माझ्या अस्तित्वाला मी स्वतः जरी कंटाळलो असलो तरी अजून जगतोय्.

पण प्रयोजन असलं तर ते त्याला माहीत; मी जगूनजगून थकलोय.

त्याच्या मनात येईल, तेव्हा तो मला हातात लेखणी घ्यायला भाग पाडील.

नाहीतर माझ्यापेक्षा जास्त प्रज्ञावंत माणसं कमी आहेत का?

मी किती व्यक्तींसमोर झुकलोय्, ते मला माहीत आहे.

यशवंत देव, सुरेशचंद्र नाडकर्णी, फॅमिली कोर्टाचे जज्ज पी.एल. जोशी, निर्मलकुमार फडकुले, राम शेवाळकर– किती शिखरं दाखवू?

त्यांच्या सर्वांच्या व्यासंगापुढे मी का वाकतो? तर त्याच कडेकपारीच्यामधून जे प्रेमाचे झरे, धबधबे कोसळतात, बुद्धीवर त्यांचं कोमल मन मात करतं, तेव्हा त्या श्रावणसरींमध्ये मी चिंब होतो.

परमेश्वरानं माझ्या मनात मिठाचे रांजण भरून मला जन्म दिला, हे त्याचे उपकार.

साखरेपेक्षाही मीठ किती तीव्र गतीनं पाण्यात विरघळतं हे आपल्याला माहीत आहे.

ही सगळी माणसं,

'दिल है कदमोंपे किसीके, सर झुकाया हो न हो
बंदगी तो अपनी फितरत है, खुदा हो या न हो'

या वर्गातली.



□

कम्युनिझमने माणसांना काय दिले हाही वादाचा विषय आहे. पण कम्युनिझमने लोकांना १०० टक्के साक्षर केले. एवढेच नव्हे तर वाचायलाही शिकवले. टॉलस्टॉय, दस्तयेवस्की किंवा पुष्किन वाचला नाही, असा टॅक्सी-ड्रायव्हरही मिळणे कठीण.

मॉस्कोतील मुक्कामात प्रकृती अस्वास्थ्यामुळे दोन तीन वेळा इस्पितळात राहावे लागले. तेथील सिस्टरने म्हणजेच नर्सने वॉर अँड पीस मधील नताशा, प्येअरे किंवा दस्तयेवस्कीचा रस्कोलनिव यांच्यावर चर्चा केली नाही असे झाले नाही.

या ग्रंथप्रेमाची मुख्य कारणे म्हणजे माणसाच्या अभिरुचीवर आणि नीतिमत्तेवर बेछूट आक्रमण करणारे टेलिव्हिजनचे भिकार डबडे मॉस्कोत नव्हते. याचा अर्थ टेलिव्हिजन नव्हता असे नाही. टेलिव्हिजन होता. पण त्यावर कम्युनिझमचा अखंड प्रचार चालायचा. त्यामुळे सहसा कोणी टी.व्ही लावत नसत. रात्री बरोबर ९ वाजता आमच्या नळाच्या पाण्याचा दाब कमी होत असे. (मी १२ व्या मजल्यावर राहत होतो.) इतक्या वक्तशीरपणे पाण्याचा दाब कमी का होतो याची मी सहज मित्राकडे चौकशी केली. तेव्हा तो असे म्हणाला, ''नरेंद्र, इतकी वर्षे मॉस्कोत राहून तुला काहीच समजले नाही. अरे, ९ वाजता टी.व्हीवर बातम्या सुरू होतात आणि तेवढीच माणसांना आंघोळीला सवड मिळते.''




कम्युनिझमच्या कंटाळवाण्या प्रचारातून सुटका करून घेण्यासाठी पुस्तके माणसांची सोबत करत. शिवाय मॉस्कोत त्या वेळी पुस्तकाच्या किंमती अक्षरशः अत्यल्प होत्या. ६०० पानी 'वॉर अँड पीस' कादंबरी मी फक्त ५ रुबलना घेतली होती. मराठीत आज तेवढ्या पुस्तकाला किमान दोनशे रुपये पडत असावेत. तरीही वाचनाची हौस असेल तर मार्गही असतात.

म्हणूनच उत्कृष्ट ग्रंथालये हे शहराचे वैभव आहे असे मला वाटते. मला स्वतःला लहानपणापासून ग्रंथालयाचे प्रचंड आकर्षण आहे. लंडनमध्ये असताना ब्रिटिश म्युझियमजवळच्या बागेतील बाकावर मी रोज संध्याकाळी जाऊन बसत असे. ब्रिटिश म्युझियम म्हणजे शारदेची खानदानी वास्तू आहे. जगातील प्रकांडपडित प्रतिभावान साहित्यिक, गाढे तत्त्वज्ञ आणि गाजलेले कवी इथे येऊन रमले होते, या जाणीवेने अंगावर रोमांच उभे राहत.



पुण्यात उत्कृष्ट ग्रंथालय कोठे आहे याचा म्हणूनच मी सतत शोध घेत असतो.


पुणे सोडून मॉस्कोला जाण्याआधी मी पुणे नगरवाचनमंदिर, कॉंटिनेंटल ग्रंथालय आणि किताबमिनार या तीन ग्रंथालयाचा वर्गणीदार होतो.

आज जवळजवळ ५-६ ग्रंथालयांचा मी वर्गणीदार आहे. पण या सर्वात एकच ग्रंथालय मला तीर्थस्थानासारखे वाटते. इतर ग्रंथालये म्हणजे ज्ञानाच्या नद्या असल्या, तरी ज्ञानगंगा म्हणावी अशी एकच वास्तू आहे.

कुमठेकर रस्त्यावर चित्रशाळा चौक ओलांडून सुमारे २५ पावले पुढे गेले की उजव्या हाताला फिनिक्स नावाचे ग्रंथालय आहे. हे ग्रंथालय तेथे आल्यापासून म्हणजे जवळजवळ १९५९ पासून मी या ग्रंथालयाचा सदस्य होतो. मॉस्कोहून पुण्यात आल्यानंतर तिकडे जाण्याचा योग जवळजवळ चार वर्षापूर्वी आला. सायकलवरून जाणाऱ्या सामान्य माणसाकडे रोल्स रॉइस यावी इतके या ग्रंथालयाचे स्वरूप बदलले होते.

पायऱ्या चढून गेल्यानंतर एक टेबल दिसते. टेबलामागे बसलेल्या व्यक्तीकडे मी निरखून पाहिले. सुमारे ६५ वर्षांचे प्रौढ, गंभीर चेहऱ्याचे गृहस्थ तेथे बसले होते. त्यांना मी जवळजवळ ३०-३५ वर्षांनी पाहत होतो. त्यामुळे डोक्यावरची काळी जुल्फे जाऊन टक्कल पडले होते. उरलेले केस पिकले होते. माझी त्यांना ओळख असेलच अशी खात्री नव्हती. म्हणून मी ग्रंथालयाच्या वर्गणीबद्दल, अनामत रकमेबद्दल चौकशी केली. ते उत्साहाने बोलू लागले. वेदशास्त्रसंपन्न पंडिताला वेदाबद्दल विचारताच त्याच्या तोंडातून अस्खलित वक्तृत्व ऐकू यावे तसे ते गृहस्थ बोलू लागले. एका वेळी एक पुस्तक, दोन पुस्तके किंवा एक पुस्तक एक मासिक किंवा विनामूल्य मासिक वगैरे वर्गणीदार होण्याचे अनेक प्रकार त्यांनी सांगितले. त्यांनी कुठेतरी थांबावे असे वाटल्याने मी विचारले,

''मला कमीतकमी आणि जास्तीतजास्त वर्गणी किती तेवढे सांगा.''



''महिन्याला २२० रु. एकावेळी एका पुस्तकाला आणि दहा हजार रुपये भरलेत आजीव वर्गणीदार होता येईल.''

ती वर्गणी ऐकून मी जरा हबकलोच.

मी त्या वेळी नेताजी सुभाषचंद्र यांच्या कांदबरी लिहीत होतो. त्या संदर्भात मला पुस्तके हवी होती.

मी लिहीत असलेल्या ग्रंथाबद्दल ऐकताच ते एकदम हर्षभरित झाले आणि त्यांनी माझ्यापुढे नेताजींच्या चरित्रासंबंधी जवळजवळ ५/६ पुस्तके ठेवली. त्यात समर गुहांचे 'नेताजी डेड ऑर अलाइव्ह', वि. स. वाळिंब्यांचे 'नेताजी', य. दि. फडके यांचे सुभाषचंद्रावरील दोन खंड, हरिहरदास

यांचे 'सुभाषचंद्र बोस अँड इंडियन नॅशनल मूव्हमेंट' ही पुस्तके तर होतीच. पण गोविंद तळवलकरांचे 'सत्तांतर', अत्र्यांचे 'सुभाषकथा', प्रा. ह. त्र्यं. देसाई यांचे 'रणझुंजार नेताजी' अशी अनेक पुस्तके होती. क्षणार्धात ही पुस्तके समोर आलेली पाहून मी चकित झालो.

ती तत्परता पाहून मी थक्क झालो.

आज फिनिक्स ग्रंथालयात जवळजवळ २७ हजार पुस्तके आहेत. माझे मित्र पोन्डा यांनी हे ग्रंथालय सुरू केले तेव्हा जेमतेम १०० पुस्तके होती. त्या वेळी स्टॅनले गार्डनर आणि ॲगाथा ख्रिस्ती यांच्या बहुतेक रहस्यकथा मी येथेच वाचल्या. आता वयानुरूप आवड आणि गरज बदलल्याने मला वेगळी पुस्तके लागतात आणि पोन्डा यांच्याकडून मला ती तात्काळ मिळतात. एवढेच नव्हे तर त्याच विषयावर इतर कोणती पुस्तके वाचावीत याचा ते सल्ला देतात.

पुस्तकांवर पोन्डांचे विलक्षण प्रेम आहे. म्हणूनच पुस्तकांची विविधता येथे आहे. एवढेच नव्हे तर प्रत्येक पुस्तक असे देखणे आहे की जणू कालच विकत घेतले आहे असे वाटावे. जाड पुठ्ठ्याच्या पुस्तकाला ते उत्तम बाइंडिंग करून घेतात. एवढेच नव्हे तर प्रत्येक बाइंडिंगला लॅमिनेशन केलेले असते. त्यामुळे पुस्तकाचा स्पर्शही गुळगुळीत आणि मुलायम वाटतो. याखेरीज प्रत्येक पुस्तकाच्या पहिल्या पानाच्या आधी ५०-६० पाने जोडलेली असतात. प्रत्येक पानावर त्या पुस्तकावर आलेले अभिप्राय असतात. माझ्या स्वतःच्या 'क्रेमलिनच्या बुरुजावरून' या पुस्तकात अशाच कागदांवर त्यांनी छापून आलेले जे अभिप्राय लावले होते ते मी स्वतःही आधी वाचलेले नव्हते.

या माणसाला पुस्तकाचे एवढे प्रेम, एवढे वेड कसे निर्माण झाले याबद्दल कुतूहल वाटल्याने मी त्यांच्या व्यक्तिगत जीवनाबद्दल त्यांना काही प्रश्न विचारले. त्यांना पुस्तकांची आवड कशी निर्माण झाली तेही विचारले.

पोन्डा मूळचे डहाणू उंबरगावचे. शाळेतील ग्रंथालयात पुस्तके वाचण्याची त्यांना गोडी लागली. तेव्हा शाळेत पुस्तके घरी नेऊन दिली जात नसत. तेव्हा पोन्डा नावाचा मुलगा कोणाचे लक्ष नाही असे पाहून हळूच ग्रंथालयात शिरायचा, हवे ते पुस्तक उचलायचा आणि ते चटकन घरी घेऊन जायचा. दुसऱ्या दिवशी परत त्या शिताफीने पुस्तक जागच्या जागी ठेवून द्यायचा आणि दुसरे पुस्तक घेऊन जायचा. अर्धी चोरी, अर्धी उसनवारी अशी ही अद्भुत कथा ऐकताच त्यांना मिठी मारावी असे मला वाटले.

अत्यंत बिकट परिस्थितीतून हा मुलगा वर आला. मुंबईच्या एका कंपनीत स्टेनोग्राफर म्हणून नोकरी केली. तेव्हा लोकलने जाण्यासाठी पैसे नसल्याने हा भाबडा कष्टाळू मुलगा विर्लेपार्लेहून चर्चगेटपर्यंत सायकल हाणीत जायचा. ऑफिसमध्ये जेवणाच्या सुटीच्या वेळी मिळालेला लंच अलाउन्स खर्च करून हा पुस्तक विकत घ्यायचा आणि समुद्राच्या रेतीत



बसून पुस्तक वाचायचा. समग्र टॉमस हार्डी आणि चार्ल्स डिकन्स त्यांनी असेच वाचले.

पुस्तकांच्या या अफाट प्रेमापोटी स्वतःचे ग्रंथालय काढावे अशी कल्पना मनात आली. तेव्हा १९५९ मध्ये सदाशिव पेठेत त्यांनी फिनिक्स ग्रंथालय थाटले. त्या वेळी येथे म्युझिक लायब्ररीही होती. छापील पुस्तकांएवढेच त्यांचे सुरांवरही प्रेम. अद्यायावत संगीताची आवड असल्याने ग्रंथाएवढाच ताज्या गाण्यांचा, सुरावटींचा उत्तम परिचय आहे.

एवढे समृद्ध ग्रंथालय असल्यानंतर लेखकमंडळी या ग्रंथालयाची वर्गणीदार झाली नसती तरच आश्चर्य! ग. वा. बेहेरे, अनिल अवचट, श्री. ज. जोशी वगैरे लेखक मंडळी फिनिक्सची वर्गणीदार होती.

ना. सी. फडके यांच्यासारखे धुरंधर लेखक आवडीने येथे येत आणि एकेका वेळी ५-६ पुस्तके नेत. कोण कुठली पुस्तके नेतो यावर तो माणूस समजतो असे मला वाटते. म्हणून मी विचारले की ही लेखकमंडळी कोणती पुस्तके नेत? तेव्हा पोन्डा म्हणाले, ''श्री. ज. जोशी यांना चरित्रवाङ्मयाची विशेष आवड होती.'' त्यांनी जरी सांगितले नाही तरी मी ओळखले की हे चरित्रग्रंथ श्री. जं. नी 'आनंदी गोपाळ' किंवा 'रघुनाथाची बखर' ही पुस्तके लिहिताना वाचले असावेत.

लेखक आले की किस्से आलेच. मी त्यांना काही लेखकांचे किस्से विचारले. त्यापैकी एक फार उद्बोधक वाटला.

एक दिवस थोराड बांध्याचा, राकट चेहऱ्याचा, चुरगळलेला पायजमा कुडता घातलेला माणूस खांद्यावर शबनम बॅग घेऊन लायब्ररीत आला. त्याने वर्गणी, अनामत वगैरेबद्दल चौकशी केली. त्या माणसाचा गावठी वेश पाहून पोन्डांना वाटले हा कुठला वर्गणीदार होणार? तेव्हा त्यांनी तटस्थपणे वर्गणी, अनामत वगैरेबद्दल माहिती पुरवली. एका पुस्तकाला २०० रुपये शिवाय अनामत रक्कम वगैरे माहिती ऐकून हा गृहस्थ बाहेर सटकणार असे पोन्डा यांना वाटले. पण त्या माणसाने खिशातून चेकबुक काढले आणि ७ वर्षांच्या वर्गणीचा चेक फाडून दिला.

जागच्या जागी खिळून गेलेले पोन्डा भानावर आले आणि त्यांनी विचारले, ''आपले नाव काय? मी पावती फाडतो.''

''माझे नाव ग. ल. ठोकळ.''

ते ऐकताच ताडकन उभे राहिलेले पोन्डा मटकन खाली बसले. त्यांनी भीतभीत विचारले, ''म्हणजे ते साहित्यिक ग. ल. ठोकळ..''

''हो हो. तोच मी ग. ल. ठोकळ.'' खणखणीत उत्तर आले. पुढे ग. ल. ठोकळ आणि पोन्डा यांची गट्टी जमली. ग. ल. ठोकळ किती रसिक होते, याच्या अनेक कथा पोन्डा रंगवून सांगतात.

मराठी साहित्यातील एक सनसनाटी साहित्यचौर्याचा किस्सा त्यांनी मला ऐकवला.

परंतु तो ज्याच्याबद्दल आहे, त्याचे नाव लिहू नका, असे नम्रपणे सांगितले. त्यांची नम्रता आणि सभ्यता पाहून वाटले, 'या फिनिक्स लायब्ररीत साहित्य आणि संस्कृती तर आहेच. पण दुर्मिळ असणारी सभ्यताही आहे.'

ही सभ्यता आहे म्हणूनच आपल्या पुस्तकांवर पोन्डा बिनधास्तपणे वाचकांना कठोर सूचना देणारा शिक्का मारू शकतात. तो असा,

'जर हे पुस्तक विक्रीकरिता आले किंवा ते फिनिक्स लायब्ररीत परत केले गेले नाही, तर ते चोरलेले समजावे.'

म्हणूनच पुण्याची संस्कृती फिनिक्स लायब्ररीने समृद्ध केली आहे असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती ठरू नये.

स्वतः पोन्डा गुजराती. पण मराठी अस्खलित आणि उत्तम बोलतात. त्यांच्या लायब्ररीतील २७६०० पुस्तकांवर लावलेल्या कात्रणांची संख्या २ लाख ४० हजार आहे. म्हणूनच लिम्का बुक ऑफ रेकॉर्डसमध्ये या लायब्ररीची निवड झाली आहे.

मला कोणते पुस्तक हवे आहे याची सूचना मी पोंडांना मी फोनवरून देतो. अत्यंत तत्परतेने ते पुस्तक माझ्यासाठी राखून ठेवले जाते. सलमान रश्दी यांचे 'ग्राउंडा बिनिथ हर फीट', स्टिफन किंग याचे 'बॅग ऑफ बोन्स', ज्युलिओ रिबेरो यांचे 'बुलेट फॉर बुलेट' जॉर्ज शेलचे 'सेरेनगेट्टी लायन्स' ही पुस्तके मी इथेच वाचली. अरुण शौरी यांचे 'मिसेस गांधीज सेकंड रन', शीला धर यांचे 'टेल ऑफ इनोसंट म्युझिशिअन्स अँड ब्यूरोक्रॅट्स', जाँ ससूनचे 'प्रिन्सेस अँड डेझर्ट रॉयल', झैलसिंग यांचे 'मेमॉयर्स' किंवा एस. एस. गिल यांचे 'डायनॅस्टी', अशी किती पुस्तकांची नावे सांगू की जी केवळ फिनिक्स लायब्ररीमध्येच मिळाली.

पुणे नगरवाचन मंदिराने शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त काही आदर्श ग्रंथालयांच्या ग्रंथपालांचा सत्कार केला. पोन्डा यांचाही सत्कार यात आयोजित करण्यात आला होता. परंतु पोन्डा यांनी या समारंभाला उपस्थित राहण्याला नम्रतापूर्वक नकार दिला. ते ऐकून मला आश्चर्य वाटले. माझ्या नजरेतील रोख ओळखून ते म्हणाले,

''यामध्ये मला उद्धटपणा अभिप्रेत नव्हता. उलट मी या सत्काराला कितपत लायक आहे, याची मला शंका आहे. शिवाय प्रसिद्धीच्या झगमगाटात येण्याला मला अतिशय संकोच वाटतो.''

ते ऐकून पोंडांविषयी माझा आदर द्विगुणित झाला. प्रसिद्धीच्या प्रकाशात येण्याला प्रत्येकजणच धडपडत असतो. पण 'मला प्रसिद्धी नको' असे म्हणणारा पोंडांसारखा विरळच.

हा आत्ममग्न आणि ग्रंथमग्न ग्रंथप्रेमी आपल्या ग्रंथांची सेवा करण्यात धन्यता मानून घेत आहे.



पुस्तके जपणे हे त्यांचे जीवितकार्य म्हणजे लाइफ मिशन असल्यासारखे वाटते. पुस्तके कशी वापरावीत हेही शास्त्र आहे.

संस्कृतमध्ये एक सुभाषित आहे. ग्रंथांचे रक्षण कसे करावे, तर 'जलाद्रक्षेत तैलातरक्षेत रक्षेत शिथिलबंधनात्' असे म्हणणाऱ्या सुभाषितकारांनाही ग्रंथांची काळजी कशी घ्यावी हे त्यावेळीही कळले होते.

फिनिक्स लायब्ररीतून घेतलेली पुस्तके पीव्हीसी बॅगमधून अत्यंत निगुतीने दिली जातात. त्यावर रबर बँड लावला जातो. अशाच अवस्थेत ती परत करावीत असा त्यांचा एक दंडक आहे. समर्थ रामदासांनी दासबोधात म्हटले आहे तशी पुस्तकाची निगा राखली जाते.

*नाना गोप नाना बासने। मेण कापडे सिंदुरवर्णे।*
पेट्या कुलपे जपणे। पुस्तकाकारणे।।

(दासबोध– १९-१-२०)

म्हणूनच फिनिक्स लायब्ररीमध्ये येताना किंवा जाताना मला इमर्सनचे ते प्रख्यात सुभाषित आठवते,

A company of the wisest and wittiest men that could be picked out of all civil countries in a thousand years has set in best order the results of their learning and wisdom.

या समृद्ध, शिस्तबद्ध फिनिक्स लायब्ररीला कसे वंदन करावे असा मला नेहमीच संभ्रम पडलेला आहे. जाफ्रे कोटेरेल यांचे एक वाक्य माझ्या चांगलेच स्मरणात आहे. ते म्हणतात, ''अमेरिकेत प्रत्येक यशस्वी लेखक हा महत्त्वाचा असतो. फ्रान्समध्ये सर्व लेखक महत्त्वाचे असतात. इंग्लंडमध्ये कुठलाच लेखक महत्त्वाचा नसतो. ऑस्ट्रेलियात लेखक म्हणजे काय हे समजावून सांगावे लागते.''

पुणे विद्वत्तेचे माहेरघर आहे असे म्हणतात. तरीही पुणेकरांना आज ग्रंथालय म्हणजे काय हे समजावून देण्याची वेळ आलेली आहे. ते समजून घ्यायचे असेल तर ७२७, सदाशिव पेठ येथील फिनिक्स लायब्ररीला अवश्य भेट द्यावी. वाचनाची आवड असेल तर उत्तमच. तशी आवड नसली, तर ती निर्माण करण्याचे सामर्थ्य यात आहे.

पण वाचनाची आवड असो वा नसो, या लोकविलक्षण ग्रंथपालाने आपले ग्रंथ सुरक्षित राहावेत म्हणून फिनिक्स ग्रंथालयाच्या प्रत्येक पुस्तकावर ज्या सूचना चिकटवलेल्या आहेत, मात्र त्यांचे पालन केलेच पाहिजे.

या सूचनांत म्हटले आहे,

''कोणत्याही ग्रंथालयातील पुस्तके ही समाजाची असतात. ग्रंथपाल आणि त्यातील कर्मचारी हे केवळ विश्वस्त असतात. दुर्मिळ पुस्तकांचा संग्रह असलेले खास ग्रंथालय हे

प्रत्येक वाचक, लेखक आणि पंडिताला महत्त्वाचे असते. ग्रंथालयाचे अस्तित्व वाचक पुस्तके कशी हाताळतात त्यावर अवलंबून असते. म्हणून आम्ही विनंती करतो की सर्व वाचकांनी या ग्रंथालयाचे नियम पाळावेत. शिस्त नसलेली ग्रंथालये लयाला गेली आहेत. म्हणूनच सर्व ग्रंथप्रेमी आणि सामाजिक जाणीव असलेल्या व्यक्ती यांना कळकळीची विनंती की,

१) पुस्तकाची पाने हळुवार उलटा. बोटाची थुंकी लावून किंवा पानांवर दाब देऊन पाने उलटू नका.

२) पुस्तक बगलेत ठेवू नका.

३) एकावेळी एकच पुस्तक हाताळा. कोणत्याही पुस्तकाला १८० अंशाची उष्णता लागू देऊ नका. पुस्तक हाताळताना पृष्ठभागाचा किंवा मागील पुठ्ठा लोंबता ठेवू नका.

४) पुस्तक हातात घेण्याआधी किंवा वाचण्याआधी हात साबणाने स्वच्छ धुवा.

५) सायकलच्या कॅरियरवर किंवा वरून दाब येईल अशा प्रकारे पुस्तक ठेवू नका.

६) पुस्तक वाचायचे नसेल तेव्हा ते आम्ही दिलेल्या स्वच्छ, मऊ पीव्हीसी बॅगमध्ये जपून ठेवा आणि पुस्तक लायब्ररीतून नेताना किंवा परत करताना याच पिशवीतून न्या किंवा आणा.

७) पुस्तक निवडताना आपल्या खाजगी वस्तू किंवा बॅगा बाजूला ठेवा.

८) पुस्तक वाचताना छापील ओळीवरून आपले बोट फिरवू नका.

९) वरून पुस्तक काढताना ते खेचून काढू नका. पुस्तकाच्या वरचा सुमारे २ इंच भाग चिमटीत धरून ते बाहेर काढा.

१०) पुस्तकात खुणेसाठी मोरपीस ठेवू नका. त्याऐवजी चित्र किंवा कपटा ठेवा.

अशा सुमारे २१ सूचना पुस्तक हाताळण्यासाठी फिनिक्स लायब्ररीने दिलेल्या आहेत.

मला वाटते फिनिक्स केवळ ग्रंथालय नसून ते ग्रंथमंदिर आहे.

पुण्याच्या सांस्कृतिक वैभवातील ते एक मानचिन्ह आहे.

शनिवारवाडा, पर्वती वगैरे ऐतिहासिक स्थळांबरोबरच पुणे बघण्याची हौस असणाऱ्या प्रत्येकाने फिनिक्स लायब्ररीला भेट दिल्याखेरीज पुण्याचा सांस्कृतिक दौरा पूर्ण होणार नाही हे नक्की.

**नरेंद्र सिंदकर–** १ श्री अपार्टमेंट, सिद्धिविनायक मंदिर, आझादनगर, कोथरूड, पुणे ४११०२९, फोन ३४१८५५

□



# बंदगी तो अपनी फितरत है
# खुदा हो या न हो।

**वसंत पुरुषोत्तम काळे**

गौतम बुद्धानं समाजाला दिलेली सर्वात श्रेष्ठ देणगी कोणती?

–परमात्म्यापासून त्यानं धर्माला मुक्त केलं.

परमात्मा म्हणजे नक्की काय? हे मला समजलेलं नाही.

जिथं अद्यापी माणूसच समजला नाही, तिथं परमात्म्याची गोष्टच सोडा.


तरीसुद्धा गौतम बुद्धाला जे अभिप्रेत आहे.

ते समजण्यासारखं आहे. ते नुसतं ऐकण्यासारखं नाही, तर समजण्यासारखं आहे. आचरणातसुद्धा आणण्यासारखं आहे.

वयाच्या अडुसष्ठाव्या वर्षी एक नवीन विचारधारा मिळाली.

बुद्धाचं कोणतंही विधान ऐकलं, म्हणजे स्वतःचं खुजेपण जाणवतं. त्या विशाल सह्याद्रीपुढे आपली उंची 'स्पीडब्रेकर' एवढीसुद्धा नाही याचं आकलन होतं.

'शल्य' वाटतं. असं म्हणता येत नाही.



'शल्य' वाटतं असं म्हणताक्षणी अष्टावक्र कान धरायला तयारच आहे.

'तू साक्षी हो. द्रष्टा हो' असं सांगणारा अष्टावक्र. आनंद झाला किंवा खेद झाला. तर ती आपली मानसिक, भावनात्मक गुंतवणूक झाली.

आपण जसे जन्माला आलो, तसंच ते येणं योग्य आहे, हे मान्य करणं म्हणजे 'साक्षीभाव'.

इथंही एक वेगळा 'स्पीडब्रेकर' आहे. 'मान्य करणं' याचा अर्थ वैचारिक पातळीवर असा होतो. 'स्वीकारणं' जास्त संयुक्तिक.

# नच सुंदरी करु कोपा

**वसंत कानटेकर**

*प्रा. वसंत कानटेकर हे विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातले मराठीतील सर्वोत्कृष्ट नाटककार. त्यांच्या चाळीस नाटकांपैकी बहुसंख्य नाटकांना मराठी प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. कानेटकरांच्या नाटकांमुळे अनेक नटनटींना आपल्या जीवनातील सर्वोत्तम भूमिका करण्याची संधी मिळाली, अनेक नाट्यसंस्थांना आर्थिक व व्यावसायिक यशाचे शिखर गाठता आले. विविध धाटणीची प्रयोगशील तरीही व्यावसायिक दृष्ट्या चांगली चालणारी नाटके गेली ४२ वर्षे कानेटकर देत आले आहेत. रायगडाला जेव्हा जाग येते, अश्रूंची झाली फुले, हिमालयाची सावली, प्रेमा तुझा रंग कसा, गगनभेदी, घरात फुलला पारिजात, मत्स्यगंधा, अखेरचा सवाल, लेंकुरे उदंड झाली, मला काही सांगायचंय– वगैरे नाटकांची नावे घेतली तरी विशिष्ट नायकनायिका आणि नाट्यसंस्थांचे स्मरण होते.*

*'नच सुंदरी करू कोपा' हे त्यांचे ताजे नाटक. ४१ वे नाटक. संगीत सौभद्राचे हे एका परीने सद्यःकालीन रूप आहे. त्यातील नांदी व एक प्रवेश येथे देत आहोत.*

---


**वसंत कानेटकरांची मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे प्रकाशित होणारी नाटके**

*नजराणा आणि इतर एकांकिका*
*देवाचं मनोराज्य*
*दोन ध्रुवावर दोघे आपण*
*अखेरचा सवाल*
*गगनभेदी*
*सोनचाफा*
*औषध मजला न लगे*
*रंग उमळत्या मनाचे*
*तेथे चल राणी*
*दिव्यासमोर अंधेर*
*आकाशमिठी*
*शहाण्याला मार शब्दांचा*
*वेड्याचं घर उन्हात*
*बेइमान*
*जिथे गवतास भाले फुटतात*
*माणसाला डंख मातीचा*
*प्रेमात सगळंच माफ*
*नच सुंदरी करू कोपा*




# नांदी

## नच सुंदरी करु कोपा

## अंक पहिला– प्रवेश पहिला

(परंपरेप्रमाणे सूत्रधार आणि दोन्ही बाजूला परिपार्श्वक हातात फुलांचे तबक घेऊन ईशस्तवन म्हणतात.

### ईशस्तवन

जय श्री शंकर! उमा-महेश्वर!
प्रसन्न होवो आम्हा नटेश्वर!
खेळ मांडिला मंदिरात या कैलासेश्वर तुझ्या कृपेवर.
॥धृ.॥ जय श्री शंकर.
नाट्यकृती 'सौभद्र' निर्मिली कविराये बलवत् किर्लोस्कर.
तिचाच हा 'अवतार आधुनिक' आम्ही करतो तुलाच सादर.
सुवर्ण पात्री नव्या, जणू ही, 'नाट्य-शांभवी', जुनीच रुचकर,
स्वाद घेऊनी आशीर्वच दे रंगकर्मींना रंगभूमीवर!
॥धृ.॥ जय श्री शंकर.


स्तवन संपल्यावर तबकातील फुले प्रेक्षकावर उधळून परिपार्श्वक दोन्ही बाजूंनी जातात. मग सूत्रधार हात जोडून प्रेक्षकांच्या पुढे येतो आणि–)

सूत्रधार : नमस्ते! महाजनहो नमस्ते! पूज्यभावनेने आम्ही केलेले ईशस्तवन ऐकून आपण रसिकराज संतुष्ट झाला असाल. आज फार दिवसांनी नाट्यमंदिरात आपली ही अशी भेट होत आहे. नाट्यनिर्मात्यांना आणि प्रेक्षकांना 'सूत्रधार–नटीच्या' प्रवेशाची आता गरज उरली आहे कोठे?
''कारण.. सगळा जमानाच आता बदलला आहे.
सगळ्यांना, सर्व प्रकारची, सगळ्या बाबतीत, घाई झाली आहे.
नको प्रस्तावना, नको पाल्हाळ!
नको स्वागत, नको स्वगत!

नको रडारड, नको आरडा ओरड.
थोडे प्रेम शिंपडा, थोडा राग ओता,
थोडे हसू घाला, थोडे आसू मिसळा
आणि अशी 'खमंग मिसळ' एकदम वाढा
कारण सगळे कसे झटपट उरकायचे आहे!
लक्षात ठेवा– शेवटची गाडी पकडायची आहे.

– असल्या नाटकांचा जमाना चालू आहे. मंडळी तुमच्या लक्षात आलं आहे का? आजच्या आमच्या नांदीच्या कार्यक्रमात नेहमी नटून थटून पुढाकार घेणारी माझी प्रिय सखी आज उपस्थित नाही. ''कोठेही जा, सतत आपला बायकांना उशीर'' हे काही तिच्या आजच्या अनुपस्थितीचं कारण नाही. आम्ही आपल्या समोर आज एक नवा खेळ मांडायचं ठरवलं आहे. पण तिला आजकालची बायकांच्या हातरुमालासारखी वीतभर नाटके आवडत नाहीत. मी तिला म्हटलं– ''हे नाटक अगदीच नवं आहे असं समजू नकोस; लेखक महोदय म्हणतात त्याप्रमाणं 'नव्या बाटलीत जुनी दारू' असंच या नाटकाचं रूप आहे.'' कै. किर्लोस्कर यांच्या संगीत सौभद्र या अजरामर नाटकाला लेखकानं केलेला मानाचा मुजरा म्हणजे हे नाटक!

''बलवत् कविवर्यें। आपुल्या परिमित् चातुर्यें..'' असे सौभद्र नाटक किर्लोस्करांनी रचिले आहे आणि आपण त्यांच्याच पावलांवर पावले टाकीत ''नच सुंदरी करू कोपा'' अर्थात 'संगीत सौमित्र' हे नाटक रचले आहे, असे नाटककार सांगतात. डोळे उघडून पाहिले तर कळून येईल की जमाना बदलला असला तरी माणसे तशीच आहेत, त्यांच्या समस्या, सुखदुःखे, त्यांचे रागलोभ आसू आणि हसू सगळे तद्दन तसेच आहे. महाभारतकाली 'कौरव आणि पांडव' यांचे युद्ध झाले असले, तर आज निवडणुकीच्या प्रांगणात 'कोरे आणि पांडे' यांच्या लढतीचे नगारे झडू लागले आहेत. या पुण्यपत्तन नगरीतले सधन शेतकरी आणि कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष आमदार बलरामजी यादव यांना कोण ओळखत नाही? त्यांचे धाकटे बंधू प्रा. डॉ. शामसुंदर वासुदेव यादव आपल्या विद्वत्तेमुळे, अध्यापन कौशल्यामुळे आणि हौशी नाट्यसंस्थांतील कामगिरीमुळे किती लोकप्रिय झाले आहेत! (डोळे मिचकावित) खास करून तरुण महिला समाजात तर फारच! त्या वेळच्या कृष्णाप्रमाणे





या शामसुंदरनं देखील विदर्भातल्या अमरावतीच्या एका प्रख्यात मालगुजाराची रूपसुंदर तरुण मुलगी चक्क पळवून आणून तिच्याशी लग्न केलंय. त्यांची धाकटी भगिनी सुमित्रा म्हणजे दुसरी सुभद्राच! मेजर धनंजय पांडे यांच्याशी तिचे रंगलेले प्रेमप्रकरण तर तुमच्या कानावर नक्कीच आले असले पाहिजे. पण त्यांच्या प्रेमाचा बोभाटा कितीही झाला असला तरी त्या दोघांचं लग्न काही होत नाही. कारण धनंजयाला आपली बहीण सुमित्रा द्यायला खुद्द बलरामजींचा सक्त विरोध आहे. त्या दोघांच्या विवाहाबद्दल खुद्द यादव कुटुंबातच खूप भांडण तंटा चाललाय. आपले लग्न सुमित्रेशी होण्याची सुतराम शक्यता नाही, हे कळल्यापासून धनंजय निराशग्रस्त झाला आहे. आणि कोठे रानावनात वा गिरिकंदरी लष्करी नेमणुकीच्या निमित्ताने परागंदा झाला आहे असे–

(तोच कडाडून केलेली गर्जना ऐकू येते– ''कोण? कोण तो, हरामजादा, बदमाश, मी रानावनात वा गिरिकंदरी परागंदा झालोय म्हणून माझी नालस्ती करतोय? अशा नीच खोटारड्या अफवा पिकवणाऱ्या अधमाधमाला मी गोळी घालूनच यमसदनाला पाठवतो..'')

सूत्रधार : (पहिल्या गर्जनेपासूनच घाबरगुंडी उडून) अरे बापरे! हा तर धनंजयाचा आवाज दिसतोय! इथल्या जंगल कॅम्पवरच त्याची नेमणूक झालीये की काय?– छे छे! तो इथं यायच्या पूर्वीच आपण इथून पसार व्हावं हे बरं (जाऊ लागतो, पण थबकून) कीऽऽ नाटकातल्याच एखाद्या भूमिकेत उतरून गंमत करीत दुरून मौज बघावी? हां रे हां! ही युक्ती नामी दिसतेय.

(लगबगीने आत जातो. दुसऱ्या बाजूने तावातावात रायफल उगारलेला मेजर धनंजय बाहेर येतो. अंगावर नखशिखांत लष्करी वेश. आल्या आल्या गर्जना करीत–)

धनंजय : कुठाय कुठाय तो अधमाधम चांडाळ? (सर्वत्र पहात) पाठीला पाय लावून पळालेला दिसतो. भेदरट कुठचा! या आगंतुक, चोंबड्या आणि नतद्रष्ट लोकांचं मला नेहमी आश्चर्य वाटतं. ज्याच्याशी आपला काडीमात्र संबंध नाही, अशा दुसऱ्याच्या जीवनातील घडामोडीबद्दल, आपली बेलगाम जीभ सैल सोडताना या हरामखोरांना शरम कशी वाटत नाही? म्हणे मी सुमित्रेशी लग्न होत नाही म्हणून निराशेनं रानावनात परागंदा झालो आहे. या जंगलकॅम्पवर 'सेकंड-इन्-कमांड' म्हणून माझी बदली झाली आहे हे काय ह्या चोरांना ठाऊक नाही? पण गेल्या कितीतरी दिवसात सुमित्रेचं मला पत्र आलं नाही.

माझ्या माघारी तिकडं पुण्यात काही विपरीत तर घडलं नाही?
(तेवढ्यात मघाचा सूत्रधार आता बाबामुनींच्या वेशात– ''नमस्ते कमांडर साहेब नमस्ते!'' म्हणत येतो. धोतराचा काचा खादीचा सदरा, वर जाकिट, गळ्याला मफलर, डोक्यावर नारदमुनी सारख्या जटा, खांद्याला शबनम पिशवी, डोळ्याला चष्मा– असा अवतार.)

धनंजय : नमस्ते! (नीट पाहून) अरे! तुम्ही बाबामुनी आणि इकडे कुठे जंगलात धडपडलात?

बाबामुनी : कोण, तू धनंजय पांडे का रे? या लष्करी वेशात प्रथमच पहातोय मी तुला, म्हणून एकदम ओळखलं नाही. तुमच्या कॅम्पवर वर्तमानपत्रासाठी मी एक बातमी तयार करतोय; त्यासाठी फोटो घ्यायला मी इथं आलो होतो. पण तू भेटलास. बरं झालं. तुझ्याकडंही माझं काम होतंच.

धनंजय : का? माझ्याकडे काय काम काम काढलंत तुम्ही?

बाबामुनी : अरे लग्नाच्या निमंत्रणासारखं दुसरं गोड काम कोणतं असणार? काहीही करून तुला यायलाच हवं, असं सगळ्यांचं म्हणणं आहे. रजेचा अर्ज टाक आणि चल माझ्याबरोबर, येतोस? (गातो.)
''.. चल जाऊ लग्नाला पुण्यपत्तना.
द्याया मी खास आलो तुज निमंत्रणा.''

धनंजय : (गद्यात) लग्न? कुणाचं लग्न? कुणाचं निमंत्रण?

बाबामुनी : (गातो).. ''गाजणार भव्यदिव्य लग्न सोहळा,
अवघ्या शहरास येई उत्सवी कळा.
मौज बघाया न मिळे संधी अशी पुन्हा।। चल जाऊ.''

धनंजय : (गद्यात) एवढा उत्सवी सोहळा म्हणता, तर तो कोऱ्यांच्याच घरचा असणार. सुयोधन कोऱ्यांचं लग्न तर काढलं नाही?

मुनी : (गातो).. ''लक्ष भोजने झडतील लग्न मंदीरी
नटूनी थटूनी मिरवतील रूप सुंदरी!..''

धनंजय : ''लक्ष भोजनवाले'' म्हणजे कोरेच, दुसरे कोण असणार?

मुनी : (गातो).. ''रात्रीचा बहर येई नृत्य गायना
छपून रसिक करतील कुणी ''हूं हूंऽ'' (अंगठ्याने दारू सुचवित) प्राशना.
(पुन्हा तीच ओळ म्हणत) छपूनी रसिक करतील कुणी मद्यप्राशना।
मौज बघाया न मिळे कधी अशी पुन्हा।। चल जाऊ.''

धनंजय : (गद्यात) अस्सं अस्सं। म्हणजे मग तो कोऱ्यांचा गुंड मवालीच असणार; पण त्याला मुलगी तरी कोण देतोय?



मुनी : (गातो).. ''यादव बलराम देई ज्याला वचना
कुस्तीगीर नामे कुणी तो असे 'धना'।

धनंजय :(गद्यात) 'धना' म्हणजे मीऽऽ? छे छे ते कसं शक्य आहे. बलरामजी तर ढुंकूनही माझ्याकडं पाहाणार नाहीत की माझं नाव घेणार नाहीत.

मुनी : (गातो) ''छे रे तो तू नव्हेस–

धनंजय :(गद्यात) मी नाही तर दुसरा कोण?

मुनी : (ओळ पुरी करत गातो).. ''कुणीही असेना?
मौज बघाया न मिळे कधी अशी पुन्हा।। चल जाऊ.''

धनंजय :(गद्यात रागाने) नाही नाही. आधी तो कोण ते मला समजलंच पाहिजे.

मुनी : हात्तिच्या! एवढंच ना? सांगतो की
(गातो).. ''राम शाम यांच्या जो येतसे मना
सुमित्राही आतूर ज्याच्याच दर्शना
तो नव्हेस तूऽऽ बाकी कुणी असेना
मौज बघाया न मिळे अशी कधी पुन्हा।। चल जाऊ.''

धनंजय :(ओरडून अंगावर धावून जात) नाही नाही कोण आहे तो नीच कपटी विश्वासघातकी? (बाबामुनींचे खांदे धरून घुसळत) सांगा मुकाट्यानं सांगता कीऽऽ–

मुनी :सांगतो, बाबा सांगतो–
(गातो).. ''राम शाम यांच्या जो येतसे मना
जेष्ठ पुत्र कोपऱ्यांचा तो– ''सुयोधना''!!!
(गद्यात) कळलं?

धनंजय :(कपाळावर हात मारून घेत) सुयोधन? हरे राम! म्हणजे सगळं संपलंच म्हणायचं (क्षणभरानं सावरून) पण बलरामजींच्या या बेताला सुमित्रेनं थोडासुद्धा विरोध केला नाही?

बाबामुनी : केला असेल, पण तिला कोण जुमानतो?

धनंजय :निदान शाममैय्यानं तरी विरोध करायचा.

बाबामुनी : अरे, तू त्या भामट्याला पुरता ओळखला नाहीस. महाबिलंदर माणूस तो. तो फक्त वारा येईल तिकडं पाठ फिरवणार.

धनंजय :या जगात कोणावरही विश्वास ठेवणं आता मला शक्य नाही. माझ्यापुढं आता एकच मार्ग उरलाय! सर्वसंग परित्याग आणि संपूर्ण संन्यास.

बाबामुनी : शिव! शिव! शिव! अरे तू महा पराक्रमी शूर वीर आणि काय ही तुझ्या तोंडात भाषा? बाकीऽऽ तुझंही एका दृष्टीनं बरोबरच आहे.

नाट्य

.. बोलून चालून प्रेमातल्या या नाजूक भानगडी,
लढाई करून कधी करता येते का त्यावर कडी?
खुद्द प्रेयसीच करते जेव्हा विश्वासघात,
तेव्हा संन्यासाशिवाय दुसरी कोणती उरणार बात?
अखेर ''ब्रह्मसत्यम् जगन् मिथ्या'' हेच खरं!
तेव्हा तू संन्यास घ्यावास हेच बरं!

धनंजय :(हात जोडत) बाबामुनी, तुम्ही आता गप्प बसायला काय घ्याल? तुम्ही जा इथून म्हणजे मला सगळं पावलं

बाबामुनी : जाणार तर आहेच. पण संन्यास घेण्याचा तुझा बेत पक्का ठरल्यावर मला फोन करून कळव. तत्पूर्वी संन्याशाच्या वेशात एखादा फोटो काढूनही पाठवून दे. मी पेपरला ही बातमी पहिल्या पानावर ठळक टायपात तुझ्या फोटोसह–

धनंजय :(ओरडून) बाबामुनी–

बाबामुनी : ओरडू नकोस. जातोच आहे मी. पण घरातल्या मंडळींना, म्हणजे– सुमित्रा, शामभैय्या इत्यादिकांना तुझा काही 'अखेरचा निरोप' द्यायचा असला तर–

धनंजय :(ओरडून) मी त्यांना मेलो आणि तेही मला मेले. समजलात? (तावातावाने जातो.)

बाबामुनी : (हसून पहात) ठीक आहे! ठीक आहे! तसे सुखासुखी कोणी मरत नाही! आता ही बातमी यादवांच्या परिसरात मोठ्या शिताफीने पेरली पाहिजे. म्हणजे मग काय– मौजच मौज!

(..''मौज बघाया न मिळे संधी जशी पुन्हा'' असे खुषीत गुणगुणत, नाकात तपकीर ठाशीत बाबामुनी जातो आणि इथेच नांदीचा प्रवेश संपतो.) □


| लाइफ-स्टाइल | नष्ट मेयेर नष्ट गद्य |
| --- | --- |
| सुधीर गाडगीळ | अनु. मृणालिनी गडकरी |
| वेगवेगळ्या क्षेत्रांत सर्वोच्च स्थानी असलेल्या तीस महाराष्ट्रीयांची जीवनशैली खुसखुशीत शब्दांत! | बंडखोर आणि प्रखर बुद्धिमान अशा तसलिमा नासरिन यांचा दाहक परंतु संजीवक विचारांचा लेखसंग्रह. |
| किंमत १२०/- | किंमत १२०/- |
| सवलतीत १०२/- | सवलतीत १०२/- |
| सभासदांना ९०/- पोस्टेज १५/- | सभासदांना ९०/- पोस्टेज १५/- |




**पुण्याच्या सांस्कृतिक वैभवातील एक मानचिन्ह**

# फिनिक्स-लायब्ररी, नव्हे ग्रंथमंदिर

**नरेंद्र सिंदकर**

व्यक्ती, शहर, राज्य आणि राष्ट्र या प्रत्येकाच्या वैभवाची, श्रीमंतीची एक विशिष्ट खूण असते. सर्वसाधारणपणे कुठल्या स्त्रीकडे किती साड्या आहेत, यावर तिची श्रीमंती ठरवण्याचा स्त्रियांचा स्वतंत्र निकष असतो. कोणाकडे फ्लॅट आहे, तो किती मोठा आहे, त्याच्याजवळ दुचाकी आहे की चारचाकी यावर त्याचे वैभव तोलण्याची अनेकांची प्रवृत्ती आढळते. कोणाच्याही घरात गेल्यानंतर दिवाणखान्यातील फर्निचर, सजावट यावरून यजमानांचा ऐवज किती आहे हे माणसे ठरवतात.


शहराचे वैभव तेथील रस्ते किती स्वच्छ, प्रशस्त आहेत यावर ठरवावे की रस्त्यावरून किती गाड्या धावतात यावर ठरवावे हा वादाचा प्रश्न असू नये. माझी स्वतःची निम्मी हयात युरोपात गेली असल्याने मॉस्कोतील प्रशस्त रस्ते, स्वच्छता, जर्मनीतील खड्डाच काय पण छिद्रही नसलेल्या सडका म्हणजे देखणे, लांबलचक, 'ऑटोबॉन', पॅरिस, रोम किंवा लंडन, मँचेस्टरमधील उत्तुंग इमारती शहराचे खरे वैभव दाखवतात.

राज्य किंवा राष्ट्र यांचे वैभव दरडोई उत्पन्न वगैरे सांख्यिकी भाषेत सांगावे लागते. त्यामुळे ती चर्चा जरा रुक्षच वाटते.

संपत्तीचे किंवा वैभवाचे हे जे निकष सांगितले, त्यात कटाक्षपूर्वक मी आणखी एका संपत्तीचा उल्लेख केलेला नाही. ही संपत्ती म्हणजे ग्रंथसंपत्ती. तुमच्या घरी किती पुस्तके आहेत, असा प्रश्न कोणीही आणि कोणालाही विचारावा. घरात लहान मुले असली तर त्यांची क्रमिक पुस्तके धरून घरटी ५ किंवा १० तरी स्वतःची पुस्तके असतील किंवा नाही याची शंकाच आहे. कारण पुस्तके विकत घेऊन वाचायची असतात ही संकल्पनाच अद्याप आमच्याकडे रुजलेली नाही. मी मॉस्कोत असताना अनेक रशियन माणसांच्या घरी जाण्याचा प्रसंग आला. अक्षरशः प्रत्येक रशियन घरात प्रत्येक माणसाचे लहानसे ग्रंथालय आढळले. साध्या घरातही कमीतकमी ५० पुस्तके तरी आढळली. कम्युनिस्ट राजवटीमुळे त्यातली किमान पाच तरी लेनिनची पुस्तके असतील. पण टॉलस्टॉय, पुष्किन, दस्तयेवस्की, चेकॉव्ह किंवा गोगोल यांचे एखादे तरी पुस्तक नाही असे एकही घर मला आढळले नाही.

## वाचनीय पुस्तके

### मूल




अपत्यप्राप्तीसाठी तळमळणाऱ्या, त्यासाठी अनेक दिव्यातून जाणाऱ्या संवेदनशील दांपत्याची ही हृदयद्रावक कथा.

निवेदन, डायरी, कविता अशा तीन आकृतीबंधाच्या एकत्र गोफातून कादंबरी उलगडत जाते. या प्रकाराचा संमिश्र वापर हा अगदी नवा आहे. जीवनात येणाऱ्या विपत्तीशी झगडताना सावरणारे, कोलमडणारे संवेदनशील मन व अस्वस्थ करणारे अनुभव याचे कसदार चित्रण या कादंबरीत घडते. महत्प्रयासाने झालेल्या अपत्याचा मृत्यू, त्याची वेदना व पुन्हा त्याच दिव्यातून साकारलेल्या दुसऱ्या अपत्याची प्राप्ती. या संघर्षमय अनुभवांची मनाला चटका लावणारी कादंबरी. मूळ किंमत: ९०रु.सवलतीत: ७५रु.सभासदांना:६६रु. पोस्टेज: १५रु.

### बिझिनेस महाराजे

बिझिनेस महाराजे म्हणजे भारतातील आठ विख्यात उद्योगपतींची चैतन्यात उसळणारी सजीव शब्दचित्रं. यात बोर्डरूममध्ये झालेले लढे, झुंजी, संघर्ष, डावपेच, शह, काटशह यांच्या माहितीसह या उद्योगपतींनी आपली साम्राज्ये कशी उभारली, अन्य उद्योगपती जिथे अयशस्वी ठरले तिथे त्यांनी यशाचे गड कसे सर केले याचे रोमहर्षक वर्णन आहे. विख्यात उद्योगपतींच्या विराट कर्तृत्वाचा, साम्राज्याचा हा शोधक, वेधक व रोचक आलेख.




मूळ किंमत: २५०रु. सवलतीत:२१३रु.
सभासदांना: १८८रु. पोस्टेज: १५रु.

**अधिक माहितीसाठी लिहा**

मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६ सदाशिव पेठ, पुणे ३०



# आठवणींचा मोहोर

**न्या. राजाभाऊ गवांदे**

*न्या. राजाभाऊ गवांदे यांचे नाव चंद्रकांत काकोडकर यांच्या रंभा मासिकात आलेल्या 'श्यामा' या कादंबरीवर अश्लीलतेच्या आरोपावरून झालेल्या खटल्यामुळे मराठी वाचकांच्या विशेष नजरेत भरले. ना.सी.फडके, आचार्य अत्रे, यांच्या त्या खटल्यातील साक्षी गाजल्या. न्या. राजाभाऊ गवांदे यांनी आरोपींना निर्दोष सोडाले; त्यावरील अपिलात मुंबई उच्च न्यायालयाचे न्या. माधवराव परांजपे यांनी लेखक व प्रकाशक यांना प्रत्येकी २५ रुपये दंड ठोठावला. त्याच्यावर सर्वोच्च न्यायालयात स्पेशल लीव्ह अपील दाखल करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने न्या. राजाभाऊ गवांदे यांचा निकाल कायम करून आरोपींना निर्दोष म्हणून सोडून दिले. 'एखादी वाङ्मयीन कृती अश्लील आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी तिच्यातले काही संदर्भविरहित उतारे पाहून चालणार नाही. तर त्या कृतीचा समग्रपणे विचार केला पाहिजे.' हा मुद्दा सुप्रीम कोर्टानेही मान्य केला.*

*न्या. राजाभाऊ यांनी 'आठवणींचा मोहोर' मध्ये आपल्या आयुष्यातील अनेक आठवणींना उजाळा दिला आहे. १९४६ साली इंग्रजी ६ वी झाल्यावर कोपरगावाहून गवांदे मॅट्रिकसाठी नगरला आले. संघशक्ती साप्ताहिकात काम करू लागले. नाविकांच्या बंडाची बातमी वाचल्यावर मुंबईला गेले. मॅट्रिक उतीर्ण झाल्यावर वडील म्हणाले, "आता शिक्षण पुरे. आपला घराण्यातले पहिले मॅट्रिक झाला. सरकारी नोकरी शोधा. घरखर्चाला हातभार लावा." परंतु गवांदे यांनी अर्धवेळ नोकऱ्या करीत कॉलेज शिक्षण केले. पुण्यात प्राचार्य सोनोपंत दांडेकरांना भेटून एस. पी. कॉलेजमध्ये प्रवेश मिळवला. त्यांची मर्जी व कृपादृष्टी संपादन केली... बी.ए. एम्.बी झाल्यावर न्यायाधीश म्हणून नेमणूक स्वीकारली. अनेक खटले चालवले. तत्कालीन पुणे, मित्र, नेते, विशेष निवाडे, विनोबांची भेट, सानेगुरुजींचा लोभ, बदलीची ठिकाणे (वाई, येवला, धुळे, नाशिक, सांगली, जळगाव, दिंडोरी, पुसद), गाजलेले खटले (नागबाबा, गंगाराम, फकिरा, आत्माराम), काही विचित्र व अतींद्रिय– अनुभव अशा अनेक बाबींवर या आठवणीतून प्रकाश पडतो.*

*पुण्यातील आपले मित्र बाळासाहेब नेऊरगावकर यांच्या व्यक्तित्वाचे दर्शन घडविणारा उतारा येथे वानगीदाखल देत आहोत.*

# माझे जिवलग स्नेही

**आ**णखी एक बाळासाहेब म्हणजे माझे जिवलग स्नेही बाळासाहेब नेऊरगावकर. ते आणि मी, पुणे लॉ कॉलेजात एकाच वेळी शिकत होतो. मी त्यांच्या अगोदर उतीर्ण झालो. ते उशिरा उत्तीर्ण झाले आणि पुण्यात वकिली करू लागले.

'काशीकृपा' या वडिलार्जित वास्तूत त्यांचे वास्तव्य होते. दर्शनी भागातील एका खोलीत त्यांनी आपले ऑफिस थाटले. मागील बाजूस त्यांनी संसार थाटला. प्रभा हे त्यांच्या पत्नीचे नाव. त्यांना दोन मुलगे. थोरला सुरेश व धाकटा रमेश. कॉलेजजीवन संपले व त्यांचा संबंध सुटला. पुण्यात मी न्यायाधीश होतो, तेव्हा हे संबंध परत प्रस्थापित झाले. त्यांनी माझ्या कोर्टात कधीच काम केले नाही. तसे पथ्य पाळणे आमच्या दोघांच्या स्वभावाला धरून होते. त्यांच्या आईला आम्ही काकी म्हणून संबोधीत असू. त्या सरदार मुजुमदारांच्या भगिनी. काकींनी मला मुलगा म्हणूनच मानले. आईच्या प्रेमाची ऊब दिली.

बाळासाहेब ज्या भिंतीला खेटून खुर्चीत बसत, त्या भिंतीवर अक्कलकोटच्या स्वामी समर्थांची तसबीर होती. बाळासाहेबांनी गुरुचरित्राची अनेक पारायणे केली होती. श्री स्वामी समर्थ आणि श्री गुरुदत्त महाराज ही त्यांची श्रद्धास्थाने.

त्यांना फलज्योतिषाचा नाद होता. कधी चेहरा पाहून ते कुंडली मांडीत, तर कधी स्वतः होऊन कुंडली मागत. परंतु कुंडली हे एक निमित्त असे. येणाऱ्या व्यक्तीकडे पाहत व डोळे मिटून काही वेळ स्वस्थ बसत. नंतर डोळे उघडले, की तंबाखू-सुपारीचा बार तोंडात भरीत आणि जातक सांगायला सुरुवात करीत. त्यांनी सांगितलेले जातक बहुतांशी बरोबर असते, असे लोक म्हणत. प्रश्न विचारणाऱ्याच्या घराचे ते वर्णन करीत. पूर्व आयुष्यातील एखादी महत्त्वाची घटना सांगत. मी सांगतो, ते बरोबर आहे का, असे विचारीत. उत्तर हो आले, तरच पुढील जातक सांगत. सांगताना स्वतःच्याच तंद्रीत असत. भारल्यागत बोलत. कुणापासून काही घेत नसत. ज्यांना अडचणी, संकटे आहेत, अशांना कधी गुरुचरित्र वाचावयास सांगत, तर कधी स्नान झाल्याबरोबर गणपत्यथर्वशीर्ष म्हणत जा, असे सांगत. कुणाला भस्माचे, तर कुणाला अष्टगंधाचे बोट लावीत. त्यांचे असे सेशन चालायचे. मग मध्येच पक्षकाराच्या कामात लक्ष घालायचे. वकिली बऱ्यापैकी होती. संसाराला कधी कमी पडले नाही. परंतु मुख्य गोष्ट म्हणजे स्वामी समर्थांची व गुरू दत्तात्रेयाची



भक्ती.

हे सारे पाहणे, ऐकणे विशेषतः सुटीच्या दिवशी, हा माझा आनंद होता.


बाळासाहेब माझ्या घरी येत. त्यांना संगीताची आवड होती. त्यांचा आवाजही चांगला होता. कधी गाणी, तर कधी फलज्योतिषावरील गप्पा यांत वेळ जाई. मग माझ्याच घरी त्यांचे जेवण होई.

एखाद्या रविवारी मी त्यांच्याकडे गेलो, म्हणजे तेथेही असेच होई. आमच्या दोघांचा आवडता पदार्थ म्हणजे पिठले. मी त्यांना म्हणे, पिठल्यावर प्रेम करण्यात मी कोणाला हार जाणार नाही. 'पिठले म्हटले, की मढे उठले,' असे मी म्हणत असे. मी त्यांच्याकडे जेवायला असलो म्हणजे काकी स्वतःच्या हाताने पिठले करीत. बाकी सारा स्वयंपाक प्रभाताईंच्या हातचा. भजी हा सुद्धा माझ्या अत्यंत आवडीचा पदार्थ. कितीही पोट भरलेले असो, कुणी भज्यांची प्लेट समोर सरकवली, म्हणजे मी म्हणे, 'भजाची डिश् ही गव्हर्नरची गाडी. पोटात पदार्थांची कितीही गर्दी असो. गव्हर्नरच्या गाडीला वाट करून दिलीच पाहिजे.' आमच्या आवडीचा तिसरा पदार्थ म्हणजे भेळ. सेनापती बापट भेळीला 'लेनिन मिक्श्चर' म्हणत, त्याची आठवण होते.

माझाही फलज्योतिषाचा थोडाफार अभ्यास होता. हा नाद फार वाईट, हेही मला जाणवत असे; परंतु मी त्या छंदापासून तेव्हा पूर्ण मुक्त झालो नव्हतो. पुढे माझ्या आयुष्यात प्रा. दि. के. बेडेकर आले आणि मग मी त्या छंदापासून मुक्त झालो. माझ्या शंका मी बाळासाहेबांना विचारी. शंकांची ते उत्तरे देत. त्यांच्या वास्तूसमोरच्या बंगलीत काँटिनेंटलचे श्री. अनंतराव कुलकर्णी ह्यांचे वास्तव्य. तेही माझे स्नेही. त्यांचे सासरे उत्तम कुंडलीवाचन करीत. त्यांच्याबरोबर आम्ही दोघे ज्योतिषशास्त्राची चर्चा करीत असू.

एकदा मी बाळासाहेबांस विचारले,

"तुम्ही कुंडली फक्त एकदाच पाहता आणि तीही, केवळ निमित्त म्हणून पाहिली,



**‘तालुक्याच्या गावी तुझी प्रगती व उन्नती होणार नाही. तू जिल्ह्याच्या गावी जा. घराण्यात स्वामी समर्थांची आणि दत्तात्रेयाची उपासना चालू राहावी, म्हणून तू तुझ्या सर्वांत धाकट्या मुलास उपदेश कर. तुझी विद्या त्याला दे. तसेच त्या मुलाला गुरुमंत्रही दे.’**

असे सांगता आणि दूर कोठेतरी नजर लावून तंद्रीत असल्यासारखे भारल्यागत बोलता, हा काय प्रकार आहे?''

बाळासाहेबांनी उत्तर दिले,

''स्वामींच्या आणि दत्तात्रेयाच्या आशीर्वादामुळे मला हे सारे सांगता येते. वस्तुतः चित्रपट पाहावा, त्याप्रमाणे प्रश्नकर्त्याचे भावी जीवन मला दिसते व मी सांगत जातो. ही त्यांची कृपा होय. पण याहून महत्त्वाचे व उत्कट आहे ते हे की ही विद्या मला माझ्या वडिलांपासून प्राप्त झाली आहे. त्यांचे ऋण मी विसरू शकत नाही.''

वडिलांच्या नुसत्या स्मरणाने ते मोहरून जात.

बाळासाहेबांचे वडील शंकरराव. ते वकिलीचा अभ्यास करीत होते. त्यांना कुणी तरी सांगितले, की कोल्हापूरच्या एका इनामदाराच्या घरी एक फार मोठा ज्योतिषी आला आहे.

शंकररावांना फलज्योतिषाचा नाद होता. ते मुद्दाम कोल्हापूरला त्या ज्योतिष्याला भेटण्यासाठी गेले. त्यांनी त्या इनामदारांचा वाडा शोधून काढला. शंकररावांना ओटीवर एक गृहस्थ दिसले. त्या गृहस्थाची काया गौर वर्णाची होती. देहयष्टी भरभक्कम. शरीर व्यायाम करून कमावलेले असे भासले. चेहऱ्यावर विद्वत्तेचे तेज होते. शंकररावांनी त्यांना नमस्कार केला आणि विचारले, ‘या वाड्यात कोणी ज्योतिषी आल्याचे समजले, म्हणून त्यांना भेटण्यासाठी मी मुद्दाम पुण्याहून आलो आहे. तेव्हा ते ज्योतिषी कोठे आहेत? ते मला भेटतील का?’

त्यावर ते गृहस्थ म्हणाले,

‘मीच तो ज्योतिषी. तवा तापलेला आहे. पोरा! प्रश्न विचार.’

शंकरराव तसे स्वभावाने व्रात्य आणि खोडकर होते. त्यांनी त्या ज्योतिष्याला प्रश्न विचारला,

‘माझा एक प्रश्न आहे. प्रश्न असा की माझे लग्न कधी होईल?’

वस्तुतः त्या वेळी शंकरराव घाबरले. लज्जितही झाले. मुळात त्यांच्यावर चांगले संस्कार झालेले होते. वडिलधाऱ्यांचा मान राखला पाहिजे, हे ते जाणून होते. वृत्तीही भावुक होती. परंतु ‘तवा तापलेला आहे, पोरा! प्रश्न विचार.’ हे ज्योतिषीबुवांचे वाक्य ऐकून त्यांना थोडीशी गंमत करावी, असे वाटले, म्हणूनच त्यांनी असा प्रश्न विचारला होता. शंकरराव क्षणात सावरले. वर ओटीवर जाऊन त्यांनी ज्योतिष्याचे पाय धरले व



क्षमायाचना केली.

ते ज्योतिषी अंतःकरणाने मऊ व प्रेमळ होते. त्यांनी शंकररावांना प्रेमाने जवळ बसवून घेतले आणि आपणांपेक्षा वयाने थोर असलेल्या माणसाची अशी चेष्टा करू नये, असे सांगितले आणि पुढे म्हटले, ‘पोरा! तवा खरंच तापलेला आहे. कागद-पेन्सिल काढ. तुझ्या साऱ्या आयुष्याचेच जातक सांगतो, ते लिहून घे.’

असे म्हणून त्यांनी शंकररावांच्या भावी आयुष्यातील अगदी मृत्यूपर्यंतच्या ठळक घटना सांगितल्या. स्वामी समर्थांची व दत्तात्रेयाची उपासना करावयास सांगितले. गुरुमंत्रही दिला. ते ज्योतिषी पुढे म्हणाले,

‘तालुक्याच्या गावी तुझी प्रगती व उन्नती होणार नाही. तू जिल्ह्याच्या गावी जा. घराण्यात स्वामी समर्थांची आणि दत्तात्रेयाची उपासना चालू राहावी, म्हणून तू तुझ्या सर्वात धाकट्या मुलास उपदेश कर. तुझी विद्या त्याला दे. तसेच त्या मुलाला गुरुमंत्रही दे.’

या संवादानंतर शंकरराव गावी परतले. त्यांनी मूळचे गाव इंदापूर सोडले. वकील झाल्यावर जिल्ह्याच्या गावी म्हणजे पुण्यासच वास्तव्य केले आणि वकिलीचा व्यवसाय केला.

शंकररावांच्या प्रथम पत्नी भाकीत केल्याप्रमाणे निवर्तल्या. त्यांनी दुसरा विवाह केला, तो सरदार मुजुमदारांच्या भगिनीशी. त्यांनाच आम्ही काकी म्हणत असू. काकींना छत्तीस वर्षांत एकूण अठरा अपत्ये झाली. श्रीपाद ऊर्फ बाळासाहेब सगळ्यात धाकटा. काकी निरक्षर होत्या. परंतु पतिनिधनानंतर त्यांना अल्पावधीत अक्षरओळख झाली व त्या पोथ्या वाचू लागल्या. त्यांची सारी श्रद्धा बाळकृष्णावर होती. कोणाचे अभद्र चिंतिणे नाही, कोणाबद्दल अभद्र बोलणे नाही आणि कोठल्याही परिस्थितीत प्रसन्न राहणे हे त्यांचे स्वभावविशेष होते.

बाळासाहेब मला म्हणाले,

‘ज्योतिष्याने जे जातक सांगितले, त्याप्रमाणे शंकररावांच्या आयुष्यात घटना घडल्या. मृत्यूचे म्हणून जे वर्ष सांगितले, त्याच वर्षी शंकररावांना मृत्यू आला. शंकररावांचा बाळासाहेबांवर विशेष जीव होता. मरण्यापूर्वी शंकररावांनी बाळासाहेबांस गुरुमंत्र दिला आणि उपासना चालू ठेवण्यास सांगितले. बाळासाहेबांचे म्हणणे असे की उपासना, गुरुमंत्र व वडिलांचा अनुग्रह यामुळेच त्यांना प्रश्न विचारणाऱ्याच्या आयुष्यातील पुढील घटना दिसतात. खुद्द शंकररावांनी बाळासाहेबांस त्यांच्या आयुष्यात घडणाऱ्या महत्त्वाच्या घटना अगोदरच सांगितल्या होत्या व मृत्यूचे वर्षही सांगितले होते.

बाळासाहेबांनी आपल्या आयुष्यात घडलेल्या चमत्कारांपैकी एक चमत्कार मला सांगितला.

बाळासाहेबांनी वकिलीच्या व्यवसायाला सुरुवात केली. काळा कोट शिवला. रोज

कोर्टात जाणे व परत घरी येणे, एवढेच काम सुरुवातीस होते. घराबाहेर वकिलीचा बोर्ड होता; परंतु अद्याप कोणी पक्षकार त्यांचा उंबरठा चढून त्यांना काम देण्यासाठी आत आला नव्हता. वकिलीला सुरुवात केली आणि अगदी पहिल्या दिवसापासून काम मिळाले, असे सहसा घडत नसते. अशा त्या काळात बाळासाहेबांचे थोरले भाऊ पपा सोलापूरहून पुण्याला आले. पपा त्या वेळी कस्टम खात्यात इन्स्पेक्टरच्या हुद्द्यावर काम करीत होते. ‘दासगणू महाराज खंडाळ्याला मुक्कामाला आले आहेत. त्यांना भेटावे, असे वाटते. परंतु माझ्याजवळ आता फक्त सोलापूरच्या परतीच्या तिकिटाला पुरतील, एवढेच पैसे आहेत. तू माझा धाकटा भाऊ. तुला खर्च करावयास सांगणे मला योग्य वाटत नाही आणि त्याचबरोबर महाराजांच्या दर्शनाची ओढही स्वस्थ बसू देत नाही. तेव्हा काय करावे?’

त्यावर बाळासाहेबांनी आपण दोघे खंडाळ्याला जाऊ आणि दोघांचा खर्च मी करीन, असे सांगितले.

दुसऱ्या दिवशी हार, नारळ घेऊन दोघे बंधू रेल्वेने खंडाळ्याला गेले. ज्या बंगल्यात दासगणू महाराज उतरले होते, तेथे गेले. बंगल्यात प्रवेश केला. तेव्हा त्यांना ध्यान लावून बसलेले दासगणू महाराज दिसले. पपांनी जवळ जाऊन त्यांना हार घातला. त्यांच्या समोर नारळ ठेवला व नमस्कार केला. बाळासाहेबांची ओळख करून दिली.

महाराजांनी विचारले, ‘काय पाहिजे?’ बाळासाहेबांनी उत्तर दिले, ‘मला काही नको.’

तुम्ही काय करता, असे विचारल्यावर आपण नुकतेच वकील झालो आहोत व वकिलीच्या व्यवसायाला सुरुवात केली आहे, असे सांगितले.

दासगणू महाराज पुन्हा म्हणाले,

‘काय पाहिजे, ते सांगा.’

यावर बाळासाहेब म्हणाले, ‘आपण मला काय देणार? मला आपणांपासून काही एक नको. पपा म्हणाला, म्हणून आपल्यासारख्या संतपुरुषाचे केवळ दर्शन घेण्यासाठी मी आलो आहे. आणि देण्याचीच गोष्ट असेल, तर मला देण्यासाठी स्वामी व गुरुदत्त समर्थ आहेत.’

यावर दासगणू महाराज म्हणाले, ‘मला तुमची ही वृत्ती आवडली. तुम्ही काही मागू नका. मी मात्र तुम्ही दिलेला हार व नारळ तुम्हांस प्रसाद म्हणून देणार आहे.’

त्यांनी बाळासाहेबांस पँटमध्ये इन् केलेला शर्टाचा पुढील भाग बाहेर काढावयास लावला. शर्टाची जी ओटी तयार झाली होती, तीत हार व नारळ घातला आणि त्याच क्षणी स्वतःचे भान हरपले आहे, असा बाळासाहेबांस अनुभव आला.

दासगणू महाराजांचा निरोप घेऊन दोघेही बाहेर पडले. परंतु बराच वेळ बाळासाहेब भान हरपल्याचा अनुभव घेत होते. पपांनी त्यांना हार, नारळ पिशवीत टाकावयास सांगितले. पुन्हा पुन्हा सांगितले, तेव्हा भानावर येऊन त्यांनी हार, नारळ पिशवीत टाकला व शर्ट परत पँटच्या आत खोवला.



दोघेही पुण्याला परतले. पपा सोलापूरला जाण्यासाठी स्टँडकडे गेले व बाळासाहेब आपल्या घरी परतले.

बाळासाहेब फाटक उघडून घरात प्रवेश करणार, तोच मध्यम वयाच्या एका बाईने त्यांना हटकले. ती बाई टोपपदरी पातळ नेसलेली होती. तिच्या अंगावर ठसठशीत असे सुवर्णालंकार होते आणि कपाळावर लालभडक चांगले रुपयाच्या नाण्याच्या आकाराचे कुंकू होते.

ती बाई म्हणाली, ‘आपण वकीलसाहेबच ना! माझे खडकीच्या कोर्टात काम आहे आणि ते आपणास देण्यासाठी मी आले आहे. तुम्ही घरी नव्हता, म्हणून बाहेर वाट पाहत बसले आहे.’

त्या बाईला घेऊन बाळासाहेब आपल्या ऑफिसात गेले. त्या बाईने सांगितले,

‘माझ्या पुतण्याने माझ्या विरुद्ध फौजदारी केस केली आहे. मारहाणीची खोटीच फिर्याद केली आहे. आपले नाव ऐकून आपणांस वकीलपत्र देण्यासाठी मी आले आहे.’ असे म्हणून त्या बाईने खटल्याचा नंबर व पक्षकारांची नावे सांगितली.

‘आपण तुमचे काम करू; काही काळजी करू नका,’ असे सांगून बाळासाहेबांनी तिचा वकीलपत्रावर अंगठा घेतला.

तिने दिलेल्या माहितीप्रमाणे फौजदारी केसचा नंबर व पक्षकारांची नावे वकीलपत्रावर लिहिली. त्यावर त्या बाईने शंभर रुपयांची एक नोट बाळासाहेबांस सुरुवातीची वकील-फी म्हणून दिली. स्टँपसाठी व टांग्यासाठी दहा रुपये दिले.

‘मी खडकीला जात आहे; कोर्टात तुमची वाट पाहीन,’ असे म्हणून ती बाई निघून गेली.

त्या काळात शंभराची नोट ही मोठी रक्कम होती व एका ज्युनिअर वकिलाला एकदम शंभराची नोट फी म्हणून मिळणे म्हणजे मोठे घबाडच हाती लागण्यासारखे होते.

‘अहो! दाराशी पक्षकार येऊन बसला आणि या वयात तुम्हांला देव देव आणि साधुसंत कसे करावेसे वाटतात?’

असा प्रभावहिनींनी प्रश्न केला, तेव्हा बाळासाहेबांनी पत्नीला ती शंभराची नोट दाखविली व वकिलीच्या व्यवसायातील ही पहिली कमाई, असे सांगितले.

जेवण करून बाळासाहेब खडकीच्या मॅजिस्ट्रेट कोर्टात गेले. कोर्टाच्या फाटकाशी किंवा आवारात सकाळची पक्षकार बाई आपली वाट पाहत असणार, ही त्यांना खात्री होती. परंतु ती बाई फाटकाशी नव्हती; आवारातही नव्हती. त्यांनी कोर्टात प्रवेश केला. कोर्टाचे काम चालू होते. कोर्ट हॉलमध्ये पक्षकार दाटीवाटीने बसले होते. त्यांच्याकडे बाळासाहेबांनी एक नजर टाकली; पण त्या लोकांमध्ये ती बाई नव्हती.

बाळासाहेब परत बाहेर आले. कोर्टाच्या आवारात त्यांनी पुन्हा एक चक्कर मारली.

परंतु त्या बाईचा आढळ झाला नाही.

बाळासाहेब पुन्हा कोर्टात आले व मधली सुटी होईपर्यंत त्या बाईची वाट पाहत बसून राहिले. पण बाईचा पत्ता नाही.

त्यांनी शिरस्तेदारास विचारले,

''या नंबरची केस पुकारली का?''

त्याने उत्तर दिले, की या नंबरची केस आज बोर्डावर नाही. त्याने दिलेला बोर्ड बाळासाहेबांनी वाचून पाहिला. त्यात ती केस नव्हती. त्याने त्या सालचे खटल्यांचे रजिस्टर बाळासाहेबांस दिले. सारे रजिस्टर चाळले. परंतु बाईने सांगितलेला खटला व त्या खटल्यातील पक्षकार यांची नोंद त्यात आढळली नाही.

बाळासाहेबांनी शिरस्तेदाराजवळ त्या बाईचे वर्णन केले व अशी बाई कोर्टात दिसली तर तिला थांबायला सांग, असे म्हटले.

शिरस्तेदार जुना व अनुभवी होता. तो म्हणाला,

'कोर्टात येणाऱ्या पक्षकारांचे चेहरे माझ्या परिचयाचे आहेत. गेल्या दोन वर्षापासून मी या कोर्टात काम करीत आहे. पण तुम्ही वर्णन करता, अशी बाई मी या कोर्टात आलेली कधी पाहिली नाही. तसेच, पुतण्याने आपल्या चुलतीवर दाखल केलेला एकही खटला या कोर्टात माझ्या कारकीर्दीत आलेला नाही. तरीही तुम्ही वर्णन केलेली बाई जर कोर्टात आली, तर मी तिला थांबवून घेईन.

कदाचित कोर्टाचे नाव सांगण्यात त्या बाईची चूक झाली असेल, तिचा खटला शिवाजीनगर किंवा कँपातील मॅजिस्ट्रेट कोर्टात असेल, असा विचार बाळासाहेबांच्या डोक्यात आला. ते शिवाजीनगर कोर्टात गेले. तेथील मॅजिस्ट्रेट कोर्टात चौकशी केली. कोर्टाच्या आवारात त्यांनी हिंडून पाहिले.

त्याचप्रमाणे कँपातील मॅजिस्ट्रेट कोर्टात चौकशी केली व त्या कोर्टाच्या आवारातही त्या बाईचा शोध घेतला.

दोन्ही ठिकाणी त्यांनी ती बाई दिसली नाही.

या साऱ्या चौकशीत संध्याकाळचे पाच वाजले.

बाळासाहेब पुन्हा खडकीच्या कोर्टात गेले. मॅजिस्ट्रेट घरी गेले होते. कोर्टात तुरळक एखादा दुसरा पक्षकार दिसत होता. बाहेरचे आवारही निर्मनुष्य होते. बाळासाहेब शिरस्तेदारास भेटले. त्याने सांगितले, की वर्णन केलेली बाई त्या कोर्टात आलीच नाही.

हा एक चक्रावून सोडणारा अनुभव होता. तो अनुभव घेत बाळासाहेब पुण्याला घरी परतले. घरी परतल्यावर झालेली घटना त्यांनी त्यांच्या पत्नीस व मातुःश्रीस सांगितले. कुठे चुकामूक झाली असल्यास ती बाई सायंकाळी किंवा दुसऱ्या दिवशी घरी येईल, असे तिघांनाही वाटत होते. त्यांनी त्याप्रमाणे त्या बाईची वाट पाहिली. परंतु ती बाई त्यांच्या



घरी पुन्हा कधीच आली नाही.

बाळासाहेब मला ही घटना सांगत होते. प्रभाताई तेथेच होत्या. तोच बाळासाहेबांच्या मातुःश्री म्हणजे काकी तेथे आल्या. आम्ही काय बोलत होतो, कोणत्या घटनेची चर्चा करीत होतो, हे त्यांच्या लक्षात आले. त्या मला म्हणाल्या,

''ही घटना घडल्याच्या दुसऱ्या दिवशीच मी बाळासाहेबांस जे सांगितले, तेच तुम्हाला आज सांगत आहे. अहो, जी बाई आली होती, ती 'लक्ष्मी' होती. दासगणू महाराजांनी बाळासाहेबास काही माग म्हटले. त्याने उत्तर दिले, मला काही मागायचे नाही. जो मागत नाही, त्याचीच 'रमा' दासी होते. विष्णूचे वर्णन करताना म्हटलेच आहे, 'न मागे तयाची रमा होय दासी.' तोच प्रकार इथे घडला. रमा म्हणजेच 'लक्ष्मी'.''

काकीने ठामपणे सांगितले, की टोपपदरी पातळ नेसलेली, इरकली खणाची चोळी घातलेली आणि सुवर्णालंकार ल्यालेली ती पक्षकार बाई साक्षात 'लक्ष्मी'च होती.

अशा ठाम बोलण्यापुढे बोलणेच खुंटते.

बाळासाहेबांच्या जातक वर्तविण्याच्या ज्ञानासंबंधी काय लिहू? त्यांना दुसऱ्याचे जातक कळत असे व स्वतःचेही समजले होते, असा त्यांचा दावा होता. कृपा काय किंवा प्रसाद काय, ज्याच्या त्याच्या अनुभवाचा व श्रद्धेचा विषय आहे. आपले भविष्य विचारण्यासाठी विविध क्षेत्रांतील फार मोठी माणसे बाळासाहेबांकडे येत आणि बाळासाहेब त्यांना भविष्य सांगत, हे मात्र खरे.

प्राप्त परिस्थितीत कोणीच खूश नसतो आणि म्हणून प्रत्येक जण स्वतःच्या खुशीचे एक स्वप्न पाहत असतो. वास्तव सत्य असते आणि वांछितो, ते स्वप्न असते. या सत्याची व स्वप्नाची निरगाठ ज्योतिषशास्त्रात मारलेली दिसते आणि म्हणून सामान्यपणे जगभर या विद्येबद्दल लोकांना आकर्षण आहे. माणसाला खरेच पुढचे दिसते का? समजते का?

एक गोष्ट खरी, की मी एकदा बाळासाहेबांस अतिशय अगतिक झालेले पाहिले होते. त्यांची फार मोठी फसवणूक झाली होती. त्यातून, ते सुखरूप बाहेर पडावे, म्हणून मी त्यांना साहाय्यभूत झालो होतो. त्यांना त्याबद्दल ऋणाची भावना वाटे. वस्तुतः अशी भावना वाटण्याचे कारण नव्हते. मी जे काही केले होते, ते त्यांचा स्नेही म्हणूनच.


त्यांनी स्वतःचे निधन अपघाती होईल, असे कधी म्हटले नव्हते. परंतु माझा हा प्रसन्न अंतःकरणाचा आणि प्रेमळ स्वभावाचा स्नेही, जंगली महाराज रस्त्याने फिरावयास गेला असता रिक्षाची धडक लागून निधन पावला. त्यांचे निधन अपघाती, तसेच अकाली! अंतःकरणाला व्याकूळ करणारे आणि आतून खोलवर स्पर्श करणारे! □

## वाचनीय पुस्तके

### अणसार

**अनु. अंजनी नरवणे**

माणूसपण आणि अवघं जगणंच पणाला लागलेल्या कुष्ठरोगी ‘रूपा’ची अस्वस्थ करणारी प्रदीर्घ कथा म्हणजे **अणसार.** अणसार म्हणजे देवाची घंटा.जेंव्हा अवघ्या अस्तित्वालाच आव्हान मिळते, तेंव्हा या घंटेचा टोल ऐकू येतो.




मेहता प्रकाशनाने वर्षा अडालजांच्या मूळ गुजराती पुस्तकाचा अनुवाद प्रकाशित करून एक अत्यंत दर्जेदार पुस्तक मराठी वाचकांना उपलब्ध करुन दिले आहे.

श्रीमंत गुजराती खानदानातील लाडक्या सुनेची मनाला चटका लावणारी ही कहाणी. कुष्ठरोगी हा समाजातून बहिष्कृत, अस्पर्श ठरतो.त्यामुळे अस्तित्व नाकारलेल्या रूपाची ही सत्यकथा वाचकांच्या मनात अनेक प्रश्नांचे मोहोळ उठवते. जिथे कथा संपते,तिथे अस्वस्थतेची सुरवात होते प्रत्येक संवेदनशील व्यक्तीने वाचावे असे पुस्तक.

मूळ किंमत: १८०रु. सवलतीत:१५३रु. सभासदांना:१३५रु. पोस्टेज : १५ रु.

### निसटलेले

**आशा बगे**



स्त्री- पुरुष संबंधातील शोध हा न संपणारा आहे. माणसाचे मन हा विषयच कधीही तळ न सापडणारा असा. त्यात स्त्री-पुरुष नाते हे कितीतरी वेगळ्या पातळीवर असणारे. या नात्यांना समजून घेऊन त्याप्रमाणे वागताना मनात असलेले खूप काही क्षण निसटून जातात. हे निसटलेले क्षण मनाच्या तळात सुखरूप असतात. असे निसटलेले क्षण माणसाला अनुभवता येतात. पण सर्जनशील कलाकाराला अचूक,मार्मिक शब्दात साकारताही येतात. आशा बगेंनी हे निसटलेले क्षण कथासप्तकात सादर केले आहेत. या सर्व कथांमध्ये आशा बगेंची एक खास भाषाशैली आहे. गुंतागुंत, उकल,निराकरण अशा पायऱ्या किंवा सनसनाटी घटना या सगळ्याच पायऱ्या ओलांडून या कथा एका उंचीवर पोहोचतात.

नातेसंबंध जपताना निसटलेले क्षण उलगडणाऱ्या भावस्पर्शी कथा.

मूळ किंमत: १००रु. सवलतीत: ८५रु. सभासदांना: ७५रु. पोस्टेज: १५रु.



## रवीपार : गुलजार

**अनु. विजय पाडळकर**

*आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कवी, लेखक, दिग्दर्शक गुलजार यांचा हा पहिलाच लघुकथा-संग्रह.*

*या चतुरस्त्र लेखकाच्या अभिजात सर्जनशक्तीचा हा निळ्या मखमलीवर ठेवलेल्या पाणमोत्यासारखा विलक्षण मनोज्ञ असा आविष्कार आहे. त्यांच्या मिताक्षरी शैलीतल्या निवेदनात घटनांश, प्रत्यक्ष घटना आणि मनोवस्था याप्रमाणे बदल घडत राहतो. अभिजात प्रतिभेच्या बळावर गुलजार वैश्विक पातळीवर जाऊ शकतील, अशी कथासूत्रं गुंफतात, आपल्या दृष्टीसमोर घडणाऱ्या दैनंदिन घटनांची विलक्षण वास्तव पार्श्वभूमी उभी करतात आणि संवादपूर्ण शैलीने वाचकांच्या थेट काळजाला हात घालतात.*

*अपारंपरिक कथनशैली, चित्रदर्शी स्मरण आणि अभिजातता ही त्यांची वैशिष्ट्यं आहेत. जगण्यातील भेदक सत्य आणि वास्तव अत्यंत संवेदनशीलतेनं आणि प्रामाणिकपणानं मांडतात.*

*कधी या कथा गंभीर वाटतात, कधी हलवून सोडतात, कधी हास्याचा शिडकावा करतात तर, कधी औपरोधिक वाटतात. जगाकडं अत्यंत समतोल आणि कणवेनं या कथेतून पाहणाऱ्या गुलजारांच्या समृद्ध आकलनशक्तीची प्रचीती येते. म्हणूनच सोनटक्क्याच्या फुलांसारख्या त्या सतत टवटवीत वाटतात.*

---

*कधी कुठली कथा मनाला डसायची तर अनेक दिवस घायाळ होऊन राहायचो. एका शेरनंतर दुसरा शेर मनात शिरायचा पण कथा एकदा भिनली की उतरायचीच नाही. तेव्हा वाटायचं की स्वतःच कथा का लिहू नये?*

*कथा लिहिण्यासाठी खूप वेळ वाट पाहण्याची गरज असते. एवढा धीर धरणे या वयात शक्य आहे पण त्या वयात मात्र जवळजवळ अशक्य होते. असा तऱ्हेने कथा लेखन सुरू तर झालं.*

*पण हे खरं की कविता असो वा कथा, त्यामुळे इलाज होत नाही. कला एक आस आहे, एक किंकाळी आहे, एक सद्‌भावना आहे. पण तो मानवी दुःखाचा इलाज मात्र नाही. कला फक्त मनुष्याच्या वेदनेचा एक हुंकार आहे.*

*भावी काळासाठी एक दस्तऐवज. - **गुलजार***

# मरणभय

जीवघेण्या भीतीनं त्याच्या शरीरातील नसन् नस ताणल्यासारखी झाली होती; आणि बसून बसून गुडघे लटलटा कापत होते. कोणत्याही क्षणी शुद्ध हरपेल, अशी त्याची स्थिती होती.

शहरात दंगे सुरू होऊन चार दिवस झाले होते. सकाळी थोडा वेळ आणि संध्याकाळी थोडा वेळ कर्फ्यूत सूट दिली जात होती.

कर्फ्यू उठला, की काही माणसं पटापट जीवनावश्यक वस्तू खरेदी करून घेत. काही माणसं घाई-गडबडीनं मारहाण करत, आगी लावत, चाकू चालवत आणि काही मुडदे पाडून, कर्फ्यू पुन्हा सुरू होईतो आपापल्या घरात जाऊन बसत.

मुंबईत गरमागरम बातम्यांचा आणि गरमागरम रक्ताचा ओघ सतत वहात होता; परंतु रेडिओ-टी.व्ही. वरून मात्र सांगितलं जात होतं; की शहरातील परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणाखाली असून जनजीवन हळूहळू सुरळीत होत आहे.


परिस्थिती सुरळीत होत आहे, हे सिद्ध करण्यासाठी कालपासून लोकल गाड्याही रात्री उशिरापर्यंत चालू ठेवण्यात आल्या होत्या. बहुतेक डबे रिकामेच होते; पण रुळांवरून येणाऱ्या-जाणाऱ्या प्रकाशकिरणांनी चार दिवसांचा काळोख थोडा कमी झाल्याचा भास होत होता. रेल्वे-मार्गाच्या दोन्ही बाजूंना असणाऱ्या वस्त्यांतील दबलेल्या दगडी शांततेला लोकल्सच्या येण्या-जाण्यामुळं तडे जात होते आणि मनाला हुरूप येत होता. उभारी येत होती.

यासीन गाडीचा आवाज ऐकत होताच; पण ती चालू झाली आहे, हे उठून पाहतही होता.

पाच दिवस झाले, आपल्या घरापासून तो जणू अदृश्य झाला होता. त्याची वाट पाहणं संपून शोध सुरू झाला असेल.

संध्याकाळ झाली. त्याला आता दम धरवेना. कर्फ्यू उठताच तो अंधेरी स्टेशनवर येऊन पोहोचला. प्लॅटफॉर्म जवळजवळ निर्मनुष्य होता. इंडिकेटवर गाडीची वेळ चमचमत होती.

गाडी नेहमीसारखी नव्हे, तर सावधपणे हळूहळू स्टेशनात येऊन दाखल झाली. जणू तीही घाबरल्यासारखी करत होती. प्रत्येक डब्यात एखादा दुसराच प्रवासी दिसत होता. कुठल्या डब्यात शिरावं, याचा निर्णय त्याला घेता येईना. बहुसंख्य तर हिंदूच आहेत ना! दोन-दोन चार-चारच्या घोळक्यांत ते इथंतिथं बसले होते.





तो प्लॅटफॉर्मवरच थोडा वेळ उभा राहिला आणि गाडी चालू होताच एक रिकामा डबा निवडून उडी मारून वर चढला. त्यानं सर्व डबाभर बारकाईनं नजर फिरवली. डब्यात कुणीही प्रवासी दिसत नव्हता. मग डब्याच्या एका कडेच्या शेवटच्या बाकावर कोपऱ्यातल्या सीटवर बसला. इथून सारा डबाभर नजर ठेवता येत होती.

गाडीनं वेग घेतला, तसा त्याच्या जिवात जीव आला.

अचानक डब्याच्या दुसऱ्या टोकाला एक मुंडकं यसीनच्या नजरेला पडलं. ते पाहताच त्याची गाळण उडाली. गुडघे पुन्हा लटलटू लागले. तो इतका वाकून बसला, की त्या टोकाचा तो इसम जर इकडं येऊ लागला, तर पटकन बाकड्याखाली लपता यावं किंवा तातडीनं पवित्रा घेऊन ताठ उभं राहता यावं.

तिथून डब्याचा दरवाजा दूर नव्हता; पण चालत्या गाडीतून उडी मारलीच, तर फक्त मृत्यू, एवढाच धोका होता. समजा, गाडीचा वेग कमी झालाच, तरी तो इसम...

अचानक तो इसम आपल्या जागी उभा राहिला. त्यानं इकडं तिकडं पाहिलं. त्याच्या चेहऱ्यावर भीतीचं कसलंही चिन्ह नव्हतं. नक्की तो हिंदूच असला पाहिजे! यासीनची पहिली प्रतिक्रिया अशीच होती.

चालत चालत तो इसम दरवाजापाशी येऊन उभा राहिला. त्याच्या गळ्यातील मफलर हवेमुळं फाटलेल्या झेंड्यासारखा फडफडत होता.

थोडा वेळ तो दारातून बाहेर पाहत राहिला. मग कुठल्यातरी अज्ञात वस्तूच्या साहाय्यानं शक्ती आजमावून पाहू लागला.

यासीनला जागेवरून नीट दिसत नव्हतं. परंतु तो इसम कुठल्यातरी वस्तूची ताकद लावून ओढाताण करीत होता. कधी ती खाली दाबत होता कधी वर उचलत होता. पुन्हा ओढत होता. यासीनला वाटलं, तो काहीतरी तोडण्याचा प्रयत्न करतो आहे.

–आणि अचानक गंज चढलेला दरवाजा जोरानं करकरला आणि प्रचंड खडखडाट करत बंद झाला.

त्या आवाजानं यासीनच्या तोंडून किंकाळी बाहेर पडली नाही, हे बरंच झालं.

खुद्द तो इसमही त्या आवाजानं दचकला होता.

त्यानं सभोवार पाहिलं. यासीन जिथं लपून बसला होता, त्या बाजूकडं तर अधिक वेळ न्याहाळत राहिला.

यानं आपल्याला पाहिलं तर नसेल? आपली चाहूल तर याला लागली नसेल?

यासीनला दाट शंका आली.

दार बंद करण्याच्या त्या इसमाच्या धडपडीवरून यासीनच्या काळजात दहशतीमुळं खड्डा पडला होता.

वेळ आलीच, तर आपण त्याच्याशी समोरासमोर उभं राहून दोन हात करू शकू का?

तो इसम हळूहळू चालत दुसऱ्या दरवाजाशी जाऊन उभा राहिला.

गाडी जोगेश्वरीशेजारचं एक निर्मनुष्य स्टेशन ओलांडून गेली. गाडी त्या स्टेशनवर

थांबली असती, तर यासीन कदाचित तिथं उतरलाही असता; पण हा भाग कर्फ्यूच्या अमलाखाली होता. म्हणून गाडी तिथं थांबली नाही.

खरं तर, कर्फ्यूचा भागच अधिक सुरक्षित होता. तिथं निदान पोलिस तरी होते. आणि आता तर गस्तीसाठी लष्करालाही बोलावण्यात आलं होतं. दंगलग्रस्त भागात हिरवे-खाकी चित्रविचित्र पट्टे अंगांवर मिरवणाऱ्या लष्करी गाड्यांमधून हातात गोळ्या भरलेल्या रायफली मिरवत हिरव्या-खाकी गणवेशातील जवानही हिंडत होते. त्यांनी बंदुकांच्या नळ्या बाहेरच्या दिशेनं रोखलेल्या होत्या. पोलिसांची ताकद कमी पडेलली होती. शिवाय त्यांचं भय आता कुणालाच वाटत नव्हतं. जमाव त्यांच्यावर दगड, सोडा वॉटरच्या बाटल्या फेकत होता. आता तर ॲसिडचे बल्बदेखील. पोलिसांनी जमावावर फेकलेली अश्रुधुराची नळकांडी भिजलेल्या रुमालांत धरून लोक पुन्हा पोलिसांवरच फेकत.

साकी नाक्याला तो काम करत होता. तिथली ती बेकरी जाळण्यात आली, तेव्हा पोलिसांनी काय केलं? ते तर, दूर उभे राहून तमाशा पाहत बसले; आणि बेकरीतली आठ-दहा माणसं कशीबशी लहानलहान गल्ल्यांतून पळाली. मोटार दुरुस्त करणाऱ्या गॅरेजमध्ये लपण्यासाठी. जीव वाचवण्यासाठी. ठाकून-ठोकून नीट केले जाणारे अनेक मोटारींचे असंख्य सांगाडे तिथं अस्ताव्यस्त पडलेले होते. त्या 'भाऊ' नावाच्या सज्जन इसमाचं भलं होवो. पळता-पळताच यासीनची पैरण पकडून त्यानं त्याला बाजूच्या गल्लीत चहाच्या टपरीजवळच्या एका आडोशाला नेलं. यासीन मुसलमान आहे, हे भाऊला ठाऊक होतं. भाऊ हिंदू; पण मग तोही का पळत होता?

भाऊनं त्याला सांगितलं की रक्ताची तहान लागलेला जमाव बळींची नावं विचारत बसत नाही. त्याची तहान एकतर रक्तानं किंवा आगीच्या ज्वालांनीच शमते. राखरांगोळी करा! जिवे मारा! सगळं उद्ध्वस्त करून टाका! दृष्टीसमोरच्या सगळ्याची विधूळवाट लावल्यानंतरच त्यांचा राग थंड होतो.

दुसऱ्या दरवाजाच्या खडखडाटानं यासीन दचकला. तिकडच्या कोपऱ्यातले दोन्ही दरवाजे त्या इसमानं बंद केले होते. आता यासीन जिथं लपून बसला होता, तिकडंच त्याची नजर वळली होती आणि स्थिरही झाली होती. मृत्यूच्या भयानं यासीनचं अवघं शरीर, मन थरारून उठलं.

हा इसम दरवाजे का बंद करतो आहे? माझा रक्तबंबाळ मुडदा इथंच टाकून हा पुढच्या स्टेशनवर उतरून तर जाणार नाही?

कुठलं तरी स्टेशन येत असावं. गाडीचा वेग कमी कमी होत होता.

त्या इसमाची पावलं आता अधिक आत्मविश्वासानं पडत होती. तो यासीनच्याच दिशेनं येत होता.

आता यासीनचा श्वास थांबल्यासारखा झाला. त्याचं कपाळ घामानं डवरून गेलं. काळजात धडधड सुरू झाली. थुंकीसुद्धा गिळण्याइतपत जीव थाऱ्यावर नव्हता. खाली मुरल्या मुरल्या आपल्या अस्तित्वाची पुसटशीही जाणीव त्या इसमाला होऊ नये, यासाठी



श्वास जागच्या जागी रोधून, खोकल्याची उबळ दाबून यासीन निःस्तब्ध पडून राहिला.

तो इसम शांतपणे प्लॅटफॉर्मकडच्या दरवाजाजवळ जाऊन उभा राहिला. त्याचा एक हात त्याच्या खिशात होता.

खिशात नक्कीच काहीतरी जीवघेणं हत्यार असणार! पिस्तूल, की चाकू?

यासीननं विचार केला; दुसऱ्या बाजूनं पळून जावं. पण लपून राहिलेल्या जागेवरून उठून दरवाज्यापर्यंत जाईतो तो इसम पोटात सुरा खुपसून मोकळा होईल. आरडाओरडा होऊ नये, म्हणून गळाही चिरून टाकील.

चोर नजरेनं त्यानं पाहिलं. तो इसम बाहेर पाहत होता. प्लॅटफॉर्मवर सर्वत्र शांतता होती. कुणाच्याही पावलांची चाहूल ऐकू येत नव्हती.

यासीनला आतून तीव्रतेनं वाटलं, कुणी तरी प्रवाशानं डब्यात यावं; पण कुणास ठाऊक, कोण येईल! हिंदू, की मुसलमान? हिंदू आला, तरी हरकत नाही. निदान तो भाऊसारखा दयाळू तरी असावा. स्वतःच्या गळ्यातलं जानवं त्याच्या गळ्यात अडकवून टपरीपासून तो आपल्याला त्याच्या खोलीवर घेऊन गेला होता. चार दिवस त्यानं आपल्याला त्याच्याकडच ठेवून घेतलं होतं. म्हणाला होता,

**साकी नाक्याला तो काम करत होता. तिथली ती बेकरी जाळण्यात आली, तेव्हा पोलिसांनी काय केलं? ते तर, दूर उभे राहून तमाशा पाहत बसले; आणि बेकरीतली आठ-दहा माणसं कशीबशी लहानलहान गल्ल्यांतून पळाली. मोटार दुरुस्त करणाऱ्या गॅरेजमध्ये लपण्यासाठी. जीव वाचवण्यासाठी. ठाकून-ठोकून नीट केले जाणारे अनेक मोटारींचे असंख्य सांगाडे तिथं अस्ताव्यस्त पडलेले होते. त्या 'भाऊ' नावाच्या सज्जन इसमाचं भलं होवो. पळता-पळताच यासीनची पैरण पकडून त्यानं त्याला बाजूच्या गल्लीत चहाच्या टपरीजवळच्या एका आडोशाला नेलं. यासीन मुसलमान आहे, हे भाऊला ठाऊक होतं. भाऊ हिंदू; पण मग तोही का पळत होता?**

'मी मराठा आहे; पण रोज मांस खात नाही. तू म्हणशील, तर घेऊन येतो. पण ते कसलं असेल, सांगता नाही येणार. हलाल-बिलाल मला समजत नाही. बाहेर अंधेरीच्या बाजारात भाज्यांचे ढीग सडत पडले आहेत. विकायलाच कुणी नाहीय्... पाहिजे तेवढी उचलून घेऊन यायचं...'

–आणि रेडिओ तर वातावरण निवळत चालल्याचं, पूर्वस्थितीवर आल्याचं सांगत होता. लोकल्स सुरू आहेतच; शिवाय काही भागातल्या बसेसही चालू झाल्या आहेत.

या चार दिवसांत त्याला घरच्यांची फार काळजी वाटत होती. घरचेही सगळे त्याची काळजी करत असतील. फातिमा आपल्याला शोधत बेकरीच्या पत्त्यावर गेली, तर?

ज्या खोलीत तो लपला होता, तिथून रेल्वेचे रूळ दिसत होते. गाड्याही येता-जाताना दिसत होत्या; पण भाऊनं त्याला जाऊ दिलं नव्हतं.

**अचानक उडी मारून यासीन बसल्या जागेवरून बाहेर आला. त्या माणसानं दचकून पाहिलं. त्याचा हात खिशाकडं सरकला. यासीनमध्ये एकाएकी एवढी ताकद कशी आली, कुणास ठाऊक. 'या अली' असं म्हणत त्यानं त्या इसमाच्या टांगांत मुंडकं खुपसलं आणि त्याला डोक्यावर उचलून बाहेर फेकून दिलं.**

गाडीनं एक झटका खाल्ला आणि ती सुरू झाली.

त्या धक्क्यानं यासीन खोलीतल्या वातावरणातून लोकलच्या डब्यात आला

तो इसम डाव्या हातात दरवाजाचा रॉड धरून टर्रीत उभा होता. त्याचा उजवा हात अजूनही खिशातच होता.

गाडी बराच वेळ हळूहळू पुढे सरकत राहिली. ही गाडी वेग का घेत नाहीये? सिग्नलचा काहीच प्रश्न नसावा. या मार्गावर अजून गाड्या नियमित कुठं सुरू झाल्या आहेत? ...आणि पलीकडच्या रुळांवरून एखादीही गाडी कशी जात नाहीये?

गाडी खूप वेळ सरकत सरकत जिथं येऊन थांबली, तो भाईन्दरचा पूल होता. खाली समुद्राची खाडी होती. या खाडीतून अनेकानेक मुडदे बाहेर काढल्याच्या बातम्या वृत्तपत्रांतून येत होत्या.

यासीनला काही सुचेना. त्याला गुदमरल्यासारखं होऊ लागलं. या भयाच्या दडपणाखाली जिवंत राहणं त्याला अवघड होऊ लागलं.

हा इसम आपला हात खिशातून बाहेर का काढत नाही? त्याच्या डोळ्यांवरून वाटतंय्, की तो आता हल्ला करण्याच्याच विचारात आहे.

काय होईल?

तो यासीनला लपलेल्या जागेतून बाहेर यायला सांगेल काय? की केस धरून, ओढून उभं करून गळ्याला चाकू लावील?

हा काहीच का करत नाही?

त्याच वेळी त्या इसमानं खिशातला हात बाहेर काढला. आता तो तिसरा दरवाजाही जोर लावून बंद करू पाहत होता. आता तर पळून जाण्याचा उरलासुरला रस्ताही बंद झाला होता. खाली चक्क खाडी होती. उडी मारलीच, तर मरण निश्चित.

भय आता शिगेला पोहोचलं होतं. गुहेचा दरवाजा बंद होऊ लागला होता.

अचानक उडी मारून यासीन बसल्या जागेवरून बाहेर आला.

त्या माणसानं दचकून पाहिलं. त्याचा हात खिशाकडं सरकला.

यासीनमध्ये एकाएकी एवढी ताकद कशी आली, कुणास ठाऊक. 'या अली' असं म्हणत त्यानं त्या इसमाच्या टांगांत मुंडकं खुपसलं आणि त्याला डोक्यावर उचलून बाहेर फेकून दिलं.

पडता पडता तो इसम जोरानं किंचाळला,

'अल्लाऽऽ...'



गाडी सुरू झाली.

यासीनला आश्चर्य वाटलं.

'हा इसम मुसलमान होता की काय?'

पण मरणभयाच्या पंजातून त्यानं स्वतःची सोडवणूक करून घेतली होती. जणू मृत्यूच्या दाढेतूनच तो निसटला होता.

त्या रात्री यासीन फातिमाला सांगत होता :

'अगं, हे असंच घडायचं होतं. मी मुसलमान आहे हे सिद्ध करणारा कोणता पुरावा मी त्याला दाखवू शकणार होतो?'

□

**सप्टेंबर ९९ स्पर्धा**

## निकाल

**स्पर्धा क्रमांक १ पुस्तके-लेखक जोड्या लावा.**

**निकाल-** बलुतं - दया पवार, स्वामी - रणजीत देसाई, सोनेरी सावल्या - वि. स. खांडेकर, नेताजी - वि. स. वाळिंबे, आपण सारे अर्जुन - व. पु. काळे, कोलाज - शिरीष पै, कांचनकण - शिवाजी सावंत, कथा सावलीची - माधवी देसाई

**यशस्वी स्पर्धक**

१) **जयंत वराडे–** वार्ड नं. २, नांदुरा, ता. नांदुरा, जि. बुलढाणा. - ४४३४०४
२) **कर्मवीर भाऊराव पाटील वाचनालय–** रेवगाव, ता. जि. जालना.
३) **डॉ. विमल भालेराव–** अ - ३, सुधीर कॉलनी, अकोला - ४४४००५

**स्पर्धा क्र. २ - डेअरींगबाज पुस्तक ओळखा**


**निकाल -** आय डेअर - किरण बेदी, अनु. आशा कर्दळे.

**यशस्वी स्पर्धक**

१) **आशा जळगावकर–** खोकरा,जि. शाजापूर - ४६५३३९ (मध्यप्रदेश)
२) **विश्वजीत तानवडे–** मु. पो. पडेल (तानवडे वाडी) ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग - ४
३) **एस. डब्ल्यू. रुखंडे–** ब्राह्मण वाडा, चांदूर बाजार, अमरावती - ४४४७२०

अभिनंदन! आपण आपल्या पसंतीची १०० रु.ची पुस्तके कळवावीत.
**आमचा पत्ता :** मेहता मराठी ग्रंथजगत १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०.

## शांताबाईंची मनोरम ललित पुस्तके




### संस्मरणे

नितळ आत्मीय शैलीमूळे वाचकांशी सलगी करणाऱ्या, लेखांचा संग्रह. शान्ताबाईंच्या उत्कट रसिकतेचा प्रत्यय यातून वाचकांना येईल.

किंमत ८०रु, सवलतीत ६८रु., सभासदांना ६० रु.





### रंगरेषा

किंमत ७५ रु., सवलतीत ६४ रु., सभासदांना ५५ रु.

शान्ताबाईंनी सदर लेखनातून अनेक तरल विषयांना स्पर्श केला आहे. बरेचसे काही व्यक्त होणाऱ्या सुंदर लेखांचा संग्रह.

## निरंजन घाटे यांची माहितपूर्ण पुस्तके





### आत्मवेध

मेंदूचं रहस्य उकलणं हे एकविसाव्या शतकातील शास्त्रज्ञांपुढील प्रमुख आव्हान आहे. 'आत्मवेध' मध्ये मेंदूवरील अलीकडच्या संशोधनाची माहिती आहे. ही माहिती खूपच उद्‌बोधक आहे.

किंमत १२० रु. सवलतीत १०० रु.

सभासदांना ९० रु., पोस्टेज १५ रु.




### एकविसावं शतक

आजच्या वैज्ञानिक प्रगतीचा आढावा घेऊन, तिचा वेग पाहून पंचवीस, पन्नास वर्षांनी तिचा वेग व स्वरुप कसं असेल याचा शोध घेणारा ग्रंथ.

किंमत १५०रु. सवलतीत १२०रु.

सभासदांना ११३ रु. पोस्टेज १५ रु.



# रेशीमगाठी

**कांचन घाणेकर**

*विख्यात अभिनेता काशीनाथ घाणेकर यांच्यावरील आपल्या प्रेमाची कहाणी सांगणाऱ्या 'नाथ हा माझा' या प्रांजल आत्मकथनामुळे कांचन घाणेकर यांच्या लेखनकर्तृत्वाची मराठी वाचकांना पहिली चाहूल लागली. केवळ त्या पुस्तकाशीच न थांबता, आपल्या जीवनात ज्यांच्याशी घनिष्ठ संबंध आला अशा व्यक्तींची शब्दचित्रे या ना त्या निमित्ताने लिहित राहिल्या. त्या व्यक्तिरेखांचा संग्रह रेशीमगाठी या नावाने लौकरच प्रसिद्ध होत आहे.*

*आई सुलोचना, धर्मपिता भालजी पेंढारकर, 'दादा' राजा परांजपे, काशीनाथ घाणेकर, ललिताबाई पवार, चंद्रकांत, रणजित देसाई, दिग्दर्शक राजदत्त, ग. दि. माडगूळकर, व विनोदवीर मधू आपटे, माई मंगेशकर, लीला गांधी, शाहू मोडक, सतीश दुभाषी, लता मंगेशकर यांच्याविषयी कांचन घाणेकर यांनी आपल्या भावपूर्ण शैलीत मोकळेपणाने लिहिले आहे. कोल्हापूरचा जयप्रभा स्टुडिओ ही त्यांना एक अद्‌भुत वास्तू वाटते. तिच्यावरही त्यांनी भारावून लिहिले आहे.*

*येथे देत आहोत ते त्यांनी आपल्या आईचे, सुलोचनाबाईंचे रेखाटलेले व्यक्तिचित्र. 'वहिनींच्या बांगड्या'मधील अजरामर वहिनी, 'औरत तेरी यही कहानी' मधील दीदी. मुलांनी शिक्षण घेतलं पाहिजे आणि मुलींनी लग्न केलं पाहिजे असा आग्रह धरणाऱ्या 'आत्ती'ने डॉ. काशिनाथ घाणेकरांबरोबर आपल्या कन्येने विवाहबाह्य संसार थाटण्याला ठाम विरोध केला. त्यासाठी बारातेरा वर्षांचा मानसिक त्रास-वनवास सोसला; पण निर्णय बदलला नाही. पुढे विधिवत लग्नाची शक्यता निर्माण झाल्यावर या दोघांचा अल्पजीवी संसार सुसह्य सुखाचा व्हावा म्हणूनही सगळे काही हौसेने व उत्साहाने केले. ''चित्रपटसृष्टीच्या मोहमयी वातावरणात राहूनही आपल्या घरट्याकडे दुर्लक्ष होऊ दिले नाही. दाणादाणा वेचून पिलांच्या तोंडी घास घातला. घारीसारखी कितीही उंच भरारी घेतली तरी तितक्याच ओढीने ती घरट्यात परत येते.'' असे आपल्या आत्तीच्या सोज्वळ, कुटुंबवत्सल, नंदादीपासारख्या सात्त्विक व्यक्तिमत्त्वाचे अनेक गुणविशेष कांचन घाणेकर यांनी आत्मीयतेने दाखवले आहेत.*

# स्वयंसिद्धा

मी साडेतीन, चार वर्षांची असेन. तेव्हा आम्ही कोल्हापूरला जैन गल्लीमध्ये भाड्याच्या घरात राहत होतो.

एके दिवशी सकाळी दारात टांगा उभा राहिल्याचा आवाज झाला. कोण आलं असेल, हे पाहायला मी धावत गॅलरीत जाऊन उभी राहिले.

एक उंच, शिडशिडीत, पांढऱ्या पातळातील बाई टांग्यातून उतरताना दिसली. खाली उतरल्यावर तिनं टांग्यात ठेवलेली लाल रंगाची, पत्र्याची, लहान मुलांना चालविता येणारी गाडी उतरवून घेतली आणि वर पाहून ओळखीचं हसली.

आपल्याकडंच कुणीतरी आलंय्, हे समजून मी माझ्या आजीला सांगायला घरात पळाले.

'आई, तुझ्याकडं कुणीतरी बाई आलीय्', असं सांगेपर्यंत ती स्त्री जिना चढून वर आलीही.

– आणि मग मला कळलं, ती 'कुणीतरी बाई' नाही, माझी आई आहे.

पण घरातील इतर मामेभावंडांसारखी मी तिला आत्तीच (म्हणजे आत्या) म्हणायला सुरुवात केली.

आजीला मात्र मी आईच म्हणायची.

कोल्हापूरपासून पस्तीस मैलांवर असलेल्या खडकलाट या छोट्या खेडेगावातून अॅड. पुरुषोत्तम बेनाडीकरांमुळं आत्ती मा. विनायक यांच्या प्रफुल्ल कंपनीत चित्रपटात काम करण्याचं वेड घेऊन दाखल झाली. परंतु काही महिन्यांतच मा. विनायकांनी सर्व कंपनी मुंबईला नेण्याचं ठरवलं. सर्वांबरोबर आत्तीलाही मुंबईला येण्याविषयी त्यांनी विचारलं. पण मुंबईला जाणं म्हणजे साता समुद्रापार जाण्यासारखी भीती वाटून घरच्यांनी नकार दिला.

आता पुढं काय, असं प्रश्नचिन्ह उभं असतानाच आबासाहेब चव्हाण हे एक रगेल आणि रंगेल व्यक्तिमत्त्व सामोरं आलं. नामांकित घराशी संबंध जुळावा, अशा त्या काळच्या पद्धतीप्रमाणे वयांतील सत्तावीस वर्षांचं अंतरही नजरेआड करून, वडिलधाऱ्यांच्या इच्छेसमोर मान तुकवावी लागली. पण मनं, स्वभाव, विचार कधीच जुळले नाहीत. परंतु 'कांचन'साठी म्हणून ही 'तडजोड'



दोघांनीही शेवटपर्यंत मान्य केली. माझे वडील आबासाहेब आणि चित्रमहर्षी भालजी पेंढारकर (सर्वजण त्यांना बाबा म्हणतात.) हे जानी दोस्त. आत्तीची आवड पाहून माझ्या वडिलांनी बाबांच्याकडं शब्द टाकला आणि आत्ती भालजी पेंढारकरांच्या जयप्रभा स्टुडिओत दाखल झाली.

सुशिक्षित, पदवीधरांच्या प्रफुल्ल कंपनीत आत्ती तशी दुर्लक्षिली गेली होती. पण बाबांच्या रत्नपारखी नजरेनं आत्तीमधील सुप्त पैलू हेरले असावेत. बाबांच्या भाषेत सांगायचं, तर झिपऱ्या सोडून (आत्तीच्या कुरळ्या केसांचा बाबांनी केलेला असा उल्लेख) स्टुडिओत हिंडणाऱ्या या मुलीतील परिश्रम करण्याची, साधना करण्याची क्षमता त्यांनी जाणली होती. तिच्या टपोऱ्या, पाणीदार डोळ्यांमुळं 'सुलोचना' नावाची देणगी ही त्यांचीच. बाबांच्या कसबी कारागिरीनं अनघड दगडातून एक सुंदर, सुबक आणि सजीव मूर्ती निर्माण केली. पण आत्तीला घडवण्याबाबतीतील बाबांना दिलेलं श्रेय त्यांना स्वतःला नामंजूर असायचं. ते म्हणत,

'सुलोचनानं या पन्नास वर्षांत शेकड्यांनी भूमिका केल्या असतील. त्यांपैकी सुरुवातीच्या पाच-सहा चित्रपटांत तिनं माझ्या मार्गदर्शनाखाली काम केलं आहे. तिची प्राथमिक तयारी, तिनं कुठं जायचं, तो मार्ग दाखवणं हे सर्व मी जरूर केलं आहे. पण त्यानंतरची तिची वाटचाल, तिची प्रगती तिनं स्वतःच केली आहे. जवळजवळ अर्धशतक टिकून राहण्याचं कसबही तिचंच आहे. सुलोचनाच्या बाबतीत एकच गोष्ट प्रथम मला प्रकर्षानं जाणवली, ती म्हणजे, तिची माझ्या बाबतीतील टोकाची श्रद्धा. ती इतकी जबरदस्त होती की, बाबा पेंढारकरांनी कड्यावरून उडी टाक असं सांगितलं तर तिनं क्षणाचाही विचार न करता तसं केलं असतं. तिची गुरूवरची ही श्रद्धा तिच्या कामावरही होती. त्या स्वयंसिद्धेतूनच



सुलोचना घडली. या पदावर पोहोचली. मी केवळ निमित्तमात्र.'

उमेदवारी ते नायिका होण्याच्या चार वर्षांच्या प्रवासात दोनदा मातृत्वाचा अनुभव 'आईच्या' भूमिकांचा पाया घालून गेला असावा. तिच्यात व माझ्यात फक्त अठरा वर्षांचं अंतर आहे. तिला सोळाव्या वर्षीही एक कन्या झाली; पण ती अल्पजीवी ठरली. आत्तीच्या चित्रपट-अभिनेत्री होण्याच्या तीव्र आवडीआड हे मातृत्व येऊ शकलं नाही. 'जय भवानी' या चित्रपटात ती प्रथमच नायिकेच्या भूमिकेत आली. या चित्रपटात तिनं पाचव्या महिन्यापासून नवव्या महिन्यापर्यंत काम केलं, तर 'मीठभाकर' या चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी बाळंतपणाच्या पंधराव्या दिवशी ती घराबाहेर पडली. पण या काळात बाबा व त्यांच्या पत्नी लीलाबाई पेंढारकरांनी बाळंतपणासाठी माहेरी आलेल्या लेकीची घ्यावी, तशी संपूर्ण काळजी घेतली.

माझ्या दुधाच्या वेळेप्रमाणे मला त्या त्या वेळी स्टुडिओत नेलं जाई. जयप्रभा स्टुडिओशी माझं असं दुधाचं नातं जोडलं गेलं. ते पुढं रक्ताहून दाट झालं. तीन महिन्यांनंतर मात्र माझ्या दुधाची गाईवर आणि संगोपनाची जबाबदारी माझ्या आजी व वडिलांवर सोपवून ती आपल्या ध्येयपूर्तीच्या ध्यासाबरोबर जगू लागली.

१९४८च्या गांधीवधाच्या जाळपोळीत जयप्रभा स्टुडिओ जळून भस्मसात झाला. तो पुन्हा बांधून बाबांची चित्रपट-निर्मिती कार्यान्वित होण्यास काही महिन्यांचा अवधी लागणार होता. अशा वेळी मंगल पिक्चर्सच्या 'जिवाचा सखा' चित्रपटासाठी पुण्याला जाण्याचा योग आत्तीला आला. गदिमा-राजा परांजपे-सुधीर फडके या त्रयींचा हा पहिला यशस्वी रौप्यमहोत्सवी चित्रपट.

बाबांच्या चित्रपटांची निर्मिती पुन्हा सुरू होईपर्यंत आत्तीचं अधिकाधिक वास्तव्य पुण्यातच राहिलं. कारण त्या वेळी पुण्यातही मराठी चित्रपटांची निर्मिती व्हायची. आत्तीचे अनेक उत्तम, रौप्यमहोत्सवी चित्रपट पुण्यातच निर्माण झाले. शिवाय कोल्हापुरात काम केलेले आत्तीचे चित्रपट बहुतांशी ग्रामीण, पौराणिक, ऐतिहासिक अशाच स्वरूपाचे होते. पुण्यातील 'बाळा, जो जो, रे'सारख्या चित्रपटातून शहरातील मध्यमवर्गीय जीवनाचे विषय मांडले गेले. त्यामुळं चित्रपटातील भूमिकेबरोबरच आत्तीनं वैयक्तिक जीवनातही पांढरपेशा जगात पाऊल ठेवलं. तिचं पुण्यातील सुरुवातीचं वास्तव्य 'पूना गेस्ट हाऊस' मध्ये अन्नपूर्णा सरस्वतीबाई सरपोतदारांच्या प्रेमळ सावलीत, मंगल पिक्चर्सचे एक निर्माते वामनराव कुलकर्णी यांच्या कुटुंबीयांच्या सहवासात होतं. ग. दि. माडगूळकरांच्या पत्नी विद्याताईंशी मैत्रीचे सूर याच वेळी जुळले. माणिक बेहेरेशी अठ्ठेचाळीस वर्षांपूर्वी जमलेलं सख्य आज तसूभरही कमी झालेलं नाही. या सर्व ब्राह्मणी वातावरणाचा, या स्त्रियांचा मध्यमवर्गीय आई, आक्का, वहिनी साकारताना खूप उपयोग झाला. 'बाळा, जो जो, रे' किंवा 'स्त्रीजन्मा ही तुझी कहाणी' मधील तरुण विधवा आक्का साकार करताना तर



चालणं, बोलणं, ओचे-पदराचं नऊवारी नेसणं या सर्वच दृष्टींनी राजा परांजपे यांच्या भगिनी बबुताई पुणेकर आत्तीच्या डोळ्यांसमोर होत्या. या अवलोकनाचा आत्तीनं फार डोळसपणे उपयोग करून घेतला. तिचा सहजसुंदर अभिनय ह्या बाह्य स्वरूपामुळं रसिकांच्या हृदयांत चटकन् ठसला. त्याचा परिणाम पाच दशकं उलटली, तरी कायम आहे.

कोल्हापूरच्या मराठमोळ्या ऐसपैस राहणीमानातून बाहेर पडून पुण्याच्या पांढरपेशा जीवनाशी जुळवून घेताना आत्तीला अतोनात कष्ट पडले. पण ते जीवन तिनं परिश्रमपूर्वक साध्य करून घेतलं. पहिली तारांबळ भाषेतच उडायची. त्यातच ग. दि. माडगूळकर, राजा परांजपे ही मंडळी बोलण्याची चेष्टा करून तिला जीव नकोसा करायची. तिला अक्षरशः पळून जावं, असं वाटे. त्यामुळंच 'पारिजातक' चित्रपटातील नायिका सत्यभामेची आव्हानात्मक भूमिका निव्वळ संस्कृतप्रचुर मराठी भाषेतील संवाद बोलता येणार नाहीत, या धसक्यानं सोडून देण्याचं आत्तीनं ठरवलं होतं. परंतु गदिमांनी मात्र ही भूमिका आत्तीनंच केली पाहिजे, असा आग्रह धरला होता. चित्रपटाचे दिग्दर्शक राजा परांजपेही आत्तीच्या निवडीबाबत नाराज होते. आत्तीनं तडक कोल्हापूर गाठून आपली अडचण बाबांना सांगितली. त्यांनी नागपूरहून प्रसिद्ध होणारा संस्कृत भाषेतील अंक आत्तीच्या हातात ठेवत सांगितलं की, 'हा अंक रोज वाचायचा, अर्थ नाही कळला तरी मोठ्यानं वाचायचा.' तसंच, वर्गणी भरून तो अंक नियमित मिळेल अशी व्यवस्थाही केली. अभिजात संस्कृत भाषेच्या सरावानं आत्तीची बुजणारी जीभ वळणावर येऊन अस्खलित मराठी बोलायला लागली. त्यामुळं चार लोकांत संवाद साधण्याचा आत्मविश्वासही निर्माण झाला.

बाबांनी अभिनयाचे धडे दिले, उत्तम संस्कार केले. तरीही बाबांच्या आदरयुक्त भीतीचं दडपण सतत असायचं. परंतु पुण्यानं मुक्त नव्हे, पण मोकळ्या वातावरणाचा लाभ आत्तीला दिला. ग. दि. माडगूळकर, पु. ल. देशपांडे, पु. भा. भावे, अरविंद गोखले, व्यंकटेश माडगूळकर अशांसारख्या मातब्बर मराठी साहित्यिकांच्या सहवासात मराठी साहित्याच्या विशालतेची जाणीव झाली. बाबांनी वाचनाची लावलेली गोडी, अनेक उत्तमोत्तम मराठी पुस्तकं विकत घेऊन वाचण्याइतकी वाढली. घरात पुस्तकांचं कपाट आणि गावात वाचनालय असणं हे तिथल्या लोकांच्या सुसंस्कृतपणाचं लक्षण असतं, असं मानलं जातं. आत्तीमुळंच हा सुसंस्कृतपणा आमच्या घरात आला. घरातील आम्हां मुलांनाही पुस्तकं विकत घेऊन वाचण्याची सवय लागली. रोजची वर्तमानपत्रं वाचल्याशिवाय आमचा दिवस सुरू होत नाही. जेव्हा केव्हा आम्ही नवं घर घेतलं, तेव्हा फर्निचर करताना पुस्तकांसाठी प्रशस्त, बंदिस्त कपाटं हवीत, हा आत्तीचा प्रथम आग्रह असायचा.

मला आत्तीच्या या साहित्यप्रेमाचं आश्चर्य वाटतं. तिला शालेय शिक्षणाची आवड

स्वयंसिद्धा

**कोल्हापूरच्या मराठमोळ्या ऐसपैस राहणीमानातून बाहेर पडून पुण्याच्या पांढरपेशा जीवनाशी जुळवून घेताना आत्तीला अतोनात कष्ट पडले. पण ते जीवन तिनं परिश्रमपूर्वक साध्य करून घेतलं. पहिली तारांबळ भाषेतच उडायची. त्यातच ग. दि. माडगूळकर, राजा परांजपे ही मंडळी बोलण्याची चेष्टा करून तिला जीव नकोसा करायची. तिला अक्षरशः पळून जावं, असं वाटे. त्यामुळंच 'पारिजातक' चित्रपटातील नायिका सत्यभामेची आव्हानात्मक भूमिका निव्वळ संस्कृतप्रचुर मराठी भाषेतील संवाद बोलता येणार नाहीत, या धसक्यानं सोडून देण्याचं आत्तीनं ठरवलं होतं.**

नव्हती, असं ती स्वतःच सांगते. शिक्षण जेमतेम चौथीपर्यंत झालं होतं. तेही काका गोपाळराव दिवाण परीक्षा घ्यायचे. त्यामुळं अभ्यास न करताही दरवर्षी पास होता यायचं. तिला लहानपणापासून चित्रपट पाहण्याचा प्रचंड नाद होता. वडील शंकरराव दिवाण फौजदार असल्यामुळं गावात तंबूत येणारा सिनेमा महिनो न् महिने फुकट पाहायला मिळायचा. शिवाय तिला तो अगदी पडद्याजवळ बसून बघायचा सोस असायचा. त्यातूनही पडद्याच्या मागं जाऊन पाहण्याची उत्सुकता अधिक असायची. त्या वेळी अभिनय करण्याचं वगैरे डोक्यात नसायचं. चित्रपट पाहायला मात्र खूप आवडायचा.

आत्ती अभिनेत्री व्हावी आणि होणारच, तसंच, हिंदुस्थानभर तिचं नाव गाजणार, याची खूणगाठच माझ्या आजीनं मनोमन मारली होती. ही माझी आजी म्हणजे बनुबाई लाटकर. ही, खरं तर, आत्तीची मावशी. तिची धाकटी बहीण तानुबाई ही आत्तीची आई. आत्ती आणि नऊ वर्षांनी मोठे तिचे बंधू विलासराव ही दोन्ही भावंडं आपल्या मावशीकडं खडकलाट इथंच वाढली. आत्तीच्या आई-वडिलांना तिला सिनेमात घालावंसं कधीच वाटलं नाही. ती महत्त्वाकांक्षा आत्तीच्या मावशीची-आक्कांची. आपल्या खडकलाट गावाचं नाव हिंदुस्थानभर गाजलं पाहिजे, या आग्रहातून आक्कांनी, आत्तीच्या नावापुढं लाटकर हे नाव नोंदवून घेतलं. आक्काच्या दुर्दम्य इच्छाशक्तीचं फळ म्हणूनच आपण हे सर्व मिळवू शकलो, याचं भान आत्तीनंही कधी सोडलं नाही; आणि म्हणून दिवाण व चव्हाण या आडनावाऐवजी लाटकर हे आडनावच ती आग्रहानं व अभिमानानं मिरवते.

'स्त्रीजन्मा, ही तुझी कहाणी' या चित्रपटानं हिंदीचा पेहराव चढवताना आपल्याबरोबर आत्तीलाही मुंबईला ओढून आणलं. मराठी 'स्त्रीजन्मा' तीला 'आक्का' रणजित फिल्म्सच्या 'औरत, तेरी यही कहानी' या चित्रपटात 'दीदी' बनून पडद्यावर आली आणि त्यानंतर हे 'दीदी' नाव तिचं उपनाव म्हणून सर्वांच्या तोंडी कायमचंच रुळून गेलं.



त्यानंतर या मुंबापुरीतच न भूतो न भविष्यति लोकप्रियता देणारी 'वहिनींच्या बांगड्या'तील अजरामर 'वहिनी' आत्तीकडून साकारली गेली. मराठी चित्रपटरसिकांच्या स्वयंपाकघरापर्यंत ती पोहोचली. पंचेचाळीस वर्षं झाली, तरीही ती वहिनी प्रेक्षकांच्या स्मरणातून जात नाही. आजही एखाद्या लग्नघरात, समारंभात जमलेले वृद्ध स्त्री-पुरुष परिचय नसतानाही एखाद्या नातलगाला आवर्जून भेटावे, तसे तिला येऊन भेटतात. आपुलकीनं चौकशी करतात.

हिंदी चित्रपटसृष्टीत भक्कम पाय रोवून उभं राहायचं असेल, तर तुझं कायम वास्तव्य मुंबईत असलं पाहिजे, या ज्येष्ठ अभिनेत्री ललिता पवार यांच्या सल्ल्यानुसार व आशा भोसले यांच्या सहकार्यामुळं आत्तीचं मुंबईत हक्काचं घर १९५५ साली होऊ शकलं. पण पुढच्याच वर्षी माझ्या वडिलांचं आकस्मिक निधन झालं, कुटुंबकबिला कोल्हापुरात ठेवून, आपण मुंबईत निर्धास्तपणे राहू शकणार नाही याची जाणीव झाल्यामुळं आत्तीनं १९५६ साली आम्हां सर्वांना मुंबईत आणलं.

माझ्या वयाच्या नऊ वर्षांनंतर प्रथमच दिवसरात्र आत्तीबरोबर राहण्याचा योग आला. त्या वेळी ती तीन तीन शिफ्टमध्ये चित्रपटांतून काम करायची. सकाळी सात वाजता ती शूटिंगला जाण्यासाठी बाहेर पडायची. ती मध्यरात्री किंवा काही वेळेला पहाटे पहाटेही परत आलेली दिसायची. त्या वेळी मी अर्धवट झोपेत, तर ती पेंगुळलेली असायची. हिंदी चित्रपटांचं काम वाढलं, तरी एका वेळी एक तरी मराठी चित्रपट कुठल्याही परिस्थितीमध्ये करायचाच, असं आत्तीनं ठरवून ठेवलं होतं. त्यामुळं त्या शूटिंगसाठी पुणे-कोल्हापूरच्या वाऱ्याही कराव्या लागत. एका महिन्यात तर रोज ती मुंबईत दिवसभर हिंदीचं शूटिंग करून रात्रभर 'धाकटी जाऊ' या मराठी चित्रपटाच्या शूटिंगसाठी पुण्याला प्रभात स्टुडिओत जायची. मुंबई-पुणे प्रवासात गाडीत मिळेल तेवढीच झोप मिळायची. मराठी चित्रपटात आर्थिक लाभापेक्षा भूमिकांचं समाधान अधिक असे.

कामाच्या या धबडग्यातही आत्तीचं माझ्या व माझ्या आठ मामेभावंडांच्या शिक्षणाकडं बारीक लक्ष असे; आम्ही किमान पदवीधर व्हावं, ही तिची अपेक्षा मुंबईच्या वातावरणात बुजल्यामुळे शाळेला दांड्या मारणाऱ्या मला एकदाच तिनं खोलीचं दार बंद करून डोक्यापासून पायापर्यंत फोडून काढलं होतं. त्यानंतर मात्र एम्.ए. होईपर्यंत याबाबतीत तिला माझा त्रास कधीच झाला नाही. सुशिक्षित होणं, पदवी मिळवणं याचं महत्त्व तिनं जाणलं होतं. ती काळाची गरज असल्याचंही तिनं पक्कं ठाणलं होतं. प्रथम वर्ग, उच्च गुण मिळवलेच पाहिजेत, याचा तिनं कधी आग्रह धरला नाही. आम्ही मुलींनी नृत्य-गाणं शिकलं पाहिजे, याचाही सोस तिला नव्हता. पण शिक्षण घेतलंच पाहिजे, यावर तिचा कटाक्ष असे.

चित्रपटसृष्टीतील पार्ट्या, ऐषारामी आयुष्य यांपासून तिनं स्वतःला आणि आम्हांलाही

दूर ठेवलं. सिनेमावाल्यांच्या घरातील मुलं म्हणून विशेष भपकाही करू दिला नाही. आमची राहणी मध्यमवर्गीय मुलांसारखीच असे. आत्तीची शूटिंगला जाण्याची वेळ आणि आमची शाळेला जाण्याची वेळ एकत्र आली, तरच आम्हांला घरच्या गाडीतून नेलं जाई. तेही दादर भागात शूटिंग असेल तरच. एरवी घरात दोन-दोन मोटारी असूनही आम्ही मुलं बेस्ट बस अथवा ट्रामनंच शाळेत जात-येत असू. माझा व माझी समवस्यक मामेबहीण विजयाचा एकत्रित वाढदिवस मोठ्या उत्साहानं आत्ती साजरा करायची. त्या दिवशी ती शूटिंगही बंद ठेवीत असे. कपडेलत्ते, खाण्यापिण्यातही तिनं कधी काटकसर केली नाही. तिला स्वतःला खाण्याचा जबरदस्त शौक. त्यामुळं सर्वांना घेऊन जुहूला भेळ खाल्ली, तर आईस्क्रीम खायला गिरगाव चौपाटी गाठली जायची.

तिचं दुसरं जबरदस्त व्यसन म्हणजे चित्रपट पाहायला जाणं. तेही सहकुटुंब, स्नेही परिवारासहित. दरवेळी कमीत कमी १५/२० तिकिटं काढली जायची. तिचं चित्रपट पहायचं वेड अजूनही कमी झालेलं नाही. आजही ती रोज रात्री एक चित्रपट टी.व्ही.वर पाहते. चित्रपट पाहताना विशिष्ट भाषेचाही आग्रह नसतो. अभिनयाला भाषा नसते-आविष्कार असतो, असं तिचं म्हणणं. त्यामुळं उत्तम अभिनय, भाषा कळत नाही म्हणून समजत नाही, हे तिला पटत नाही.

आमची शाळा बुडवून तर तिनं आम्हाला चित्रीकरण पाहण्यासाठी कधीच नेलं नाही. शाळेच्या सुट्टीत बाह्यचित्रीकरण आलं असेल, तरच आम्ही तिच्या बरोबर जात असू. पण तिथंही तिच्याबरोबर एकापेक्षा अधिक मंडळी असतील, तर ती त्यांचा खर्च तिच्या करारापोटी मिळणाऱ्या पैशातून कापून घ्यावा, असं आधीच ती निर्मात्याला सांगे. चित्रीकरणाची जागा प्रेक्षणीय स्थळांपैकी असेल, तर तिथं फिरण्यासाठी लागणारी गाडीसुद्धा ती स्वतः मागवते. तोही त्रास ती निर्मात्याला देत नाही.

चित्रपट-व्यवसायाविषयी आत्ती कमालीची कृतज्ञ आहे. त्यामुळं या व्यवसायाविषयी ती कधीही अपशब्द उच्चारीत नाही उच्चारू देत नाही. ती म्हणते, कुठल्या व्यवसायात अपप्रवृत्ती नाहीत? चांगलं राहणं हे बहुतांशी स्वतःवरच अधिक अवलंबून असतं. तेव्हा तरुण-तरुणींनी जरूर या व्यवसायात यावं, असं तिचं सांगणं आहे. मात्र प्रामाणिकपणे कष्ट करण्याची तयारी हवी, असं तिला वाटतं. माझी सर्वांत मोठी भाची चिमू. ती लहान असताना, तू सिनेमात काम करणार का, असं तिला विचारलं, तर आपलं छोटंसं नाक उडवीत ती म्हणाली, ‘मी हिंदी सिनेमात काम करीन. मराठीत पैसे कमी मिळतात.’

हे ऐकून ‘काय हल्लीची मुलं हुशार तरी,’ असं कौतुकानं म्हणत आम्ही सर्व हसलो होतो. पण जेव्हा आत्तीनं हे ऐकलं तेव्हा ती ताडकन् चिमूला म्हणाली,

‘आपण हे जे दोन वेळ जेवतोय् आणि आरामात राहतोय्, ते मराठी चित्रपटांमुळेचं,



एवढं लक्षात ठेवा. त्याच्याशी बेइमानी नको. मराठी चित्रपटांचं कायमचं ऋण आपल्यावर आहे.’

आत्तीला बऱ्याचदा प्रश्न विचारला जातो की, तुम्ही इतक्या प्रथितयश अभिनेत्री असूनही, तुमची मुलगी किंवा घरातील इतर कुणीच कसं या व्यवसायात आलं नाही?

यावर तिचं उत्तर असं की,

‘परिश्रमानं कलावंत घडवता येत असला, तरी प्रथम तो कलावंत म्हणून जन्मावा लागतो. कलेची ओढ, ऊर्मी त्याला असली पाहिजे. आमच्या घरात कोण अभिनय करीत होतं? तो करणारी आमच्या घरातील मी पहिलीच. मी जाणीवपूर्वक, इतर काही न करता या क्षेत्राकडं वळलेच ना? प्रयत्नपूर्वक माझं ईप्सित साध्य केलंच ना? या क्षेत्राविषयीची अशी ओढ, अशी ऊर्मी मला आमच्या घरातील मुलांत कधीच जाणवली नाही. त्यामुळं मारून मुटकून त्यांना या व्यवसायात आणावं, असं मला कधी वाटलं नाही.’

आजच्या जमान्यात आत्तीसारखा सुज्ञ विचार जर केला गेला, तर आज जे भयानक स्टार पुत्र-पुत्री प्रेक्षकांच्या माथ्यांवर मारले जातात, त्यातून प्रेक्षकांची सुटका तरी होईल.

मुलांनी शिक्षण घेतलं पाहिजे, याबरोबरच मुलींनी लग्न केलं पाहिजे, हाही तिचा आग्रह असतो. या भूमिकेतूनच डॉ. काशिनाथ घाणेकरांच्या बरोबर माझा विवाहबाह्य संसार थाटण्याला तिचा ठाम विरोध राहिला. अखेरपर्यंत ती आपल्या निर्णयापासून तसूभरही ढळली नाही. बारा-तेरा वर्षांचा मानसिक त्रास-वनवास तिनं माझ्या बरोबरीनं सोसला; पण आपला निर्णय बदलला नाही. डॉ. घाणेकरांच्या बरोबर माझं विधिपूर्वक लग्न होण्याची शक्यता निर्माण झाल्यावर तिनं कमालीच्या सहकार्यानं माझा अल्पजीवी संसार सुसह्य केला. माझ्यासहित माझ्या सर्व मामेभावंडांचे संसारही तिनं तितक्याच हौसेनं आणि उत्साहानं उभे केले. इतकंच काय, तिच्या तरुण विधवा वहिनीच्या पुनर्विवाहालाही परवानगी दिली. माझा मामेभाऊ दिलीप याच्या अकाली निधनानंतर त्याच्या पत्नीलाही तिनं दुसरं लग्न करायला लावलं.

अगदी पहिल्यापासून आत्तीनं माझ्यामध्ये आणि आपल्या भाचरांमध्ये कधीही फरक केला नाही.

लहानपणी एकदा मी व माझ्या तिन्ही बहिणी एकाच वेळी गोवरानं आजारी होतो. शेजारच्या बाई आम्हांला बघायला आल्या होत्या. त्या माझ्या आजीला म्हणाल्या,

‘कांचनला या आजारपणात जरा आंबेमोहर तांदळाचा भात करून घाला.’

हे ऐकताच संताप आवरत आत्ती बाईंनी म्हणाली,

‘हे पाहा, आंबेमोहर तांदळाचा भात शिजला, तर सर्वच मुलांकरता शिजेल. एका कांचनसाठी नाही. सर्वांबरोबरच जे असेल, तेच कांचन खाईल... आणि असा दुजाभाव

स्वयंसिद्धा

करणारा सल्ला देणार असाल, तर पुन्हा इथं येऊ नका.’

आजही आत्तीच्या या वृत्तीत फरक पडलेला नाही.

काही महिन्यांपूर्वी माझ्या सगळ्यांत मोठ्या भाचीला-इरावतीला (माझं घर, माझी माणसं’ या चित्रपटातील आपल्या अत्यंत आवडत्या भूमिकेच्या नावावरून आत्तीनं स्वतः हे नाव ठेवलं आहे.) मुलगी झाली-हृदया. त्या वेळी आनंदानं गहिवरलेली आत्ती म्हणाली,

‘आक्का (आजी) व दादाला (मामा) न मिळालेलं भाग्य मला मिळालं. त्या दोघांनी नातवंडं पाहिली. पण माझ्या वाट्याला पणजी होण्याचं भाग्य आलं.’

आत्तीला मुलग्यापेक्षा मुलगी अधिक आवडते.

पुनर्विवाहाचे अनेक योग, उत्तम योग आत्तीच्या वाट्याला आले; पण कधी अभिनयसंन्यास घ्यावा लागेल, कधी कांचन जवळ असता कामा नये, तरी कधी नातेवाईक जवळ चालणार नाहीत, या अटींसाठी या प्रस्तावांकडं तिनं पाठ फिरवली. या मोहमयी वातावरणात राहूनही आपल्या घरट्याकडं दुर्लक्ष होऊ दिलं नाही. दाणादाणा वेचून पिलांच्या तोंडी घास घातला. घारीसारखी कितीही उंच भरारी घेतली, तरी तितक्याच ओढीनं ती घरट्यात परत येते.

पैसे मिळवणं आणि ते घरच्यांवर आणि बाहेरच्यांवरही खर्च करून टाकणं, एवढाच पैशाचा उपयोग तिला माहीत आहे; आणि आजही, ही सवय कमी झालेली नाही. त्यामुळं मिळकतीचा जमाखर्च सांभाळताना माझी मात्र फार तारांबळ उडते.

एकदा बाबांच्याकडं आत्तीच्या या सवयीची तक्रार केली असता, कौतुकानं हसत बाबा म्हणाले,

‘म्हणजे सुलोचनानं माझी हीही गोष्ट उचलली, वाटतं!’

बाबा आत्तीच्या अशा सवयीबद्दल तिची काहीतरी कानउघडणी करतील, असं वाटून त्यांच्याकडं तक्रार केली, तर त्यांनी वरील उत्तर दिलं.

धन्य ते गुरू आणि धन्य ती शिष्या, असं म्हणत मी मनातल्या मनात कपाळावर हात मारून घेतला.

मात्र पैसे उसने दिल्यावर, त्यांची परतफेड न करता आल्यामुळं जेव्हा माणसं दुरावतात किंवा तोंड चुकवतात, तेव्हा आत्तीला अतोनात दुःख होतं. बऱ्याचदा तर ते पैसे परत मिळणारच नाहीत, असं समजूनच ती पैसे देते. त्यामुळं ती शांतच असते. तिला दुःख होतं, ते चांगले संबंध पैशामुळं बिघडल्यानं.

माणसांच्या गराड्यात राहणं, गर्दीत राहणं ही आत्तीची अतोनात आवडीची गोष्ट आहे. उपनगरात ज्या किंमतीत शांत वस्तीतील प्रशस्त बंगला राहायला मिळाला असता, ते त्याच किंमतीत दादरसारख्या भागात फ्लॅट घेऊन राहणंच तिनं अधिक पसंत केलं.



कारण एकच-नातेवाइकांचा, परिचितांचा, मराठी-मंडळींचा वावर या भागातच अधिक होता. घर घेताना सिनेमा-नाटकाची थिएटर्स जवळ हवीत, ही तिची अट होती. सिनेमात असूनही नाटकाला तिनं कधी दुय्यम लेखलं नाही. शेकडो प्रेक्षकांसमोर रंगमंचावर उभं राहून अभिनय करणाऱ्या रंगभूमी कलावंतांचं तिला कोण कौतुक वाटतं! चित्रपट-व्यावसायिकच काय, पण नाट्यव्यावसायिकांनाही दीदी आपल्या नाटकांना, समारंभांना याव्यात, असं आवर्जून वाटतं. प्रभाकर पणशीकर, मोहन वाघ ही मंडळी तर आत्तीसाठी खास नाटकं लिहून घ्यायला तयार होती. पण वेळेअभावी ती नाटकात काम करू शकली नाही. प्रभादेवीच्या रवींद्र नाट्य मंदिरावर पुण्याहून येणारे नाट्यकलावंत संबंध बस घेऊनच भेटायला येत. दीदींना भेटणं आणि कपभर चहा पिणं एवढाच त्यांचा उद्देश असे.

मराठी चित्रपटसृष्टीत नव्यानं प्रवेश करणाऱ्या तरुण अभिनेत्रींना मेकअपचं सामान भरलेल्या मेकअपबॅग्ज भेट म्हणून देणं हे तर अलिखितच होतं. त्यांत अगदी जयश्री गडकर, सीमा, कामिनी कदम, नीलम, लीला गांधी अशी कितीतरी मोठी यादी होईल. जयश्री गडकर यांनी बाळ धुरींशी विवाह करण्याचं ठरवताच त्यांच्या साखरपुड्यापासून त्यांच्या लग्नाच्या पत्रिका वाटणं ते अगदी त्यांच्यावर अक्षता टाकण्यापर्यंतचं सर्व थोरल्या बहिणीच्या नात्यानं केलं तिनं.

लताबाई मंगेशकर, उषाकिरण अशांसारख्या समकालीनांशी झालेली जवळीक आजही दुरावलेली नाही. जयश्री गडकर, सीमा, उमा, रत्ना भूषण, नीलम, लीला गांधी, आशा काळे यांच्याशी जमतं, तितकंच रंजना, भक्ती बर्वे, रिमा, प्रिया अरुण, निवेदिता सराफ यांच्यासारख्या आजच्या तरुण पिढीशीही आपुलकीचं नातं आहे. बोबडं बोलणारा सचिन, गुबगुबीत गालांचा महेश कोठारे यांना जेव्हा ती आजच्या घडीचे लोकप्रिय नट-निर्माता-दिग्दर्शक झालेले बघते, तेव्हा घरातील मुलं कर्तृत्ववान निघाल्याचा अभिमान आत्तीला वाटतो.

मुख्य म्हणजे, आजच्या तरुण कलावंत पिढीला आत्ती ‘बोअर’ वाटत नाहीत. त्याचं मुख्य कारण म्हणजे, ती कधीच आमच्या वेळी असं होतं न् तसं होतं, याची ‘लाँग प्ले’ लावीत नाही. उलट, नव्या पिढीचे विचार, त्यांच्या कल्पना, योजना ऐकण्याची तिला उत्सुकता असते. नवीन काही शिकल्यासारखं तिला वाटतं. तरुण पिढी किती हुशार, किती लवकर सगळं आत्मसात करते, याचं तिला कोण कौतुक वाटतं.

जया आणि बाळ कसं आहे, असं अमिताभला विचारताच हॉस्पिटलमध्ये काढलेला जयाचा व नवजात बाळाचा फोटो अमिताभनं दुसऱ्या दिवशी आत्तीच्या हातात ठेवला. आत्तीनंही कौतुकानं तो फोटो घरच्या आल्बममध्ये लावून ठेवला आहे. नाना पाटेकरसारखा ‘टेरर’ अभिनेताही ‘तू माझी आई आहेस; मला अरे नाना म्हण’ म्हणून हटून बसतो. तर

# मराठी रोमँटिक काव्यप्रतिभा

**प्रा. रमेश तेंडुलकर**

*विक्रमी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर याचे वडील अशी प्रा. रमेश तेंडुलकर यांची ओळख करून दिली तर बहुसंख्य मराठी वाचक हे तर आपलेच सुहृद अशा सलगीने त्यांच्याकडे पाहू लागतील.*

*प्रा. रमेश तेंडुलकर हे विद्यार्थ्यांचे एक आवडते अध्यापक होते. मृदुभाषी निरलस; प्रेमळ, अजातशत्रू. कोणाबद्दलही कधी अनुदार वा कडवट शब्द कधी त्यांच्या तोंडून निघत नसे. समोरच्या अनोळखी माणसाशीही ते आत्मीयतेने बोलून त्याच्या सुखदुःखात सहभागी होत. प्राध्यापक म्हणून तर विद्यार्थ्यांवर आपल्या सहृदय स्नेहाची पाखर घालत. प्रा. तेंडुलकर यांनी लेखन तसे फार कमी केले. काही संपादने केली. प्रस्तावना लिहिल्या. परंतु आपल्या समीक्षात्मक लेखांची पुस्तके प्रसिद्ध करण्याबाबत नाईलाज झाला तरच ते लेखणी हाती धरीत, मोजकेच लिहित. ते काहीसे निरुत्साही होते. अगदी आपले गुरू व सहकारी अनंत काणेकर यांच्याप्रमाणेच ते गुणग्राही व लोकाभिमुख होते.*

*रमेश तेंडुलकर यांच्या खास अभ्यासविषयात रोमँटिक कालखंडातील केशवसुत, रेव्हरंड टिळक, गोविंदाग्रज, बालकवी, माधव जूलियन, यशवंत, अनिल, कांत, कुसुमाग्रज यांना खास स्थान होते. 'मराठी रोमँटिक काव्यप्रतिभा' या पुस्तकात या सर्व कवींच्या काव्यांतील सौंदर्यवादाचा आस्वादक मागोवा घेण्यात आला आहे. वेळोवेळी लिहिलेले लेख एकत्र करताना, रोमँटिसिझमची तात्त्विक व वाङ्मयीन भूमिका स्पष्ट व्हावी म्हणून 'रम्य धुक्याची अद्भुत सृष्टी' हा लेखही या पुस्तकासाठी मुद्दाम लिहिण्यात आला आहे. आजची पिढी ही रोमँटिसिझमशी काहीशी अपरिचित आहे; त्यामुळे अर्धशतकावर काल मराठी साहित्यात अधिराज्य गाजवणाऱ्या रोमँटिसिझमवरील तेंडुलकरांचे हे भाष्य विशेषच औचित्यपूर्ण व उद्बोधक ठरेल.*

*प्रा. रमेश तेंडुलकर यांनी २३ जानेवारी १९९९ रोजीच या पुस्तकाची मुद्रणप्रत दिलेली होती. प्रुफेही त्यांनी वाचली होती. त्यांचे त्यानंतर अल्पावधीत देहावसान झाले. हे पुस्तक पहायला ते हयात नाहीत याची हळहळ वाटते.*



# रम्य धुक्याची अद्भुत सृष्टी

'रेनेसन्स' आणि 'एनलाइटनमेंट' या दोन्ही अतिशय गुंतागुंतीच्या घटना होत्या. त्यांना अनेक अंगे होती. मानवाचा अभ्युदय साधण्यात, त्याला मध्ययुगातून बाहेर काढण्यात आणि नव्या युगाची प्रस्थापना करण्यात या घटनांचा मोठा वाटा आहे. आपण केवळ अडसर ठरणाऱ्या त्यांच्या बाजू रोमँटिसिझमची पार्श्वभूमी म्हणून इंग्रजीतील रोमँटिक युगाच्या संदर्भात आवश्यक तेवढ्याच मर्यादेत येथे विचारात घेत आहोत.

'रेनेसन्स' आणि 'एनलाइटनमेंट'च्या कालखंडांत बाह्य विश्व स्थिर आणि स्थितिशील मानण्यात येत होतं. त्या दृष्टिकोणानुसार काही 'नवीन' सोडाच, पण काहीही घडण्याची (State of becoming) क्रिया मुळातच संभवत नव्हती. नव-अभिजातवादाच्या संकल्पनेत पुरातन आदर्शांचा धाक जबरदस्त होता आणि एनलाइटमेंटमध्ये विवेकावर इतका पराकोटीचा भर होता की परमेश्वर हे तत्त्व देखील pure reason म्हणून पाहिलं जात होतं. या दृष्टिकोणानुसार बाह्य विश्व ही एक ठराविक नियमांनुसार चालणारी प्रचंड यंत्ररचना असून ते नियम पूर्णतः बुद्धिगम्य आणि अपरिवर्तनीय आहेत अशी धारणा होऊन राहिली होती. भावनात्मक प्रतिक्रिया किंवा अतार्किक, गूढ, संदिग्ध अशा कोणत्याही अनुभवांना त्यात स्थान नव्हते. निसर्ग आणि नैसर्गिक प्रवृत्तींपासून मानवाची फारकत झाली होती. बाह्य विश्वाकडे पाहायची ही सगळी संकल्पना 'यांत्रिक' दृष्टिकोण म्हणून ओळखली जात होती.

या कृत्रिम जखडलेल्या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर आत्माविष्कार, निसर्ग, उत्स्फूर्तता,

अमराठी जॅकी श्रॉफ एखाद्या समारंभात भेटला की, 'आई, कशी आहेस?' असं शुद्ध मराठीत अदबीनं विचारत आत्तीचे हात हातांत घेतो.

एकदा तोंडाला रंग लावून एखादा कलावंत या दिव्यांच्या दुनियेत आला की, तो दुसरीकडे कुठंच रमू शकत नाही. आत्तीचीही तीच अवस्था आहे. सुदैवानं बावन्न-त्रेपन्न वर्षांची प्रदीर्घ कारकीर्द, चारशेच्या आसपास मराठी-हिंदी चित्रपटांची संख्या-इतकं व्यस्त आयुष्य गेल्यानंतर वयोमानपरत्वे आलेली स्वस्थताही तिनं तितक्याच सहजतेनं पचविली आहे. मुंबईतल्या मुंबईत असल्यास एखाद्या चित्रपटाचं शूटिंगही ती अधूनमधून करते. पण मिळणारा मोकळा वेळ वाचन, विणकाम, चित्रपट-नाटक पाहणं, समारंभांना जाणं, महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक खात्याच्या समितीवर काम करणं, गरजू कलावंतांना जमेल तशी मदत करणं, मदत मिळवून देणं अशांसारख्या गोष्टींत तिनं स्वतःला गुंतवून टाकलं आहे. त्यामुळं वेळ कसा घालवायचा, यापेक्षा वेळ कसा पुरवायचा, याचीच काळजी तिला पडते.

–आणि आता तर पणतीशी खेळण्यातच वेळ कसा भुर्रकन् जातो ते कळतही नाही. तो निरागस, निर्मळ आनंद तिला शक्तिवर्धकासारखा वाटतो. मनान उत्साही ठेवतो.

ख्यातनाम अभिनेते शाहू मोडक हे अभ्यासू ज्योतिषीही होते. त्यांनी केलेल्या अनेक भाकितांचा पडताळा आत्तीला आला आहे. त्यांतील एक म्हणजे, त्यांनी आत्तीला सांगितलं होतं की, ती कोणत्या ना कोणत्या कारणांनी चित्रपटसृष्टीशी कायम संबंध राहील. दीर्घकाळ अभिनय करीत राहील आणि वयाच्या साठीनंतर अनेक सन्मानाचे योग तिच्या वाट्याला येतील. यापूर्वी वैयक्तिक अभिनयासाठी तिनं अनेक पारितोषिकं मिळवली आहेत. पण आता मात्र चित्रपटसृष्टीतील तिच्या प्रदीर्घ कारकीर्दीसाठी दरवर्षी एखादं तरी पारितोषिक जाहीर होतंच.

या सन्मानात 'गदिमा पुरस्कार', महाराष्ट्र शासनाचा 'व्ही. शांताराम पुरस्कार', मंगेशकर प्रतिष्ठानचा 'दीनानाथ पुरस्कार', आशीर्वाद संस्थेचा 'नवरत्न पुरस्कार', महाराष्ट्र कला-निकेतनचा 'महाराष्ट्र-रत्न' पुरस्कार आणि यंदाचा भारत सरकारचा 'पद्मश्री' पुरस्कार असा वर्षाव सुरू आहे. या सर्व कर्तृत्वाचं श्रेय देताना आत्ती कृतज्ञतेने सांगते,

''ईश्वरी कृपा, वडीलधाऱ्या मंडळींचे आणि गुरूंचे आशीर्वाद आणि रसिकांचे अमाप प्रेम हे सर्व तर आहेच; पण हे मोठेपण मिळवून देणाऱ्या भूमिकांचे ऋणही न फिटणारे आहे.''

□



# मुंबई शिवसेना युतीसरकार

**कुमार केतकर**

*द्वा.भ. कर्णिक आणि गोविंद तळवलकर यांच्यानंतर महाराष्ट्र टाइम्सचे तिसरे संपादक म्हणून काम करणारे कुमार केतकर हे मराठीप्रमाणे इंग्रजीतही सराईतपणे लिहिणारे सव्यसाची पत्रकार आहेत. डाव्या विचारसरणीचा प्रभाव असूनही संपादकीय भूमिकेतून निर्भीड व निःपक्षपाती भूमिका मांडण्यात ते कुठलीही कसूर करीत नाहीत. त्यांचे अग्रलेख अभ्यासपूर्ण असतात; कुठल्याही समस्येचे व्यापक संदर्भ लक्षात आणून देणारे असतात; कोणाचाही मुलाहिजा न ठेवता ज्याचे गुणदोष ज्याच्या त्याच्या खात्यावर स्पष्टपणे नोंदवणारे असतात. १९९४ पासून ते महाराष्ट्र टाइम्समध्ये अग्रलेख लिहित आहेत. त्यापैकी निवडक अग्रलेखांचे तीन संग्रह मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रसिद्ध करण्यात येत आहेत. एका संग्रहात मुंबईशी संबंधित अग्रलेख असतील, दुसऱ्या संग्रहात शिवसेनाविषयक अग्रलेख असतील आणि तिसऱ्या संग्रहात शिवसेना- भारतीय जनतापक्ष युती सरकारच्या महाराष्ट्रातील राजवटीच्या विविध पैलूंची चिकित्सा करणारे अग्रलेख असतील. या पुस्तकांतील अग्रलेखाचा एक नमुना या अंकात देत आहोत.*

***सध्या महाराष्ट्र अस्थिर अशा राजकीय परिस्थितीतून जात आहे. नुकतेच निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आहेत. महाराष्ट्रातील ग्रामीण सुजाण मतदाराने सत्तेसाठी झुंजणाऱ्या सर्वच राजकीय पुढाऱ्यांना मोठ्या पेचात टाकले आहे□ दिवाळीपर्यंत या सर्वांचा निकाल नक्कीच लागलेला असेल. तरीही या परिस्थितीतून सर्वच राजकीय पुढाऱ्यांनी आत्मपरिक्षण करावे. असेच जनतेला वाटत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर या पुस्तकातील लेख हे विशेष महत्त्वाचे ठरतील असे वाटते.***

सहजता, प्रतिभा, स्फूर्ती, कल्पकता, तरल संवेदनशीलता, नावीन्य, ताजेपणा, बंडखोरवृत्ती, स्वातंत्र्यप्रीती इत्यादी अनेकविध वैशिष्ट्यांनी भारलेले ताजे, टवटवीत 'रोमँटिक युग' इंग्रजी कवितेत अवतरते. यांत्रिक दृष्टिकोणाच्या जागी 'नैसर्गिक दृष्टिकोणा'ची- प्रस्थापना करते. केवळ या एका गोष्टीवरून देखील 'रोमँटिक युगा'ची अपरिहार्यता, आणि प्रतिभा-बळ, तसेच रसिकांच्या मनावर या कवितेने घातलेली मोहिनी यांची कल्पना करता येते.

रोमँटिक कवितेत कवीच्या व्यक्तित्वाला, त्याच्या अंतःसृष्टीला, आत्मप्रत्ययाला आणि आत्माविष्काराला असाधारण महत्त्व प्राप्त झाले. आता आत्माविष्कारातूनच (Subjectivism) वास्तवाचा अर्थ लावता येणं शक्य होतं. तो एक शोध बनला. या आत्माविष्काराला बाह्य विश्वात आधार मिळाला तो निसर्गाचा. झाड हे काही एखादी यांत्रिक जुळणी असावी तसे नसते. त्याची सर्वांगीण वाढ होत असते ती निसर्गातील चैतन्यतत्त्वाने. सृष्टी ही एक स्थिर, स्थितिशील वस्तू नसून ते एक अखंड प्रवाही असे चैतन्य आहे, अशी जाणीव त्यातून होऊन रोमँटिक कवितेत विश्वाविषयीचा 'नैसर्गिक' दृष्टिकोण प्रस्थापित झाला. आपल्या जीवनविषयक दृष्टिकोणातच मूलभूत फरक घडवून आणणारी ही एक क्रांतिकारक घटना होती. अशा तऱ्हेने निसर्ग ही रोमँटिक कवितेची एक महत्त्वाची प्रेरणा होऊन राहिली.

काव्यनिर्मितीसंबंधीच्या तत्त्वावरही याचा परिणाम झाला. 'झाडाला पालवी यावी तशी कविता सहज झाली पाहिजे; नाहीतर ती नकोच!' (If poetry comes not as naturally as the leaves to a tree, it had better not come at all) या कीटस्च्या उद्गारांवरून हे स्पष्ट होते. निसर्गाशी निर्माण झालेल्या दृढ नात्यातून कवीच्या मनाच्या विविध लहरी वा मनोऽवस्था (moods) त्याला निसर्गात प्रतिबिंबित झालेल्या दिसू लागल्या. त्यामुळे निसर्ग हा एकाच वेळी बाह्य विश्वाचा आधार असलेला पण कवीच्या मनोऽवस्थांचे उत्कट, गडद रंग घेऊन त्याच्या आत्माविष्कारातून प्रकट झालेला दिसू लागल्या. निसर्गाकडे जाण्याचा मार्ग रोमँटिक कवींना सापडला तो निसर्गाच्या कुशीमध्ये नैसर्गिक प्रेरणांनी जगणाऱ्या अनागर, जानपद जीवनाच्या व्यवहारात; त्यांच्या जिवंत बोलीत; तसेच, शैशवासारख्या मानवाच्या मुग्ध, निरागस अवस्थांत! शहरी, कृत्रिम आणि निसर्गापासून फारकत झालेल्या जीवनापेक्षा या साध्या, अकृत्रिम जीवनाची ओढ हा त्यामुळे रोमँटिक कवितेचा आणखी एक महत्त्वाचा विशेष होऊन बसला.

याचा परिणाम रोमँटिक कवितेच्या भाषेवर, शब्दकळेवर आणि एकूणच आविष्कारशैलीवर झाला. अलंकृत, कृत्रिम, कलाकुसरीच्या रचनेऐवजी सहज, स्वाभाविक उत्स्फूर्त भावोद्गारांना रोमँटिक आविष्कारात प्राधान्य मिळाले. भावनाशीलता, संवेदना आणि त्याच्या उत्कट आविष्काराला साजेसा प्रतिभा, नाद, लय आणि उच्चारातील मोकळेपणाचा स्वीकार या शैलीने केला. आत्माविष्काराला अनुरूप अशी सहज शैली त्यातून घडत गेली. या आविष्कारातून 'भाव-कविते'ची फार मोठ्या प्रमाणात निर्मिती 'रोमँटिक कविते'च्या कालखंडात



झाली. पुढील काळात, 'भावकविता हेच कवितेचे खरे रूप (फॉर्म) होय.' ही संकल्पना दृढमूल करण्यात रोमँटिक युगातील भावकवितेचा हातभार फार मोठा आहे.

**सृष्टी ही एक स्थिर, स्थितिशील वस्तू नसून ते एक अखंड प्रवाही असे चैतन्य आहे, अशी जाणीव होऊन रोमँटिक कवितेत विश्वाविषयीचा 'नैसर्गिक' दृष्टिकोण प्रस्थापित झाला. आपल्या जीवनविषयक दृष्टिकोणातच मूलभूत फरक घडवून आणणारी ही एक क्रांतिकारक घटना होती. अशा तऱ्हेने निसर्ग ही रोमँटिक कवितेची एक महत्त्वाची प्रेरणा होऊन राहिली.**

## आत्माविष्कार म्हणजे आत्मचरित्र नव्हे

रोमँटिक कवितेतील आत्माविष्कार म्हणजे कवीच्या लौकिक जीवनाचे आत्मचरित्र नव्हे. ती एक 'निर्मिती' होती, 'सर्जन' होते. कवीच्या ठिकाणी उपजतच असलेल्या कल्पनाशक्तीच्या बळावर कवीला ही निर्मिती साधता येणे शक्य होते, याची जाणीव रोमँटिक कवितेच्या काळात प्रकर्षाने पुढे आली. कल्पनाशक्ती हा मानवी प्रज्ञेचा सर्वोच्च आविष्कार मानून कोलरिजने या शक्तीचे भेद आणि निर्मितीतील कार्य स्वतंत्रपणे विशद करून सांगितले. प्रतिभा, स्फूर्ती, सौंदर्य, नावीन्य, मौलिकता (ओरिजिनॅलिटी) या संज्ञा रोमँटिक काळात त्या वातावरणाचाच एक भाग होऊन राहिल्या.

## अलौकिक दृष्टी

याच्या जोडीला, कवीची 'अलौकिक दृष्टी' हा देखील रोमँटिक कवितेच्या काळात विशेष कुतूहलाचा विषय होऊन राहिला. ही अलौकिकता दोन अंगांनी मानली जायची. एक - दिक्कालातीत आरपार पाहू शकणारी कवीची प्रतिभाशक्ती आणि दोन – तरल कल्पनाविलासातून, किंवा परिचित दृश्यांच्या अपूर्व वर्णनातून प्रत्ययास येणारी त्याच्या आत्माविष्कारातील कल्पनाशक्ती 'Tiger Tiger burning bright' ही ज्याची कविता अनेकांना परिचित आहे त्या ब्लेक या कवीला कुणी विचारलं, 'सूर्य उगवतो तेव्हा तो 'गिनी' नाण्यासारखं अग्नीचंच एक झगझगीत गोल बिंब वाटत नाही काय?' यावर, 'छे, छे. मला तर असंख्य स्वर्गीय देवता 'तो सर्वशक्तिमान प्रभू परम परम पवित्र आहे' हे उद्घोष-गीत गात आहेत, असं दृश्य दिसतं!' असं ब्लेकनं उत्तर दिलं. (''Oh, no, no, I see an Innumerable company of the Heavenly host crying, ``Holy, Holy, Holy is the Lord God Almighty'')

## अद्भुततेचे वलय

प्राचीन काळी मुळातच कवीच्या प्रतिमेभोवती एक अद्भुततेचं वलय होतं, पण रोमँटिक कालखंडात ते अधिकच रम्य आणि झगमगीत झालं. याचं कारण एक तर नव-अभिजातवादाच्या पार्श्वभूमीवर रोमँटिक कवितेचं नावीन्य, ताजेपण, मोकळेपण खुलून दिसत होतं - आकर्षून घेत होतं. पण त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे मध्ययुगीन काळातील मूल्यव्यवस्था ढासळायला लागून माणसाला जे निराधारपण जाणवू लागलं होतं त्याला या कवितेतील आत्माविष्काराचा मोठा आधार वाटत होता.

'रोमँटिक' कवी हे निसर्ग-कवी म्हणून ओळखले जात होते. तोवर इंग्रजी कवितेत, न जाणवलेले निसर्गाचं चैतन्य या कवींच्या उत्कट संवेदनशील चित्रणातून या काव्यात प्रकट होत होते. परंतु त्याबरोबर कित्येक ठिकाणी निसर्गदृश्य वा निसर्गाची पार्श्वभूमी ही एक निमित्त किंवा प्रतीकात्मक स्वरूपाची होती. त्या कवितांचा रोख होता तो, मानवी भावनांच्या चित्रणाकडे. अनागर किंवा जानपद जीवनाकडे या कवींची जी ओढ दिसून येते त्याला देखील एक व्यापक सामाजिक संदर्भ होता. सरंजामशाही किंवा शहरी जीवनाहून वेगळ्या, साध्या, निष्कपट व जिव्हाळ्याच्या मानवी संबंधावर आधारलेल्या समाजाच्या घडीची जी कल्पना-चित्रे रूसो आदी विचारवंतांकडून त्या काळात रंगविली जात होती, त्यांतून मुळातच मुक्तता आणि स्वातंत्र्याची ओढ असलेल्या या कवींना नव्या मानवतावादी जगाची स्वप्ने रंगवण्याची प्रेरणा मिळत होती.

एका परीने ते नवे जग घडविण्याची जबाबदारी या कवींनी स्वीकारली होती. 'poets are unacknowledged legislators of humanity' या शेलेच्या उद्‌गारांमध्ये हीच जबाबदारीची जाणीव प्रतिबिंबित होते. याचा परिणाम म्हणजे स्वप्नदर्शी ('ड्रीमर') आणि प्रेषित (प्रॉफेट) या दोन्ही नात्यांनी कवीच्या प्रतिमेभोवती अद्भुततेचं वलय निर्माण झालं.

## रोमँटिक युगाचा जाहीरनामा

'आत्माविष्कार' म्हटल्यावर सर्वसाधारणपणे आपल्या डोळ्यांसमोर रोगट व संकुचित अशा आत्मकेंद्री, वा 'स्वयकेंद्री' वृत्तीचं जे चित्र उभं राहतं, त्याहून या 'रोमँटिक' कवितेतील 'आत्माविष्कारा'चे बळ आणि व्याप्ती किती वेगळी आणि मोठी होती, याची यावरून सहज कल्पना येईल. या आत्माविष्काराचं स्फुरण जरी 'स्वतः'मध्ये असलं तरी त्या वर्तुळांचा विस्तार समुद्रासारखा अमर्याद, असीम आणि जडापलीकडील चैतन्याच्या क्षितिजांना स्पर्श करणारा होऊ शकत होता. कोलरिजच्या पुढील उद्‌गारांत त्या 'रोमँटिक युगा'चा जणू जाहीरनामा आपणांस पाहावयास मिळतो.

'We begin with the I KNOW MYSELF, in order to end with the absolute, I AM. We proceed from the SELF, in order to lose and find all self in GOD''



## रोमँटिक ही एकजिनसी संज्ञा नाही

'रोमँटिक' ही एकजिनसी संज्ञा नाही याचा प्रारंभीच उल्लेख झाला आहे. या संकल्पनेत अनेक भेद आणि प्रवृत्ती अंतर्भूत आहेत. आत्माविष्कारातून वास्तवासंबंधी काही मूल्यव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न काही कवींमध्ये दिसून येतो- काहींमध्ये नाही. त्यावरून 'नकारात्मक रोमँटिसिझम' (उदा. बायरन) आणि 'सकारात्मक रोमँटिसिझम' (उदा. कोलरिज, शेली) असे भेद केले गेले आहेत. युरोपमधील इंग्लंड, फ्रान्स आणि जर्मनी या तिन्ही देशांतील रोमँटिक कवितेचा आविष्कार एकाच प्रकारचा नाही. परंपरा आणि परिस्थितीनुसार त्यात प्रकट झालेल्या. वैशिष्ट्यांचे स्वरूप आणि रंग वेगवेगळे आहेत. फ्रान्समधील साहित्यावर नव-अभिजातवादाची पकड फार घट्ट होती. त्यामुळे तिथे रोमँटिसिझमला सर्वात अधिक प्रतिकार झाला. रोमँटिसिझम रुजायला वेळ लागला.

## जर्मनीत स्वागत

जर्मनीच्या बाबतीत असा अडसर नव्हता. 'विश्वाची संकल्पना व्यक्तीच्या जाणिवेवर, परिप्रेक्ष्यावर अवलंबून असल्यामुळे सतत प्रगतिशील अशा एका अद्भुत आदर्शवादाचं नवं रूप तिला देता येणं शक्य आहे,' या तत्त्वज्ञानाच्या बैठकीवर 'रोमँटिसिझम' ही एक सर्वव्यापी संकल्पना म्हणून जर्मनीमध्ये विविध व्यवहारक्षेत्रांत उसळी घेत पसरली.

आपण पाहत आहोत त्या रोमँटिक कवितेच्या युगाचा प्रारंभ जर्मनीतच झाला. प्रारंभीच्या काळात उत्साहातिरेकाने या कवितेचे वारेमाप कौतुक श्लेगेल बंधूंनी, विशेषतः फ्रेड्रिक श्लेगेल यांनी, केलेले आढळते.

म्हणजे फ्रान्सच्या कडव्या वृत्तीच्या बरोबर विरुद्ध दुसरे टोक!

इंग्लंडच्या बाबतीत पहिल्यापासून उपजत समंजसपणातून समतोल साधणारी, अतिरेक टाळणारी वृत्ती प्रकट झालेली दिसून येते.

जॉन्सनच्या कालखंडात अभिजातवादाच्या प्रभावाखाली प्राचीन नियमांच्या पालनावर कटाक्ष असतानादेखील साहित्यातील 'सौंदर्याच्या' निकषावर त्या नियमांना थोडी मुरड घालावी लागली तर तिकडे क्षमाबुद्धीने पाहिले जायचे.

शेक्सपिअर तसेच एलिझाबेथच्या काळातले साहित्य अभिजातवादी साहित्यापासून निराळे आहे, याची जाणीव इंग्लंडला होती. मात्र हे बदल हळुहळू स्वीकारले जायचे. त्यामुळे इंग्रजी काव्यातील 'रोमँटिक युगा'चं 'उत्क्रांतीच्या वाटेने घडलेली क्रांती' असं वर्णन केलं जातं.

## अनुकृतीची जागा आविष्काराने घेतली.

साहित्यातील कोणतंही 'युग' वा 'प्रवृत्ती' 'मावळते'– 'नष्ट' वा 'मृत' होत नाही. पुढील काळात वास्तववादाचा प्रभाव वाढला. आणखीही काही नव्या प्रवृत्ती साहित्यात येत

**आपल्याकडील 'प्रबोधन' युग आणि आपली रोमँटिक काव्यदृष्टी यात कोठे संघर्ष आला नाही, उलट प्रबोधनयुगाचा आशय आणि जीवनदृष्टी हा आपल्या रोमँटिक कवितेचा अविभाज्य भाग होऊन राहिला; तर दुसऱ्या बाजूने रोमँटिक कवितेच्या प्रभावामुळे आपल्या प्रबोधनयुगातील बुद्धिवाद आदी संकल्पनांवर यांत्रिक दृष्टिकोणाचा प्रभाव पडू शकला नाही.**

गेल्या व रोमँटिक युग मागे पडले. तरीही आत्माविष्कार, कल्पनाशक्ती, प्रतिमा-प्रतीक आदी सौंदर्यनिर्मितीचे घटक अशा अनेक अंगांनी रोमँटिसिझमने केलेले कार्य दीर्घकाल परिणाम करणारे ठरले. तोवर साहित्याचे अनुकृती –(म्हणजे नव-अभिजातवादाच्या काळात अभिजात साहित्याचे आदर्श डोळ्यांसमोर ठेवून त्यांचं केलेलं अनुकरण नव्हे, तर ॲरिस्टॉटलच्या काळापासून मानले गेलेले अनुकृतीचे तत्त्व) हे जे तत्त्व मानले जात होते, त्याची जागा आविष्कार या नव्या तत्त्वाने घेतली.

रेनेसन्स- एनलाइटनमेंटच्या काळातील मेकॅनिस्टिक भूमिकेच्या जागी रोमँटिसिझमने जो ऑरगॅनिक दृष्टिकोण आणला. त्याचाही कलेच्या क्षेत्रातील सेंद्रिय आकृतिबंधाच्या विचारांवर परिणाम झाला. 'प्रतीकवाद ही रोमँटिसिझमचीच विस्तारित संकल्पना होय' असे कोणी मानतात तर 'अति-वास्तववादा'मध्ये (Surrealism) अंतर्मनाशी असलेल्या संबंधाचं मूळ रोमँटिक कवितेच्या 'आत्माविष्कार' या तत्त्वामध्ये शोधलं जातं.

म्हणूनच 'रोमँटिक युग' मावळले तरी त्या रोमँटिक कालखंडाचा पुढील काळातही टीकाकारांकडून नव्या नव्या संदर्भात पुन्हा पुन्हा विचार होत राहिलेला आढळतो.

त्याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'रोमँटिसिझम' हे मुळी निर्मितीचंच एक अंगभूत तत्त्व आहे.

## अर्वाचीन मराठीतील रोमँटिक युग

अर्वाचीन मराठी कवितेत, एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस रोमँटिक युग अवतरले त्याची प्रेरणा आपण वर पाहिलेल्या इंग्रजी रोमँटिक कवितेत होती. पालग्रेव्ह यांनी संपादित केलेला 'The Golden Treasury' हा इंग्रजीतील स्फुट कवितांचा संग्रह हे या काळातील पहिल्या दोन पिढ्यांपर्यंतच्या कवींच्या बाबतीत तरी केवळ एक प्रेरणा आणि स्फूर्ती देणारं केंद्र नव्हतं - त्याची एक विलक्षण जादू, मोहिनी वा धुंदीच म्हणा, या कवींवर (आणि रसिकांच्या मनावरही) त्या काळात पसरली होती. 'दत्त कवी. भावनाप्रधान... 'गोल्डन ट्रेझरी' उशाशी घेऊन निजणारे' असं जे कवी दत्त यांच्याविषयी त्यांचे चिरंजीव व साहित्यात स्वतःचं नाव करून गेलेले वि.द. घाटे यांनी लिहिलं आहे, ते एक प्रकारे त्या काळाचं प्रातिनिधिक चित्र म्हणता येईल.



## गोल्डन ट्रेझरीचा प्रभाव

परंतु 'गोल्डन ट्रेझरी' हा एकच संस्कार नव्हता. प्रेरणा देणाऱ्या अनेक तत्कालीन घटनांतून मराठी कवितेला हे नवे वळण प्राप्त होत होते. इंग्रजांची सत्ता आणि त्यामुळे इंग्रजी संस्कृतीशी प्रत्यक्ष येऊ लागलेला संबंध; भारतीय संस्कृतीपासून भिन्न आणि त्या काळात विजिगीषु व प्रभावी ठरलेल्या त्या संस्कृतीचं सामर्थ्य आणि वैभव यांचं घडणारं दर्शन; दोन संस्कृतींच्या संघर्षातून सुरू झालेलं वैचारिक मंथन, नव्या विद्या आणि भौतिक शास्त्रांचा परिचय, निरनिराळ्या पातळ्यांवर निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये प्रत्यक्ष इंग्रजी माणूस, कुटुंब, स्त्रीपुरुष यांचा या भूमीवर आपल्या समाजात सुरू झालेला वावर - कातडी, पोषाख, भाषा, खाणं-पिणं, राहणी, वागणं असं सर्वच बाबतीत जाणवणारं त्यांचं (त्या काळातील आपल्या राहणीच्या तुलनेनं) पराकोटीचं वेगळेपण, त्या निमित्ताने ही माणसं ज्या भूखंडातून आली त्या देशाविषयी निर्माण झालेलं कुतूहल ('नवखण्ड पृथ्वी आणि दहावं काशी' या पौराणिक कल्पनेत गुरफटून राहिलेल्या तत्कालीन सर्वसामान्य माणसाला हा अनुभव आश्चर्यकारक व अद्भुतच असणार) – अशा अनेक घडामोडी आणि या पार्श्वभूमीवर आपल्या देशात अवतरलेलं 'प्रबोधन-युग' या सर्वच घटना, रोमँटिक कवितेला निरनिराळ्या प्रकारे प्रेरक झालेल्या दिसून येतात.

## उत्कट व प्रबळ प्रवृत्ती

या वातावरणात हुरूप, उत्साह, नैराश्य, संताप, त्वेष, असमाधान अशा वेगवेगळ्या प्रकारच्या आणि कुठे परस्परविरोधीही वृत्ती प्रबळ झालेल्या आढळतील. त्या कशाही असल्या तरी मुख्य म्हणजे प्रबळ आणि उत्कट होत्या, समाजमन जागृत करणाऱ्या होत्या, समाजाला ढवळून काढत होत्या.

आपल्याकडील 'प्रबोधन' युग आणि आपली रोमँटिक काव्यदृष्टी यात कोठे संघर्ष आला नाही, उलट प्रबोधनयुगाचा आशय आणि जीवनदृष्टी हा आपल्या रोमँटिक कवितेचा अविभाज्य भाग होऊन राहिला; तर दुसऱ्या बाजूने रोमँटिक कवितेच्या प्रभावामुळे आपल्या प्रबोधनयुगातील बुद्धिवाद आदी संकल्पनांवर यांत्रिक दृष्टिकोणाचा प्रभाव पडू शकला नाही.

## काव्यदृष्टी व प्रबोधन युग

प्रबोधनयुग आणि आपली रोमँटिक कविता यांच्यामध्ये इतकं निकटचं नातं असलं तरी ही रोमँटिक कविता आणि तिच्यामागील काव्यदृष्टी हा केवळ प्रबोधनयुगाचा परिपाक नव्हता. प्रबोधनयुगाशी असलेल्या तिच्या वरील प्रकारच्या संबंधांमुळे अनेकदा आपली अशी गल्लत होते– आपण तिला प्रबोधनयुगाच्या विचारांची आणि जीवनदृष्टीची केवळ वाहक धरून चालतो.

प्रबोधनयुगाच्याच पार्श्वभूमीवर पण कवी, काव्यलौकिक आणि जिवंत काव्यदृष्टी यासंबंधीच्या आपल्या कल्पनांना स्वतंत्रपणे चालना मिळाली ती थेट इंग्रजी रोमँटिक कवितेतून. प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धन यांचा ‘काव्य आणि काव्योदय’ हा निबंध या वस्तुस्थितीची जाणीव स्पष्ट करून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो.

पटवर्धनांचा निबंध १९०९ या वर्षीचा आहे. पटवर्धन हे केशवसुतांचे समकालीन व स्वतःदेखील कविता लिहीत होते. त्यांच्या नवीन वृत्तीच्या ‘मधुर कविते’चं गुणगान करणारी एक कविता केशवसुतांनी (‘रा. वा. ब. पटवर्धन मु. नागपूर, यांस’) १८८८ साली लिहिली होती. पुढील गाजलेल्या केशवसुतांच्या काव्यपंक्ती याच कवितेतल्या आहेत.

*या अन्तरालातिल तारकांत*
*आत्मे कवीलागुनि दिसतात;*
*कांचेमधूनीहि दिसतें जनांला,*
*धोंड्यामधूनीहि दिसे कवीला!*

पटवर्धन आपल्या निबंधातून जे विचार मांडत होते त्याच रोमँटिक काव्यकल्पनांनी केशवसुतांची काव्यदृष्टी भारलेली होती.

पटवर्धनांना याची जाणीव होती, हे त्यांनी केशवसुतांबद्दल जो गौरवोद्‌गार त्यांच्या वरील निबंधात काढले आहेत, त्यावरून लक्षात येते.

## केशवसुतांचे काव्य

केशवसुतांच्या काही गाजलेल्या सामाजिक आशयाच्या कवितांमुळे त्यांना प्रबोधनयुगाचे उद्‌गाते म्हणण्यात येते ते केवळ अंशमात्र सत्य आहे. केशवसुतांनी आपल्या काव्यप्रतिभेत सामावून घेतली होती ती प्रबोधन-युगाची ‘सर्जनशीलता’. केवळ आपल्याकडीलच प्रबोधनाची नव्हे तर युरोपमधील रेनेसन्स व एनलाइटनमेंट या दोन्ही प्रबोधनांची देखील. त्यामुळे प्रबोधनयुगाचा आशय, दृष्टी आणि सत्त्व यांच्या कवितेत जितक्या उत्कट आणि व्यापक स्वरूपात आविष्कृत झालं आहे तितक्या प्रमाणात ते अन्य मराठी कवींमध्ये आढळत नाही. पण हे खरं असलं तरी प्रबोधनयुगाच्या सीमा ओलांडून व्यापक जीवनचिंतनाकडे त्यांच्या प्रतिभेची झेप जाते, याचं रहस्य त्यांच्या रोमँटिक काव्यदृष्टीमध्ये सापडेल.

केशवसुतांच्या या रोमँटिक काव्यदृष्टीची बीजं अर्थातच इंग्रजीतील रोमँटिक कवितेत होती. इंग्रजीतील रोमँटिसिझमचे सत्त्व आणि ऊर्जा यांच्या बीजधर्मी युगप्रवर्तक काव्यप्रतिभेने किती खोल आणि उत्कटपणे आत्मगत करून घेतली होती. आत्माविष्कार, निसर्ग, प्रेम, अनागर जीवनाची ओढ, स्वातंत्र्यप्रीती, सौंदर्यजाणीव, तत्त्वचिंतन, काव्यदृष्टीची अलौकिकता, स्फूर्ती, शब्दशक्ती, प्रतिभेची सर्जनशीलता इत्यादी अनेक तत्त्वांना वेढून घेणारी ही



काव्यदृष्टी, तिचा आवाका आणि व्याप्ती मराठी कवितेचं तोवरचं चित्रच आमूलाग्र बदलून टाकण्याइतकी प्रभावी ठरली याचंही रहस्य स्पष्ट व्हायला या अवतरणांची मदत होईल. ही अवतरणे मुख्यत्वे कवी आणि काव्यविषयक असली तरी एकूणच रोमँटिक आविष्काराचे संचारक्षेत्र, विषय आणि जाणिवा यांचं दिग्दर्शन ती करतात.

*विश्वीं या प्रतिभाबलें विचरतों चोहींकडे लीलया,*
*दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके! (आम्ही कोण?)*
*प्रत्येक मेघ वरता फिरतां नभांत*
*एकेक शब्द लिहितों मम पुस्तकांत (सृष्टी आणि कवी)*
*युवा जसा तो युवतीस मोहें*
*तसा कवी हा कवितेस पाहे, (कविता आणि कवि)*
*रम्य धुक्याची अद्भुत सृष्टि,*
*तींत उघडिसी अपुली दृष्टि,*
*मग तो भास्वान् तुजवरि करितो*
*तेजाची वृष्टि!*
*चिरतरुणा रे! चिररुचिरा रे!*
*तुजसन्निध तो वास बरा रे!*
*तुजमजमध्यें परी केवढी*
*आहे रुन्द दरा रे! (पुष्पाप्रत)*
*पूजितसें मी कवणाला तर मी पूजीं अपुल्याला*
*आपल्यामधें विश्व पाहुनी, पूजीं मी विश्वाला! (नवा शिपाई)*
*तों मज गमलें विभूति माझी स्फूर्ती पसरली विश्वामाजी;*
*दिक्कालांसहि अतीत झालों;*
*उगमीं विलयीं अनन्त उरलों; (सतारीचे बोल)*

तुकारामांनी विठ्ठलासाठी घेतलेला ध्यास आणि तळमळ यांची आठवण व्हावी अशी अंगभूत उत्कटता केशवसुतांच्या या उद्‌गारांमध्ये आहे. मराठीतील रोमँटिक कवितेचे बहुतेक ठळक विशेष या काव्य पंक्तींच्या आधारे देखील आपणांस लक्षात घेता येतात.

केशवसुतांची काव्यप्रतिभा प्रकृतीनेच बंडखोर होती. परंतु प्रकृतीने बंडखोर नसलेल्या, शिवाय भारतीय परंपरा, संकेत, श्रद्धा, तत्त्वज्ञान यांत खोल मुरलेल्या दोन कवींच्या प्रतिभा, त्यांच्या संवेदनशीलतेला अनुकूल ठरतील तेवढे व त्याच प्रकारचे धागे आपल्या निर्मितीत गुंफून मराठीतील रोमँटिक कवितेचे प्रेरणास्थान होऊन राहतात. ते दोन कवी

म्हणजे कविवर्य भा. रा. तांबे आणि कवी 'बी' (BEE). यांपैकी 'बी' कवी काहीसे एकाकी पडतात. त्यांची काव्यरचना थोडा आणि त्यांचा थेट वारसाही दाखवता येण्यासारखा नाही. तरीही त्यांची काव्यरचना पायाभूत स्वरूपाची म्हणून महत्त्वाची ठरते. केशवसुत आणि तांबे यांचे तर संप्रदायच निर्माण झालेले आपण पाहतो.

रोमँटिक कवितेतील आत्माविष्कार (subjectivism) या प्राणभूत तत्त्वाचा आविष्कार सर्वच कवींच्या बाबतीत सारख्याच उत्कटतेने झालेला दिसून येत नसला तरी या तत्त्वाचं भान सहजपणे किती भिन्न भिन्न प्रकृतींच्या काव्याविष्कारांमध्ये पसरलेलं जाणवतं, याचा जाता जाता एक नमुना सादर करावा म्हणून कवी गोविंद यांच्या 'सरस्वतीची भूपाळी' या प्रसिद्ध काव्यरचनेतील पुढील ओळी पहा :

*आत्मवेलिच्या स्फूर्तिफुलांवर वसंत जे विकसती*
*बुद्धिचे वसंत जे विकसती*
*त्याच वसंतां, तदिय विकासा सरस्वती बोलती.*

आपल्या रोमँटिक कवितेचं प्रारंभापासूनच प्रबोधन व प्रबोधनाचं पर्यावरण यांच्याशी निकटचं नातं असल्यामुळे आत्माविष्कारावरही त्याचा परिणाम झालेला दिसून येतो. तो आत्माविष्कार कलावंत या दृष्टीने जितका आत्मगत तितकाच त्या प्रबोधनाचा पर्यावरणाचे रंग आणि जाणिवा यात मिसळलेला राहिला. काही कवींच्यामध्ये हा या जाणिवांसकट आणि निखळ अशा दोन्ही रूपांत प्रकट होत राहिला (केशवसुत); काहींमध्ये अधिक प्रमाणात तो निखळ, विशुद्ध स्वरूपात होत राहिला (बालकवी); तर अनेक कवींनी ठराविक आशय व्यक्त करण्यासाठी एक साधन वा तंत्र म्हणून आत्माविष्कार या तत्त्वाचं उपयोजन केलं.

या संदर्भात एक गोष्ट येथे लक्षात घ्यायला हवी. सगळी मूल्यव्यवस्था कोसळून वा प्रचलित व्यवस्थेला जबरदस्त हादरे बसून मानव निराधार झाला आहे आणि आत्माविष्कारातूनच त्याला वास्तवाचा शोध घ्यावा लागणार आहे, अशी इंग्रजी रोमँटिसिझमसारखी विलक्षण परिस्थिती वा कोंडी आपल्याकडे निर्माण झाली नव्हती. आपल्या आत्माविष्काराचा एक धागा बाह्य वास्तवाशी निगडित तर एक धागा केशवसुतांनी निर्माण केलेल्या कवीच्या रोमँटिक प्रतिभेतून स्फूर्ती घेणारा होता.

आपल्या रोमँटिक कवितेमध्ये तीन प्रमुख घटक वा प्रवृत्ती आढळून येतात.

स्थूलमानाने त्यांना ध्येयवाद, वास्तववाद आणि स्वप्नरंजन असे संबोधता येईल.

मात्र या तिन्ही संज्ञा विशिष्ट संदर्भात आणि विशिष्ट अर्थाने योजल्या आहेत.

□

# मंदिरा : सुनील गंगोपाध्याय

**अनु. तारा पंडित**

*आता मुले मोठी झाली, आपापल्या मार्गाने निघून गेली. नवरा राजकारणात गुंतलेला. आपल्याला या घरात स्थान नाही असे समजणारी मंदिरा ही आपल्या ब्रिटिश खासदार नवऱ्याला घटस्फोट देऊन पंचवीसेक वर्षांनी बंगालमध्ये परत येते. आपल्या जुन्या मित्रांना भेटते. तिचा पूर्वाश्रमीचा प्रियकर विमान तिच्याशी जवळीक साधून जुन्या स्मृतींना उजाळा देऊ पाहतो. सज्जद व जावेद हे मुस्लिम कार्यकर्तेही तिला भेटतात. एका खेड्यातील खत कारखान्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाविरुद्ध मोर्चा निघतो, त्यात ती नकळत ओढली जाते. तिच्याकडे त्या मोर्चाचे नेतृत्व येते. पोलिस तिला पकडून बराच वेळ गाडीतून हिंडवतात व रात्री तिच्या घराजवळ सोडून देतात. त्या रात्री तिच्याशी शारीरिक लगट साधण्याचा कोणीतरी प्रयत्न करते. ती अस्वस्थ होते. आत्महत्या करायचे ठरवते. परंतु तिच्याशी लगट करणाऱ्या तरुणाला सज्जद शोधून काढतो आणि तिच्यापुढे हजर करतो. आपल्या स्त्रीत्वाला जागवणारा तो तरुण तिला आवडतो. "तू खरंच रे किती सुंदर आहेस! मोठेमोठे डोळे, दाट भुवया, मातीसारखा वर्ण, आणि तरीसुद्धा तू असा रागीट चेहरा करून का राहतोस? ....तुझ्या रागानं तुझं व्यक्तित्व संपूर्णपणे झाकून टाकलंय. तरीही मला तुझं आकर्षण वाटत होतं.. तुझा राग हा राग नसून तुझा स्वाभिमान आहे. एखाद्या पुरुषाचा एवढा स्वाभिमान मला अगोदर कधी जाणवला नव्हता.. मला जवळ घे. घट्ट धरून ठेव. तुझ्या छातीशी धर. जावेद, मला खूप आवडेल. मला प्रेम हवंय रे! माझं वय वाढलं असलं तरी अजून मी म्हातारी झालेली नाहीय."*

*....मंदिराला भेटायला तिची मुलगी एलिझाबेथ आपल्या नवपरिणित नवऱ्यासह येते. मंदिरा आणि जावेद एका नावेत राहात असतात. एकमेकांत गुंतलेले असतात.*

*एलिझाला आपल्या आईचे हे नवे सुख खूपच पसंत पडते.*

*सुनील गंगोपाध्याय यांच्या ह्या कादंबरीत अनेक वादग्रस्त विषय आले आहेत. उतारवयातील स्त्रीच्या मनात आयुष्याबद्दल येणारी उदासीनतेची भावना संसार-प्रपंचातून तिचे लक्ष उडवते. पण योग्य प्रतिसाद देणारा कोणी भेटला की जीवनात नव्याने रस निर्माण होतो. आयुष्य अर्थपूर्ण वाटू लागते आणि हे सुखाचे वेगळेच रूप आनंददायक ठरते.*

*परदेशातील वास्तव्य, तेथील जीवनशैली, नवरा टॉमस यांचे राजकीय क्षेत्रातील वाढते कार्य, मुलांची मानसिकता, बंगाली स्त्री व ब्रिटिश खानदानी तरुण ह्यांच्या विवाहामुळे निर्माण होणारे काही प्रश्न, त्यांच्या मुलांना त्यामुळे येणारे पक्षपातीपणाचे अनुभव, ब्रिटिश जीवनशैलीचे विशेष भारतात परतल्यावर आलेले पुरुषांचे व पूर्वाश्रमीच्या मित्रांचे अनुभव, जीवनाचे श्रेय शोधण्याचा प्रयत्न, ग्रामीण भागात राहून आपल्या भूतकाळाचा घेतलेला वेध, कारखाने व प्रदूषण, त्यामुळे होणारे आंदोलन असा सर्व घटनाक्रम ह्या कथानकात आलेला आहे. तरीही केंद्रवर्ती राहते ते मंदिराचे असमाधान आणि ते दूर करण्यासाठी तिने नकळत चालवलेला आत्मशोध.*

*तिचे विचार, तिचे वागणे हे पाश्चात्य स्त्रीला साजेसे बोल्ड आहेत. पूर्वाश्रमीच्या मित्राबरोबर राहण्यात तिला संकोच वाटत नाही; परंतु तरीही योग्य ती मर्यादा ती पाळते.*

*...मराठीत सुनील गंगोपाध्याय यांच्या अर्जुन वगैरे कादंबऱ्या आलेल्या आहेत. 'मंदिरा'ने पडणारी ही नवी भरही वाचकांना आवडेल.*

*टॉमशी २६ वर्षे संसार केल्यावर आणि तो तसा स्वभावाने समंजस असूनही मंदिरा घटस्फोटाचा निर्णय घेते, त्यामागची मानसिकता स्पष्ट करणारे प्रकरण आम्ही येथे देत आहोत.*



# “मला डायव्होर्स हवाय, टॉम, डायव्होर्स.”

आपली आई भारतीय महिला असल्याचं लिझने आपल्या मित्र-मैत्रिणींपासून कधीच लपवून ठेवलं नाही. उलट तिने अभिमानाने तसा उल्लेख केल्याचं मंदिराने आडून एकदा ऐकलं होतं. एका पार्टीत नावीन्य म्हणून ती मुद्दाम साडी नेसून गेली होती, आईकडून हट्टाने शिकून. रोज ती आईशी खूप गप्पा करायची. पण आता ती नव्हती त्यामुळे घर कसं रिकामं रिकामं भासत होतं. तरीपण तिचं खळखळून हसणं वातावरणात जणू भरून राहिलं होतं.

लिझ कधीही भारतात गेली नव्हती तरीसुद्धा तिने थोडंफार बंगाली शिकून घेतलं होतं. मंदिरा कधीकधी तिला रागवताना बंगाली भाषा बोलायची तेव्हा ती डोक्याचे केस उडवीत म्हणायची : समजलं, समजलं!

लिझ आपल्या बॉय फ्रेंडबरोबर गोल्डर्स ग्रीन ॲटीकमध्ये राहायला गेल्यापासून एकदाही घरी आली नाही. तरीपण ती वरचेवर फोन करायची, आईची विचारपूस करायची, वडिलांबद्दल मात्र चौकशी करायची नाही. रोज नव्या नव्या ठिकाणी झालेल्या पार्टीची वर्णनं ती आईला ऐकवायची. मग तिला इथे यायला कशी सवड मिळणार? लिझचा संसार बघायला एकदा जावं असं मंदिराला वाटायचं. पण बोलावल्याशिवाय तर ती जाऊ शकत नव्हती. या वयाची मुलंमुली लंच-डिनर बाहेरच घेतात. पण सकाळचा त्यांचा ब्रेकफास्ट कोण बनवत असेल? लिझ की बॉब?

मंदिराने अगोदरपासून स्वतःचं वेगळं असं वर्तुळ तयार केलेलंच नव्हतं. लंडनच्या बंगाली किंवा भारतीय लोकांशी तिने घनिष्ट परिचय कधी प्रस्थापित केलाच नाही.

टॉमशी लग्न करून तिला पूर्णांशाने ब्रिटिश कल्चर आत्मसात करायचं होतं. टॉमलाही भारताविषयी विशेष प्रेम नव्हतं. भारतातील राजनैतिक परिस्थितीबाबतच तो जास्त उत्सुक होता, पण भारतीय संस्कृतीचं आकर्षण त्याला कधी वाटलं नाही. भारतीय खाद्यपदार्थही त्याला आवडत नसत,



फक्त दोन गोष्टी वगळून– फिशकरी आणि पापड.

मंदिरा आपल्या ऑफिसातल्या लोकांना घरी कधी बोलावीत नसे. बोलावलं असतं तर टॉम त्यांच्याशी नक्कीच रूडली वागला असता. तसा टॉमचा स्वभाव थोडा उद्धटच. जे त्याच्या राजकारणाच्या चर्चेत भाग घेऊ शकत नसत ते सारे त्याच्या दृष्टीने मूर्ख.

घरी त्याला बाहेरचे कोणी आलेले खपत नसे. टॉमची ही वृत्ती मंदिराला अगदी सुरुवातीपासूनच माहीत होती.

मंदिरा सहा वाजेपर्यंत ऑफिसातून परत यायची. मुलं ज्या वेळी शाळा कॉलेजात शिकत होती तेव्हा घरी येताच ती डिनरच्या तयारीला लागायची. आता तर काहीच घाई नसते. टॉम कित्येक दिवस डिनरला घरी येतच नाही.

आता इलेक्शन जवळ आलं होतं. त्यामुळे टॉमला वरचेवर ससेक्सला जावं लागे.

मंदिराला खाण्यापिण्याचं विशेष प्रेम नव्हतं. कित्येक दिवस ती नुसत्या सँडविचवरच भागवायची. एकटीपुरता स्वयंपाक करायचा तिला कंटाळा यायचा. ती टी.व्ही. चालू करायची पण त्यात तिचं लक्ष लागत नसे. चांगली फिल्म किंवा म्युझिक प्रोग्राम असेल तर ती बघायची.

एक दिवस टॉमचा इंटरव्ह्यू पाहताच ती चमकून उठली. लाइव्ह नव्हता, प्रिरेकॉर्डेड होता. टॉमने असा इंटरव्ह्यू दिलाय हे मंदिराला माहीत नव्हते. ते सांगायला तो विसरून गेला होता किंवा त्याला वाटलं असावं की यात सांगण्यासारखं काही नसावं.

मंदिरा कधी कधी गाणं ऐकत बसायची. तिच्याकडे रवींद्र संगीताच्या काही रेकॉर्ड व कॅसेटस् होत्या. इतका काळ लोटल्यानंतर देखील रवींद्रसंगीताचं तिचं प्रेम कमी झालं नव्हतं. टॉमने तिच्या संगीताच्या रुचीमध्ये कधी अडथळा निर्माण केला नाही. एके दिवशी चॅनेल फोरवर सत्यजित राय यांचं पथेर पांचाली पिक्चर होतं. ती बसलीच बघायला. टॉमने पण पूर्ण फिल्म पाहिली. नंतर म्हणाला, “व्हेरी ऑथेंटिक. पण इंडिया अजूनही स्वतःच्या पायावर उभा राहू शकला नाही. म्हणून आवडत नाही...!”

मंदिरा म्हणाली, “ही ७०-८० वर्षापूर्वीची बंगाली खेड्याची अवस्था आहे. टॉम, आता तर कितीतरी बदललंय् सगळं.”

टॉम उपहासाने म्हणाला, “खरंच का बदललंय् सगळं?”

या विश्वविख्यात चित्रपटाच्या गुणदोषांच्या बाबतीत टॉमची इतर कोणतीच प्रतिक्रिया नव्हती.

मधून मधून टेलिफोन वाजायचा. कित्येक वेळा ती तसाच वाजू द्यायची. कोणाचा फोन असावा? दर दहा माणसांपैकी नऊजणं टॉमचीच चौकशी करणार. उरलेला एक लिझचा. लिझचा फोन यायचा तो फक्त सकाळी किंवा सुट्टीच्या दिवशी दुपारी. संध्याकाळचे

ते दोघे घरात थांबायचेच नाहीत.

टॉम म्हणजे पब्लिक फिगर, साहजिकच कित्येकजण त्याची चौकशी करणार. पण मंदिरासाठी एकही फोन नसावा? संध्याकाळी कोणालाच तिची आठवण होऊ नये? कोणीही तिची चौकशी करू नये? कुठे आणून ठेवलं होतं आपलं जीवन तिने?

एवढं मोठं लंडन शहर, रस्त्यावर नुसता दिव्यांचा चकचकाट, ट्यूब ट्रेनमधून असंख्य माणसं बाहेर पडतात, किती प्रकारचे सिनेमा, नाटकं, कन्सर्ट.. क्लब, रेस्टॉरंटस्... पण मंदिरा कुठेच जात नव्हती. एकटं जाणं वाईट दिसतं. काही काही फॉर्मल पार्ट्यांमध्ये विवाहित पुरुषांना आपल्या पत्नीसह जावंच लागतं. पत्नी बरोबर नसेल तर लोकांच्या भुवया वर जातात आणि त्यांना वाटतं या जोडप्यांमध्ये काही दुरावा निर्माण झालाय् की काय? ह्या सर्व पार्टींच्या गोष्टी मंदिराला टॉमने अगोदरच सांगून टाकल्या होत्या. मग मंदिराला सुद्धा नटूनसजून जावं लागायचं, हसून सर्वांशी बोलावं लागायचं, पण मधूनच एकाएकी ती रडवेली व्हायची.

अलीकडे मंदिराला आपलं जीवन अर्थहीन वाटायचं. नोकरीमध्ये ती जे काम करायची ते तिच्या जागी दुसरा कोणीही सहज करू शकत होता. ते इंडिस्पेन्सिबल नव्हतं. मंदिराला जेवढे पौंड मिळत ते तिने नसते मिळवले तरी चाललं असतं. मुलगा-मुलगी यांच्या बाबतीतलं तिचं कर्तव्य संपलं होतं. पतीच्या बाबतीत तरी आता तिचं कोणतं कर्तव्य उरलं होतं?

कर्तव्य सोडाच, पण प्रेम? मुलांचं प्रेम, नवऱ्याचं प्रेम सर्व काही आता संपून गेलं होतं. कदाचित अजून थोडं शिल्लक असेलही. पण पूर्वीसारखं अदृश्य प्रेम, फॉर्मलिटी औदासीन्य घालवणारं प्रेम केवळ यावर काही जीवन चालत नाही.

आपलं जीवन तिला निरर्थक वाटू लागलं होतं खरं. पण तिला तर मरायची इच्छा नव्हती. तिला संपूनही जायचं नव्हतं. एका दमात ते संपवून टाकणंही शक्य नव्हतं. जीवनाचा अर्थ शोधून काढणं आवश्यक होतं. अर्थ सापडेल अगर सापडणार नाही, पण हा शोध मात्र न संपणारा असतो.

अकरा जानेवारीचा दिवस होता तो. सकाळपासून बर्फ पडायला सुरुवात झाली होती. गेल्या तीनचार दिवसांपासून हेवी स्नो फॉल सुरू झालाय्.

मंदिरा ऑफिसला गेली नाही. सकाळीच फोन करून तिनं कळवून टाकलं होतं–

नंतर बराच वेळ ती बिछान्यावर पडून राहिली. वीक डेला अशी आरामाची संधी क्वचितच असते.

रात्री टॉम घरी आलाच नव्हता. पार्लमेंटचं विंटर सेशन सुरू होतं. काल रात्री साडेदहापर्यंत चर्चा सुरू होती. अशा वेळी पार्टी ऑफिसच्या जवळपासचं एखादं हॉटेल



**अलीकडे मंदिराला आपलं जीवन अर्थहीन वाटायचं. नोकरीमध्ये ती जे काम करायची ते तिच्या जागी दुसरा कोणीही सहज करू शकत होता. ते इंडिस्पेन्सिबल नव्हतं. मंदिराला जेवढे पौंड मिळत ते तिने नसते मिळवले तरी चाललं असतं. मुलगा-मुलगी यांच्या बाबतीतलं तिचं कर्तव्य संपलं होतं. पतीच्या बाबतीत तरी आता तिचं कोणतं कर्तव्य उरलं होतं?**

भाड्याने घेतात. पार्टीचे काही एम्.पी. तिथेच राहतात. रात्री उशिरापर्यंत जागून आपली स्ट्रॅटेजी ठरवतात. टॉमने बॅगेत दोन चेंजेस् बरोबर नेले होते. तो केव्हा घरी येईल ते नक्की नव्हतं.

काल लिझी आणि बॉब ग्रीस देशात फिरायला गेले होते. त्यांचा फोन येण्याची शक्यता नव्हती. दिवसभर बिछान्यावर पडून राहिलं तरी काय फरक पडणार होता?

तरीपण आतल्या आत तिला एक प्रकारची अस्वस्थता जाणवत होती.

या वीकएन्डला शॉपिंग करणं झालंच नाही. टॉम कधीच बाजारात जायचा नाही. मंदिराच दर शनिवारी गाडीतून जाऊन आठवडाभराचं सामान घेऊन येत असे.

फ्रिजमध्ये दूध नव्हतं. व्हेजिटेबल्स नव्हत्या. पण बाहेर जाऊन काही विकत आणायची इच्छाच नव्हती. काही न खाता राहावं असंच वाटत होतं. नुसती कॉफी पिऊन एखादा दिवस काढणं जमू शकतं.

कॉफीचा तिसरा कप घेतल्यानंतर मंदिराने सिगरेट पेटवली. खिडकीशी येऊन पडदा बाजूला सारला. बाहेर हिम पडत होते. रस्त्यावरून गाड्या जात होत्या. पण आवाज येत नव्हता. हिम पडायच्या वेळी सगळीकडे एक अनाकलनीय शांतता पसरत असते.

मंदिराला एकदम वाटलं, खिडकीची काच फोडून रस्त्यावर उडी मारावी.

दुसऱ्याच क्षणी तिला या विचाराचं नवल वाटलं. ही कसली विचित्र इच्छा! असं पूर्वी कधीच आपल्याला वाटलं नव्हतं. विनाकारण आपण मरणाचा विचार का करतोय?

तिचं डोकं गरम झालं. कपाळाच्या दोन्ही बाजूच्या शिरा ताडताड उडू लागल्या. तिची प्रकृती तशी चांगली होती. ती क्वचितच् आजारी पडायची, २५ वर्षांच्या वैवाहिक जीवनात फक्त एकदाच किडनी स्टोनच्या कारणास्तव हॉस्पिटलमध्ये जावं लागलं होतं. दोन्ही मुलांच्या वेळी नॉर्मल डिलिव्हरी झाली होती.

अंगातल्या तीनचार कपड्यांवरून ओव्हरकोट घालून स्त्रीपुरुष रस्त्याने जात होते. एक पातळशी नाईटी घालून ती बसली होती. इतके दिवस ह्या देशात काढूनही मंदिरा ह्या असाधारण वृत्तीचा नीटपणे स्वीकार करू शकली नाही.

खिडकी उघडून मंदिराने डोकं बाहेर काढलं. जरा बरं वाटलं.लहानपणी अशीच ती कधी कधी पावसाच्या पाण्याने डोकं भिजवून घ्यायची. कलकत्त्याला त्यांच्या फ्लॅटला व्हरांडाच नव्हता. इथे पण नाहीये. पिंजलेल्या कापसासारखे बर्फाचे कण तिच्या चेहऱ्यावर विसावत होते.

ह्या खोलीतून त्या खोलीत ती अकारण चकरा मारू लागली. ती काहीतरी शोधत होती की फक्त चकरा मारत होती?

ऑफिसमधून सुटी घेऊन आज दिवसाभर बिछान्यात आळशासारखं लोळत राहायचं होतं तिला! ग्लासामध्ये थोडीशी रेड वाईन ओतून ग्लास साईड टेबलावर ठेवला. हीटिंग बंद केलं. घर हळूहळू थंडगार होऊ लागल्यावर रजई ओढून आरामात ताणून द्यायचं. तिनं टी.व्ही चालू केला. एक पुस्तक घेऊन ती बिछान्याकडे आली. सिगरेट पेटवली. आता पुस्तक, सिगरेट, वाईन, टी.व्ही. आणि बिछाना. तिला वेगवेगळा आनंद देणार होते.

तेवढ्यात फोन वाजला. बिछान्यातून ताडकन उठून ती धावत गेली.

''कुड आय टॉक टू मि. टॉमस् ब्रॉक्वे, प्लीज!''

हेच स्वाभाविकच होतं. फोन येणार म्हणजे तो टॉमचाच असणार. मंदिराला कोण फोन करणार अशा अवेळी? लिझीला काय ठाऊक की आज तिची आई ऑफिसात जाणार नाही म्हणून? ती स्वतःसुद्धा फोन करू शकत होती. परिचितांचे फोन नंबर लिहिलेलं नोटबुक जवळच होतं. तरीपण तिनं फोन केला नाही. ते तिला अपमानास्पद वाटत होतं.

मंदिरा पुन्हा बिछान्याकडे गेलीच नाही. घर आवरायला सुरुवात केली तिने. प्रत्येक खोलीत पुस्तकं नि कागदपत्रांचा पसारा होता. खूप मोठ्ठं अपार्टमेंट. तीन बेडरुम्स. टॉमने स्वतंत्र घर विकत घेतलं नाही. त्याला अपार्टमेंटच जास्त आवडायचं.

मंदिरा धूळ झाडून कागदपत्र व्यवस्थित ठेवू लागली. एक तर एकच काम करीत सुटली.

क्षणभर थांबून ती विचार करू लागली. हे मी का करतेय? घर अव्यवस्थित राहिलं तरी काय फरक पडणाराय्?टॉमला तर हे काहीच दिसत नसतं. व्यर्थ मेहनत कशाला?

मग ती आंघोळीसाठी बाथरुममध्ये गेली. बाथटबमध्ये पडल्यावर खूप बरं वाटलं. गरम-थंड पाणी मिसळून हवं तसं मिश्रण झाल्यावर त्यात तिने थोडा सेंट टाकला. मग ती नग्न होऊन टबात उतरली. पडल्या पडल्या पुस्तक वाचता येतं. फोन वाजला तरी उठून जायची गरज नाही. इथे पण एक रिसीव्हर आहे.

स्पंजने ती अंग घासू लागली. जणू तिला घाई होती. बाथटबमध्ये पडल्या पडल्या पुस्तक वाचायची मंदिराला सवय होती. पण आता या वयात ते बरं वाटत नाही. लवकर



स्नान आटोपून बाहेर यायचं असतं. वेळ लागला की वाटतं, बाहेरचा संसार वेगवेगळ्या स्वरात आपल्याला हाक मारतोय. कित्येक कामांची स्वतःलाही आठवण होत असतेच.

वय? होय, बरंच वाढलंय्. पन्नाशीच्या घरात. शरीर तर अजूनही कार्यक्षम आहे. मनाला सुद्धा म्हातारपण आल्यासारखं वाटत नाहीये. आजचा व दहाबारा वर्षापूर्वीचा चेहरा आणि मनःस्थिती ह्यात काही फारसा फरक झाल्याचं वाटत नाहीये. तरीपण वय वाढलंच होतं ना!

बाथटबमध्ये बसून निळ्या भिंतीवर डोकं ठेवून बराच वेळ मंदिरा स्फुंदून स्फुंदून रडत होती. साबणाच्या फेसात तिचे अश्रू पडत होते.

थोड्या वेळाने अंग पुसून बाहेर येऊन साडी नेसता नेसता ती मनाशी विचार करीत होती.

कुठे काय चुकलं? जीवन असंच अधिकाधिक मागण्या करीत चालतं का?

आपल्या वयाच्या इतर स्त्रियाचं जीवनही असंच असेल का?

तिनं टॉमशी लग्न केल्यानंतर लंडनमधील बंगाली मंडळी म्हणायची, हे लग्न तीनचार वर्षे टिकलं तरी पुष्कळ झालं.

टॉमस् हा ब्रॉक्वे नावाच्या विख्यात कुटुंबातला तरुण, धडपड्या, कुशल वक्ता, करिअरिस्ट. तो काय म्हणून एका भारतीय स्त्रीचा पत्नी म्हणून स्वीकार करून तिच्या फंदात अडकून पडेल? भारतीय मुलीशी लग्न करण्याचं नावीन्य दोनचार वर्षात संपून जाणार. मंदिराही लंडनला आल्या आल्या लागलीच लग्न करून बसली. एका ब्रिटिश परिवारात घुसली, तिथल्या चालीरीती नीट माहीत करून घेतल्या नाहीत, परिस्थिती समजून घेतली नाही, इंग्रज लोक जेव्हा हाऊ नाईस, ब्युटीफूल, वंडरफूल, आय लाइक इट अशा तऱ्हेचे प्रशंसोद्‌गार काढतात तेव्हा त्यामध्ये खरी प्रंशसा असते, की खोटी हे समजून घ्यायलाच पाचसात वर्षे लागतात.

तरीपण सव्वीस वर्षे निघून गेली. ह्या अवधीत एकदाही त्याचं लग्न मोडण्याची भाषा आली नाही.

फक्त एकदा एक संकट! छे! त्याला संकट म्हणता येणार नाही, समजुतीचा घोटाळा म्हणावा लागेल!

रविन जेमतेम चार वर्षांचा होता.

टॉमचा मित्र डेव्हिड याला त्याची आयरिश पत्नी सोडून गेली होती. डेव्हिडचा मूड खराब होता, तो सारखा घरी येऊन बसायचा. कॉलेजमध्ये शिकत असल्यापासूनच मंदिरा डेव्हिडला ओळखत होती. टॉमचा आणखी एक मित्र होता हॅरी नावाचा. डेव्हिडचं नाव डिक नव्हतं तरी या तिघांना बाकीचे सगळे टी डी एच् म्हणायचे.. टॉम, डिक, हॅरी.

डेव्हिड अॅन्ड्र्यूला खरोखरच भारताचं प्रेम होतं. इंडिया त्याचं ऑब्सेशन होतं म्हटलं तरी चालेल. भारतीय खाद्यपदार्थ, भारतीय संगीत, भारतीय पोशाख सारं काही त्याला आवडायचं. ब्रिटिश कौन्सिलच्या नोकरीच्या निमित्ताने तो दोन वर्षे इंडियात राहून पण आला होता. खुद्द कलकत्त्याला सहा महिने होता. त्यावेळी कलकत्त्यात डेव्हिडचा एक मित्र होता, मॅकॉचियन. जाधवपूर विश्वविद्यालयात तो अध्यापन करीत होता आणि बंगाल-ओरिसाच्या मंदिरावरील शिल्पकलेबाबत संशोधन करीत होता, त्याच्या बरोबर डेव्हिड अॅन्ड्र्यू पण बंगालच्या खेड्यापाड्यातून फिरला होता. इंग्लंडला परत आल्यानंतर डेव्हिड अॅन्ड्र्यूला फॉरिन ऑफिसमध्ये चांगल्यापैकी नोकरी मिळाली. आपल्या घरी तो सुटीच्या दिवशी पायजमा झब्बा घालून बसायचा. कित्येक भारतीय वस्तूंचा त्याने सग्रह केला होता. टेराकोटाचं काम, राधाकृष्ण आणि नटराजाच्या मूर्ती. भिंतीशी लावून ठेवलेली सितार मित्रमंडळीना तो जबरदस्तीने ऐकवायचा. बिसमिल्ला खानची सनई आणि पन्नालाल घोषची बासरी यांच्या रेकॉर्डस! त्याच्या पत्नीने ह्या सर्व बाबतीत काहीच हरकत घेतली नव्हती. त्यांच्या फारकतीचं कारण वेगळंच होतं.

डेव्हिडच्या मनावर जबरदस्त आघात झाल्यामुळे टॉम व मंदिरा त्याला वरचेवर डिनरला आमंत्रण देत असत. तोही मग त्यांच्याकडे रात्री उशिरापर्यंत थांबायचा. मंदिराशी बोलताना तो भारताचा विषय हटकून काढायचा. तीही एक मजाच असायची. डेव्हिड सर्व बाबतीत भारताची प्रशंसाच करायचा आणि मंदिरा करायची कठोर टीका. डेव्हिडच्या मते ऑक्सफर्डपेक्षाही शांतिनिकेतन जास्त चांगलं. लंडनच्या तुलनेत कलकत्त्याचे रस्ते तुटकेताटके असले तरी सुरक्षित. इंग्लंडमधील एखाद्या खेड्यात हॉटेल नसेल तर बाहेरच्या पाहुण्यांना तेथे उपाशीच राहावं लागतं. पण या उलट इंडियात कुठल्याही खेड्यात बाहेरच्या पाहुण्याला सर्व साधारण माणूससुद्धा आपल्या घरी नेऊन जेऊ खाऊ घालतो. तिथले गरीब लोकसुद्धा आतिथ्यपरायण असतात.

भारताच्या गोष्टी चालायच्या तेव्हा टॉम गप्प बसून राहायचा. जांभया द्यायचा, नाहीतर बाथरूममध्ये जाऊन बसायचा.

हा क्रम कित्येक दिवस चालला होता. डिनरनंतर डेव्हिड तीन-चार तास थांबायचा.

टॉमची कल्पना मंदिराच त्याला थांबवून घेत असली पाहिजे. सुरुवातीला मंदिराच्या हे लक्षात आलं नाही.

डेव्हिडमध्ये भारताच्या प्रेमाव्यतिरिक्त इतरही गुण होते. तो अतिशय सज्जन आणि विनम्र होता. तो ओरडून कधी बोलत नसे. इतरांवर आपली मते जबरदस्तीने लादत नसे. चर्चा करताना वाद निर्माण झाला तरी ओठावर मृदू हास्य खेळत असायचं. मंदिराची स्मरणशक्ती चांगली होती. इतिहासातल्या तारखा ती अचूक सांगायची. गेल्या दोन



शतकांचा विश्व इतिहास तिला चांगलाच अवगत होता. डेव्हिडबरोबर चर्चा करताना मतभेद झाला तर मंदिरा लगेच एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका आणून आपल्या विधानाचं समर्थन करायची. पराजय स्वीकारून डेव्हिड म्हणायचा, चला, उद्या सायंकाळी साऊथक्लबमध्ये जाऊ या, मी तुम्हाला इंडियन डिनर देतो.

दोन दिवसांकरिता ससेक्सला गेलेला टॉम सात दिवस झाले तरी परतला नाही. मंदिरा रोज टेलिफोन करायची, टॉम निरनिराळ्या कामाची कारणं सांगायचा. सातव्या दिवशी मंदिरा म्हणाली, ''तुला जर आणखी उशीर होणार असेल तर मीच ससेक्सला येईन.''

टॉम म्हणाला, ''मी खूप व्यस्त आहे, तुला यायची गरज नाही यावेळी. हॅव फन् विथ डेव्हिड.''

बसं, हे एकच वाक्य. ह्या खेरीज दुसरा कुठलाही विरोध किंवा तक्रार नव्हती. मंदिरा समजून चुकली, टॉमच्या मनात अभिमान, मत्सर किंवा संशयाचा काटा घुसला असावा.

डेव्हिड घरी येत राहिला. पण अलिकडे टॉमपेक्षा मंदिराशीच त्याची जास्त मैत्री झाली होती. ह्या भारतीय स्त्रीमध्ये डेव्हिड आपल्या स्वप्नातला भारत तर शोधत नव्हता ना? टॉम दूर गेला तर तिच्याविषयी अधिक जिव्हाळा दाखवण्याची त्याची इच्छा होती.

डेव्हिडशी असलेला संपर्क इथेच थांबला. सर्वसाधारणपणे घरी यायला विरोध करणं तर शक्य नव्हतं. लागोपाठ दोनतीन दिवसांचं डिनरचं निमंत्रण मंदिरानं कॅन्सल करून टाकलं. रविशंकरच्या कार्यक्रमाची भारी तिकिटं आणून डेव्हिडने आमंत्रण दिलं, पण ऐन वेळी ती गेलीच नाही. स्वतःहून टेलिफोनही केला नाही तिने. त्यावरून डेव्हिड काय ते समजला. खरं तर तो थोडा वेळ मन रिझवण्यासाठी म्हणून त्यांच्या घरी जायचा. मित्राचा संसार तोडण्याचा विचार कधी त्याच्या मनात डोकावला नाही.

बस! मंदिराबद्दल तेवढा एकच गैरसमज टॉमच्या मनात निर्माण झाला होता.

त्या नंतर कित्येक वर्षे उलटली, पण टॉम व मंदिरा यांच्यामध्ये कधीच वाद झाला नाही. टॉमच्या मनात यायचं, मंदिराशी लग्न करून तिला तिच्या आईवडिलांपासून, कुटुंबियांपासून एवढंच नव्हे तर स्वदेशापासूनसुद्धा उखडून अलग करून टाकलं. मंदिराने पुन्हा कधी मागे वळून पाहिलं नाही. तो मंदिराला दूर लोटू शकत नव्हता. अलिकडे सर्व देशांमध्येच कित्येक विवाह जास्त दिवस टिकत नाहीत. डिव्होर्स रेट शेकडा पासष्ट झालाय्. साहजिकच त्यांचं दांपत्य जीवन दीर्घकाळपर्यंत टिकलं हे एक आश्चर्यच!

मग मंदिराचा क्षोभ कशासाठी?

संसारात लक्ष नसलेला माणूस असूनही टॉमने कसलीच कमतरता ठेवली नव्हती. शारीरिक मीलन अलीकडे कमी झालं होतं हे खरं. सहा-सात महिन्यात जेमतेम एखादेवेळी. इतक्या वर्षांच्या वैवाहिक जीवनानंतर हेच कदाचित् स्वाभाविक असावं!

मंदिराला कधी कधी वाटायचं, आपल्या वयाच्या दुसऱ्या स्त्रियांना याबाबतीत विचारावं. पण तिला लाज वाटे. तशी घनिष्ठ मैत्री कोणाशीच नव्हती तिची. टॉमची बहीण मार्था तिची मैत्रीण होती; पण तिने तर कधीच आपल्या ग्रीक नवऱ्याशी डिव्होर्स घेतलेला होता. आणखी एक लग्न आणि डिव्होर्स झाला होता. अलीकडेच तिनं तिसरं लग्न केलं होतं. मार्था नि मंदिरा वयाने बरोबरीच्याच. मंदिराला कुतूहल होतं की ह्या वयात लग्न करण्यात सेक्स, तारुण्य कितपत असतं? मार्थाशी एकांतात बोलणं झालं तर हा विषय काढता येईल. पण मार्था राहणार वेस्ट बर्लिनमध्ये आणि फोनवर तर असलं काही विचारता येत नाही!

मंदिराचं शरीर अजूनही चांगलाच प्रतिसाद देत होतं. टॉमचं नव्हतं का देत? कामाच्या प्रचंड व्यापामुळे ह्या गोष्टीचा विसर पडतो का? पहिली काही वर्षे तर टॉममध्ये केवढी तरी आसक्ती होती. दीर्घ दांपत्य जीवनानंतर ती कमी होते का? मंदिराने पुष्कळ स्त्रिया पाहिल्या होत्या. लठ्ठ, थुलथुलीत तर कोणी सुकलेल्या. अशा स्त्रिया आपल्या नवऱ्यांशी वाद घालतात, बाजारात गेल्यावर सर्व पॅकेटस् नवऱ्यांना धरायला लावतात. इकडे चला, तिकडे चला म्हणून हुकूम करतात. बाहेर नवऱ्यावर एवढं अधिपत्य गाजवणं हेच त्यांच्या अभिमान आनंदाचं दुसरं स्वरूप!

कधीतरी मुलं दूर जातील, नवरा आपल्या कामात अधिक व्यस्त होईल. मंदिराच्या नवऱ्याच्या करियरचा हा जणू पीक पिरियड, पुढल्या वेळी त्याचा पक्ष जिंकला की तो कॅबिनेटमध्ये जाणार, अशा वेळी कुटुंबातल्या लोकांना थोडासा त्याग करावाच लागतो. कुटुंबात तर आणखी कोणीच नाही. मंदिरा एकटी, पण म्हणून काय झालं? कित्येक कुटुंबं अशी छोटी असतात. मंदिराने स्वयंपाकपाणी करायचं, घर व्यवस्थित ठेवायचं. आपल्या आवडीनुसार फर्निचर, ज्वेलरी विकत घ्यायची, इतर स्त्रियांशी गप्पागोष्टी करून वेळ घालवायचा. नवऱ्याच्या सुख-स्वास्थ्याकडे लक्ष ठेवायचं. हाच तर परिपाठ असतो. एखादा टूर प्रोग्राम निवडून ती वेगवेगळ्या देशांमधून फेरफटका पण करून येऊ शकत होती. एक दोन महिने इंडियात फिरून यायला सुद्धा टॉमने हरकत घेतली नसती.

तसं चुकूनही काही झालं नव्हतं. जीवनाचा प्रवाह चालू होता. मग रडू कशाचं येतंय? अशी वेड्यासारखी अवस्था का म्हणून मग? तिला स्वतःचं असं काहीच नको होतं का?

११ जानेवारीला दिवसभर आणि सायंकाळी एकूण तीन वेळा तिला आत्महत्या करावीशी वाटली.

यापुढेही जीवन असंच बांधलेलं राहणार असेल तर ते इथेच थांबवून टाकलेलं काय वाईट?

जगात त्यामुळे कोणाचंच काही अडणार नव्हतं!

दुपारी बर्फ पडायचा थांबला. संध्याकाळी वादळ सुरू झालं. खिडकी बंद करायची



राहून गेली. धडामधडम् खिडकीची दारं आपटल्याच्या आवाजाने ती चमकून उठली. घर आता जास्त थंड झालं होतं. पण मंदिराने पुन्हा हीटिंग सुरू केलं नाही.

आठ वाजता मंदिराने फोन केला. टॉमला.

त्यावेळी टॉम आपल्या सहकर्मींसह डिनर घ्यायला बसला होता. पत्नीचा फोन आहे हे कळल्यावर त्रासिकपणे उठून फोन घ्यायला गेला.

शांत स्वरात मंदिरा म्हणाली, ''टॉम, तू एकदा घरी येशील? अर्ध्या तासात?''

टॉम उद्वेगाने म्हणाला, ''काय झालं मणी? तब्येत ठीक नाही का? डॉक्टरला फोन केलास?''

मंदिरा म्हणाली, ''नाही, तब्येत खराब नाहीये. पण तुला खूप भेटावंसं वाटतंय्.''

**मंदिराला कधी कधी वाटायचं, आपल्या वयाच्या दुसऱ्या स्त्रियांना याबाबतीत विचारावं. पण तिला लाज वाटे. तशी घनिष्ठ मैत्री कोणाशीच नव्हती तिची. टॉमची बहीण मार्था तिची मैत्रीण होती; पण तिने तर कधीच आपल्या ग्रीक नवऱ्याशी डिव्होर्स घेतलेला होता. आणखी एक लग्न आणि डिव्होर्स झाला होता. अलीकडेच तिनं तिसरं लग्न केलं होतं. मार्था नि मंदिरा वयाने बरोबरीच्याच. मंदिराला कुतूहल होतं की ह्या वयात लग्न करण्यात सेक्स, तारुण्य कितपत असतं? मार्थाशी एकांतात बोलणं झालं तर हा विषय काढता येईल. पण मार्था राहणार वेस्ट बर्लिनमध्ये आणि फोनवर तर असलं काही विचारता येत नाही!**

टॉम म्हणाला, ''कम् ऑन् मणी! काय झालंय् ते नीट सांग. तुला कल्पना आहे का ह्या वेळी मी किती झंझटात अडकलोय् ते. थोड्या वेळापूर्वीच एक न्यूज ब्रेक झाली. तू ऐकली नाहीस? टी. व्ही. बघत नाहीस तू? आजच्या वर्तमानपत्रातही थोडंसं कव्हरेज आहे.''

''टॉम, तू येणार नाहीस?''

''ऐक डार्लिंग, एच. पी. फूडसच्या बेक्ड बीन्सच्या डब्यात काचेचा तुकडा सापडलाय्. यॉर्कशायरमध्ये अशा प्रकारचा कॉन्टॅमिनेटेड टिन सापडल्यामुळे कित्येक हजार लोकांना अटक झालीय्. तुला माहीत आहे नं नॉरफोकच्या नॉर्थ वॉल्सस मध्ये एच. पी. फूडस्चा प्लान्ट आहे. तो आता बंद पडेल कदाचित्. नॉरफोकवर कॉन्झर्वेटिव्ह लोकांचा स्ट्राँग होल्ड आहे, हे त्यांचं भाग्यच.''

''मला तुला आज एकदा भेटायचंच आहे टॉम, टॉम!''

"अशी काय असमंजसपणाने बोलतेस मणी! हे बघ, आय प्रॉमिस. ह्या वीकएण्डला तुला मी बोल्शाय् बॅले बघायला घेऊन जाईन. सोव्हिएट ट्रुप येणाराय्. तिकिटं मिळालीत. बाहेर खूप वादळ आहे. तुझं मन स्वस्थ नसेल तर तू स्लीपिंग टॅब्लेट खाऊन झोपून जा."

"टॉम, तू आज न आलास तर मग मी तुला दिसणारच नाही." मंदिराने टेलिफोन ठेवून एक दीर्घ निःश्वास सोडला.

एक प्रकारे हे ब्लॅक मेलच म्हणायचं. असला पोरकटपणा मंदिराने यापूर्वी कधी केला नव्हता. पुन्हा एकदा फोन करून टॉमची क्षमा मागायची का? म्हणायचं, थट्टा केली होती म्हणून? टॉम न आला तरी चालेल. महत्त्वाचं काम टाकून टॉम विनाकारण भेटायला धावत येणार, असं व्हायला नको पुन्हा. मंदिरा नवपरिणीताप्रमाणे खोडसाळपणा करतेय्.

पण टेलिफोनकडे हात गेलाच नाही, तिचा तीर एकदा सुटला होता, आता तो परत येऊ शकत नव्हता.

लिव्हिंग रूममध्ये ग्रँड फादर चेअरमध्ये मंदिरा येऊन बसली. दैनिक गार्डियनचा अंक तिनं उचलला. आज दिवसभरात तिने पेपरच पाहिला नव्हता.

होय. एच्. पी. फूडसची बातमी पहिल्या पानावरच होती. बेक्ड् बीन्स मंदिराला अजिबात आवडत नाहीत. पण ह्या लोकांच्या प्रत्येक कुटुंबात ब्रेकफास्टला त्या खातात. अशा बेक्ड् बीन्सच्या डब्यात काचेचा तुकडा निघाला? देशात नक्कीच भयंकर आरडाओरडा होणार.

बेक्ड् बीन्समध्ये असलेले काचेचे तुकडे खाऊन दोनचार मुलं मेली तर?

वर्तमानपत्रातील तिसऱ्या पानावर असलेल्या आणखी एका छोट्या बातमीने मंदिराचं लक्ष आकर्षून घेतलं. तीनचार वेळा वाचूनही त्याचा अर्थ तिच्या लक्षात येईना. ब्रिटिश पार्लमेंटचे काही प्रतिनिधी क्युबाला जाणार होते. त्या सात सभासदांच्या ग्रुपमध्ये एक टॉमस ब्रॉक्वेचं नाव होतं. नावाकडे एकटक पाहता पाहता मंदिराच्या मनात आलं, हाच का आपला नवरा आहे? तिला तर हे काहीच माहीत नव्हतं.

त्या ग्रुपमध्ये मेरी वेअर पण होती. मेरीचं आणखी एक खोटं नाव होतं टॉम बॉय. फाजील धीटपणा अंगी असलेली ही बाई प्रक्षोभक भाषण करू शकते. पहिलं लग्न तुटल्यानंतर बरीच वर्षे तिनं लग्न केलं नाही. अलिकडे जिथे टॉम जाईल तिथे मेरी वेअर जाणारच. त्या दोघांची खूपच मैत्री होती. कदाचित् ह्यापेक्षा जास्त काही नसेलही. मात्र टॉमने मेरीला कधीही डिनरला घरी बोलावलं नाही.

मंदिराने तारखेप्रमाणे हिशोब करून पाहिला, पुढचा सोमवार म्हणजे बरोबर पाच दिवसांनी. ह्या अवधीत वीकएण्डला टॉम तिला बॉल्शाय बॅले दाखवणार आहे.

कशासाठी टॉम माझा एवढा अपमान करतोय्?



२९ मिनिटांनी दरवाजाची किल्ली फिरवल्याचा आवाज आला. टॉम टॅक्सीने आला होता. तो गाडी चालवत नसे. गाडी चालवण्याचं काम मंदिराचं असायचं. बाजारहाट पण तीच करायची. एके काळी ती मुलांना शाळेत नेणं-आणणं करायची. आताही नाटक सिनेमाला जायचं असलं की तीच गाडी चालवते. टॉमचं ड्रायव्हिंग लायसन्स आहे. तरी ड्रायव्हरच्या शेजारच्या सीटवर बसून झोप काढायला त्याला फार आवडतं. चालत्या गाडीत टॉमला नेहमीच खूप झोप येत असते.

**त्या ग्रुपमध्ये मेरी वेअर पण होती. मेरीचं आणखी एक खोटं नाव होतं टॉम बॉय. फाजील धीटपणा अंगी असलेली ही बाई प्रक्षोभक भाषण करू शकते. पहिलं लग्न तुटल्यानंतर बरीच वर्षे तिनं लग्न केलं नाही. अलिकडे जिथे टॉम जाईल तिथे मेरी वेअर जाणारच. त्या दोघांची खूपच मैत्री होती. कदाचित् ह्यापेक्षा जास्त काही नसेलही. मात्र टॉमने मेरीला कधीही डिनरला घरी बोलावलं नाही.**

बर्फ झटकून तो आत आला. आत आल्यावरही त्याने अनेकदा बूट आपटले. ओव्हरकोट काढून हॅट-रॅकवर ठेवला. त्याच्या वागण्यात नाराजी किंवा अस्थिरता नव्हती. क्षणभर एकाग्र चित्ताने बघत मृदू आवाजात तो म्हणाला, "हॅलो, मणी."

मंदिरा चेअरमधून उठलीच नाही. ती पण नुसतीच समोर बघत बसली.

टॉमने तिच्याजवळ येऊन तिच्या ओठांवर ओठ टेकले. दोघांचेही ओठ थंडगार. पद्धतीनुसार असलेलं अकारण चुंबन!

मंदिराच्या दोन्ही खांद्यावर हात ठेवून त्याने आस्थापूर्वक विचारलं "मणी, काही वाईट बातमी आहे का? माझ्यापासून लपवून ठेवू नकोस. मोकळेपणानं सांगून टाक काय ते, कोणाला काय झालं? रविनला की लिझीला?"

मंदिरा म्लानपणे हसली. मुलगा किंवा मुलगी यांच्यावर अकस्मात संकट आलं तरच वाईट बातमी असू शकते, मंदिराला तर कधीच काही होत नाही; तेव्हा तिची स्वतःची काही वाईट बातमी असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. रविन, लिझी दोघंही खुशाल आहेत.

मंदिरा म्हणाली, "ह्या चेअरवर बस, टॉम. मला तुझ्याशी काही बोलायचंय्."

आज्ञाधारक मुलाप्रमाणे टॉम एक खुर्ची ओढून पायावर पाय ठेवून बसला. त्याने विटकरी रंगाचा सर्जचा सूट घातला होता. डोळ्याखाली कावळ्याच्या पायाचे छाप पडले होते, बरेच दिवसात त्याला नीटशी झोप मिळाली नसावी. त्याचा रोडावलेला चेहरा अलीकडे जरा भारी झाला होता. वयोमानाप्रमाणे ते ठीकच होतं. त्याच्या ओठांच्या रेषेवर उच्च आकांक्षा रेखाटलेली होती.

ह्या घरात टॉम बॉस होता. त्याचं म्हणणं हे अखेरचं. तो तसा पूर्णांशाने पुरुषी

वर्चस्वाचा अभिमानी होता. पण आज मंदिरा त्याला जणू आदेश देत होती.

गुडघ्यावर बोटांनी ताल देत तो मंदिराकडे बघत बसला. मंदिरा काहीच बोलत नाही हे पाहून तो इंग्रजांच्या नेहमीच्या पद्धतीने म्हणाला, ''आज एकदम घास्टली वेदर आहे. रस्त्यारस्त्यावर दोनतीन फूट बर्फ जमलाय्. उद्यापासून पुन्हा बस स्ट्राइक आहे. फोरकास्ट तर आहे, आणखी काही दिवस अशीच वेदर राहणार म्हणून. सुवेझच्या ह्या बाजूला सूर्याचं दर्शनच होणार नाहीये.''

मंदिरा खिन्नपणे नुसतीच बघत बसली.

टॉम म्हणाला, ''बरेच दिवसांनी साडी नेसलेली दिसतेय्. कुठे जाणार आहेस का?''

मंदिरा मान हलवीत म्हणाली, ''नाही, मला आज काहीही चांगलं वाटत नाहीये.''

टॉमने सहानुभूतीच्या स्वरात विचारलं, ''तुझा प्रॉब्लेम काय आहे ते तरी सांग.''

मंदिरा म्हणली, ''माझा काहीच प्रॉब्लेम नाहीये. तरीपण माझं कशातच मन लागत नाहीये.''

टॉमने बऱ्याच वेळा मान हलवली. त्याला बरोबर कळलं होतं काय ते. मग हळूहळू म्हणाला, ''फक्त एवढंच सांगायसाठी का तू मला बोलावून घेतलंस?''

जणू त्याला म्हणायचं होतं. फक्त मन नाराज आहे किंवा कशातच लक्ष लागत नाही एवढंच कारण पुरेसं नसावं. ते काही आता नवतरुण राहिलेले नाहीत; आता ते मध्यमवयीन स्त्रीपुरुष आहेत, त्यांचं बोलणं कसं कॉंक्रीट टॅन्जिबल असायला हवं.

मंदिरा गप्प बसलेली पाहून टॉम एकदम बॉंब फुटल्याप्रमाणे गर्जना करीत म्हणाला, ''डोन्ट बी सो डम्ब्, मणी! मी किती व्यस्त आहे कामात ते तुला माहीत नाही का? असा पोरखेळ करायसाठी का तू मला एवढ्या वादळवाऱ्यातून ओढत आणलंस? ही कसली थट्टा? तुला मी सांगितलं होतं, बेक्ड् बीन्सची घटना खूप चिघळत चाललीय्.''

मंदिरा एकदम शांत स्वरात म्हणाली, ''मला वाईट वाटतं टॉम, अशा प्रकारे तुला मी बोलावून घेणं योग्य नव्हतं. मला खरंच याचं वाईट वाटतं. पण एक गोष्ट तुला आज समोरासमोर सांगून टाकायची इच्छा झाली. मी इथून निघून जाणार आहे. टॉम, तू मला डिव्होर्स दे.''

''व्हॉट?''

''मला तुझ्याकडून डिव्होर्स हवाय.''

''वेडी आहेस की काय तू मणी? हे काय बोलते आहेस?''

''मला वाटतं मी खरोखरचं वेडी झाली आहे. मला आता थोडा वेडेपणा करूच दे. तुला माझी कसलीही गरज नाही. तुझ्या आयुष्यात मी एक ओझं होऊन राहिलेय्. मी निघून गेल्यावर तू मुक्त होशील, तुझ्या कामात अधिक चांगल्या प्रकारे लक्ष घालू



शकशील.''

टॉम खुर्चीतून जवळजवळ उडी मारूनच उठला, राग व थोडासा अभिमान यामुळे त्याचा चेहरा लाल झाला. दोन्ही हात नाचवीत तो म्हणाला, ''तू हे सांगतेस मला? कोणी सांगितलं तुला की तू माझ्या जीवनात ओझं आहेस म्हणून? कधीतरी मी असं दर्शवलंय् का? तुझ्यासाठी मी कधी काहीच सॅक्रिफाइस् केला नाही? कधी तुझ्याशी वाईट वागलोय् का?''

''नाही, माझ्याशी तू कधीच वाईट वागला नाहीस. पण तुझ्या जीवनात माझं प्रयोजन आता उरलेलं नाही. ते संपून गेलं आहे.''

''प्रयोजन? विचित्रच शब्द आहे हा! मी तर तुला कधी तसं समजलो नाही. प्रेम नावाची एक गोष्ट आहे, आय थॉट इट् वॉज लॉस्ट बीट्वीन अस्!''

''आपलं मध्यमवयीन प्रेम आता खूप जुनं झालय्. गंजून गेलंय्. आता ओळखूही येत नाहीये ते.''

''तुझी काय अपेक्षा आहे मणी? आपण नवविवाहितांप्रमाणे अजूनही सारखं एकमेकांना धरून बसावं नि कानात कुजबुजत रहावं? हे कसलं खूळ शिरलंय तुझ्या डोक्यात? तू तरी अशी मठ्ठ कधी नव्हतीस. आजच्या ह्या विचित्र हवेत तू सैरभैर झालेली दिसतेस. सवड असली तर मी तुला सोबत केली असती. पण प्लीज, आजच्या दिवस मला माफ कर, मला अत्यंत जरुरीचं काम आहे.''

''टॉम, मला तुझ्याकडून डिव्होर्स हवाय्.''

''तू पुन्हा तेच तेच बोलतेस? हा माझा चक्क अपमान आहे हे तुला कळत नाही का? तुझं काय ग्राऊंड आहे? मी तर कधी तुझा पत्नीचा मान सोडला असं झालेलं नाही. मी पुन्हा सांगतो, हा तुझा निष्कारण तात्पुरता वेडेपणा आहे. तू शांतपणे झोप. सारं काही ठीक होईल.''


''कदाचित् हा माझा खरोखरच वेडेपणा असावा. म्हणूनच मला आता स्वतःच्या मताने हा वेडेपणा करू दे.''

टॉम दरवाजाकडे वळताच मंदिरा खुर्चीतून उठून धावत आली आणि तिने त्याचा एक हात धरून ठेवला. तिचा चेहरा तेलकट दिसत होता. डोळे जळजळ करत होते. ती खरोखरच जणू पागल दिसत होती.

अत्यंत कातर आवाजात ती म्हणाली, ''थोडासा थांब टॉम. असं मी पूर्वी कधी तुझ्याशी बोललेय् का? आज वाटलं, बोलून टाकतेय्. प्लीज, आणखी थोडा वेळ दे ना मला.''

हात सोडवून घेत कठोर शब्दात टॉम म्हणाला, ''आता माझ्या सहनशक्तीची

''मला डायव्होर्स हवाय, टॉम, डायव्होर्स.''




## 'स्तनपान' अर्थातच आईचं दूध : बाळासाठी!


**लेखिका : डॉ. ज्योत्स्ना पडळकर**

**'स्तनपान'**

'स्तनपान' या नाजूक हळव्या आणि गुपित गोष्टीवर आजवर चर्चा झाली नाही, की मोकळेपणानं कुणी काही सांगितलं नाही आणि मनातल्या शंका कुणाला विचारू? कधी विचारू? अशा संभ्रमात विचारायचं राहूनच गेलं. पण आता, **'आईचं दूध : बाळासाठी!'**च्या रूपानं डॉक्टर सततच तुमच्याजवळ असतील– जरूर भासेल तेव्हा लगेच तुमचे प्रश्न सोडवायला.

आता मनातला गोंधळ संपवून वेगळ्या आत्मविश्वासानं आपल्या बाळाला पाजत राहा, आणि त्यात यशस्वी व्हा.

- **मूल्य : १००/-**
- **सवलत मूल्य : ७०/-**




**मुलाच्या जन्मापासून वयात येईपर्यंतच्या सर्व प्रश्नांची उत्तरं देणारं आपल्या घरी हवंच, असं बालसंगोपनावरील अप्रतिम पुस्तक**

## नवी बाळगुटी : पालकांसाठी!

**लेखिका : डॉ. ज्योत्स्ना पडळकर** एम्. डी. (बालरोग), पुणे

- **सर्वगुणसंपन्न पुस्तक!** पालक, शिक्षक, विद्यार्थी, डॉक्टर्स, नर्सेस् या सर्वांना अत्यंत उपयुक्त ठरेल. खूप नवी माहिती मिळेल.

  **डॉ. आनंद पंडित**, डायरेक्टर ऑफ पेडियाट्रिक्स, के.ई.एम्.हॉस्पिटल, पुणे.

- मुले चांगली वाढवण्याकरिता खास जोपासनेची जरूर असते. यासाठी योग्य माहिती असलेल्या पुस्तकाची उणीव या पुस्तकाने भरून काढली आहे.

  **डॉ. यशवंत आमडेकर**, प्रेसिडेंट, इंडियन ॲकेडमी ऑफ पेडियाट्रिक्स.

- या पुस्तकाच्या नियमित आणि अभ्यासपूर्ण वाचनाने घरातली अनुभवी वडिलधाऱ्यांची उणीव भरून निघेल. प्रत्येक पालकाने संग्रही ठेवण्याजोगे पुस्तक.

  **डॉ. रमेश पोतदार**, प्रेसिडेंट ऑफ असोसिएशन्स ऑफ पेडियाट्रिक सोसायटीज् ऑफ द साऊथ ईस्ट एशियन रीजन.

- **मूल्य रु. १५०/-**
- **सवलत मूल्य रु.१००/-**

प्रमोद प्रकाशन **१०१९, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०. फोन : ४४७८९९६**

**सर्व प्रमुख विक्रेत्यांकडे उपलब्ध**

# सुंदरबनच्या जंगलात

**सुनील गंगोपाध्याय** **अनु. तारा पंडित**

*बंगालची फाळणी झालेली नव्हती, तेव्हा सुंदरबन घनदाट जंगल, दलदल, नद्या आणि नाना पशुपक्षी यांनी व्यापलेले होते. त्या पर्यावरणाला साजेशी तेथील जीवनशैली होती. त्या काळातील तरुण शिकारी अर्जन सरदार याने आपल्या मंदार या मित्राबरोबर केलेल्या साहसी मोहिमा व शिकारी याच्या रोमांचकारक आठवणी या पुस्तकात आल्या आहेत. अर्जन हा कालिकापूरचा रहिवासी. चोहोबाजूंनी नदीनाले, मध्येमध्ये शेतजमीन, शेताच्या सर्व बाजूंनी उंच बांध, बांधाच्या काठावर शेतकऱ्यांची घरं. कालिकापूरला तीन बाजूंनी वेढणारी नागमोडी कोयरा नदी. तिच्या एका तीरावर जंगल. दुसऱ्या तीरावर वस्ती. या प्रदेशात रस्तेच नाहीत. पैलतीरावरच्या जंगलातून वाघाच्या डरकाळ्या, हरिणांचे आवाज, मगरींची सळसळ, सापांची निःशब्द सरसर, उंदराची लगबग, बगळ्यांची उड्डाणे हे सर्व सतत सोबतीला. बनबिबीसारखे सण. नाना दंतकथा, लोककथा, भुताखेतांचे किस्से या सर्वांमुळे सुंदरबन मराठी वाचकांच्या मनात कोकणप्रमाणेच घर करून राहील.*

*या पुस्तकातील वाघाच्या एका शिकारीची कथा पुढे देत आहो.*

*सुंदरबनच्या जंगलात श्री. शिवशंकर मित्र जवळजवळ दहा वर्षं अर्जन नावाच्या शेतकरी-शिकाऱ्याच्या सहवासात त्याच्या सावलीसारखे राहिले. अर्जनचं प्रत्यक्षातलं जीवन आणि त्यानं कथन केलेल्या पूर्वायुष्यातील घटनांचं इतिवृत्त यांचा आविष्कार म्हणजेच : 'सुंदरबनच्या जंगलात!'*

*अर्जनच्या रोमांचकारक शिकारी जीवनातील घटना या पुस्तकात सदैव ताज्या वाटाव्यात, इतक्या प्रभावीपणे शब्दबद्ध झाल्या आहेत आणि वाचकांना बसल्या जागी खिळवून ठेवतील, एवढ्या त्या थरारक आहेत!*



# शिकार वाघाची

जंगलात जायचं म्हटलं की अर्जन एका पायावर तयार. धनाई, अर्जन आणि काफिल असे तिघे मध गोळा करून आणायला निघाले. काफिल हा धनाईचा आश्रित होता. डाकू लोकांचे अनेक गुण त्याच्यात होते. त्यापैकी हा एक. तो लोकांना मधूनमधून आश्रय द्यायचा.

मध आणायला जायचं म्हणजे तिघेजण लागतात. एकजण पोळं कापायला, दुसरा लांब बांबूच्या टोकाला जाळ पेटवून मधमाशा उडवायला आणि तिसरा एक मोट्ठं टोपलीवजा भांडं घेऊन बरोबर पोळ्याखाली उभं राहायला, जेणेकरून मध खाली न सांडता बरोबर भांड्यात पडेल. ज्यांना पोळं कापता येत नाही त्यांना मंत्र येतो. त्या मंत्राने मधमाशा हाकलून लावता येतात. जर त्यांना तेही न आलं तर मात्र त्या मधमाशा माणसाला चावून चावून बेजार करतात.

धनाईला मंत्र येत होता. तो मंत्रच म्हणायचा पण लोकांना विश्वास वाटत नव्हता, मधाच्या शोधात जंगलात किती दूर जावं लागेल ते सांगणं कठीणच.

हिवाळा संपला की सुंदरबनातील झाडांना तऱ्हतऱ्हेची फुलं येतात. मॅनग्रोव्ह नामक झाडांना छोटी छोटी पिवळी फुलं येतात. त्या फुलांचा सुगंध, पिवळाधमक रंग आणि मधमाशांचं गुंजन यामुळे सारं जंगल फुलून येतं. वसंत ऋतूतील मंदमधुर हवेमुळे हे तिघे विलक्षण उल्हसित झाले होते.



होडीतून बरंच दूर जंगलात गेल्यानंतर ते तिघे किनाऱ्यावर उतरले. खूप खूष होऊन एकामागून एक मधाचं पोळं कापीत पुढे पुढे चालले होते. मधाचा कलश भरत आला होता.

तिघांचा त्या मधात वाटा होता.

पण त्यापूर्वी आणखी एखादं पोळं शोधून ठेवायचं होतं. ते शोधायचं म्हणजे मधमाशा फुलांमधून मध काढून घेऊन कोणत्या दिशेला उडत जातात ते लक्ष देऊन बघायचं नि त्यांच्या मागून त्याच दिशेने पुढे जायचं असतं. या कामात ते तिघे एकत्र राहू शकत नव्हते. इकडेतिकडे एकेकट्यानं जाणं आवश्यक होतं.

सध्या तर ते तिघे एका ओळीत पाठोपाठ चालत होते. धनाई सर्वांच्या पुढे होता. डाव्या हातात कोयता नि पोतं. उजव्या हातात एक लांब बांबू नि डोक्यावर मधाचा कलश.

समोर एक टॅक. टॅक म्हणजे दोन नद्या मिळाल्यावर जो त्रिभुज प्रदेश तयार होतो तो. त्याला टॅक म्हणतात. मॅनग्रोव्हच्या झाडावर मधाचं मोठ्ठं पोळं पाहून धनाई जोराने ओरडून म्हणाला : अरे, आणखी एक पोळं दिसतंय.

पण दुसऱ्याच क्षणी तीक्ष्ण नजरेने पाहिल्यावर त्याने म्हटलं : हात्तिच्या! यात तर मधच नाहीये.

मग मध आहे किंवा नाही हे ताडून पाहण्यासाठी अर्जनने एक मातीचं ढेकूळ त्या दिशेने फेकलं. ते ढेकूळ बरोबर लागलं नाही म्हणून त्याने दुसरं ढेकूळ फेकलं. मध खाली सांडलाच नाही. मात्र काही मधमाशा लागलीच उडत आल्या नि त्यांना चावू लागल्या.

ते तिघेही पळत सुटले नि एका झुडपाआड लपून बसले.

मग मात्र धनाई एकटाच पुढे गेला. त्याच्या समोर तीनचार हात रुंदीचा एक मोठा खड्डा होता. कलश डोक्यावर घेऊन या खड्ड्यावरून उडी कशी मारायची याचा तो विचार करू लागला. हातातल्या इतर वस्तू त्याने खड्ड्याच्या पलीकडे फेकल्या.

एका बारक्याशा झाडाला धरून खड्ड्यावरून उडी मारून तो पलीकडे गेला. मग त्या दोघांना त्याने हाका मारल्या पण त्यांचा पत्ताच नव्हता.

त्याने मागे वळून पाहिलं. तेवढ्यात एका हिंस्र वाघाने डरकाळी फोडीत त्याच्यावर झडप घातली. सारं जंगल थरथरलं.

अर्जन व काफिल झुडपाआडून पाहात होते. ते विस्मयचकित झाले. त्यांच्यातली शक्तीच जणू नष्ट झाली होती. ते मागच्या मागे पळून जाऊ शकत नव्हते की समोरही जाऊ शकत नव्हते.

तो वाघ मॅनग्रोव्ह झाडाच्या जवळपासच्या झुडपांमध्ये झोपलेला होता. तो धनाईच्या आवाजाने व अर्जनच्या



ढेकूळ फेकण्याने सतर्क झाला. पण तो थोडासा गोंधळून गेला होता.

**तो वाघ मॅनग्रोव्ह झाडाच्या जवळपासच्या झुडपांमध्ये झोपलेला होता. तो धनाईच्या आवाजाने व अर्जनच्या ढेकूळ फेकण्याने सतर्क झाला. पण तो थोडासा गोंधळून गेला होता.**
**एका बाजूला टॅक. टॅकच्या दोन्ही बाजूंना नद्या व समोर हे तिघेजण. अशा वेळी वाघ आपला रस्ता सोडून पळून जायच्या विचारात असतो. हा वाघ पण धनाईच्या अंगावरून पुढे निघून जाण्याच्या विचारात होता. एवढ्या वेळात धनाई झाडाच्या साह्याने खड्डा ओलांडून पलीकडे गेला आणि वाघाला त्याच झाडाची जबरदस्त ठोकर लागली.**
**त्या आघातामुळे वाघ उलट दिशेला वळला नि धपदिशी खड्ड्यात पडला. धनाईला वाघाच्या शेपटीने चांगलाच मार दिला.**

एका बाजूला टॅक. टॅकच्या दोन्ही बाजूंना नद्या व समोर हे तिघेजण. अशा वेळी वाघ आपला रस्ता सोडून पळून जायच्या विचारात असतो. हा वाघ पण धनाईच्या अंगावरून पुढे निघून जाण्याच्या विचारात होता. एवढ्या वेळात धनाई झाडाच्या साह्याने खड्डा ओलांडून पलीकडे गेला आणि वाघाला त्याच झाडाची जबरदस्त ठोकर लागली.

त्या आघातामुळे वाघ उलट दिशेला वळला नि धपदिशी खड्ड्यात पडला. धनाईला वाघाच्या शेपटीने चांगलाच मार दिला.

त्या मारामुळे डोक्यावरचा कलश खाली पडला.

वाघ खड्ड्यात गेला नि कलश त्याच्या डोक्याला लागून फुटला.

त्याच्या डोक्यावर सर्व मध सांडला. त्याच्या नाकाडोळ्यात नि तोंडात मध गेला.

मग धनाईने सारी शक्ती एकवटून वाघाला शिव्या देत बांबूने बडवायला सुरुवात केली.

इकडे हे दोघे झुडपाआड लपून सारा तमाशा पाहात असले तरी भीतीमुळे ते जणू दगडाच्या मूर्तिगत भासत होते. पुढे काय झालं त्यांना कळलं नाही.

वाघाचा आरडाओरडा थांबल्यावर बऱ्याच वेळाने ते दोघे सावध झाले.

अर्जन म्हणाला, चल, पुढे जाऊ या.

अर्जन पुढे निघाला. काफिल काहीशा अनिच्छेनेच त्याच्या मागून पावलं टाकीत चालू लागला.

काही वेळाने अर्जन म्हणाला. अरे, मामू तर कुठे दिसत नाही. नेलं बहुतेक वाघाने त्याला.

काफिल म्हणाला : चल, आपण परत जाऊ या.

अर्जनला मदारची आठवण आली, त्याला वाघाने धरून नेलं होतं. त्याचं प्रमाणपत्र त्याला काही दाखवता आलं नव्हतं. लोकांनी त्याच्यावर अविश्वास दाखवला होता. आता तो काहीतरी खूण नक्कीच बरोबर घेऊन जाणार होता.

आणखी पुढे गेल्यावर खड्ड्याच्या काठावरच त्यांना वाघाच्या पायांचे नि मामूच्या पावलांचे ठसे दिसले. वाकून पाहिलं तर मधाचा कलश फुटून खड्ड्यात पडलेला होता. मग एकाएकी त्याला धनाईच्या हातात असलेला बांबू पडलेला दिसला. पण हे काय, कुठे रक्ताचं चिन्ह सुद्धा नाही. म्हणजे मामू जिवंत असावा तर.

अर्जन जोराने ओरडला, मामू! मामू!

भीतीमुळे काफिल हतबल झाला होता. वेड्यासारखा इकडे तिकडे बघत होता.

सुकलेल्या पानांवरून खर्र् खर्र् आवाज आला. दोन हरणं येत होती. हळूहळू त्यांच्याजवळ येऊन थांबली, वाघाच्या भीतीने हरणांनाही माणसाचा आश्रय हवा असतो.

अर्जनच्या लक्षात आलं. वाघ जवळपास नसावा. बराच दूर असला पाहिजे. मग अर्जन खड्ड्यावरून उडी मारून पलीकडे गेला. तिथे मामूच्या पावलांच्या खुणा अगदी स्पष्ट दिसत होत्या. म्हणजे वाघाने त्याला तोंडात धरून ओढत नेलेलं दिसत नाही.

ते दोघे आणखी पुढे पुढे जाऊ लागले. मधूनच जोराने मामूला हाक मारायचे. शंभर गज चालल्यावर सुद्धा मामूच्या पाऊलखुणा स्पष्ट दिसत होत्या. मग दूरवर नजर जाताच काहीतरी पांढरं पांढरं त्यांना दिसलं.

अर्जन धावतच निघाला.

जवळ जाऊन पाहिलं, मामू पडलेला होता.

मामू जिवंत असावा.

त्या दोघांनी त्याला खांद्यावर घेतलं नि होडीमध्ये आणून ठेवलं. त्याच्या तोंडावर पाणी मारलं.

शेवटी डोक्यावर पाणी टाकताच तो शुद्धीवर आला.

तो नुसताच बघत होता. काहीही न बोलता पडून राहिला होता. खूप वेळाने होडी कोयरा नदीत शिरली.

अर्जन म्हणाला : अच्छा, मामू, मधाच्या कलशाचं काय झालं?

धनाई फक्त हसला.

अर्जनने पुन्हा विचारलं : तुम्हाला काय झालं?

धनाई विचार करीत म्हणाला : हं, आठवलं. मधाचा कलश फुटला, नि सगळा मध वाघाच्या तोंडावर माखला गेला.

आणि तो पुन्हा हसू लागला.



अर्जन म्हणाला : मग पुढे?

पण धनाईला पुढचं काहीही आठवेना. थोडावेळ विचार करून तो म्हणाला : माहीत नाही पुढे काय झालं ते.

त्याने कूस बदलली नि तो झोपून गेला.

काफिल त्याच्या कानाशी तोंड नेऊन म्हणाला : माहीत आहे मामू, हरीण केवढे घाबरलेले होते!

फॉरेस्ट ऑफिसच्या बोटीनेच सर्वजण निघाले. पांढरी चकचकीत बोट. तिच्यात लाकडाची एक छोटीशी खोली बनवलेली.

रशीद अली साहेब त्या खोलीच्या छतावर बसले. हातात रायफल. ती अशी धरली होती की जणू काही वाघ त्यांच्या समोरच आहे. शिवाय कलिमच्या हातीपण एक बंदूक-दोन नळ्या असलेली. आता ती अर्जनने घेतली होती. दोघेजण बोटीच्या टोकाशी जवळ जवळ बसले होते.

कलिम बिडी पीत होता. त्याला बिडी पिणं फारच प्रिय होतं. मधूनच तो बाबूकडे पाहून गालात हसायचा.

जंगलाच्या ज्या भागात ती घटना घडली होती त्या भागाला आडपांगाशेचं जंगल म्हणतात. मोठ्या नदीचं नाव आडपांगाशे. म्हणून जंगलाच्या या भागाला नदीचंच नाव दिलंय.

बोट आता खाडीत शिरली. कलिम म्हणाला : थांबवा बोट इथेच.

नावाडी म्हणाला : इथे का बरं? वाघाने माणूस धरून नेला ती जागा आणखी पुढे आहे.

तरीपण इथेच थांबव.

बोट थांबली, बोटीत सगळे मिळून दहाजण होते. कलिम आणि अर्जन किनाऱ्यावर उतरले. मग त्याने रशीद अली साहेबांना खाली उतरायला सांगितलं. ते उतरले पण म्हणाले, मग हे सगळे नाही का उतरणार? त्यांना नाही न्यायचं बरोबर?

कलिमने रोखठोक उत्तर दिलं. 'नाही बाबू. त्या सर्वांना न्यायचं नाही. अशाने शिकार होणार नाही.' आणि नावाड्यासकट सर्वांना म्हणाला, 'तुम्ही इथेच बोटीमध्ये बसून राहा. भीतीचं कारण नाही. पोट भरलेलं असेल तेव्हा बनबिबीचं वाहन कोणाकडेही ढुंकून पहात नाही.' वाघाबद्दलही कलिमच्या मनात एक प्रकारचं प्रेमच होतं जणू!

ते तिघे आत जंगलात शिरले. वाघाचं भक्ष्य ठेवण्याची जागा ते शोधत होते. पण शोधायला फार वेळ लागला नाही.

कलिम शोध घेत पुढे चालत होता. त्याच्यामागे अर्जन आणि शेवटी बाबू. असे एका ओळीत ते चालू लागले.

बाबू म्हणाले, कलिम, रायफलचा कॅच धरून ठेवू का?

कलिमने म्हटलं, नको बाबू, आत्तापासून नको. आणि एवढ्या मोठ्याने बोलू नका.

समोर बरीचशी वाळलेली पानं पडली होती. वाघ त्यावरून न जाता बाजूबाजूने निघून गेला होता. कलिम हळू आवाजात अर्जनला म्हणाला, बघ, अर्जन, काय हुषार जनावर आहे हे! पानांच्या बाजूबाजूने निघून गेलं. चालताना जरासुद्धा आवाज होऊ देत नाही.

टोकदार काठ्यांच्या मधून रस्ता कापीत अर्जन आणि कलिम भराभर चालत होते. बाबू मात्र मागेच राहिला. बाबूची अवस्था पाहून त्या दोघांनी आपला वेग कमी केला. नाहीतरी शिकार करायला जाताना वेगाने जायचंच नसतं. थोड्याच वेळात त्यांना माणसाच्या पावलांची चिन्हे व बडेमियाँच्या पायांचे ठसे स्पष्ट दिसू लागले.

अर्जन म्हणाला : पण रक्त सांडलेलं तर कुठे दिसत नाही!

चल, आणखी पुढे जाऊन बघू या. कलिम म्हणाला.

आणखी पुढे गेल्यावर तो म्हणाला, जुना वाघ दिसतोय. खूप मोठा! माणसाला तोंडात धरून जो घेऊन गेला तो त्याला एकदाही खाली ठेवलं नाही. मग रक्त सांडणार कसं? किंवा मग माणूस नेलाच नसेल वाघाने. ती माणसं खोटं तरी सांगत असावीत.

बाबूच्या मनात शंका आली. म्हणाले, हे खोटं असेल तर मग वाघाचं पोट भरलेलं नसणार. आता वाघाच्या मागे मागे तरी कशाला जायचं? तो कसा सापडणार आहे?

कलिम म्हणाला : आता आपण इथपर्यंत आलोच आहोत तर पुढे जाऊन बघायलाच हवं.

थोड्या वेळातच त्यांच्या समोरून एक चारपाच हात लांबीचा विषारी नाग सपसप करीत निघून गेला.

सापाच्या बाबतीत इथले शेतकरी लोक उदासीन असतात. साप चावून कितीतरी लोक मरतात. पण साप चावला तर मनसादेवीला (सापांची देवता) कोणी दोष देत नाहीत. दोष देतात त्याच माणसाला ज्याला तो चावलेला असतो. या भागातल्या हिंदू व मुसलमान या सर्वांनाचा बेहुला मनसाचं गाणं तोंडपाठ असतं.

मग त्यांना आणखी दूर जावंच लागलं नाही. ओल्या मातीवर अनेक ठिकाणी रक्त सांडलेलं दिसतं. याचा अर्थ या ठिकाणीच वाघाने प्रथम आपलं भक्ष्य तोंडातून खाली ठेवलं असलं पाहिजे.

रक्ताचं एवढं थारोळं पाहून रशीद अलीला कसंसंच वाटू लागलं. आता कलिम न बोलता खुणांनी काय ते सांगू लागला. खुणेनेच बाबूला म्हणाला, तुम्ही पटकन् समोरच्या झाडावर चढून बसा.

रायफल पाठीला लटकवून बाबू त्या मॅनग्रोव्ह वृक्षावर मोठ्या मुष्किलीने चढून बसले. कलिमजवळ दोन नळीची बंदूक होती. त्यात फक्त दोनच गोळ्या होत्या. बाकी जास्तीच्या गोळ्या बाबूंच्या खिशात. मग कलिमच्या सांगण्यावरून त्यांनी गोळ्या झाडाखाली टाकल्या



व अर्जनने त्या उचलून घेतल्या.

आता हे दोघे पुढे निघाले. रक्ताच्या डागांचं अनुसरण करीत चालू लागले. अगदी सावकाश, एकेक पाऊल टाकीत.

समोर ताडाच्या झाडासारखंच एक झाड होतं. या झाडाची पानं बांबूच्या पानासारखी दिसतात. सगळीकडे शांतता. हवा जंगलावरून वाहात होती. सुंदरबनातली सगळी झाडं सरळसोट वाढत असतात. सुरुवातीला फारशी पानं येत नाहीत. झाड वीसपंचवीस हात उंच झाल्यावर मग भरमसाट पानं फुटतात. झाड छत्रीसारखं दिसू लागतं. सूर्याचा प्रकाश मिळवण्यासाठी त्यांची एकमेकांत जणू स्पर्धा लागते कोण अगोदर उंच होऊन सूर्यप्रकाश ग्रहण करण्यासाठी आपली पानं विस्तृतपणे पसरवू शकतो. शांत जंगलामध्ये प्रकाश मिळवण्यासाठी ही अविश्रांत स्पर्धा सुरू असते. परिणामतः सुंदरबनात या पानांच्या छत्र्या खूप विस्तृत होत असतात. या छत्र्यांवरून वारा हू हू करीत पळत असतो. मधूनच एखादी झुळूक खालच्या जंगलात प्रवेश करते. या झुळुकीबरोबर झाडाच्या खालच्या भागातील पानं हळूहळू झोके घेतात.

कलिम सूक्ष्म निरीक्षण करू लागला. याच झाडांच्या आडोशाला वाघ नक्कीच लपून बसला असावा.

कलिमने या झाडाझुडपांच्या मागच्या बाजूला जायचं ठरवलं. ही झुडपं दक्षिणेकडे तीसचाळीस हात अंतरावर होती व वारा पूर्वपश्चिम वाहात होता. वाऱ्याबरोबर माणसाचा वास वाघाला येऊ नये म्हणून त्याने तसा निर्णय घेतला. जंगलातल्या प्राण्यांचे घ्राणेंद्रिय भयंकर प्रखर असते.

ते दोघे एकेक पाऊल पुढे टाकीत निघाले. मधूनच थांबून बघायचे, तो झाडांच्या गर्दीमधून दिसतो का ते.

थोडासा रस्ता कापायला त्यांना तब्बल अर्धातास लागला. पलिकडच्या बाजूला पाहिलं, काहीच नव्हतं. एकाच दिशेला दोघंही तीक्ष्ण नजरेने बघत होते. त्या भीतीजनक क्षणाची वाट पाहता पाहता अर्जन थकून गेला.

ते एकाजागी उभे होते. कलिम अंदाज घेत होता, कुणीकडे बरं गेला असेल वाघ? तेवढ्यात एक रानकोंबडी कॉक् कॉक् करीत पश्चिमेकडे निघून गेली. तिच्या पंखांची फडफड स्पष्ट ऐकू आली. नक्कीच काहीतरी भयानक दृश्य पाहून ती घाबरून गेली असावी.

मग ते ताडाच्या झाडापर्यंत चालत गेले. शोध घेऊ लागले. त्यांच्या लक्षात आलं, इथून वाघ पुढे दक्षिणेकडे निघून गेला असणार.

रक्ताचे डाग आणि वाघाच्या पायांचे ठसे यांच्या अनुरोधाने ते पुढे चालू लागले. कलिमला अकस्मात् आठवलं, इथेच कुठेतरी एक ओटा होता. सुंदरबनमध्ये असा ओटा

म्हणजे रहस्यमय ठिकाण. वनात चालता चालता कुठेतरी एकदम एखादा जळका ओटा दिसतो. याचा अर्थ हा कोणाच्या तरी घराचा पाया होता. म्हणजेच इथे पूर्वी माणसांची वस्ती असली पाहिजे. आजूबाजूला चिंचेचं किंवा बेलाचं झाड, नाहीतर एखादा गाब किंवा डुमुर वृक्ष. आणि ही झाडं सुंदरबनामध्ये आपोआप उगवत नाहीत, मुद्दाम लावलेली असतात. घराच्या पायाचे हे ओटे जास्तत उंच असतात. कदाचित इथे एखादा मीठाचा कारखानाही असू शकतो. अर्थात् या सगळ्या खूप दूरवरच्या भूतकाळातल्या गोष्टी आहेत.

ते दोघे अत्यंत खबरदारीने चालत होते. पन्नास हातावर पुन्हा त्यांच्या नजरेला एक पाया भरणीचाच ओटा दिसला. त्या ओट्यावर प्रेत पडलं होतं. पोटाचा भाग खाऊन टाकलेला होता. हात दोन्ही तुटून पडले होते. ते दोघे पुढे चालतच होते. कुठे कोण्या प्राण्याच्या अस्तित्वाचंच चिन्ह नाही. शांत, निर्जन अरण्य!

अशीच पाच मिनिटे गेली. इकडे तिकडे बघतांना मानसुद्धा अत्यंत हळू हलवावी लागते. डावीकडून उजवीकडे मान हलवायला पूर्ण दोन मिनिटे लावावी लागतात, जवळपास वाघ असेल तर त्याचं लक्ष जाऊ नये म्हणून! फार काय, डोळ्यातलं बुबुळ सुद्धा झटकन् हलवायचं नसतं. जवळून शत्रू जात असेल तर त्याच्या नजरेला माणूस पडू शकतो म्हणून.

आणि सावधपणे चालत चालत ते ओट्याच्या मागच्या बाजूला आले.

एकाएकी कलिम जोराने ओरडला : अरे, हा बघ साला!

शिकारीचे सगळे नियम बाजूला सारून तो जोराने ओरडला : अरे, हा बघ साला!

वाघ झुडपांमध्ये लपून बसला होता. त्याचं तोंड प्रेताच्या दिशेला होतं. तो प्रेतावर पहारा देत होता. झुडपाच्या पानांमधून तो प्रेताकडे एकटक बघत होता.

वाघाला पाठीमागच्या बाजूने पाहताच कलिम विसरूनच गेला की तो एक बाऊल आहे. उलट यावेळी तो हाती बंदूक घेतलेला वाघाचा शिकारी बनला होता.

याच वेळी वाघ पण तोंड फिरवून आळस देत उठून बसला व आपले हिंस्र दात दाखवीत आणि हिंस्र नजरेने बघत त्याने डरकाळी फोडली.

हाती बंदूक असली तरी अशा भयंकर हिंस्र जनावराला निःशस्त्रपणे आव्हान देण्याची कलिमला सवय होती. आपण मुळीच भीत नाही हे त्याला जणू दाखवून द्यायचे होते. असल्या विकृत चेहऱ्याची तमा आपण बाळगीत नसतो हेही तो सिद्ध करीत होता.

वाघासमोर त्याचाही चेहरा हिंस्र झाला होता. तोंडाने शिव्यांची लाखोली वाहात तो सराइतासारखा गुढघे टेकून बसून राहिला.

असं समोरासमोर उभं राहून आव्हान देणारा कलिम यापूर्वी अर्जनने पाहिला नव्हता. आपण काय करायला पाहिजे हे त्याला कळेना. वाघाप्रमाणे तोही ओरडण्याचा आवाज करू लागला.



एकाएकी कलिम एकदम सतर्क झाला, आपण वाघाला पळवून लावण्यासाठी आलो नसून त्याला मारायला आलो आहोत हे त्याच्या लक्षात आलं. तोंडाने अर्वाच्य शिव्या देत तो बसलेला उठून उभा राहिला. वाघाच्या तोंडातून लाळ गळत होती. कलिमने बंदूक उंच धरली तशी वाघानेही जोराने शेपटी आपटली. कलिमला माहीत होतं की वाघ अशा प्रकारे तीनवेळा शेपटी आपटून एकदम आपल्यावर झडप घालील म्हणून. क्षणाचाही विलंब न लावता त्याने बंदूक कानाशी धरली आणि दोन्ही घोडे एकदम दाबले.

वाघ जागच्याजागीच उभा. त्याने हालचाल केली नाही की उडी मारली नाही. फक्त दोन पावलं तो पुढे आला. कलिमही दोन पावलं समोर आला. त्याच्या गोळीनं वाघाचं पोट विद्ध करून कमरेचं हाड मोडलं होतं. तो उभा राहू शकत नव्हता. फक्त समोरच्या पायांनी पुढे यायचा प्रयत्न करीत होता. त्यामुळे मागचं शरीर जमिनीवर घासत होतं.

**कलिमला माहीत होतं की वाघ अशा प्रकारे तीनवेळा शेपटी आपटून एकदम आपल्यावर झडप घालील म्हणून. क्षणाचाही विलंब न लावता त्याने बंदूक कानाशी धरली आणि दोन्ही घोडे एकदम दाबले.**

**वाघ जागच्याजागीच उभा. त्याने हालचाल केली नाही की उडी मारली नाही. फक्त दोन पावलं तो पुढे आला. कलिमही दोन पावलं समोर आला. त्याच्या गोळीनं वाघाचं पोट विद्ध करून कमरेचं हाड मोडलं होतं. तो उभा राहू शकत नव्हता. फक्त समोरच्या पायांनी पुढे यायचा प्रयत्न करीत होता. त्यामुळे मागचं शरीर जमिनीवर घासत होतं.**

क्षणाचाही विलंब न लावता अर्जनने कलिमच्या हातची बंदूक काढून घेतली. हातातली गोळी बंदुकीत भरली आणि नेम धरून वाघाच्या डोक्यावर मारली.

वाघ बेशुद्ध होऊन पडला. पुढे पावले टाकीत जाणाऱ्या कलिमला अर्जनने थोपवून धरलं आणि आणखी एक गोळी झाडली.

आता वाघाच्या कानाजवळून भळभळा रक्त सांडू लागलं. या वेळी वाघ जेमतेम पंधरा हात दूर होता.

ते दोघे खाली बसले. अर्जनने बंदुकीत आणखी एक गोळी भरली आणि कमरेची विडी काढून कलिमला दिली. त्याने जोराने दम मारला.

अर्जनला आपल्या वडिलांच्या मृत्यूची घटना आठवली.

वाघाकडे तो एकटक पाहू लागला.

ते दोघे मृत वाघाजवळ आले. वाघ चांगला आठ हात लांब होता. मग ते दोघे परत

फिरले. कलिम म्हणाला, थांब, एकदा 'कू' देऊ या. बाबू तर झाडावरच बसलेला आहे. त्याच्याजवळ बंदूक आहे. एखादे वेळेस आपला आवाज ऐकून गोळी झाडायचा.

कलिमने 'कू' दिल्यावर बाबूनेही 'कू' देऊन प्रतिसाद दिला आणि बोटीतूनही 'कू' ला 'कू' ची उत्साहाने प्रत्युत्तरं येऊ लागली.

सुंदरबनमध्ये 'कू' देणं हा एक अभिनव प्रकार आहे. जंगलात नावाने कोणीच कोणाला हाक मारीत नाहीत. पक्ष्यांसारखा 'कूऽऽ' असा मोठ्याने आवाज करतात. हिंस्र पशूंपासून सावध राहण्याचे असे अनेक मार्ग माणसाने शोधून काढले आहेत.

कलिम आणि अर्जनच्या चेहऱ्यांवरचं हसू बघून रशिद अली साहेब काय ते समजले. ते झाडावरून उतरून त्या दोघांबरोबर चालू लागले.

कलिम म्हणाला काय बाबू, आता काय करणार?

बाबूने तिकडे दुर्लक्ष करून म्हटलं, थांबा. शिकारीला यायचं आणि गोळी झाडायची नाही म्हणजे काय! आणि रायफल उंच धरून दाट जंगलाच्या दिशेने त्यांनी एक गोळी झाडली.

सर्वांनी मिळून आरडाओरडा करीत वाघाला बोटीत घातलं. सारेजण ऑफिसच्या दिशेने निघाले.

ते किनाऱ्यावर पोचेपर्यंत सायंकाळ झाली. त्यावेळेपर्यंत बाजार उठला होता.

वाघाला बघायला लोकांनी खूप गर्दी केली. सर्वांची उत्सुकता ओसरल्यावर कलिम व अर्जन बाबूला म्हणाले, एक विनंती आहे. बाबू हा वाघ आम्ही प्रथम आमच्या गावात घेऊन जातो. उद्या तुम्ही खुलन्याला जाणार तेव्हा तो घेऊन जा.

म्हणजे? तुम्ही येणार नाही खुलन्याला?

येऊ ना. आम्ही पण येऊ.

ठीक आहे. घेऊन जा. पण आमच्याच बोटीतून न्या आणि आमचे लोकही बरोबर जातील.

सगळे आनंदाने निघाले. अर्जनच्या हातातली तेलाची बाटली रिकामीच होती. रशीद अलीने ते पाहिलं आणि त्याला बाटलीभर तेल आणि दोन शहाळी दिली व निरोप दिला.

कालिकापूरला आल्यावर वाघाला अर्जनच्याच अंगणात ठेवलं. सगळे आसपासचे लोक वाघाला बघायला आले.

अर्जनची आई आजारी होती. तिला पण त्याने बाहेर आणून वाघ दाखवला.

त्याच्या पाठीवरून हात फिरवीत ती म्हणाली : अरे, हा वाघ तर खूप जुना आहे. खूप म्हातारा झाला होता ना. हाच तो वाघ असला पाहिजे.

मग अर्जनच्या पाठीवरून आपला जीर्णशीर्ण हात फिरवीत ती ताडाच्या झाडाकडे एकटक पाहू लागली. झाडाखाली अजूनही दिवा जळत होता.

□




# मेहता मराठी ग्रंथजगत

**वर्गणीचे नूतनीकरण करा!**

**एक वर्षांची वर्गणी ८० रुपये**
**तीन वर्षांची वर्गणी २०० रुपये बचत ४० रुपये**
**पाच वर्षांची वर्गणी ३०० रुपये बचत १०० रुपये**

पाच वर्षांची वर्गणी एकदम पाठवल्यास आपणांस सर्वांत जास्त लाभ होईल. पुढे वर्गणी वाढली तरी आपल्याला याच वर्गणीत अंक नियमित मिळत राहतील.

*अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक*

*वर्गणी पाठवण्याचा पत्ता :*
**मेहता मराठी ग्रंथजगत**, १२१६, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०.

नाव ____________________
पत्ता ____________________
____________________
गाव/शहर ____________ पिनकोड नंबर ____________

माझ्या पुढील मित्रांनाही हे मासिक १/३/५वर्षे भेट म्हणून माझ्यातर्फे पाठवावे. त्यांचीही वर्गणीही सोबत जोडत आहे.

नाव ____________________
पत्ता ____________________
____________________
गाव/शहर ____________ पिनकोड नं. ____________

मी खालील तपशीलानुसार वर्गणी पाठवली आहे.
मनीऑर्डर द्वारा : ____________ दिनांक : ____________
डिमांड ड्राफ्ट क्रमांक : ____________ दिनांक : ____________
बँकेचे नाव : ____________________

काम जसं मंजुळाचं असतं तसं तिच्या घरचा कठीण प्रश्न थोडा माझाही असतो. तिच्या मुलाला शाळेचा युनिफॉर्म मी देते. कधीतरी सिनेमाला पैसे देते. सणावाराला चांगले पदार्थ सन्मानाने देते. मामी, तुझी कोरडी भाषणं कोण कशाला ऐकेल? स्वच्छतेलासुद्धा पैसा लागतो. आज सुदैवाने आपण चांगल्या स्थितीत आहोत. तिची परिस्थिती मध्यम... पण तीसुद्धा माणूस आहे. आपण मदतीसाठी तिला घरी आणलीय. तिचे सुखदुःख आपण जाणायला हवे. ती आपली मैत्रीण आहे असं समजा! आपल्या जवळचे नातेवाईकसुद्धा करू शकणार नाहीत अशी अन् इतकी मदत ही मैत्रीण करते....तिला आदराने, सन्मानाने वागवणे इतकं तरी आपण करू शकतो.''

सोनल घरी आली....नंदाचं बोलणं मनात घुमत होतं. जना कामाला आली. तिने एका कळकट रिबिनेने केस बांधले होते. साडी वर खेचलेली...श्रमदेवतेसारखी वाटली ती! नंदाने नवी दृष्टी दिली. आजपर्यंत जे दिसले नव्हते ते जाणवले. सोनलचं घर जनानं झगमगीत केलं.

ती जायला निघाली तेव्हा देवापुढे नारळ ठेवावा तसं एक पुडकं तिनं जनापुढं ठेवलं.

लक्स, रिनबार, तेलाची बाटली, कंगवा, रबर बँडचा पाकीट, शिकेकाई होती. एका पिशवीत दोन जुने परकर अन् बऱ्यापैकी सोनलच्याच दोन साड्या, दोन नॅपकीन अन् एक नंदाकडून घेतलेला एक एप्रन होता.

जना आनंदून गेली. हसत म्हणाली, ''बाईसाहेब, हे इतकं कायले? आन् मडमिणीवाणी हा झगा?''

सोनलने सगळं तिला समजावून सांगताच जना म्हणाली, ''आता नेसूचं लुगडं कायले बेकार व्हनार? हा असाच इ्याक बांदला झगा की झालं! येते हा बाईसाहेब!''

''बाईसाहेब नाही... मला ताई म्हणायचं. कळलं? अगं, तू माझी सखी...''

सोनलला ते बोलणं कळलंच नाही... पण काहीतरी वेगळं अन् छान वाटलं!

सोनलच्या मनात जनातून मंजुळा घडत होती.

□


***मद्य नव्हे, हे मंतरलेले पाणी!***

– संपादक अरुण शेवते

नामवंत साहित्यिक कलावंतांनी रंगवलेल्या मद्यपानाच्या मैफलींच्या आठवणी

किंमत १२० रु. सवलतीत १०२ रु.

सभासदांना ९० रु .पोस्टेज १५ रु.




# महात्मा

**डॉ. रवीन्द्र ठाकूर**

*आधुनिक जगाला महाराष्ट्राने केवढा मोठा माणूस दिला आहे, याची जाणीव अजून तरी महाराष्ट्राचा अभिमान बाळगणाऱ्या लोकांना किती आहे, हाही एक प्रश्नच आहे. याबाबत आमची स्थिती कस्तूरीमृगासारखी आहे, असेच म्हणावे लागेल. आज समाजात सुरू असलेल्या अनेक प्रकारच्या विचारमंथनाची पूर्वसूत्रे म. फुले यांच्या विचारात आहेत, ही वस्तुस्थिती आहे. शेतीसुधारणा, धंदेशिक्षण व तंत्रशिक्षण, पर्यावरण, आरक्षण, अस्पृश्यता-निवारण, देवदासी-प्रथा-निर्मूलन, अंधश्रद्धा-निर्मूलन, स्त्रीसमता, इत्यादी अनेक विषय त्यांच्या साहित्यात आले आहेत व त्या दृष्टीने त्यांनी प्रत्यक्ष कार्यही केले आहे. अनेक विचारवंतांनी, अभ्यासक-संशोधकांनी त्यांच्या साहित्याचा व जीवनकार्याचा सखोल अभ्यास करून त्यांची थोरवी समाजापुढे मांडायचा प्रयत्न केला आहे. परंतु सर्वसामान्य माणूस अशा वैचारिक व संशोधनपर लेखनापासून प्रायः दूर असतो किंवा ते वाचायला तो फारसा उत्सुक नसतो. म्हणूनच म. फुले यांचे विचार आणि त्यांचे सर्वस्पर्शी व्यक्तिमत्त्व कादंबरीच्या रूपाने वाचकांपुढे ठेवावे, या हेतूने हा प्रयत्न केला आहे.*

*चरित्रात्मक कादंबरी लिहिली ही एक मोठी कठीण साधना आहे. त्याकरिता लेखकाच्या अंगी चरित्रकार व कादंबरीकार या दोहोंचेही गुण असावे लागतात. चरित्रकार हा मुख्यतः संशोधक व संचयक असतो; तर कादंबरीकार हा मुख्यतः सर्जक असतो.*

*महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवन चरित्रावर आधारलेली डॉ. रवीन्द्र ठाकूर यांची कादंबरी 'महात्मा' या नावाने नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. या कादंबरीतील सत्यशोधक समाजाच्या स्थापनेच्या संदर्भातील प्रकरण आणि ब्रिटनचे युवराज ड्युक ऑफ कॅनॉट यांच्या पुणे भेटीच्या संदर्भातील प्रकरण अशी दोन प्रकरणे येथे देत आहोत.*

# सत्यशोधक समाजाची स्थापना

२४ सप्टेंबर, १८७३ रोजी फुले वाड्यात सकाळपासून वर्दळ सुरू झाली. बाहेरगावाहून बरीच मंडळी आली होती. भिल्लारहून गोविंदराव बापूजी, पर्वतीहून नारायणराव शिंदे आले होते. ग्यानबा झगडे मिस्त्री सकाळी लवकर येऊन, काय हवं, काय नको, ते पाहून गेले होते. काल संध्याकाळी हजर झालेले नारायणराव नगरकर तात्यांशी काही महत्त्वाच्या बाबींवर चर्चा करीत होते. नारायणराव कडलक, शाहीर धोंडीराम प्रतिज्ञापत्रक लिहीत होते. कृष्णराव भालेकर त्यांना मदत करीत होते. सीताराम, ग्यानोबा ससाणे बैठक व्यवस्था पाहत होते.

दुपारी बारा वाजेपर्यंत सुमारे पन्नास-साठ मंडळी जमली. सर्वांच्या विनंतीवरून तात्यासाहेब बोलायला उभे राहिले. त्यांनी आपल्या खणखणीत आवाजात बोलायला प्रारंभ केला,

''बंधूंनो, समाजघटनेसाठी धर्म ही एक आवश्यक बाब आहे. परंतु धर्मज्ञानाबाबत आपल्या समाजबांधवांची अवस्था अंधळ्यांच्या गोष्टीसारखी झाली आहे. धर्म म्हणजे नेमकं काय, हेच त्यांना कळेनासं झालं आहे. कारण स्वतंत्र विचार करण्याची कुवत त्यांच्या ठायी उरलेली नाही. त्यामुळं ते धर्माचं सत्यस्वरूप जाणू शकत नाहीत आणि त्याप्रमाणे आचरण करू शकत नाहीत. धर्मग्रंथांनी लादलेल्या मानसिक गुलामगिरीत ते जखडले आहेत. पोथ्यांची अर्थहीन पोपटपंची झाली की ब्राह्मणांना धर्मरक्षण केल्यासारखं वाटतं. आणि ब्राह्मणांच्या पायाचं पाणी प्यालं की शूद्रांना धर्मपालन झाल्यासारखं वाटतं. हे खरं धर्मजीवन नाही. ही धर्माची थट्टा आहे. तुम्हांआम्हांला जीवन देणाऱ्या सर्वशक्तिमान ईश्वराचा हा घोर अपमान आहे. त्या विश्वनिर्मात्या ईश्वराला हे वर्तन कधीही मान्य होणार नाही.

''प्रचलित हिंदू धर्म हे आर्यभटांचं कुटिल कारस्थान आहे. भेदांचे वेद आणि कर्माचा धर्म करून त्यांनी धर्माचा धंदा केला आहे. असा हा धर्म म्हणजे खरा धर्म नव्हे. वेदान्त सांगणारे लोक गोष्टी फार मोठमोठ्या सांगतात; परंतु व्यवहारात तसे वागत मात्र नाहीत. वेदान्तासारख्या नास्तिक मतांवर विश्वास ठेवणं हा सुद्धा ईश्वराचा अपमान आहे. परंतु दुःखाची गोष्ट म्हणजे त्यांचा हा कावा लोकांच्या ध्यानी येत नाही. ब्राह्मणो मम दैवतम् हे वेड काही केल्या डोक्यातून जात नाही. भट्ट सांगे आणि मठ्ठ ऐके, अशी आपल्या समाजाची स्थिती





आहे. भट्ट सांगेल ती पुनव आणि भट्ट सांगेल ती अवस, हे आता थांबवू या. एका गोष्टीचा निर्देश इथं केला पाहिजे. धर्मग्रंथांमध्ये ब्राह्मणांनी करून ठेवलेल्या लबाड्यांचं खरं स्वरूप कळण्याच्या कामी आम्हांला ज्ञानगिरीबुवांची फार मदत झाली. त्यांनी आम्हांला जे सत्यज्ञान घडविलं त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

''या ब्राह्मगारुडाविरुद्ध झगडणं हे एका व्यक्तीचं काम नाही. त्यासाठी आपण सर्वांना एकत्र येऊन झटलं पाहिजे. म्हणूनच ही बैठक घेतली आहे.

''बंधूंनो, पोथ्या-पुराणं ऐकणं आणि दगडधोंड्यांची पूजा करणं हा धर्म नाही. ती दिशाभूल आहे. ती काही लोकांची पोटं जाळायची सोय आहे. ती तशीच टिकून राहावी, म्हणून त्यांनी जातिभेदांचं आणि कर्मकांडांचं खूळ माजवलं आहे. शूद्र जातीतल्या कित्येकांना सारखीच बुद्धिशक्ती असूनही, आपण केवळ शूद्र जातीत जन्मलो, म्हणून श्रेष्ठ होऊ शकत नाही, असं वाटत असतं. मनातल्या या भावनेमुळं आपल्या देशातली मनुष्यशक्ती वाया जात आहे. अस्पृश्यता, भेदाभेद नष्ट केल्याशिवाय समाजाची उन्नती होणं शक्य नाही. दीनदुःखी अक्षरशत्रू माणसाचे अश्रू पुसले नाहीत, तर आपलं मनुष्य म्हणून जगणं व्यर्थ ठरेल.

''प्रत्येक माणूस गुणांनी श्रेष्ठ ठरतो. जातीनं किंवा जन्मानं नव्हे. महार सदाचारी असला तरी नीच; आणि ब्राह्मण दुराचारी असला तरी श्रेष्ठ– हा कुठला न्याय आहे? याबाबत आपणही थोडं आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. ब्राह्मणांच्या पायाचं पाणी तीर्थ म्हणून पिण्यात धन्यता मानू नका, त्याऐवजी आपली स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करा. त्यातच खरं मनुष्यपण आहे.

''धर्माचा चुकीचा अर्थ लावण्यात आला असून, आमच्या शूद्र बांधवांनी तो अज्ञानानं



**"पृथ्वीवर जेवढी म्हणून धर्मपुस्तकं आहेत त्यापैकी एकाही ग्रंथात सारखं सार्वजनिक सत्य नाही. कारण प्रत्येक धर्मपुस्तकात काही स्वार्थी लोकांनी हेकडपणा करून ठेवला आहे. त्यामुळं ते ग्रंथ सर्व मानवांस सारखे हितकारक ठरत नाहीत. प्रत्येक धर्मपुस्तकात त्या त्या वेळेस अनुसरून काही ना काही सत्य आहे; परंतु स्वार्थी लोकांच्या कारस्थानामुळं ते झाकलं गेलं आहे. ते सत्य शोधून त्याचं अनुसरण करणं हेच आपलं कर्तव्य आहे.**

तसाच स्वीकारला आहे. उदाहरणार्थ, मेंढरं पाळणं हा धनगरांचा धर्म नव्हे, तो त्यांचा उद्योग आहे. घरं बांधणं हा सुतारांचा धर्म नव्हे, तो त्यांचा धंदा आहे. किंवा शेती करणं हा कुळवाड्यांचा धर्म नव्हे, तो त्यांचा उद्योग आहे. त्याचप्रमाणे युद्धात पराजित झालेल्या आमच्या अज्ञानी लोकांना भोंदाडून खाणं हा आर्यभटांचा धर्म नव्हे; तो त्यांचा धूर्तपणा आहे. धर्माच्या नावाखाली लोकांना लुटून खावं हा आर्यभटांचा धर्म नव्हे, ती त्यांची उघड ठकबाजी आहे. शूद्राकडून दान घेऊन ते त्याच्या पितरांना स्वर्गाला पाठवतात, तर आपल्या पितरांना स्वर्गाला पाठवण्यासाठी स्वतः कोणाला दान करतात? दानधर्माचं लटांबर आमच्यामागं लावून त्यांनी आपली पोटं जाळायची खाशी सोय करून ठेवली आहे."

एकच हशा उसळला. तात्या थबकले. त्यांचा आवाज आता चांगलाच तापला होता. ते पुढं बोलू लागले,

"एकाच घरातील तीन भाऊ वेगवेगळे धंदे करत असतील, तर त्यांच्या जाती वेगवेगळ्या आहेत, असं तुम्ही मानता का? बंधूंनो, धर्माचा खरा अर्थ जाणून घेण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी परमेश्वराची इच्छा काय आहे, हेही लक्षात घेतलं पाहिजे.

"ईश्वर एक असून तोच सत्य आहे. त्याला निर्मिक म्हटलं असता चिंता नाही. हे जग त्यानं सर्व मानवांसाठी, पशुपक्ष्यांसाठी निर्माण केलं असून, येथील सर्व वस्तूंवर सर्वांचा सारखाच हक्क आहे. सर्वांनी सर्व वस्तूंचा सारखा उपभोग घ्यावा, हीच निर्मिकाची इच्छा आहे. त्यानं निर्माण केलेली पानं-फुलं त्यालाच अर्पण करणं चुकीचं असून त्यातून तो प्रसन्न होणार नाही. तुम्ही-आम्ही सर्व मानवांनी जगाच्या कल्याणासाठी झटणं हाच त्याला खरा नैवेद्य आहे. सर्वांनी बंधुभावानं आणि सत्यनिष्ठेनं वागलं, तरच त्याला संतोष होणार आहे.

"निर्माणकर्ता कसा नि कुठं आहे, हे जाणण्याची मनुष्यानं इच्छा न केलेली बरी. कारण यत्किंचित मानवास त्याचा शोध घेणं शक्य नाही. कारण मानवाच्या बुद्धी-शक्तीला मर्यादा आहेत आणि तो जगाचा निर्माणकर्ता ईश्वर सर्वशक्तिमान आहे. त्याची प्रार्थना



करण्यासाठी कोणाही मध्यस्थाची गरज नाही. कारण आम्ही सर्व त्याची लेकरं आहोत. मुलाला आईशी बोलायचं असेल, तर बापाची परवानगी घ्यावी लागत नाही. कुठल्याही मध्यस्थाशिवाय तो आईची भेट घेऊ शकतो. ईश्वराशी असलेलं आमचं नातं हे असं मायलेकरासारखं आहे. कुठल्याही मध्यस्थाशिवाय आम्ही त्याची उपासना करू शकतो. गुरू होऊन लोकांना भोंदाडणाऱ्या पातक्यांवर विश्वास ठेवू नका.

"पृथ्वीवर जेवढी म्हणून धर्मपुस्तकं आहेत त्यापैकी एकाही ग्रंथात सारखं सार्वजनिक सत्य नाही. कारण प्रत्येक धर्मपुस्तकात काही स्वार्थी लोकांनी हेकडपणा करून ठेवला आहे. त्यामुळं ते ग्रंथ सर्व मानवांस सारखे हितकारक ठरत नाहीत. प्रत्येक धर्मपुस्तकात त्या त्या वेळेस अनुसरून काही ना काही सत्य आहे; परंतु स्वार्थी लोकांच्या कारस्थानामुळं ते झाकलं गेलं आहे. ते सत्य शोधून त्याचं अनुसरण करणं हेच आपलं कर्तव्य आहे.

"देशाभिमान आणि धर्माभिमान हे माणसांमध्ये वैरभाव निर्माण करणारं व्यर्थ खूळ आहे. कारण पृथ्वी हा एकच देश असून, त्याचा निर्माणकर्ता एकच आहे. आम्हां सर्वांना मानवी अधिकारांचा सारखा उपभोग घेता आला पाहिजे. परंतु असं घडत नाही. आम्हांस कितीतरी दुःसह अडचणी सोसाव्या लागत आहेत...

"...पृथ्वीवरील अनेक देशांतील नद्या महासागरास मिळतात. त्या पैकी एकाच देशातील नदी पवित्र कशी असेल? त्याप्रमाणे एकंदर सर्व माणसं अवयवानं व बुद्धिकौशल्यानं एकसारखं असून; त्यापैकी काही लोक फक्त पिढीजात पवित्र बनून श्रेष्ठ कसे ठरतील? बंधूंनो, सत्य जाणून घ्या आणि आपणही थोडं आत्मपरीक्षण करा. आत्मपरीक्षणानं आपले दोष दूर होतील. जुगार खेळू नका. व्यसनाधीन होऊ नका. उद्योगी व्हा. मुलांना शिकवा. दैववादी होऊन दुःखदारिद्र्याच्या नावानं बोटं मोडत बसू नका. आपण उद्योगी झालो तर आपलं दारिद्र्य कुठल्या कुठं पळून जाईल.

"बंधूंनो, धर्माचं सत्य-स्वरूप जाणून घेऊन त्यानुसार आचरण करणं हाच धर्म होय. सत्य म्हणजे नीती. सत्य म्हणजे कृती. मानवासाठी सत्यापरता वेगळा धर्म नाही. तोच सत्यधर्म होय. सत्यधर्माचं आचरण केल्यानं प्रत्येक माणूस सुखी होईल आणि अशा सुखीसमाधानी माणसाला पाहून निर्मिकालाही संतोष होईल. म्हणूनच आम्ही सार्वजनिक सत्यधर्माची, सत्यशोधक समाजाची स्थापना करावी, असं ठरवलं आहे...

"बंधूंनो, धर्म ही कोणाच्या मालकीची वस्तू नाही. सर्वांना सारखीच हितकर ठरेल, अशी ती सार्वजनिक गोष्ट आहे. हिंदू धर्म असा सर्वांचा सार्वजनिक नाही. स्त्रियांना, शूद्रातिशूद्रांना तेथे धर्माचा अधिकार नाही.

"या उलट ख्रिस्ती धर्म, महंमदी धर्म किंवा बौद्ध धर्म हे सार्वजनिक आहेत. दीक्षा घेऊन त्यांचं पालन करता येतं. तसं हिंदू धर्माचं नाही. या धर्मात जन्म घ्यावा लागतो

आणि एकदा जन्म घेतल्यावर तुमची इच्छा असो नसो, तुम्हांला हिंदू म्हणूनच जगावं लागतं. ख्रिस्ती, महंमदी हे धर्म सार्वजनिक आहेत, म्हणून लगेच त्यांचा स्वीकार करा, असं मी म्हणणार नाही. कारण त्या धर्मातही दोष शिरले आहेत. म्हणून सर्वांना सारखाच हितकारक ठरेल, असा धर्मविचार स्वीकारला पाहिजे. सर्व मानवजात एक आहे, सत्य हाच धर्म आहे, हे मानणारा सार्वजनिक सत्यधर्म आम्ही मानवसमाजापुढं ठेवत आहोत. आमचा धर्मविचार प्रत्येकानं स्वीकारलाच पाहिजे, असा जुलूम आम्ही कोणावर करणार नाही. कोणाही व्यक्तीच्या धर्मस्वातंत्र्याआड आम्ही येणार नाही. उलट, सत्यधर्माला अनुसरून अनेकधर्मीय व्यक्ती एका घरात गुण्यागोविंदानं नांदत आहे, असा दिवस पाहायला मिळो, अशी आमची त्या सर्वशक्तिमान ईश्वराकडं प्रार्थना आहे. सार्वजनिक सत्यधर्म हे धर्मपीठ नाही. धर्मपीठ पुरोहितशाहीला जन्म देतं. कर्मकांड निर्मण करतं. असं धर्मपीठ निर्माण करणं हा सत्यधर्माचा उद्देश नाही. प्रत्येकानं बुद्धीची कसोटी लावून सत्याचा शोध घ्यावा आणि त्याप्रमाणे आचरम करावं, हीच सत्यधर्माची शिकवण आहे. आज आपल्या समाजबांधवांची स्थिती फार हलाखीची झाली आहे. भट-जोशी त्यांना धर्माच्या नावाखाली लुटून खात आहेत. पूर्वजांच्या लबाड्या झाकण्यासाठी निर्माण झालेले समाज त्यांच्या हिताचा विचार करणार नाहीत. ते काम आपणच केलं पाहिजे. जुलूम, अन्याय यांना बळी पडलेल्या आपल्या अज्ञानी देशबांधवांना त्यातून सोडवलं पाहिजे. याविषयी आपणही आपली मतं मांडावीत, अशी विनंती मी करतो.''

तात्यांचं भाषण संपलं. वातावरण एकदम सुन्न होऊन गेलं होतं. तात्यांनी जणू प्रत्येकाच्या मनातले विचार बोलून दाखवले होते.

हळूहळू चर्चेला तोंड फुटलं. प्रत्येक जण मोकळेपणानं आपले विचार मांडू लागला. कृष्णराव म्हणाले,

''तात्यासाहेब, सत्यधर्माचा स्वीकार केल्यानं आपला समाज ब्राह्मणी हिंदू धर्माच्या जोखडातून मुक्त होईल?''

''शंकाच नको!!'' तात्या म्हणाले, ''ब्राह्मणी हिंदू धर्माची रचनाच असत्यावर आधारलेली आहे. सार्वजनिक सत्यधर्म समाजाच्या मानगुटीवर बसलेलं ब्राह्मणी धर्मसत्तेचं भूत जमीनदोस्त करील. ब्राह्मणांची मिरासदारी होऊन बसलेल्या हिंदू धर्मात शूद्रातिशूद्रांच्या हिताचा विचार नाही. सार्वजनिक सत्यधर्म सर्वांचा, सर्वांसाठी असेल. त्यात अंधळ्या कर्मकांडाला, गूढवादाला किंवा मूर्तिपूजेला थारा असणार नाही. आमचा हेतू केवळ धर्मसुधारणा हा नाही. धर्म म्हणजे काय हे लोकांना जाणवून द्यावं हा आमचा हेतू आहे. ब्राह्मणी अधर्माची गुलामी करण्यात आपलं हित नाही, तसं इतर कुठल्याही धर्माच्या कच्छपी लागण्यातही



नाही. प्रत्येकाला धर्मस्वातंत्र्य उपभोगता आलं पाहिज. त्यासाठी मनाला गुलाम करणाऱ्या गूढांना फाटा दिला पाहिजे. ख्रिस्ती धर्मावर टीका करूनही टॉमस पेननं वेगळा धर्म निर्माण केलेला नाही. धर्माचा विचार करण्याची स्वतंत्र बुद्धी त्यानं आम्हांला दिली. हे त्याचं कार्य आहे. त्याच आधारावर सत्यधर्माला विचारांची गुलामी नव्हे, तर विचारांचं स्वातंत्र्य अपेक्षित आहे.''

स्वतंत्र धर्मविचार मांडलाच पाहिजे, या विषयाची कोणाच्याही मनात कुठलाच विकल्प नव्हता. समाजाची तत्त्वं कोणती असावीत, हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा होता.

चर्चेअंती तयार झालेली तत्त्वं तात्यांनी वाचून दाखवली.

१. ईश्वर एक असून, तो सत्यरूप आहे. तोच जगातील सर्व प्राणिमात्रांचा पिता आहे.

२. आईच्या भेटीसाठी अगर बापाला प्रसन्न करण्यासाटी ज्याप्रमाणे कोणा मध्यस्थाची गरज नसते, त्याप्रमाणे परमेश्वराच्या प्रार्थनेसाठी कुठल्याही धर्मगुरूची आवश्यकता नाही.

३. मनुष्य जातीनं श्रेष्ठ ठरत नसून, तो गुणांनी श्रेष्ठ ठरतो.

ही तत्त्वं ज्याला मान्य आहेत, तो सत्यशोधक समाजाचा सभासद होऊ शकतो. कोणालाही सहज समजेल असा धर्मविचार त्या तत्त्वांमध्ये आलेला होता.

नारायणराव नगरकर, नारायणराव कडलक, कृष्णराव भालेराव, शाहीर धोंडीराम यांचीही भाषणं झाली. त्यांनीही सार्वजनिक सत्यधर्माची आवश्यकता प्रतिपादन केली.

तात्यांनी दीक्षाविधीविषयी माहिती दिली. दीक्षाविधीत क्षत्रियांच्या मूळ धर्मपरंपरांचं भान ठेवण्यात आलं होतं. दीक्षाप्रसंगी घ्यावयाची प्रतिज्ञाही त्यांनी वाचून दाखवली.

''तात्यासाहेब, आता दीक्षाविधीला सुरुवात होऊ द्या.'' नारायणराव नगरकर म्हणाले.

''ही तत्त्वं सर्वांना मान्य आहेत का, हे आधी स्पष्ट होऊ द्या.''

''काय, ग्यानोबा, तात्या म्हणतात, ते पटतं ना?''

तात्या सांगत होते, ते सारं काही भक्तिभावानं ऐकत असलेले ग्यानोबा दचकले.

''तात्यांनी सांगितलं, ते बरोबर आहे. ते मला पटलं.'' ग्यानोबांनी आपला होकार भरला.

त्यांची प्रतिक्रिया सर्वांना आवडली.

''आम्हांलाही समाजाची तत्त्वं मान्य आहेत.'' त्यांना दुजोरा देत सर्वजण म्हणाले.

''ठीक आहे. सीताराम, तळी घेऊन ये.''

तात्या उठले. एका घोंगड्याची घडी घालून त्यांनी मधोमध ठेवली. त्यावर काकूंनी भरून पाठवलेली गूळ, गुलाल खोबऱ्याची तळी ठेवली आणि सर्वांना तळी उचलण्याचं आवाहन केलं. सर्वांचे हात तळीला लागले. बळीस्थानातील क्षेत्रपतींचा येळकोट सुरू झाला,

*"हर हर महादेव*
*चिंतामण मोरया*
*बहिरव की चांग बोलो*
*भवानी की जय*
*हनुमान की हूं*
*गरूड का झरारा*
*आस्मान का तारा*
*फेर वाजे नगारा*
*सोन्याची जेजुरी*
*रुप्याचा फवारा*
*मोत्याचा तुरा*
*देव आले घरा*
*सदानंदाचा ऽयेळकोट.."*

"काळं बहिरीचं चांगभलं." तात्यांनी घोषणा दिली.

"काळ बहिरीचं चांगभलं." सर्वांनी जयजयकार केला.

"खंडोबाचा येळकोट."

"खंडोबाचा येळकोट."

सर्व क्षेत्रपतींचा जयजयकार झाला. गुलालभंडार उधळला गेला.

तात्यांनी प्रतिज्ञा म्हणायला प्रारंभ केला,

"सर्व मानवप्राणी एकाच देवाची लेकर आहेत, सबब ती माझी भावंडं आहेत. परमेश्वराची पूजा अगर भक्ती करते वेळी मी मध्यस्थाची गरज ठेवणार नाही. मी माझ्या मुलामुलींना सुशिक्षित करीन. नेहमी राजनिष्ठेनं वागेन. सत्यरूप परमेश्वरास साक्षी ठेवून मी ही प्रतिज्ञा करीत आहे."

तात्यांच्या नंतर राजारामभाऊंसह इतर सर्वांनी प्रतिज्ञा म्हटल्या. लगेचच पदाधिकाऱ्यांची घोषणा करण्यात आली. समाजाचे अध्यक्ष आणि कोषाध्यक्ष म्हणून तात्यासाहेब फुले आणि कार्यवाह म्हणून नारायणराव कडलक यांची नावं जाहीर करण्यात आली.

समाजाच्या सभासदांची यादी तयार होऊ लागली. प्रत्येकजण आपापलं नाव पुकारत होता. नारायणराव कडलक लिहून घेत होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास दिसत होता. धर्माचा अधिकार नसलेल्या लोकांनी धर्म स्थापना केला होता! स्वतंत्रपणे आपला जीवनमार्ग निवडला होता! आता ते कोणाच्या ओंजळीनं पाणी पिणार नव्हते! प्रत्येक धर्मनिष्ठ, ईश्वरनिष्ठ माणसासाठी सार्वजनिक सत्यधर्माची, सत्यशोधक समाजाची स्थापना झाली होती!



## ब्रिटिश राजपुत्राची भेट

तात्यांना श्वास घ्यायला फुरसत नव्हती. अंगावर कामाचा डोंगर येऊन कोसळला होता. समाजाची स्थापना झाल्या झाल्या कार्तिक महिन्यात सर्व सभासदांनी ब्राह्मणांशिवाय तुळशीची लग्नं लावून बंडाचा झेंडा उभारला. त्या बातम्या गावोगाव जाऊन पोचताच समाजाच्या शाखा उघडण्याचा नुसता धूमधडाका उडाला.

पर्वती, भिल्लार, भांबुर्डे, हडपसर, इत्यादी अनेक ठिकाणी सत्यशोधक समाजाच्या शाखा स्थापन झाल्या. तात्यासाहेब फुले येणार आहेत, एवढं कळण्याचा अवकाश माणसं दहादहा मैलाचं अंतर तोडून सभेला येत. शाहीर धोंडीराम, भीमराव महामुनी, कृष्णराव भालेकर असे फर्डे शाहीर आणि वक्ते सत्यशोधक चळवळीत उतरले. ठिकठिकाणी होणाऱ्या त्यांच्या सभा गाजल्या. कसबिणींचे नाचतमाशे आणि कलगीतुऱ्याच्या शाहिरीत रममाण होणारे शेतकरी सत्यशोधक जलसे करू लागले.

**१. ईश्वर एक असून, तो सत्यरूप आहे. तोच जगातील सर्व प्राणिमात्रांचा पिता आहे.**
**२. आईच्या भेटीसाठी अगर बापाला प्रसन्न करण्यासाठी ज्याप्रमाणे कोणा मध्यस्थाची गरज नसते, त्याप्रमाणे परमेश्वराच्या प्रार्थनेसाठी कुठल्याही धर्मगुरूची आवश्यकता नाही.**
**३. मनुष्य जातीनं श्रेष्ठ ठरत नसून, तो गुणांनी श्रेष्ठ ठरतो.**
**ही तत्त्वं ज्याला मान्य आहेत, तो सत्यशोधक समाजाचा सभासद होऊ शकतो. कोणालाही सहज समजेल असा धर्मविचार त्या तत्त्वांमध्ये आलेला होता.**

कृष्णरावांचा राघू गाडीवानाचा पोवाडा लोकांच्या तोंडावर खेळू लागला. पुणे इलाख्यात नवचैतन्य संचारलं. त्याचं लोण हळूहळू महाराष्ट्राच्या इतर भागांतही पसरत चाललं.

थेट सातारा, बुलढाणा, ठाणे इथपर्यंत चळवळ पोचली. मुंबईतही हालचाली सुरू होत्या. आनंदाची गोष्ट म्हणजे, कृष्णराव भालेकर, पंढरीनाथ आबाजी चव्हाण, रावजी शिरोळे असे नव्या दमाचे अनेक तरुण समाजाला लाभले. आपल्या भाषणांतून, निबंधांतून आणि कवनांतून त्यांनी समाजजागृतीचं कार्य जोमानं सुरू केलं. त्यासाठी कृष्णरावांनी नवीच शक्कल शोधून काढली. बुधवारी बुधवार पेठेत, गुरुवारी गुरुवार पेठेत अशी प्रत्येक दिवशी प्रत्येक पेठेत व्याख्यानं देण्याचा धडाका त्यांनी सुरू केला. पुण्याच्या ब्राह्मणांनी त्यांच्या सभांचा धसकाच घेतला. सभा म्हटल्यावर अध्यक्ष हवाच. परंतु रावबहादूर गोपाळराव हरी सोडले, तर कोणीही ब्राह्मण विद्वान त्यांच्या सभेला अध्यक्ष म्हणून यायला धजत नसे.

ठाण्यात डॉ. संतूजी लाड, साताऱ्यात रामचंद्रराव धामणस्कर, बुलढाण्यात बापूजी हरी, मुंबईत स्वामी रामय्या व्यंकय्या अय्यावारू यांनी सत्यशोधक चळवळीचे ध्वज खांद्यावर पेलले. पुण्यात रामशेट उरवणे, विठ्ठलराव गुठाळ अशी कितीतरी मान्यवर माणसं समाजाच्या झेंड्याखाली एकत्र आली.

दर रविवारी बैठकी झडत होत्या. पंधरा दिवसांतून एका शनिवारी एखाद्या उपयुक्त विषयावर चर्चा होत. मद्यपानाचे दुष्परिणाम, विद्येपासून फायदे, अनिष्ट चालीरीती, खरा धर्मविचार, जातिभेद, मूर्तिपूजा असे कितीतरी विषय मांडले जात.

चहुबाजूंनी देणग्यांचा ओघ सुरू होता. तनमनधन लावून माणसं झटत होती. रविवारच्या बैठकीला परगावांहून माणसं येत. दुकानातली जागा अपुरी पडू लागली होती. म्हणून सदोबा गावडे डॉक्टर यांच्या वाड्यात जमावं लागत होतं.

आता ती रविवारची बैठक राहिली नव्हती. ती सत्यशोधक समाजाची साप्ताहिक सभा झाली होती.

या सर्व वातावरणात तात्यांची कवित्वशक्ती पुन्हा जागृत झाली. त्यांना चालता-बोलता अनेक अखंड सुचत. भाषणात त्यांचा सहज वापर ते करीत. दिवसेंदिवस मनात घोळत राहिलेले अखंड ते रात्री-पहाटे वेळ मिळेल तेव्हा लिहून ठेवत. शाहीर धोंडीराम यांचा तगादा असे, तो वेगळाच. त्यांना व्याख्यानात दाखले देण्यासाठी तात्यांचे अखंड हवे असत. त्यांच्यामुळंच तात्यांचे बरेचसे अखंड कागदावर उतरत आणि हातोहात सत्यधर्माच्या प्रचारकांपर्यंत पोचविले जात.

पोटं जाळण्यासाठी लहानसहान बातम्या मोठ्या करून छापणाऱ्या पुण्यातल्या गुलाबी वर्तमानपत्रांना अजून सार्वजनिक सत्यधर्माच्या स्थापनेची बातमी लागलेली दिसत नव्हती.

नाही म्हणायला एका विविधज्ञानी मासिकानं 'गुलामगिरी'ची दखल घेतली. 'मूर्खत्वमय निंदाप्रचुर चोपडे (त्याला पुस्तक म्हणण्यास शरम वाटते.)' या शब्दात 'गुलामगिरी'ची दखल घेऊन विविधज्ञानविस्तारानं लिहिलं,

'त्याचे कर्ते जोतीराव गोविंदराव फुले कोणी आहेत. या नावाच्या गृहस्थाने काही वर्षांपूर्वी अशीच वेडगळ आणि निंदक चोपडी छापवली होती, तेच हे गृहस्थ असे दिसते.'

हरी रावजी चिपळूणकरांचा चौसोपी वाडा आज हंड्या-झुंबरांनी लखलखत होता. झुंबरांतून झिरपणारी रंगांची इंद्रधनुष्यं दिवाणखान्याच्या भिंतींवरून खेळत होती. प्रत्येक कोपऱ्यातील शामदानात मेणबत्त्या तेवत होत्या. वाड्याचं आवार पताकांनी सजलं होतं.

दिवाणखान्याच्या भिंतीलगत पाच-सहा खुर्च्या आणि मेज ठेवून विलायती पद्धतीचं व्यासपीठ तयार करण्यात आलं होतं. समोर निमंत्रितांना बसण्यासाठी पाच-पंचवीस खुर्च्या ठेवलेल्या होत्या. खास तैनात केलेलं सुरक्षापथक वाड्यासमोर उभं होतं. चिपळूणकरांच्या



वाड्यात आज मेजवानीचा जंगी बेत पार पडणार होता. इंग्लंडचे राजपुत्र ड्यूक ऑफ कॅनॉट यांच्या सन्मानाप्रीत्यर्थ आजची ही खास मेजवानी आयोजित करण्यात आली होती.

वाड्यात अनेकदा मेजवान्या आयोजित केल्या जात. कंपनी सरकारच्या सेवेतून निवृत्त होऊन मायदेशी परतणाऱ्या अनेक सरकारी अधिकाऱ्यांनाही चिपळूणकरांच्या वाड्यात असाच समारंभपूर्वक निरोप घ्यावा लागत असे. कधीतरी पुणे शहराला भेट द्यायला आलेल्या राजपुरुषांचंही वाड्यात असंच स्वागत केलं जाई. आजच्या मेजवानीला आणखी एक खास संदर्भ होता. तो म्हणजे, हरी रावजींना मिळालेला ऑनररी मॅजिस्ट्रेट हा सन्मान. राजपुत्र महोदयांशी असलेले त्यांचे स्नेहसंबंध ध्यानात घेता आजची मेजवानी म्हणजे दोघं मित्रांची स्नेहभेट ठरणार होती. महत्त्वाचं म्हणजे, राजपुत्र महोदय सपत्नीक येणार होते. त्यामुळं सर्वांचा आनंद द्विगुणित झाला होता.

मेजवानीची वेळ जवळ येऊ लागली, तसतशी वर्दळ वाढू लागली. मशालींच्या उजेडात वाड्यासमोर मेणे-पालख्या रिकाम्या होऊ लागल्या. प्रत्येक व्यक्तीनं आज ठेवणीतली उंची वस्त्रं परिधान केलेली होती. श्रीमंत असामींच्या अंगावर सोन्यामोत्यांचे दागिने झळकत होते. पायांतल्या जोडव्यांपासून नाकातल्या नथीपर्यंत दागदागिन्यांनी लगडलेल्या श्रीमंताघरच्या स्त्रिया डोक्यांवरचे शालूपैठण्यांचे पदर आणि खांद्यांवरच्या जरीच्या शाली सावरत मेण्यातून उतरत होत्या. मोलकरणी त्यांना सोबत करीत वाड्यात घेऊन जात होत्या.

सोयीसाठी प्रत्येक निमंत्रिताकडं प्रवेशपत्रिका पाठवण्यात आलेली होती. बरीचशी मंडळी ओळखीची असली, तरी एखाद्या अनोळखी पाहुण्याला आत सोडताना त्याच्याकडं प्रवेशपत्रिका असल्याची खात्री करून घेतली जात होती. त्या कामासाठी दोघे कारकून रक्षकांसह वाड्याच्या प्रवेशद्वाराजवळ उभे होते. दिवाणखान्यात स्वतः हरी रावजी निमंत्रितांचं स्वागत करीत होते. प्रत्येक गृहस्थाला त्याच्या नियोजित जागी बसवण्यात येत होतं.

शिवराम कारकून हरी रावजी यांच्याजवळ आला आणि त्यांच्या कानाशी लागून काहीतरी सांगू लागला. वाड्याच्या प्रवेशद्वाराजवळ काहीतरी गडबड झाली होती. कोणीतरी खेडवळ माणूस मेजवानीसाठी आला होता. त्याच्या एकूण अवतार पाहता, त्याला आत सोडणं शक्य नव्हतं. परंतु तो परत जायलाही तयार नव्हता. कारण त्याच्याकडं प्रवेशपत्रिका होती.

हरी रावजी बुचकळ्यात पडले. अशा कोणा गृहस्थाला निमंत्रण दिल्याचं त्यांना आठवेना. काय प्रकार आहे, तो पाहावा, म्हणून ते वाड्याच्या प्रवेशद्वाराजवळ आले.

हातात काठी, डोक्यावर फाटकं मुंडासं आणि खांद्यावर घोंगडं घेतलेला एक शेतकरी अंगणात उभा होता. आखूड मुंडीछाट कुडत्याखाली गुडघ्यांपर्यंत आलेलं धोतर तो नेसला होता. हा गृहस्थ आहे तरी कोण? हरी रावजींना काही कळेना. ते आणखी जवळ आले.

त्यांना कसला तरी संशय आला. दोरीनं बांधलेल्या फाटक्या वहाणांपासून ते डोक्यावरच्या गाठीगाठींच्या मुंडाशापर्यंत त्यांनी त्या शेतकऱ्याला पुन्हा एकदा निरखून पाहिलं आणि चटकन् हात जोडत ते म्हणाले,

''माफ करा, तात्यासाहेब, शिवरामनं तुम्हांला ओळखलं नाही. या...''

तात्यासाहेबांना सोबत करीत हरी रावजी व्यासपीठाजवळ आले. राजपुत्र महोदयांच्या खुर्चीला लागून त्यांचं आसन मांडण्यात आलेलं होतं.

राजपुत्राच्या शेजारी बसणारा हा फाटका माणूस आहे तरी कोण, म्हणून कुजबूज सुरू झाली..

मशालजी येत असल्याची वर्दी मिळाली. ठिकठिकाणी उभ्या असलेल्या सैनिकांची आणि पोलिसांची सलामी स्वीकारत राजपुत्र ड्यूक ऑफ कॅनॉट यांची घोडागाडी चिपळूणकरांच्या वाड्याकडं येत होती.

धावत पुढं आलेले मशालजी वाड्यासमोर थांबले. हरी रावजींनी पाहुण्यांना सन्मानपूर्वक दिवाणखान्यात आणलं.

राजपुत्र महोदयांनी सपत्नीक आसन ग्रहण केल्यावर सर्वजण आपापल्या जागी स्थानापन्न झाले.

भोजनापूर्वी पाहुण्यांना सन्मानाप्रीत्यर्थ काही भाषणं व्हावयाची होती. स्वतः पाहुणेही दोन शब्द बोलणार होते.

एव्हाना निमंत्रित मंडळी उपस्थित झाली असल्यानं कार्यक्रम सुरू व्हायला काहीच हरकत नव्हती. हरी रावजी पाहुण्यांना उपस्थितांचा परिचय करून देऊ लागले.

प्रत्येक असामीचा परिचय करून घेत असताना पाहुण्यांचं लक्ष सारखं तात्यांकडं जात होतं. आल्यापासून ते पुन्हा पुन्हा तात्यांकडं पाहात होते. पाहुण्यांची उत्सुकता ओळखून हरी रावजी म्हणाले,

''युवर हायनेस, ही इज जोतीराव गोविंदराव फुले. अवर सोशल रिफॉर्मर. लीडर ऑफ अवर पीझन्ट्स अँड अवर सोशल रिफॉर्मर.''

''आय् ॲम व्हेरी ग्लॅद टु सी यू, युव हायनेस.'' तात्या म्हणाले.

खेडवळ दिसणारा हा माणूस काहीतरी वेगळा आहे, हे राजपुत्र महोदयांच्या लक्षात आलं. कुतूहलाची जागा आदरानं घेतली. ठरलेली अभीष्टचिंतनपर भाषणं सुरू झाली. ती भाषणं आटोपताच हरी रावजींनी पाहुण्यांच्या आभाराप्रीत्यर्थ तात्यांनी दोन शब्द बोलावेत, अशी विनंती केली.

तात्या म्हणाले,

''ठीक आहे. परंतु त्यासाठी मला अर्धा तास द्यावा लागेल. साहेबांना तेवढा वेळ आहे



का?''

आभाराच्या निमित्तानं तात्यांना आणखी काही गोष्टी सांगायच्या आहेत, हे हरी रावजींनी ओळखलं. क्षणभर साहेबांच्या कानाशी लागून ते तात्यांना म्हणाले,

''साहेब आपलं भाषण ऐकण्यासाठी उत्सुक आहेत. तुम्ही बोला.''

पुन्हा कुजबूज सुरू झाली. मुळात जोतीराव फुल्यांनी अशा पेहरावात येऊन समारंभाला गालबोट लावावं, ही गोष्ट अनेकांना फार खटकली होती. दृष्ट लागावी, अशा मेजवानीला शूद्र शेतकऱ्याच्या वेशात येऊन आगंतुकपणा केला, तो केला... आता वरून आणखी भाषण ऐकवणार होते! पुण्यातले काही शिष्ट हरी रावजींवर संतापले. आता पुरती खरडपट्टी निघणार, यात शंकाच नव्हती. परंतु आता जीव मुठीत धरून बसण्याऐवजी दुसरा इलाज नव्हता.

समोर अनेक लोक तात्यांचं भाषण ऐकायला आतुर झाले. हा शेतकरी माणूस काय बोलणार आहे, हे जाणून घेण्यासाठी राजपुत्र महोदयसुद्धा तेवढेच उत्सुक होते.

तात्याही भाषण करायच्या तयारीनंच मेजवानीला आले होते. राजपुत्रासमोर ते हिंदुस्थानातील शेतकऱ्यांच्या स्थितीचं निवेदन करणार होते.. त्यांचं आजचं भाषण हिज हायनेस ड्यूक ऑफ कॅनाट यांना उद्देशून असणार होतं...

तात्यांनी उजव्या हातातली लांबलचक काठी मागं खुर्चीला टेकवली. खांद्यावरचं घोंगडं टेबलावर ठेवलं आणि ते बोलायला उभे राहिले. अस्खलित इंग्रजीत त्यांनी आपलं भाषण सुरू केलं. शिष्टाचाराप्रमाणे प्रथम राजपुत्र महोदयांचं अभीष्टचिंतन केल्यावर ते पुढं म्हणाले,

''बंधूंनो, माझा हा पेहराव पाहून तुम्ही गोंधळला असाल. परंतु यात गोंधळण्यासारखं काय आहे? आपल्या देशात नव्वद-पंच्याण्णव टक्के माणसं ज्या पेहरावात राहतात, तोच हा पेहराव आहे. मी स्वतःही शेतकरीच आहे. आज या पेहरावात इथं येण्याचं कारण तसंच महत्त्वाचं आहे...''

–आणि हिज हायनेस ड्यूक ऑफ कॅनॉट यांच्याकडे वळून ते म्हणाले,

''युवर हायनेस, या समारंभास आलेल्या लोकांचे झगमगीत उंची पोशाख आणि त्यांच्या अंगांवरचे हिऱ्यामोत्यांचे दागिने पाहून कदाचित तुम्हांला असा भास होईल की हा देश फार सुखी आणि संपन्न आहे. परंतु तसं झालं तर तो तुमचा गैरसमज ठरेल. कारण वस्तुस्थिती फार वेगळी आहे. तुम्ही ज्याला हिंदुस्थान म्हणता, त्याला आम्ही बळीस्थान म्हणतो. कारण हा देश शेतकऱ्यांचा आहे. जमिनीत कष्ट करणाऱ्या बळी राजाचा आहे, उंची वस्त्रं आणि दागदागिन्यांनी मढलेले हे लोक म्हणजे खरा हिंदुस्थान नाही. हे लोक त्या बहुसंख्य जनतेचे प्रतिनिधी नाहीत...

“खरा हिंदुस्थान खेड्यांत आहे. आमच्या खेड्यांतले लोक निर्धन, भुकेकंगाल आणि बेघर आहेत. रात्रंदिवस कष्ट करूनही ते अर्धपोटी राहतात. अनवाणी चालतात. लाज झाकायला सुद्धा त्यांना पुरेसा कपडा मिळत नाही. त्यांचा पेहराव, मी केला आहे, त्याच तऱ्हेचा; पण याहून जास्त विटलेला असतो. राजपुत्र महाशयांना खरा हिंदुस्थान पाहायचा असेल आणि हिंदुस्थानांच्या महाराणीला खरा वृत्तान्त निवेदन करायचा असेल, तर त्यांनी आजूबाजूच्या काही खेड्यांना भेटी द्याव्यात. अज्ञानी जनतेचं भयंकर दारिद्र्य प्रत्यक्ष पाहावं. महार-मांग लोकांच्या वस्त्यांना भेटी देऊन, त्या मनुष्यवस्तीसाठी कितपत योग्य आहेत, याची खात्री करून घ्यावी...

**“युवर हायनेस, या समारंभास आलेल्या लोकांचे झगमगीत उंची पोशाख आणि त्यांच्या अंगांवरचे हिऱ्यामोत्यांचे दागिने पाहून कदाचित तुम्हांला असा भास होईल की हा देश फार सुखी आणि संपन्न आहे. परंतु तसं झालं तर ती तुमचा गैरसमज ठरेल. कारण वस्तुस्थिती फार वेगळी आहे. तुम्ही ज्याला हिंदुस्थान म्हणता, त्याला आम्ही बळीस्थान म्हणतो. कारण हा देश शेतकऱ्यांचा आहे. जमिनीत कष्ट करणाऱ्या बळी राजाचा आहे, उंची वस्त्रं आणि दागदागिन्यांनी मढलेले हे लोक म्हणजे खरा हिंदुस्थान नाही. हे लोक त्या बहुसंख्य जनतेच प्रतिनिधी नाहीत...**

“खरा हिंदुस्थान असा आहे. साहेब, तुमची भाषा आमच्या अज्ञानी शेतकरी लोकांना समजत नाही आणि शेतकऱ्यांची भाषा तुम्हाला कळत नाही. हे सगळं अंधळ्या बहिऱ्याच्या गोष्टीसारखं झालं आहे. लाचखोर ब्राह्मण कारकून मधल्यामधे दोघांची फसवणूक करत आहेत. कृपा करून तुमच्यासमोर जे लोक येतात, त्यांच्यावरून तुम्ही इथल्या प्रजेची कल्पना करू नका. हिंदुस्थानच्या महाराणीला सांगा की त्यांची वीस कोटी गरीब जनता दारिद्र्यामध्ये पिचत असून तिला शिक्षणाची गरज आहे. आणि राणीसाहेबांना हेही सांगा, की ही मागणी करणारा एक खेडवळ माणूस मला पुण्याला झालेल्या एका मेजवानीत भेटला होता. युवर हायनेस, कृपया आमचा एवढा निरोप त्यांना द्या. एवढंच सांगायला मी इथे आलो आहे...”

तात्यांचं भाषण संपलं.

राजपुत्र महोदय डोळे विस्फारून तात्यांकडं पाहत होते. त्यांच्या हिंदुस्थानच्या दौऱ्यात एवढं रोखठोक बोलणारा माणूस त्यांनी पाहिला नव्हता. हिंदुस्थानच्या मुक्तीची स्वप्नं पाहणाऱ्या आणि त्यासाठी असंतोष माजवणाऱ्या देशभक्तांविषयी त्यांनी ऐकलं होतं. परंतु सामान्य जनतेच्या कल्याणासाठी तळमळणारा एवढा एकच माणूस त्यांना आढळला होता. हिंदुस्थानातली गुंतागुंतीची सामाजिक परिस्थिती पाहून तेही खरोखर गोंधळून गेले होते.



असा जगावेगळा समाज त्यांनी कुठंच पाहिला नव्हता.

आपल्या भाषणात त्यांनी तात्यांचे मनःपूर्वक आभार मानले. हिंदुस्थानच्या महाराणीपर्यंत त्यांचा निरोप पोचवला जाईल, असं आश्वासन दिलं.

समारंभ संपला. वाढप्यांची लगबग सुरू झाली. अगरबत्त्यांच्या सुवासात ताज्या अन्नाचा गोड घमघमाट मिसळला आणि वर्दी मिळेपर्यंत बांधल्या गेलेल्या जिभा थोड्या सैल झाल्या. हरी रावजींनी जोतीराव फुल्यांना बोलायची संधी दिली, याबद्दल नाराजी व्यक्त झाली. जोतीराव फुले काय बोलणार आहेत हे त्यांना जसं आधीच माहीत होतं. तात्यांच्या भाषणानं त्यांच्या नाकाला मिरच्या झोंबाव्या, यात काहीच नवल नव्हतं.

परंतु काही लोक आनंदात होते. आपल्या श्रीमंतीचं प्रदर्शन करणाऱ्यांना आणि सुधारणेच्या गोष्टी करणाऱ्या काही उपटसूळ लोकांना चरचरीत उतारा मिळाला होता.

राजपुत्र महोदयांनी तात्यांना आपल्या शेजारी बसायची विनंती केली. त्यांनी आपल्या भाषणात वापरलेल्या ‘बळीस्थान’ या शब्दाचा अर्थ त्यांना स्पष्ट झालेला नव्हता.

तात्यांनी आपली भूमिका त्यांना पुन्हा समजावून सांगितली.

चिपळूणकरांच्या वाड्यातली ती मेजवानी आणि तात्यांचं ते भाषण हा विषय फुलेवाड्याला आणि पुण्याला बरेच दिवस पुरला. □

**वाचनीय कादंबऱ्या**

| | | |
|---|---|---|
| स्वामी | रणजित देसाई | १०० रु. |
| प्रतिक्षा | रणजित देसाई | ५० रु. |
| बारी | रणजित देसाई | १०० रु. |
| लक्ष्यवेध | रणजित देसाई | ८० रु. |
| झोंबी | आनंद यादव | २०० रु. |
| काचवेल | आनंद यादव | २०० रु. |
| आंधळी | अनु. शान्ता शेळके | १०० रु. |
| आंधळ्याचे डोळे | अनु. शान्ता शेळके | १५० रु. |
| चौघीजणी | अनु. शान्ता शेळके | ३०० रु. |
| परिशोध | अनु. उमा कुलकर्णी | १०० रु. |
| वंशवृक्ष | अनु. उमा कुलकर्णी | १७० रु. |
| डोंगराएवढा | अनु. उमा कुलकर्णी | ९० रु. |
| तंतू | अनु. उमा कुलकर्णी | ४५० रु. |

सवलत १५%
सभासदांना २५%

मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६ सदाशिव पेठ, पुणे ३०

सत्यशोधक समाजाची स्थापना

परिसीमा झाली आहे. मी फक्त दोन मिनिटं थांबतो. सांग, तुझ्या आयुष्यात दुसरा कोणी पुरुष आलाय् का?''

मंदिराचे डोळे भरून आले. म्हणाली, ''नाही, नाही, नाही! माझ्या आयुष्यात तूच एक पुरुष होतास. आज संध्याकाळपर्यंत.''

''मला तुझं बोलणंच कळत नाहीये, मणी.''

''पुरुष मानायलाच तयार नसतात. अनेकांच्या जीवनात पतिपत्नींमध्ये कर्तव्य म्हणून एक प्रकारचा संबंध असतोच. तू पब्लिक फिगर झाल्यानंतर, तुझं कर्तव्य होतं, तू हॅपीली मॅरिड माणूस, तू डिसेंट फॅमिली लाइफ जगतोस हे बाहेरच्या लोकांना जाणवून द्यायला हवं होतं. तू सदैव कामात गुंतलेला, स्वतःच्या मुलांकडे लक्ष द्यायला तुला फुरसद नाही. ती जबाबदारी घेणार तुझी पत्नी. तू कुठेही गेलास तरी जाणीव असू द्यायला हवी होती की एक व्यक्ती तुझा संसार सांभाळतेय्.''

''मग? हे सगळं तुझंही कर्तव्य नाही का? मुलंबाळं, संसार हे सगळं तुझं पण नाही वाटतं? माझी प्रसिद्धी किंवा माझं यश ह्यात तुला आनंद वाटत नाही?हे तर मला आजपर्यंत कळलंच नाही.''

''मला पण अगोदर कळलं नव्हतं. आजपर्यंत वाटायचं सगळं काही आमचं दोघांचं आहे. सगळी जबाबदारी संयुक्त. आपला सगळा आनंद, दुःख, अपयश दोघं वाटून घेऊ शकतो. तू ब्रिलियंट आहेस, तुझं बाहेरचं जीवन जास्त प्रमाणात असणं स्वाभाविकच होतं. मला बघायला हवा संसार, ह्यालाच म्हणायचं दोघांनी वाटून घेणं, तुझ्या यशाने मला होणारा आनंद होणार नाही का? तू तर माझा पती आहेस. पण अकस्मात एकदा माझ्या लक्षात आलं, माझं असं आता काहीच शिल्लक नाही. मी कायमची एकटी पडलेय्. माझा आता संसारपण नाही. मी एक अनावश्यक स्त्री! जसं मला नुकतंच कळलं, ब्रिटिश पार्लमेंटरी डेलिगेशन घेऊन तू क्युबाला जाणार आहेस. मला तू हे सांगितलं देखील नाहीस.... खरोखर तुझ्या जीवनात आता मला स्थान उरलेलं नाही... त्यामुळं अस्वस्थ आहे मी!... मला खरोखर आता मोकळं व्हायचंय... मला डायव्होर्स दे.''

□


**तुम्ही आणि तुमचं वैवाहिक जीवन**

अनु. डॉ. प्रमोद संभूस

तुमचं वैवाहिक जीवन शाश्वत सुखांनी परिपूर्ण होण्यासाठी सतत हाताशी ठेवा!

किंमत ७० रु. सवलतीत ६० रु.

सभासदांना ५३ रु. पोस्टेज १५ रु.




# नक्षत्राच्या प्रकाशात

**विजया जहागिरदार**

*विजया जहागिरदार यांनी आपल्याला भेटलेल्या सर्वसामान्य पण समस्याग्रस्त स्त्रियांची काही व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. त्या प्रत्येक स्त्रीच्या समस्या वेगळ्या आहेत. प्रत्येक स्त्रीच्या जीवनात उठलेली वादळे सारे काही उद्ध्वस्त करून आयुष्याची मोडतोड करणारी आहेत आणि तरीही त्या वादळांशी टक्कर देत कधी आत्मविश्वासाने, कधी असहाय्यपणे आयुष्य कंठत राहतात. अनेक स्त्रियांना समाजाने, कायद्याने, नातलगांनी, मित्र म्हणवणाऱ्यांनी गोत्यात आणले आहे. आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होण्यावाचून आपले दुःख दूर करण्याचा अन्य मार्ग नाही याचीही जाणीव त्यांना आहे. परंतु ते स्वावलंबन संपादन करण्याआधी त्यांना प्रचंड घुसमट सहन करून, मोठ्या यातनापर्वातून जावे लागते. या स्त्रियांची एकूण अवस्था पाहून विजयाताई अस्वस्थ होतात. अनेकींची दुःखे त्यांच्या मनावर ओरखडे उमटवतात. ''मंगीच्या रूपाने स्त्रीदेहाचे वेदनामय परिणाम आणि पुरुषांची अटळ वासना यांचं चित्र मला दिसलं. इलाज नसणारा हा रोग बघून मी फार उदास आहे. मंगी मला भेटायला नको होती.'' यासारखी मनाला छळणारी जाणीवही त्या व्यक्त करतात.*

*या खरे म्हणजे केस स्टडीज आहेत. एकेका स्त्रीची हकीकत सांगून विजयाबाई काही निष्कर्षही काढतात. काही मार्गदर्शक सूत्रेही वाचकांसमोर ठेवतात.*

*''काळाची पावले ओळखून ज्येष्ठांनी आपल्यात इष्ट तो बदल करायला हवा. अलिप्तता हा गुण अंगी बाणवायला हवा.''*

*''बेफाम बेधुंद, बेबंद वागणं म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्य नव्हे हे मृणालला कळायला हवं. लग्नसंस्था ही स्त्रीच्या फायद्याची आहे, सुखाची आहे... हक्कापेक्षा कर्तव्याच्या मार्गाने गेले तर सर्वच नाती मनोहर होतात.''*

*स्वाभिमानाने जगण्यासाठी, अस्मिता जोपासण्यासाठी, मनोविकासासाठी, उन्नत जीवन जगण्यासाठी आपल्या स्वातंत्र्याचा उपयोग स्त्रियांनी करायला हवा... हे स्वातंत्र्य एखाद्या शस्त्रासारखे वापरून परिवारातील वा परिसरातील*

*लोकांचा छळ करण्याची प्रवृत्ती सध्या बोकाळत आहे. त्याचा निषेध करायला हवा. आपल्याला सापडलेल्या नव्या वाटांचं स्वागत, परिचय आणि विरुपाचा निषेध करणे– असा प्रयत्न 'नक्षत्रांच्या प्रकाशात' या सदरात करण्याचे उद्दिष्ट विजयाबाईंनी समोर ठेवले होते.*

*रत्ना, भानुप्रिया, राधा, देवकी, साधना, उर्मिला, डॉ. हेमरू, माहेश्वरी, अनारकली, सविता, अंजली, फुल्वा, शिल्पा, शांताबाई, पांढऱ्या पायाची म्हणून शिक्का बसलेली रेखा, राजेश्वरी, ललिता, वेणू अशा प्रत्येक स्त्रीच्या जीवनातून विजयाबाई सर्व स्त्रियांना व समाजाला पोषक-संवर्धक असे बहुमोल संदेश देण्याची ईर्षा बाळगतात.*

*येथे 'मैत्रीण' हा उतारा देत आहो. घरात काम करणारी मोलकरीण जना हिला आपली मैत्रीण म्हणून वागवण्याची भावना सोनलमध्ये कशी विकसित होते, हे वाचताना प्रत्येक गृहिणीला एक नवे जीवनसूत्र गवसल्याचा आनंद वाटेल.*

**ऑगस्ट ९९ स्पर्धा**

## शब्दकोडे निकाल

या कोड्यामध्ये बारा नावे ओळखा याऐवजी चौदा नावे ओळखा असे छापले गेले होते. परंतु सतर्क स्पर्धकांच्या ते लगेचच लक्षात आले व त्यांनी त्याप्रमाणे निर्दशनास आणून दिले. यावरून स्पर्धकांचा उत्साहर्वधक प्रतिसाद जाणवला.

**निकाल-** शिवाजी सावंत, आ. बा. पाटील, निरंजन घाटे, आनंद यादव, मंगला निगुडकर, बा. ग. केसकर, रा. रं. बोराडे, निर्मलकुमार फडकुले, आशा कर्दळे, उमा कुलकर्णी, बाळ फोंडके, माधव मोर्डेकर

**यशस्वी स्पर्धक**

**१) अनघा पेंडसे–** श्रीलक्ष्मी निवास, घंटाळीदेवी रस्ता, ठाणे ४००६०२
**२) वैशाली कंठे–** जकात नाका क्र. २ चे मागे, दर्यापूर जि. अमरावती, ४४४८०३
**३) सुनंदा मंजुरे–** तुलसी अपार्टमेंटस्, ५२, आनंद रोड, मालाड (प.) मुंबई - ६४

अभिनंदन! आपण आपल्या पसंतीची १०० रु.ची पुस्तके कळवावीत.
**आमचा पत्ता :** मेहता मराठी ग्रंथजगत १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०.



# मैत्रीण

सोनल संतापून गेली होती... घरात भांड्यांचा ढिगारा... त्यातून निघालेली मुंग्यांची रांग... खरकट्याचा वास... मोरीत पडलेला कपड्यांचा ढीग.. आता ही जना येणार केव्हा अन हे सारं आवरणार केव्हा? 'चार दमड्यांची मोलकरीण... पण मेलीची मिजासच फार... कधी वेळेवर यायला नको.' मनातल्या मनात बडबड करत होती सोनल.

तेवढ्यात जना येताना दिसली अन् तिचा पारा वर चढला. ओरडून म्हणाली, "पायघड्या आणू का तुझ्या पायाखाली टाकायला? ही काय वेळ झाली यायची? अन् ही पाटीएवढं डोकं घेऊन यायचं... वेणी नै घालता येत? किती स्वच्छता शिकवायची? सांगून दाताच्या कण्या झाल्या! आली तशी चालती हो!"

"बाई... येणी वाळूनच आले की... पन हे क्येसच लै वाकडे हायेत बगा! त्यांचे डोंबलावर बाटकाभर त्येल वतावे लागतं... पान्यानं बसत्यात व्हय ते?"

"जने... तुझी बडबड वाढलीय हं! तोंड सुटलंय तुझं... तुला काय वाटतं? तुझ्याखेरीज बाई मिळायची नाही? छप्पन मिळतील. स्वच्छ रहायला नको. वर गमजा करते!"

"काय गमजा केल्यात व बै मी? काय बोल्ले? बशी बी फुटली तरी पैसं कापत्यात तुमी... काय शियंपाक देता ते मुकाट नेते... कधी बोल्ले? सास म्हैन्यापासून जुनं परकर साडी मागत्येय तुमाजोडं... न्हाई दिली तुमी! बोल्ले बाई? पोराच्या औषधासाठी दोनशे रुपये मागितले, पन न्हाई दिले तुमी... बोल्ले काय? आन मी काय सोच्छ ऱ्हात न्हाई व्हय? रोज अंग धुवूनशान कामाला येती! सोच्छ काम करते..."

"बरं बरं कळली तुझी अक्कल? आटप लौकर... मला वन्संकडे रहायला जायचंय! उद्या नंदाची मंगळागौर आहे ना!"

"नंदा दोन दिवसांपूर्वीच आलीया! तुमच्या नंदेची पोरगी नं? मी बी व्हतेच की लग्नाला... मला बी साडी न्येसवली की तुमच्या नंदेनं! लै ग्वाड हायेत त्या... अन पोरगी... ती नंदी बी!"

सोनल फणकाऱ्यानेच उठली. जायची तयारी करू लागली. तोच जना म्हणाली, "बाई, साबणचूर सरलाय... फिनाईल बी सरलंय... चार दिवसापासून सांगतिया... कसं सोच्छ करायचं समंद?.. वर मलाच बोल लागतो..." यावर सोनल म्हणाली, "बडबड

**“बरं बाई मदतनीस... पण ही इतकी कशी नेटकी वागते? कसं शिकवलंस?”**

**“मामी, रागावू नकोस. पण आपल्या मदतनीसाला प्रशिक्षण देण्यासाठी आर्थिक झीज सोसावी लागते. त्यांच्यासाठी पण काही करावं लागतं. हिला सात वर्षाचा मुलगा आहे. नवरा मिलमध्ये हजार रुपये कमावतो. मी हिला जेवूनखाऊन दोनशे देते. ती माझी कामे करते, मी तिची! तिच्या मुलाला माझ्या इतर ट्यूशन्सबरोबर शिकवते. तिची पोस्टाची, बँकेची कामे माझ्याबरोबर करून टाकते. तिला बचतखाती मी उघडायला लावलीत.”**

बंद कर अन् कामाला लाग... पुरे झाली चरचर!”

सोनल नणंदेकडे पोचली. बेल दाबताच एका तरुण, चुटचुटीत मुलीने दार उघडलं. तिच्या हातातली पिशवी घेतली. “मामी....बसा....पाणी आणते हं!”

सोनल तिच्याकडे पाहतच राहिली. केसांचा अंबाडा, त्यावर कापडी गजरा, साडी नेटकी पिन लावून, चापून नेसलेली...लांब पदर...पण खोचून घेतलेला. काळासावळा गोड चेहरा...हसरा! सोनलला वाटलं, नंदाच्या सासरची नातेवाईक असावी. त्या मुलीने पाणी आणून ठेवलं. म्हणाली, “मामी, चहा आणू की कॉफी?” तिचा आवाज किणकिणणाऱ्या बिल्वरांप्रमाणे मंजूळ होता. सोनल म्हणाली, “तुला कसं ग कळलं मी नंदाची सासू म्हणून? अन् तू नंदाच्या सासरची का?”

“माझं नाव मंजुळा...मंजूताई अन् आई बाहेर जाताना तुम्ही येणार असं सांगून गेल्या. मी नंदाताईंकडे असते....आलेच हं चहा घेऊन!”

सोनलला आश्चर्य वाटलं. किती यथार्थ नाव! मंजुळा! तेवढ्यात मंजुळा आलीच. तिच्या कमरेला आता फुलाफुलांचा सुंदर एप्रन होता. खिशात नॅपकीन होता. इतकंच. नाही तर केसांवरही रूमाल बांधून तिने अंबाड्यावर गुंडाळला होता.

पुढे चहा ठेवून ती बाजूच्या सोफ्यावर बसली. सोनलच्या मनात आलं. ‘लाडावलेलीच दिसतेय... चक्क सोफ्यावर बसते म्हणजे काय?’ पण बोलणार काय? चहा होतोय तोवर नंदा आईबरोबर आलीच! म्हणाली, “मंजुळा, अग मामीला करंजी चकली दे!”

मंजुळा आत गेली.

“आयत्या आणल्या की काय?” सोनलने कुसुमबाईंना-नणंदेला विचारलं,

“घरीच केलं हो! ही नंदाकडची मंजुळा आलीय ना! फार गुण आहेत हो तिच्या अंगात. आपल्या नात्याचीच वाटेल बघ! राहणी कशी नीटनेटकी... आता दिसायला काय सुंदर आहे का? पण ती सुंदर वाटते तिच्या गुणांनी... वागण्याने!” नंदाला विचारायला



हवं की कुठे बाई मिळाली तुला ही मोलकरीण? माझ्या त्या जनाने तर अगदी डोकं फिरवलंय!....

तोवर मंजुळा ट्रेमध्ये ताटलीत करंज्या, चकल्या घेऊन आली. सोबत एक पेपरनॅपकीन! सोनलला नंदाच्या या सुखाचा अगदी हेवा वाटला. मंगळागौरीच्या तयारीत बोलायला फुरसत नव्हती. पण मंजुळाचे हातपाय भिंगरीसारखे फिरत होते.

पूजेची तयारी, जेवणाची तयारी, आवरणे, वाढणे, विडे लावणे, पुन्हा संध्याकाळचा फराळ... एक ना दोन! केस बांधून एप्रन घालून मंजुळा साळीच्या झुडुपासारखी लवत होती. फराळाचं सगळं आवरून झाल्यावर झुळझुळीत पंजाबी ड्रेस घालून पुन्हा रात्रीच्या जागरणात सामील! नंदा तिच्याशी खुर्ची का मिर्ची, सासूबाई-सुनबाई! अगदी, ‘अग माझ्या सवतीपर्यंत सगळे खेळ बरोबरीने खेळली. सोनल मनातल्या मनात या जवळिकीला नाकं मुरडत होती.

सगळं कार्य आटोपल्यावर सोनल नंदाला म्हणाली, “मंजुळेसारखी मोलकरीण कुठे बाई मिळवलीस? इतकं वळण कसं हिला? इतकी स्वच्छ राहणी? आम्ही गाडाभर बोललो तरी आमच्या मोलकरणी ऐकत नाहीत. फार मातून जातात या मोलकरणी.”

यावर नंदा म्हणाली, “मामी.... मोलकरीण नको ग म्हणूस... मला बिलकूल आवडत नाही तो शब्द! मदतनीस म्हण! आपण सगळेच कामाचं मोल घेतो ना? मग त्यांनाच का ‘मोलकरीण’ म्हणायचं?”

“बरं बाई मदतनीस... पण ही इतकी कशी नेटकी वागते? कसं शिकवलंस?”

“मामी, रागावू नकोस. पण आपल्या मदतनीसाला प्रशिक्षण देण्यासाठी आर्थिक झीज सोसावी लागते. त्यांच्यासाठी पण काही करावं लागतं. हिला सात वर्षाचा मुलगा आहे. नवरा मिलमध्ये हजार रुपये कमावतो. मी हिला जेवूनखाऊन दोनशे देते. ती माझी कामे करते, मी तिची! तिच्या मुलाला माझ्या इतर ट्यूशन्सबरोबर शिकवते. तिची पोस्टाची, बँकेची कामे माझ्याबरोबर करून टाकते. तिला बचतखाती मी उघडायला लावलीत.”


“बाई ग...इतका पगार देतेस?”

“पगाराव्यतिरिक्त मी तिला दर महिन्याला रिनची एक वडी, लक्सच्या दोन वड्या, शिकेकाई अन तेलाची बाटली देते. एप्रन शिवून घेतलेत. रुमाल अन् डोक्याची बांधणी दोन दोन आहेत. मध्यंतरी नेलकटर दिला. डेटॉल-लाईफबॉयचा वापर शिकवला! साड्या तर माझ्याच कितीतरी देते. पुण्यात सुखवस्तू बायकासुद्धा साड्या विकतात. त्यांची कींव येते मला मामी! या मदतनीसाशी तुम्ही प्रेमाचं नातं जोडा. मंजुळेशी मी बरोबरीने खेळले हे तुला अन् आईलाही रुचले नाही. कारण तुम्ही त्यांच्याकडे ‘मोलकरीण’ या भावनेने बघता.’ ती आपल्यासारखीच एक स्त्री आहे. आपली मदतनीस आहे! आज माझ्या घरचं

**शाळा/कॉलेज मधील विद्यार्थ्यांना**
**शिक्षण संपवून बाहेरच्या**
**व्यवहारी जगात प्रवेश करताना**
**स्वयंरोजगाराच्या वाटा दाखवणारी पुस्तके**
**प्रत्येक शाळा / कॉलेज मधील**
**ग्रंथालयासाठी अत्यावश्यक पुस्तके**




**मूल्य : रु. ५००/-**
**सवलत मूल्य : रु. ४००/-**




**मूल्य : रु. ५०/-**
**सवलत मूल्य : रु. ४०/-**

प्रमोद प्रकाशन
**१०१९, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०.**
**फोन : ४४७८९९६**

# इट इज ऑलवेज पॉसिबल

**किरण बेदी**

*पोलिस खात्यात एक महिलेचा उच्चपदी प्रवेश ही वीस वर्षांपूर्वी एक अपवादात्मक बाब होती. किरण बेदी यांनी भारतीय पोलिस सेवेत सामील होण्याचे ठरवले. स्पर्धा परीक्षेत उत्तम यश मिळवले; आणि प्रशिक्षणही पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी आपल्या कर्तबगारीने, योग्यतेने आणि उपक्रमशीलतेने आपल्या पदाचा विधायक दृष्टीने वापर करून जनहिताच्या अनेक गोष्टी निष्ठेने पार पाडल्या. दिल्लीतल्या बेशिस्त वाहतुकीला वळण लावले. त्यासाठी चुकीच्या जागी उभी केलेली वाहने क्रेन लावून ओढून नेण्याचे तंत्र अवलंबिले. त्यामुळे तिला क्रेन बेदी असेही नाव पडले. खुद्द इंदिरा गांधींची कारही त्यांनी उचलायला कमी केले नाही. ...'आय डेअर' हे त्यांच्यावरील पुस्तक मराठीतही लोकप्रिय झाले आहे. इट इज ऑलवेज पॉसिबल हे त्यांचे नवे आत्मकथनात्मक पुस्तक. त्यात तिहार कारागृहाचा जो कायापालट घडवून आणला त्याची कहाणी त्यांनी स्वतःच सांगितली आहे. कैद्यांची मानसिकता बदलण्यासाठी काय करावे असा विचार त्यांना पडला. त्यातून विपश्यना पद्धतीची माहिती व महती त्यांच्यापर्यंत पोचली. तिहार कारागृहात एक हजार व्यक्तींचे प्रचंड विपश्यना शिबिर त्यांनी घेतले. त्यामुळे अनेक कैद्यांमध्ये खरोखरच मोठे परिवर्तन घडून आले. त्याबद्दलचे हे प्रकरण येथे देत आहोत.*

**''जी स्त्री स्वतः निर्णय घेते आणि त्यांच्या परिणामांना तोंड द्यायला सिद्ध असते तीच खरी समर्थ स्त्री. त्यातून तिची परिपक्वता आणि जबाबदारीची जाणीव दिसते.''**

**किरण बेदी**





# तिहार कारागृहाचे आश्रमात रूपांतर करणारे विपश्यना शिबिर

एक दिवस मी तुरुंगाच्या फेरीला निघाले होते. माझ्यासोबत राजेंद्रकुमार नामक तरुण, सडपातळ असिस्टंट सुपरिंटेंडंट होता. ''गुन्हेगारांनी आपण होऊन गुन्हेगारी सोडावी म्हणून काही जादूचा मंत्र वगैरे असता, तर किती बरं झालं असतं!'' मी म्हणाले. त्यावर त्याने मला असा एक उपाय आहे, व त्याचं नाव 'विपश्यना' असं सांगितलं. ते ऐकताच त्याविषयी अधिक माहिती मिळवण्याची उत्सुकता मला वाटू लागली. ''मॅडम, विपश्यनेचे लाभ समजावून घ्यायचे असतील, तर तुम्ही माझ्या कुटुंबियांना भेटा,'' तो म्हणाला. मी तात्काळ त्याच्या पत्नीची व इतर कुटुंबियांची गाठ घेतली. तेव्हा मला असं समजलं, की, राजिंदर पूर्वी स्वभावाने फार तापट होता. परंतु विपश्यना शिबिरात सहभागी झाल्यानंतर तो खूप शांत झाला. आपल्या भावनांवर ताबा मिळवण्यात त्याला बऱ्याच अंशी यश आलं.

राजिंदरकडून कळलं की तुरुंगात, कैद्यांसाठी विपश्यना शिबिर भरवायचं असेल तर जयपूरच्या विपश्यना केंद्राचे प्रमुख श्री. रामसिंग यांच्याशी संपर्क साधावा. रामसिंग हे पूर्वी राजस्थानच्या स्टेट गर्व्हनमेंटचे होम सेक्रेटरी होते. जयपूर व बडोदा येथील तुरुंगामधून विपश्यना कार्यक्रम सुरू करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता.

त्यात एक योगायोगाची घटना घडली. गृहखात्याचे अलिखित सचिव श्री. एम.एल. मेहता यांनी तिहारला भेट दिली. तिहारमध्ये कैद्यांसाठी विपश्यना शिबिराचे आयोजन करावे असे सुचविले. या बाबतीत रामसिंग यांच्याशी बोलू असेही आश्वासन दिले. मी अक्षरशः थक्क झाले. ही टेलिपथीच नव्हे, तर काय? आपण देवाकडे काही मागायचे ठरवावे आणि त्यापूर्वी देवाने हाकेला धावून यावे, अशापैकीच हा प्रकार होता.

मी रामसिंग यांना पत्र लिहिले. त्यांचेही उत्तर आले.

त्यांनी लिहिलं –विपश्यना ही एक पुरातन भारतीय ध्यानपद्धती आहे. तिचं मुख्य उद्दिष्ट चित्तशुद्धी. माणसाचं पूर्ण व्यक्तिमत्त्व बदलून टाकण्याची ताकद विपश्यना पद्धतीत आहे. विपश्यना शिबिर हे दहा दिवसांचे असते. त्याचे नियम अत्यंत कडक होते. दहा दिवस मौनव्रत पाळण्याची शपथ घ्यावी लागते. (याला नोबल सायलेन्स असे म्हणतात) आपापसात किंवा बाहेरच्या व्यक्तीशी संवाद करण्याची परवानगी नसते. या शिबिराचा

दिवस भल्या पहाटे चार वाजताच सुरू होई. ठराविक नेमलेल्या वेळी ध्यानधारणेस बसून आठ तास ध्यान करावे लागे.

पहिले तीन दिवस ध्यानपद्धतीमधून शिबिरार्थींना श्वासोच्छ्‌वास प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यास शिकवले जाते. या शिस्तबद्ध आचरणाचे पालन करताना अर्थातच बराच त्रास सहन करावा लागे. उरलेल्या सात दिवसांमध्ये आपल्याला ज्ञानेंद्रियांमार्फत होणाऱ्या संवेदनांची व भावभावनांची जाणीव होणे व त्यावर विजय कसा मिळवावा याचे तंत्र आत्मसात करणे त्याचा सराव करून घेतला जातो. अशा प्रकारे शरीर व मन यांच्यावर नियंत्रण मिळवून त्याद्वारे चित्तशुद्धी आपोआपच घडते. भीती, मानसिक ताण व यातना यांवरही पूर्ण विजय मिळवणे शक्य होते.

अशा प्रकारे माणसाचे मन विकसित होऊन त्यातून त्याचे पूर्ण व्यक्तिमत्त्वच बदलून जाण्यास मदत होई. यात भाग घेणाऱ्या लोकांची संख्या सुमारे ६० ते ९० असे. त्यांनी सर्वांनी या कार्यक्रमात स्वखुषीने सहभागी व्हावे अशी अपेक्षा होती. विशेषत: दीर्घ मुदतीची शिक्षा भोगणाऱ्यांनी. कारण त्यांना यापासून बराच लाभ होणार होता. श्री. रामसिंग यांचं तर असं मत पडलं की सुरुवातीला काही कर्मचाऱ्यांसही यात सहभागी करून घ्यावं. यासाठी आम्ही सुरवातीपासून अत्यंत शास्त्रशुद्ध आखणी करायची असं ठरवलं. कारण अगदीच एखादं अपरिहार्य कारण पुढे आलं असतं तर तेवढाच अपवाद वगळता एकूण कार्यक्रम सुरळीत पार पडण्यास मदत झाली असती. ज्या व्यक्तींच्या मनात आयुष्याविषयी एक नैराश्याची भावना निर्माण झाली आहे, ज्यांचा भविष्यकाळ पूर्णपणे अंध:कारमय आहे अशा व्यक्तींच्या आयुष्यात आशेचा किमान एक किरण आपल्याला निर्माण करता येईल असंही त्यांनी सांगितलं.

आणि आम्हाला हेच तर हवं होतं.

मी रामसिंग यांना जयपूरला फोन केला. त्यांच्याशी दिल्ली येथे एक मीटिंग ठरवली. ती मीटिंग झाल्यावर ते तिहारला आले. येथील परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून काही आवश्यक गोष्टींची कल्पना दिली. यांतील पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे या शिबिरात भाग घेणाऱ्या व्यक्तींची राहण्याची वेगळी व्यवस्था करणे. यासाठी दोन-तीन बराकी वेगळ्या काढाव्या लागणार होत्या. प्रत्यक्ष शिबिरासाठी एका विस्तीर्ण सभागृहाची गरज होती. प्रशिक्षकांना राहण्यासाठी स्वतंत्र खोली व स्नानगृह याची व्यवस्था करावी लागणार होती. यात सहभागी होणाऱ्या व्यक्तींचा आहार ठराविक असल्याकारणाने स्वतंत्र स्वयंपाकघराची सोय करावी लागणार होती. सकाळी ६.३० वाजता नाश्ता, दिवसभरात ११ वाजता एकदाच शाकाहारी जेवण आणि सायंकाळी पाच वाजता दूध व फळे.

दररोज सायंकाळी व्हिडिओवर एक प्रवचन दाखववायचे होते. हे प्रवचन केवळ सहभागी व्यक्तींपुरतेच मर्यादित नव्हते, तर कर्मचारी, अधिकारी व पहारेकरी यांनाही



ऐकवण्यात येणार होतं.

पहिले विपश्यना शिबिर २२ नोव्हेंबर १९९३ रोजी सुरू करण्याचे ठरवले. दीर्घ मुदतीच्या कैद्यांना तुरुंग क्रमांक दोनमध्ये ठेवले जाई. त्यांच्यासाठी तेथेच घ्यायचे ठरले. रामसिंग तसेच दिल्ली आय.आय.टी. चे प्रोफेसर धर हे दोघेही विपश्यना तंत्रात पारंगत होते. प्रशिक्षक म्हणून दोघांनाही तुरुंगाच्या आतच राहावे लागणार होते, जन्मठेपेची शिक्षा झालेल्या त्या कैद्यांच्या सहवासात, म्हणजे मग त्या कैद्यांशी मानसिक जवळीक होऊन हे शिबिर भरवण्यामागचा उद्देश समजावून देणे शक्य होणार होते.

ही उद्दिष्टे कितीही प्रामाणिक असली तरी त्या निर्ढावलेल्या गुन्हेगारांनी सुरुवातीला त्यांच्याकडे संशयी दृष्टिकोणातूनच पाहिलं. संवेदनाशीलता, दयाळूपणा, माया इत्यादी भावनांची त्या गुन्हेगारांना मुळातच ओळख नव्हती. त्यांना दोन-तीन दिवस अत्यंत भयप्रद अनुभवांना सामोरे जावे लागले. त्यांना ते कैदी धमक्या देऊन घाबरवण्याचा प्रयत्न करत. आता या प्रशिक्षकांचा तुरुंगात प्रवेश झाल्यामुळे आपली पहारेकऱ्यांमधील व इतर कैद्यांमधील किंमत कमी होऊ लागली आहे, अशी त्यांची भावना होती.

विपश्यना शिबिराचे कडक नियम होते. हे कैदी त्या नियमांचे जाणून-बुजून उल्लंघन करू पाहत. त्यांनी धूम्रपान सुरू केले. शांततेचा भंग करण्यास सुरुवात केली. या धमक्यांना व शिवीगाळीला घाबरून प्रोफेसर धर व रामसिंग हे तेथून पळ काढतील अशी त्यांची कल्पना होती. पण तसे काही घडले नाही. या अशा आक्रमक वृत्तीचा सामना कोणाच्याही मदतीशिवाय स्वत:च करायचा असं त्या दोघांनी ठाम ठरवलं होतं. कशाकडेही लक्ष न देता त्यांनी आपलं काम चालू ठेवले. त्याला फळ आलं. अवघ्या ५ दिवसांत त्या सर्वच्या सर्व गुन्हेगारांना आपली चूक कळून आली. त्यांनी त्या दोघा शिक्षकांची क्षमा मागितली. हा सुद्धा एक चमत्कारच म्हणावा लागेल.

हे शिबिर दहा दिवसांचे होते. या काळात संपूर्ण मौन पाळायचे असा नियम होता. दहा दिवसांच्या अखेरीस या सर्व 'विपस्वी'नी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी मोकळेपणाने जी गुपिते उघड केली ती थक्क करणारी होती. ती ऐकत असताना आनंदाचा पाझर फुटला व नव्या चैतन्याने आम्ही सळसळून उठलो.

एकेकाळच्या या निर्ढावलेल्या गुन्हेगारांच्या व्यक्तिमत्त्वात आश्चर्यकारक बदल झाला होता. जणू काही पुनर्जन्मच झाला होता. शिबिराच्या समारोप प्रसंगी श्री. एन.एल. मेहता उपस्थित होते. त्यांनी विपस्वींची ही मनोगते उत्साहाने ऐकली.

पहिला शिबिरार्थी विचितर सिंग म्हणाला : ''माझ्या आईवडिलांनी व भावाने माझ्याविरुद्ध बनावट पुरावा तयार करून मला गुन्ह्यात गोवले. त्यामुळे मी गेली दहा वर्षे तुरुंगात आहे. इतके दिवस त्या सर्वांविषयी माझ्या मनात सूडाची आग धुमसत होती. परंतु विपश्यनेचा कोर्स पूर्ण केल्यावर मला खूपच हलकं, तणावमुक्त वाटत आहे. मला आज इतका आनंद

झाला आहे. की आईवडिलांचे आणि भावाचे आभार मानावेसे वाटते आहे. त्यांच्यामुळे मी तुरुंगात आलो आणि मला हा विपश्यना कोर्स करण्याची संधी प्राप्त झाली.'' अशी शिबिरे पोलीस, ज्यूडीशिअरी, व इतरही सरकारी ऑफिसांमध्ये आयोजित करण्यात यावीत. त्यामुळे लक्षावधी लोकांच्या भविष्यकाळास योग्य ती दिशा मिळेल अधिकारी वर्गाच्या अंध कारवायांमुळे शेकडो निरपराध व्यक्तींना तुरुंगात जावे लागते. असेही त्याने सुचवले.

त्यानंतर संतोक सिंग बोलायला उठला. खुनाच्या आरोपावरून तो जन्मठेपेची शिक्षा भोगत होता. विपश्यना शिबिरामुळे आपल्याला मन:शांती व समाधान प्राप्त झाले आहे, असे त्याने म्हटले. सुटका झाली की आपण जयपूर येथे आपल्या बायकामुलांसह परत एकदा विपश्यन शिबिरात भाग घेऊ असेही त्याने सांगितले. तिहार आश्रमात विपश्यनेच्या ध्यानधारणा पद्धतीचा अवलंब आपण करणार असल्याचे त्याने सांगितले.

तिसरा कैदी होता सतबीर सिंग. हा पोलीस कॉन्स्टेबल होता. बलात्काराच्या आरोपावरून त्याला दहा वर्षांची शिक्षा झाली होती. आपला काहीही दोष नसताना आपल्याला ही शिक्षा ठोठावण्यात आली असे त्याने सांगितले. परंतु त्याचबरोबर १९८४ साली दिल्ली येथे झालेल्या दंगलीत आपल्या हातून इतर गुन्हे घडल्याचे त्याने कबूल केले. कदाचित त्या पातकांची सजा तिहारमध्ये भोगतोय असे त्याने म्हटले. तिहारला येण्यापूर्वी मला वाटत होते की लाठी ही सर्वशक्तिमान असते. परंतु हा माझा गैरसमज दूर झाला. येथील अधिकारी कैद्यांच्या सुधारणेसाठी व पुनर्वसनासाठी जे परिश्रम घेत आहेत त्यामुळे माझ्यात परिवर्तन झाले आहे. नकारात्मक गोष्टीचा बीमोड करण्याची ताकद प्रेम आणि मायेत आहे, आपापल्या हातून घडलेल्या दुष्कृत्यांची शिक्षा कधी ना कधी तरी भोगावीच लागते मी आज सर्वांसमोर सांगतो की ज्या कृत्यामुळे इतरांचे नुकसान होईल, असे कोणतेही कृत्य मी आजपासून करणार नाही.''

निरंजननाथ हा घरफोडी व शस्त्रास्त्रे जवळ बाळगणे याबद्दल शिक्षा भोगत होता. त्याने सांगितलं, की, त्याचं मन पूर्वी अतिशय चंचल होतं. त्याच्या मनात पूर्वी दुष्कृत्यांचे विचार सतत घोळत असत. परंतु विपश्यना शिबिरानंतर अहिंसात्मक आचरण करावे, वर्तमानकाळाचाच विचार करावा आणि कधीही भूतकाळात जगू नये असे त्याला वाटू लागले. माणूस येथे शिकवल्याप्रमाणे जेव्हा वर्तमानकाळात जगतो, स्वत:च्या श्वासोच्छ्वास प्रक्रियेवर नियंत्रण ठेवतो तेव्हा खरीखुरी चित्तशुद्धी होते.

सर्वांत खळबळजनक गौप्यस्फोट केला तो ओमप्रकाश बैखा या कैद्याने. एका लहान मुलीचे अपहरण केल्याच्या गुन्ह्यात अडीच वर्षांची शिक्षा झाली होती. आपल्या शत्रूंनी पोलिसांच्या मदतीने या खटल्यात गोवले आपण सामाजिक कार्यकर्ते व नेते असून निवडणुकीस उभे राहणार होतो असे त्याने सांगितले. ''विपश्यना शिबिरात भाग घेण्याआधी माझ्या मनात फार वेडेवाकडे विचार येत होते. एकतर चुकीचा निर्णय देणाऱ्या त्या



अधिकाऱ्यास ठार मारावे, नाहीतर त्याच्या मुलांना पळवून न्यावे, किंवा त्याच्या गाडीचा अपघात घडवून आणावा, अशा वेड्यावाकड्या विचारांमुळे मी कितीतरी रात्री तळमळून काढल्या. परंतु माझ्या मनातील सर्व दुष्ट भावना आता नाहीशा झाल्या आहेत. मी सूडाचे विचार मनात आणणार नाही. माझे आता अपार करुणेने आणि स्नेहभावनेने भरून गेले आहे.''

निर्ढावलेले, उलट्या काळजाचे म्हणून प्रसिद्ध होते त्यांनाही यातून सर्वांत जास्त फायदा झाला. विपश्यनेतून आपल्याला आलेले अनुभव इतरांपुढे प्रकट करण्यासाठी ते अधीर होते. आपले ऐकून इतर कैद्यांनाही उपरती व्हावी असे त्यांना वाटत होते. आपल्या काही मागण्या पूर्ण कराव्य असे विपस्वींनी सांगितले. त्या आम्ही अत्यंत आनंदाने पूर्ण केल्या.

त्यांच्या म्हणण्यास मान देऊन आम्ही १९९४ सालचा नववर्षदिन विपश्यना दिवस म्हणून चारही तुरुंगांमध्ये साजरा केला. त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते, सर्वच्या सर्व कैद्यांनी नवे वर्ष प्रामाणिकपणे, तळमळीने, उदात्त संकल्पनांनी व नवविचारांनी साजरे करावे. तिहारमध्ये विपश्यना शिबिराचे उद्घाटनप्रसंगी विपश्यनाचे प्रवर्तक सत्यनारायण गोएंका यांनी जे भाषण केले ते येथे देत आहे :

...मित्रहो, तुम्ही सर्वजण येथे मुक्ती प्राप्त करून घेण्याकरता जमला आहात. ही मुक्ती कशापासून आहे? सर्व प्रकारच्या शृंखलांपासून, दास्यांपासून, बंधनांपासून; दु:ख आणि यातनांपासून. येथे अशा प्रकारे बंदिवासात जीवन कंठणे खरोखर अत्यंत यातनामय आहे या तुरुंगातून तुमची सुटका होईल तो दिवस तुमच्या दृष्टीने सुदैवी असेल. परंतु तुम्ही-आम्ही सर्वजण याहीपेक्षा एका मोठ्या तुरुंगात बंदिवान असतो. हा तुरुंग असतो आपल्यामधील नकारात्मक प्रवृत्तींचा, आपल्या मनाच्या ढळलेल्या समतोलाचा. कारण या दुष्प्रवृत्तीच आपल्यावर अधिकार गाजवत असतात. आपण सर्वजण आपल्या मनातील क्रोध, राग, द्वेष, तिरस्कार, असूया इत्यादी भावनांचे गुलाम झालो आहोत. आपल्या मनात लालसा, हाव, मोह, मायापाश आणि अहंकार या भावनांनी ठाण मांडले आहे. आपल्या मनात उमटलेली कोणतीही दुष्प्रवृत्ती त्या क्षणी आपल्यावर संपूर्ण नियंत्रण करते. आपण तिचे गुलाम बनतो. आपल्या खऱ्या यातना सुरू होतात त्या त्यामुळेच! या यातना केवळ तुरुंगाच्या चार भिंती पुरत्याच काही मर्यादित नसतात. जे तुरुंगाच्या आत राहतात तेही, आणि जे या तुरुंगाबाहेरच्या जगात राहतात तेही, असे सर्वच लोक स्वत:च्या सवयींचे गुलाम आहेत. ते स्वत:च एकेक दुष्प्रवृत्ती निर्माण करतात आणि त्यापोटी येणाऱ्या यातना भोगत बसतात.

जेव्हा या दुष्प्रवृत्तींपासून आपली सुटका होईल तेव्हाच आपल्याला मुक्तीचा खराखुरा आनंद उपभोगता येईल. मग खरीखुरी शांती आणि सौहार्दाचा आनंद आपल्याला लुटता

येईल. परंतु त्यासाठी आपले मन शुद्ध, निर्मळ, दोषमुक्त होणे आवश्यक आहे. त्यानंतर आपल्या संपूर्ण आयुष्यालाच एक वेगळे वळण लागणार आहे. जे मन शुद्ध असते ते अपार करुणेने व प्रेमाने भरलेले असते. हा आनंद सहानुभूतीचा असतो आणि तो मन:शांतीने भरलेला असतो. त्यातून मनाचे संतुलन प्राप्त होते. खरेखुरे निर्व्याज समाधान त्यातूनच प्राप्त होते. माणसाची खरी गुलामगिरी असते परस्परांविषयीच्या कलुषित भावनांची गुलामगिरी. ज्या ज्या माणसांना या दुष्प्रवृत्तींपासून मुक्ती मिळते त्यांना मिळणारा आनंद हा वैश्विक असतो. तो माणूस हिंदू आहे की मुस्लीम, शीख की बुद्ध, जैन, ख्रिश्चन की ज्यू यावर काही त्या आनंदाची प्रतवारी ठरत नाही. एकदा कोणीही या कलुषित भावनांच्या गुलामगिरीत कैद झाला, त्याला अपार यातना या भोगाव्या लागणारच आणि जो या शृंखला तोडून बाहेर पडला त्याला सुख, शांती आणि समाधान प्राप्त होणारच.

हे सनातन भारतीय तंत्र नववर्षाच्या प्रथम दिवशी आज तुमच्यापर्यंत आणले आहे. हे तंत्र अत्यंत शास्त्रशुद्ध आहे. यातून निश्चित परिणाम हा शंभर टक्के दिसून येतो. हे तंत्र असांप्रदायिक, धर्मातीत आहे. ते आपल्याला मुक्ती व शांतीचा, सलोख्याचा संदेश घेऊन येते. जे कोणी या शिबिरात सहभागी होणार असतील त्यांनी अत्यंत मनापासून, एकाग्र चित्ताने व अथकपणे आपल्या स्वत:च्या उन्नतीचे हे काम करावे, स्वत:च्या शृंखला स्वत:च तोडून टाकाव्यात व दु:खमुक्त व्हावे. या शिबिरामुळे तुमच्या आयुष्यातील एका नव्या पर्वाचा प्रारंभ होईल. विपश्यनेने तुमची संपूर्ण मुक्ती घडून येईल व तुम्हा सर्वांना खऱ्याखुऱ्या उच्च कोटीच्या आनंदाची प्राप्ती होईल अशी सदिच्छा मी येथे व्यक्त करतो...

विपश्यना कार्यक्रमाने तुरुंगात सर्वव्यापी स्वरूपाची सद्भावना जागृत केली. या एम.एल. मेहता यांनी विपश्यना ध्यानपद्धतीचा प्रसार करण्याचे कार्य हाती घेतले. मेहता आणि रामसिंग यांच्या सूचनेवरून विपश्यनेचे लाभ इतरांपर्यंत पोचावेत म्हणून आम्ही राष्ट्रीय पातळीवर सर्व इन्स्पेक्टर जनरल (प्रिझन्स) ची एक मीटिंग दिनांक २४ जानेवारी १९९४ रोजी तिहार जेलच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये घेतली. या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर विपश्यना या विषयावर एक दृक्‌श्राव्य सादरीकरण (प्रेझेंटेशन) करण्यात आले. त्यातून त्यांना या कार्यक्रमाचे महत्त्व सांगण्यात आले. त्याचबरोबर विपश्यनेचा उगम, तिचे संक्रमण, त्यापासून होणारे लाभ इत्यादी गोष्टींचे तपशीलवार विवेचन झाले. त्यानंतर या सर्वच अधिकाऱ्यांना तुरुंगाच्या पाहणीसाठी नेण्यात आले. नंतर एक खुली चर्चा झाली. त्यात विपश्यना शिबिराचा अनुभव घेतलेले कैदी व हे सर्व अधिकारी यांच्यात विचारांचे आदान-प्रदान झाले. त्या वेळी विपश्यना अजून न केलेले जे कैदी तेथे उपस्थित होते त्यांच्या मनात या कार्यक्रमाविषयी अपार उत्सुकता निर्माण झाली. जसजसे दिवस जात होते तशी ही उत्सुकता वाढत चालली होती. आमच्या बाजूने आम्हाला सुद्धा या चालून आलेल्या संधीचा कैद्यांनी लाभ घ्यावा असे वाटतच होते. आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या



पुनर्बांधणीवर सर्व कैद्यांनी आपलं लक्ष केंद्रित करावं असं जर असेल तर त्यासाठी या बंदिवासातील मुबलकपणे उपलब्ध असलेल्या काळाचा त्यांनी सदुपयोग करायलाच हवा होता. यासाठी विपश्यनेसारखा दुसरा मार्गच नव्हता. पण कैद्यांची संख्या इतकी प्रचंड होती. मग जास्तीत जास्त कैद्यांस या उपक्रमाचा लाभ घेता यावा म्हणून एकाच वेळी १००० कैद्यांसाठी विपश्यना शिबिर आयोजित करता आले तर? असा प्रश्न माझ्या मनात उमटला. मग मी जरा चाचरतच श्री. रामसिंग यांना तसे विचारले. त्यावर ते म्हणाले : "हो, येईल की. का नाही?" माझा तो प्रश्न ऐकून त्यांना एका जुन्या घटनेची आठवण झाली. गोएंकांचे गुरू होते ऊ बा खिन. हे ब्रम्हदेशीय होते. यांनी १९६९-७० साली असे भाकीत करून ठेवले होते की गोएंकाजी एक ना एक दिवस १०००हून जास्त व्यक्तींना एकाच शिबिरात विपश्यना मार्गदर्शन करतील. ही गोष्ट न भूतो न भविष्यती प्रकारची होती आणि इ.स. १९९४ च्या एप्रिल महिन्यात ही भविष्यवाणी तिहार येथे शब्दश: खरी ठरली.

विपश्यना शिबिर एकाच वेळी १००० कैद्यांसाठी भरवणे हे काम काही सोपे नव्हते. त्यासाठी फार मोठ्या सुसज्ज व सतर्क सुरक्षायंत्रणेची उभारणी करावी लागणार होती. विविध प्रकारच्या उपक्रमांचं अत्यंत कौशल्याने एकसूत्रीकरण करायचं होतं. गोएंकाजी, त्यांच्या पत्नी, त्यांचे अत्यंत निष्ठावान प्रशिक्षक, सुपरिंटेंडंट श्री. पी.आर. मीना, डेप्युटी सुपरिंटेंडंट श्री. सुनील गुप्ता या सर्वांनी मिळून, एकजुटीने, अत्यंत बारीक तपशिलात लक्ष घालून शिस्तबद्ध आखणीला सुरुवात केली.

सर्वांत प्रथम आम्हाला १००० व्यक्तींसाठी आसनव्यवस्था करायची होती. त्यासाठी योग्य जागा शोधायची होती. जागा अशी हवी होती की गर्दीपण होता कामा नये आणि सुरक्षाव्यवस्थेची समस्याही उद्भवता कामा नये. चार क्रमांकाच्या तुरुंगात दोन नव्या इमारतींचे बांधकाम जवळजवळ पूर्ण होत आले होते. त्यात अतिशय मोठे वॉर्डस् होते. त्यांत सर्व कैद्यांची व्यवस्था करता आली असती. मग आम्ही ती जागा आमच्या उपक्रमासाठी निश्चित केली. पी. डब्ल्यू. डी. चे इंजिनिअर इनचार्ज श्री. आय. सी. कालरा यांनी या इमारतींचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा जणू विडाच उचलला. (त्यांच्या पूर्वीच्या अधिकाऱ्यांच्या पार्श्वभूमीवर हा केवढा मोठा विरोधाभास) या कामासाठी लागणारे कसब ज्यांच्यापाशी होते ते कैदी आपण होऊन मदतीसाठी पुढे आले. संपूर्ण तुरुंगातच एक प्रकारची सहकार्याची भावना वाढीस लागली होती. मग इतर कैदीही मागे कसे हटतील? गटारांसाठी खड्डे खोदणे, विपश्यनेसाठी मुक्रर केलेली जागा स्वच्छ करणे, तेथे वाढलेली झुडपे, गवत व तण काढून टाकणे, केरकचरा हलवणे, पाण्याच्या नळांचे जाळे सर्वत्र फिरवून पाणीव्यवस्था करणे, जागा सपाट करणे, इत्यादी कामे त्यांनी पुढे होऊन हिरीरीने केली. मग मोकळ्या पटांगणावर विपश्यनेसाठी एका प्रचंड मोठा शामियाना

उभारण्याचे काम सुरू झाले. त्यानंतर आत १००० लोकांची बैठकव्यवस्था, ध्वनियोजना, प्रकाशयोजना अशा अनेक सोयी करायच्या होत्या. कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊन चालणार नव्हते. जाजमे अंथरण्यात आली. त्यांवर लोड, उशा, गिर्द्या इत्यादी मांडल्या गेल्या. पंखे आणि दिवे बसवण्यात आले.

४ एप्रिल १९९४ हा दिवस उजाडला. सर्व प्राथमिक तयारी झाली. मग आम्ही १००३ पुरुष कैद्यांना पाचारण केले. गोएंकाजींकडून सर्व प्रारंभिक सूचना ऐकून घेण्यासाठी सर्वांनी त्या शामियान्यात जमायचं असं ठरलं.

कोर्स सुरू झाला. एकंदर १३ पुरुषमदतनीस व त्यांच्यापैकी प्रत्येकाच्या हाताखाली ७५ ते ८० विद्यार्थी त्यांना मदत करण्यासाठी बाहेरून प्रशिक्षित कार्यकर्ते आले होते. ६० जुने कैदी विद्यार्थीही मदतीला होतेच. याच वेळी तुरुंग क्रमांक एकमध्ये महिलांसाठी पहिल्या विपश्यना शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हा कोर्स दोन महिला प्रशिक्षकांनी घेतला. त्यात ४९ स्त्रिया सहभागी झाल्या.

या शिबिरात भाग घेणाऱ्यांपैकी अनेकांवर खटले चालू होते. घरफोडी, खून, बलात्कार, अतिरेकी कारवाया, मादक द्रव्यांची हाताळणी इत्यादी आरोप होते. ते सर्वजण वेगवेगळ्या धर्मांचे होते.– हिंदू, मुस्लीम, शीख, बुद्ध, ख्रिश्चन इत्यादी. त्यांच्यामागे वेगवेगळ्या परंपरा होत्या. त्यांच्यापैकी एक तृतियांशहून अधिक कैदी तर अशिक्षित होते. वीस कैदी परदेशी होते. अफगाणिस्तान, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इटली, नायजेरिया, सेनेगल, सोमालिया, श्रीलंका, टांझानिया व युनायटेड किंग्डम इत्यादी देशांचे ते नागरिक होते.

एक दिवस आमच्या या शिबिरात एक अनपेक्षित संकट कोसळले. पहाटेच्या वेळी फार प्रचंड मोठे वादळ झाले व पावसाची झोडपणी सुरू झाली. शामियान्याचे खांब उखडून पडले. छताचा काही भाग कोसळला. सर्व आसने, जाजमे, गाद्या इत्यादी साहित्य भिजून चिंब झाले. व्यासपीठ तयार करण्यासाठी सर्वांनी इतकी मेहनत घेतली होती, ती सर्व शब्दशः पाण्यात गेली. पहाटे साडेतीन वाजता सर्व शिक्षक व वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीची बैठक बोलावण्यात आली. आमच्या विपश्यना शिबिराची धूळधाण होण्याची वेळ आली. यातून मार्ग काढण्यासाठीच ही बैठक बोलावण्यात आली होती. दरम्यानच्या काळात वादळाचा आणखी जोरदार तडाखा बसून प्रचंड हानी झाली.

गोएंकाजी व त्यांच्या पत्नीने परिस्थितीची पाहणी केली. त्या शामियान्याची स्थिती तर अशी दिसत होती, की, जणू काही तेथे जरा वेळापूर्वी संतप्त जमावाने हिंसक दंगलच घडवून आणली असावी. पण त्याही परिस्थितीत त्या पतीपत्नींनी आपला समतोल ढळू दिला नाही. सर्व काही पहिल्यासारखेच चालू ठेवण्याची सूचना ते करत होते. त्याही परिस्थितीची हाताळणी त्यांनी इतक्या शांत मनाने केली की प्रत्येकाच्या मनात एक नवीन आशा पल्लवित झाली. जेल सुपरिंटेंडंट श्री. पी. आर. मीना यांनी सर्व सहभागी कैद्यांना



आपापल्या बराकीत थांबण्याची सूचना केली. मोठ्या प्रमाणावर ध्वनिव्यवस्था (पब्लिक अॅड्रेस सिस्टिम) उभारण्यात येत होती. शिबिरात जे कोणी कैदी, कर्मचारी आणि प्रशिक्षक सहभागी झाले होते त्यांना सर्व सूचना बराकीमधेच ऐकू जाणार होत्या आणि त्या पद्धतीने शिबिराचे सर्व कामकाज सुरळीत चालू ठेवण्यात येणार होते. गुरूंच्या सूचनासुद्धा या पब्लिक अॅड्रेस सिस्टिमवरून सर्वांपर्यंत पोहोचणार होत्या. थोड्याच वेळात ध्वनिक्षेपकावरून मंद संगीताचे सूर प्रसारित करण्यात आले. त्याने आसमंत भरून गेले. त्या सुरांनी वातावरणातील भयावहता कमी होऊन सर्वांच्या चित्तवृत्ती उल्हसित झाल्या. कैद्यांनी आपल्या प्रशिक्षकांच्या मदतीने आपले पूर्ण चित्त ध्यानधारणेमध्ये केंद्रित केले.

नाश्त्यानंतर हवा निवळू लागली. मग परिस्थिती पुन्हा पूर्ववत आणण्याच्या दृष्टीने जारीने प्रयत्न सुरू झाले व फार मोठ्या प्रमाणात कैदी यात सहभागी झाले. तंबूतून सुमारे १००० उशा, गाद्या इत्यादी सामान बाहेर आणून उन्हात सुकवण्यासाठी ठेवले. तंबूचे कापड जागोजागी फाटले होते ते शिवण्यास सुरवात केली. लोंबकळणाऱ्या विजेच्या तारा पुन्हा नीट जोडल्या, दिवे व पंखे परत बसवले. साठलेले पाणी पुसून स्वच्छ केले. हे सर्व काम प्रचंड वेगाने पार पडले. सायंकाळी ७ वाजेपर्यंत शामियाना पुनश्च उभा झाला. कार्यक्रम पत्रिकेतील पहिला कार्यक्रम होता– गोएंकाजींचे प्रवचन. हा कार्यक्रम वेळेत पार पडला.

दहा दिवसांच्या शिबिरातील एकेक दिवस पुढे सरकत होता. अंतर्बाह्य परिवर्तनाची प्रक्रिया वेगाने चालू होती. या उंच भिंतींच्या अंतर्भागात सक्तीशिवाय भक्ती चालू होती. शेवटच्या दिवशी सर्वच्या सर्व सहभागी व्यक्तींना एका गोष्टीची जाणीव झाली– काहीतरी अविश्वसनीय गोष्ट घडली होती. सुमारे १००० कैद्यांनी विपश्यना कार्यक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला होता. गोएंकाजींनी असे जाहीर केले की आजपर्यंत घेण्यात आलेले हे सर्वांत मोठे विपश्यना शिबिर होते. गेली पंचवीस वर्षे ते स्वत: विपश्यना शिकवत होते. रोज सायंकाळी ते हिंदीतून व्याख्याने देत आणि विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधानही करीत. रोज हा कार्यक्रम सुमारे ३० ते ४५ मिनिटे चालत असे.

एका पत्रकाराने त्यांना विचारले: ''विपश्यना ही कैद्यांसाठी फार उत्तम आहे असे का म्हटले जाते?''

त्यावर त्यांनी जे उत्तर दिले ते खरोखरच सर्वांनी ऐकण्यासारखे आहे. ... कैद्यांसाठीच काय पण तुम्हा आम्हा सर्वांसाठीच विपश्यना उत्तम आहे. आपण सर्वजण आपल्या मनाच्या दुष्प्रवृत्तींचे गुलाम असतो. परंतु विपश्यना पद्धतीचा सराव केल्याने आपली या मानसिक दास्यत्वातून सुटका होते. सर्व प्रकारच्या यातना भोगत असलेल्या लोकांच्या मदतीला धावून येणारे विपश्यना हे एक साधन आहे. जे गजाआड, आपल्या कुटुंबियांपासून दूर, येथे बंदिवासात खितपत पडले आहेत त्यांच्याही आणि जे तुरुंगाबाहेरील समाजात

खुलं जीवन जगत आहेत त्यांच्याही. तुम्हाला तिहारमध्ये हे जे काही घडताना पाहायला मिळालं, तो एक आशेचा किरण आहे. एक संदेश आहे. त्यापासून अवघ्या विश्वाचा लाभ होणार आहे...

गोएंकाजींची व्याख्याने केवळ तिहारपुरतीच मर्यादित नव्हती. झी टीव्ही व इतरही वाहिन्यांनी या भाषणाच्या व्हीडिओटेप्स जगात सर्वत्र प्रसारित केल्या. 'करुणा फिल्म्स' यांनी याच विषयावर एक माहितीपट काढला. त्याचे नाव 'डुईंग टाईम, डुईंग विपश्यना.' १९९८ सालच्या फ्रान्समधील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात या चित्रपटास गोल्डन स्पायर पुरस्कार मिळाला त्याचप्रमाणे न्यूयॉर्क येथील चित्रपट महोत्सवात फायनॅलिस्ट पुरस्कार मिळाला. हा माहितीपट अमेरिकेत व इस्रायलमध्ये टी. व्ही. वर दाखवण्यात आला.

इतक्या प्रचंड मोठ्या विपश्यना शिबिराच्या आयोजनानंतर आता तिहारमध्ये एका कायमस्वरूपी विपश्यना केंद्राची स्थापना होणार हे तर ओघानंच आलं. चार क्रमांकाच्या तुरुंगात दिनांक १५ एप्रिल १९९४ रोजी सुमारे ११०० व्यक्तींच्या उपस्थितीत याचा उद्घाटन सोहळा पार पडला. या केंद्राचे नामकरण गोएंकाजींनी 'धम्म तिहार' असे करून टाकले. या उद्घाटन प्रसंगी त्यांनी (गुरुजींनी) खालील श्लोक म्हटला :

*... इस आश्रमके जितने प्राणी*
*सबके दुखडे दूर हो*
*शुद्ध धर्म सबके मन जागे*
*अंतर निर्मल होया रे*
*अंतर शीतल होया रे...*

या आश्रमात जेवढे प्राणी असतील त्यांची दु:खे दूर होवोत. सर्वांच्या मनात शुद्ध धर्म जागृत होऊ दे. त्यांचे अंतर्मन शुद्ध होऊ दे. शीतल होऊ दे.

या केंद्राचा शिलालेख व मुहूर्तमेढ गोएंकाजींच्या हस्ते रोवली गेली. यानंतर केवळ तीन आठवड्यांत या केंद्राचे कामकाज झपाट्याने सुरू झाले.

चारही तुरुंगांतील कैद्यांसाठी दहा दहा दिवसांचे विपश्यना शिबिर थोड्या थोड्या दिवसांच्या अंतराने भरवण्यात येऊ लागले. तिहारमध्ये असंख्य प्रकारचे कैदी होते. काही लोकांनी प्रत्यक्ष विपश्यना शिबिराचा अनुभव घेतला होता, काही लोक या उपक्रमाबद्दल नुसते सांगोवांगी ऐकून होते, आणि काही लोकांना विपश्यनेविषयी काहीच माहीत नव्हते. तेव्हा यावर उपाय म्हणून एकदा विपश्यना पूर्ण केलेल्या काही कैद्यांना आम्ही मुद्दाम पुढच्या शिबिरात सहभागी करून घेण्यास सुरवात केली. यांचा आम्हाला उपयोग होत असे. विपश्यना शिबिरात ज्या कैद्यांनी भाग घेतला असेल त्यांना खास वेगळ्या बराकीत ठेवण्यात येई. त्या बराकी जवळची जी मोकळी जागा असेल ती ध्यानधारणेसाठी 'तपस्थळी'



म्हणून राखून ठेवण्यात येई. ह्या ज्या योजना केल्या त्या सर्व विपश्यना कोर्सचा जास्तीत जास्त कैद्यांना लाभ उठवण्यासाठी फार महत्त्वाच्या होत्या.

आम्ही नियमितपणे सर्व कैद्यांच्या सभा घेण्यास सुरवात केली. यात हळूहळू विपश्यनेचा लाभ घेतलेल्या कैद्यांची संख्या वाढू लागली. या सभा महापंचायतीच्या सभेप्रमाणे भरत. आम्ही एक वेगळी विपश्यना पंचायतही सुरू केली. कैदी आणि शिक्षक यांच्यात नियमितपणे सुसंवाद असावा यासाठी हा दुवा फार महत्त्वाचा ठरला.

विपश्यना रिसर्च इन्स्टिट्यूट तर्फे येथे एक दिवसीय शिबिर भरवण्यात आले. यातून सामूहिक सभांच्या कल्पनेला चालना मिळाली. मग या इन्स्टिट्यूटच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सामूहिक ध्यानपद्धती सुरू झाली. या वेळी गोएंकाजींच्या व्याख्यानांच्या व्हिडिओटेप्ससुद्धा दाखवण्यात येत. कैद्यांनी सभेत उपस्थित केलेल्या प्रश्नांना शिक्षक तेथेच उत्तरे देत. काही व्यक्तींच्या मनात अजूनही किंतु असे. अशा व्यक्तींनी आपला संशय जर बोलून दाखवला तर त्याचे निराकरणही तात्काळ होई. अशा रीतीने धम्म तिहार केंद्राचा विपश्यनेचे निवासी केंद्र म्हणून विकास झाला. या केंद्रामुळे झालेले लाभ दूरगामी व चिरस्थायी होते. परंतु त्या केंद्राच्या उपक्रमांवर फार बारकाइने लक्ष घालावे लागे.

दरम्यानच्या काळात विपश्यनेचा भारतात मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला. याचे कारण प्रसारमाध्यमांनी या उपक्रमास उचलून धरले. यापासून होम मिनिस्ट्रीच्या अधिकाऱ्यांनी सुद्धा प्रेरणा घेतली व भारत सरकारतर्फे सर्व राज्यसरकारांकडे व केंद्रशासित प्रदेशांकडे विपश्यनेची परिपत्रके पाठवून दिली. येथून पुढे सर्व तुरुंगांमध्ये कैदी सुधार कार्यक्रमांबरोबर विपश्यना उपक्रमही राबवण्यात यावा असे त्यात म्हटले होते. विपश्यनेचे बीज अशा रीतीने सर्वत्र पेरले गेले.

विपश्यना चळवळीने पकडलेला हा वेग असाच कायम ठेवण्यासाठी विपश्यना रिसर्च इन्स्टिट्यूटने संक्षिप्त पण माहितीपूर्ण अशा पुस्तिका काढल्या. त्या वाटल्या. विपश्यनेत सहभागी झाल्यानंतर ज्या काही नियमांचे पालन करावे लागते तेही तपशीलवार दिले. या नियमांचे पालन करताना बंदिवासातील कैद्यांपुढे काय अडचणी येतात ह्याची जाणीव ठेवून हे नियम लिहिले होते. इतकेच नव्हे, तर तिहार येथील विपश्यना शिक्षक व कैद्यांच्या बरोबर बडोदा व जयपूर जेलमधील कैद्यांचेही विपश्यनेच्या बाबतीतील अनुभव येथे विचारात घेण्यात आले होते.

तारसेम कुमार यांनी एक उपक्रम हाती घेतला. कैद्यांपुढे विपश्यना करत असताना काय अडचणी उभ्या राहू शकतात याची एक यादी त्यांनी तयार करायची ठरवली. पण मग त्यांनी आधी साक्षरतेच्या उपक्रमावर एक पुस्तक लिहिले. तिहारमधील परिवर्तनाच्या टप्प्यात त्यांना स्वत:ला जे काही अनुभव आले त्या विषयीचे सविस्तर विवेचन त्यांनी या पुस्तकात केले आहे. या पुस्तकात त्यांनी विपश्यना या विषयावरही तपशीलवार लिहिले

आहे. तत्पूर्वी त्यांनी स्वत: जयपूर येथे जाऊन स्वत: विपश्यना शिबिरात सहभागही घेतला व त्यात विशेष प्रावीण्य मिळवले. तुरुंगातील आमच्या या सुधारकार्यक्रमात त्यांचा इतका मोठा वाटा होता की, यानंतर जेव्हा जेव्हा या विषयावर तिहारच्या बाहेर कोठेही या विषयावर चर्चासत्र, परिसंवाद, किंवा अधिवेशन झाले तेव्हा तिहारचे प्रतिनिधी म्हणून तेच उपस्थित राहिले. त्यांनी तिहारमधील कैद्यांच्या जीवनावर एक पुस्तक लिहिले– 'फ्रीडम बिहाईंड बार्स' (गजाआडचे स्वातंत्र्य). या पुस्तकाचे प्रकाशन तिहार जेलमध्येच श्री. टी. एन. शेषन, भारताचे तत्कालीन चीफ इलेक्शन कमिशनर यांच्या हस्ते झाले. या समारंभासाठी प्रचंड मोठा कैद्यांचा समुदाय उपस्थित होता. मी जेव्हा अमेरिकेच्या काँग्रेशनल एक्झिक्यूटिव्ह कमिटीच्या निमंत्रणावरून वॉशिंग्टनला गेले होते तेव्हा तेथील नॅशनल प्रेअर मीटिंगला ड१९९५ च्या फेब्रुवारी महिन्यात.गेल्यावर या पुस्तकाची एक प्रत भेट म्हणून नेली होती. पाश्चात्त्य देशांना सुद्धा विपश्यना पद्धतीचा नक्की लाभ होईल अशी मला खात्री आहे. यातून गुन्हेगारांचा सुधार घडवून आणता येईल व या परिवर्तन प्रक्रियेचा अभ्यास करता येईल. एका कैद्याने लिहिलेले एक पत्र पुढे दिले आहे. यातून ही गोष्ट स्पष्ट होते.

विपश्यना रिसर्च सेंटरने ख्यातनाम संशोधकांची एक तुकडी तयार केली. यात डॉ. किशोर चंद्रामाणी, डॉ. एन. एन. विग आणि डॉ. उदय पारेख इत्यादींचा समावेश होता. यांनी विपश्यनेत सहभागी होऊन विपश्यना पूर्ण केलेल्यांच्या मानसिक आरोग्यावर या विपश्यनेचा नक्की काय परिणाम होतो त्याचा अभ्यास केला. या अभ्यासातून अनेक बाबी प्रकाशात आल्या. त्यांतील एक परिच्छेद येथे देण्यासारखा आहे.

... एकीकडे तुरुंगातील भावनिक वातावरण पुनर्वसनाच्या बहुतेक उद्दिष्टांना मारक ठरणारे असले तरी त्यांतून अत्यंत सुरक्षित असा आकृतिबंध मिळू शकतो. यात प्रामुख्याने स्वत:च्या मनाची जडणघडण करणाऱ्या भावना व प्रेरणा असतात. यातून वैयक्तिक विकास आणि प्रगतीसाठी संधी उपलब्ध होऊ शकतात. तुरुंगाच्या वातावरणाच्या काही विशिष्ट अंगांचा सुधारकार्यक्रमासाठी विधायक मार्गाने उपयोग करता येतो. विपश्यनेमुळे कैद्याला एक अत्यंत वेगळ्या प्रकारचा अनुभव येतो. कैद्यांना बंदिवासात असताना समाजाने आपल्याला टाकून दिलं असल्याची भावना असते. आपली कोणाला काळजी नाही असं त्यांच्या मनाने घेतलेलं असत. विपश्यना पद्धतीत परस्परसामंजस्य, परस्परांची काळजी घेणे, ठाम निर्धार आणि प्रत्येक व्यक्तीविषयी सकारात्मक दृष्टिकोण असल्यामुळे व्यक्तीच्या मनातील भयगंड नाहीसा होतो. त्या व्यक्तीची मानसिक परिपक्वता वाढीस लागते. त्यामुळे बंदिवासात असताना सुटकेचे विचार, बदलीची इच्छा वगैरेवर लक्ष केंद्रित होणे बंद होते. त्याऐवजी चार भिंतींच्या आत राहून सुद्धा स्वत:विषयीची जाणीव निर्माण होते. एकदा मानसिक परिपक्वता वाढीस लागली की कोणत्याही प्रकारची हानी



कशी अटळ असते व त्या अटळतेचा कसा स्वीकार करावा, त्याच्याशी मानसिकरीत्या तडजोड करावी, आत्मोन्नतीसाठी धडपडत असणाऱ्या इतर व्यक्तींकडे आदरभावनेतून पाहावे या गोष्टी आपोआप साध्य होतात. मन करुणेने भरून जाते. तिहारमध्ये विपश्यनेचे मनावरील परिणाम या विषयावर आणखीही बरेच संशोधन झाले. ज्या विपश्यनेच्या साधकांनी नोव्हेंबर १९९३ मध्ये विपश्यनेला सुरवात केली होती त्यांच्या मानसिक अवस्थेत जानेवारी १९९४ पर्यंत लक्षणीय बदल झाल्याचे दिसून आले. भय, नैराश्य, शत्रुत्व व असहायता या सर्व भावनांमध्ये मोठ्या प्रमाणात घट झाली होती. त्याचबरोबर भविष्याविषयीची उत्सुकता व मानसिक स्वास्थ्य वाढीस लागले होते.

यापूर्वी सुद्धा अनेकांनी विपश्यना या विषयावर संशोधन केले होते. राजस्थान व गुजरात मधील तुरुंगांमध्ये जेव्हा विपश्यना शिबिरांचे आयोजन करण्यात आले, तेव्हा तेथील कैद्यांमध्ये घडून आलेल्या परिवर्तनाचा काही व्यक्तींनी अभ्यास केला. अशा प्रकारच्या सर्व अभ्यासांमधून वरील विवेचनाला पुष्टी देणारेच निष्कर्ष निघाले. आमच्या येथील शिबिरानंतर काही भारतीय आणि परदेशी कैद्यांनी आपापले अनुभव कथन केले आहेत. वर उल्लेख केलेल्या संशोधनांच्या निष्कर्षांशी या कैद्यांचे अनुभव मिळतेजुळतेच आहेत. या अनुभवांपैकी काही मुद्दाम देत आहोत.

... हा आगळावेगळा उपक्रम सुरू केल्याबद्दल मी तुरुंगव्यवस्थापनाचा आभारी आहे. विपश्यनेत सहभागी झाल्यानंतर मला सत्याचा अनुभव आला...

(तिमोथी ॲसेमोती.)

... हा खरोखरच्या तेजाचा देदीप्यमान प्रकाश होता. मी व इतर काही कैद्यांनी या दहा दिवसांच्या शिबिरात भाग घेतला. गुरुजींपासून आमच्यापर्यंत जी संवेदनाशीलता संक्रमित झाली ती मन थक्क करून सोडणारी होती. हे शिबिर केवळ दहाच दिवसांचे होते, या गोष्टीचा मला खरोखरच खेद वाटतो. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर या शिबिराचा कालावधी कमीत कमी १५ ते २० दिवसांचा असायला हवा होता. असो, काहीही असलं तरी विपश्यना शिबिर हा माझ्या दृष्टीने अत्यंत विलक्षण अनुभव होता...

(टोये एम. अनरालेय)

... हा एक लक्षणीय अनुभव होता. ह्या शिबिराची कार्यपद्धती तर विशेष उल्लेखनीय होती.

(एन्. ॲलीसन)

... विपश्यना शिबिरास सुरवात करण्याआधी त्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींना विपश्यना म्हणजे काय याची माहिती दिली, म्हणजे त्यांना या शिबिराची पूर्वतयारी करता येईल...

(जोहर बाबरी)

... गुरुजी जो काही उपदेश करतील त्याचे प्रत्येक सहभागी व्यक्तीने फार तंतोतंत पालन केले पाहिजे. या शिबिरात भाग घेतल्यानंतर माणसाच्या मनातील सर्व ताणतणाव व दु:खे दूर होतात. त्याची आपल्याला तात्काळ जाणीव सुद्धा होते. मला सुद्धा आता खूप शांती लाभली आहे...

(लाडू डिबे.)

... क्रोधावर नियंत्रण करून शांतीपूर्ण आयुष्य जगण्यास शिकवणारी विपश्यना ही एक कला आहे...

(सुनील रतन)

... माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी माझ्यापाशी शब्द नाहीत. मला इतकं हलकं वाटत आहे, की, जणू काही मी आकाशातच उड्डाण करीत आहे. या विपश्यना शिबिरांचे आयोजन करणाऱ्यांचा मी अत्यंत आभारी आहे...

(प्रिन्स व्होरा)

... मी पूर्वी फार वाईट होतो. मी आजवर इतरांना भरपूर दु:ख दिले. पण आता विपश्यनेचा कोर्स केल्यानंतर मला असं वाटतं, की, प्रत्येकाने दुसऱ्याला मदत करावी. कोणीही कोणाला दुखवू नये...

(सलमान हुसेन)

... या शिबिरातून मला एका विलक्षण जाणिवेचा अनुभव आला. आता मला माझ्या क्रोधावर अधिक चांगल्या प्रकारे नियंत्रण करता येऊ लागले असून मनालाही शांती लाभली आहे...

(रामबाबू)

... मला या कोर्समधून खूप अनुभव मिळाला. आता माझी तर अशी खात्री झाली आहे, की ह्या शिबिरात सहभागी होणारा प्रत्येकजण स्वत:ला अधिक चांगल्या तऱ्हेने समजावून घेऊ शकेल...

(सुधाकर सिंग)

... हा कोर्स करण्याआधी मी माझ्या कौटुंबिक समस्यांमुळे फार बेचैन होतो. त्यासाठी मी कितीतरी रात्री जागून काढल्या. परंतु आता मात्र मला फारच हलकं आणि आनंदी वाटत आहे...

(सुखदेव सिंग)

... मी तुरुंगात येण्यापूर्वी पुष्कळ चुका केल्या. पण त्या चुका मला आता समजून चुकल्या आहेत व मी आता अशी प्रतिज्ञा करत आहे, की, मी पुन्हा आयुष्यात कधीही गैरकृत्य करणार नाही...

(संतोष कुमार)



... अशा प्रकारचा कोर्स प्रत्येकाला आवश्यक आहे. आणि प्रत्येकाने हा कोर्स केलाच पाहिजे. विपश्यना करत असताना आमच्या देहातून विविध संवेदनांचे संक्रमण होत असल्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो...

(प्रवीण छाब्रा)

... मी परत कधीही कोणतेही गैरकृत्य करणार नाही. हा थरारक अनुभव होता...

(लखन लाल.)

... यापूर्वी माझ्या मनात इतका क्रोध होता. इतरांना हानी पोचवण्याचे विचार माझ्या मनात सतत घोळत असत. परंतु आता मात्र मला अत्यंत शांत वाटत आहे. इथून पुढील आयुष्य मला उत्तम घालवता येईल...

(सुरेश सिंग)

... पहिल्या विपश्यना सत्राने माझं पुरतं समाधान झालेलं नाही, त्यामुळे मला आणखी एका सत्रात सहभागी होण्याची इच्छा आहे...

(सुधीर शर्मा.)

... आमच्या आय. जी. (पी.) यांचे मला आभार मानावेसे वाटतात. या शिबिरातून मला खूप काही मिळालं. मी ते आता नियमितपणे आचरणात आणीत आहे...

(हुसेन खालाक)

... या विपश्यना शिबिराने मला आयुष्य शांततापूर्ण रीतीने जगण्यास शिकवलं. यामुळे मला इतरांविषयी वाटणारे प्रेम वृद्धिंगत झाले आहे...

(नेर्ट जे जाकारीजा)

... हा कोर्स आपल्याला शिस्तबद्ध जीवनाकडे घेऊन जातो. परंतु फार दीर्घकाळ या कोर्समध्ये बसणं अवघड आहे...

(स्टेफानो मॅनसिनी)

... इतरांशी चांगुलपणानं कसं वागावं व तेही परतफेडीची कोणतीही अपेक्षा न धरता, हे मला या कोर्समधून समजलं.

(जॅकसन दानालोगन)

... हा कोर्स म्हणजे आपल्या स्वत:च्याच पुनर्वसनाचं एक तंत्र आहे. मी जेव्हा माझ्या देशात परत जाईन तेव्हा माझ्या देशबांधवांना मी हा कोर्स करण्यास उद्युक्त करीन...

(ओलाटुंजी दादेवूद)

... विपश्यनेतून प्राप्त होणाऱ्या ज्ञानाची कशाशी तुलनाच होऊ शकत नाही. आपल्या अंतर्मनात जे निसर्गदत्त सत्य असतं त्याचं आपलं आपणच निरीक्षण व परीक्षण करण्याची तीव्र शक्ती आपल्याला लाभते...

(जेकब लॉरीसन)

विपश्यनेचा परिणाम न भूतो न भविष्यति असा होता. त्याचा लाभ या उपक्रमात भाग घेणाऱ्या प्रत्येकाला झाला. या कोर्समुळे आत्म्याची शुद्धी झाली. त्याने सर्वांना महानतेची शिकवण दिली. काही थोड्याच महिन्यांच्या कालावधीत विपश्यना हा तिहार आश्रमाचा एक अविभाज्य घटक बनला. मी जेव्हा १९९३ च्या मे महिन्यात तिहारची सूत्रे हाती घेतली तेव्हाच आम्ही ठरवलं होतं– आपण सर्वांनी मिळून या कारागृहाचं एका आश्रमात रूपांतर करायचं. आणि हे जे काम होतं त्याकडे आम्ही एक काम म्हणून पाहिलंच नाही, तर एक जीवितकार्य म्हणून पाहिलं. कारण यातूनच भविष्यकाळ घडवला जाणार होता.

□

# दिवाळीनिमित्त खास शब्दकोडे

रचनाकार :
**मनोहर बांदेकर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **ळ** | **का** | **स** | **क** | **हि** | **प्ता** | **सा** | **स** |
| ☒ | **न** | ☒ | **मा** | **नी** | **मौ** | **णी** | **हं** |
| **षी** | **मे** | **हे** | **हि** | **आ** | **ज** | **वा** | **आ** |
| **यु** | **र** | **मो** | **नं** | **ऱ्या** | **सौ** | **व** | **श्री** |
| **ता** | **क्ष** | **द** | **सा** | **खा** | ☒ | **थी** | **दी** |
| **श** | **अ** | **न** | **री** | **शा** | **क** | **ज** | **प** |
| **वा** | **ळू** | **व** | **दे** | **वि** | **त्रा** | ☒ | **ल** |
| **मि** | **छा** | **ल** | **चं** | **द्र** | **कां** | **त** | **क्ष्मी** |

वरील चौकोनात २१ अंकांची नावे आहेत ती ओळखा व बक्षीस जिंका.
दिवाळीच्या खमंग खुशखुशीत फराळाची लज्जत यांच्याबरोबर काही न्यारीच लागेल!

बरोबर उत्तर पाठवणाऱ्यांपैकी लॉट टाकून येणाऱ्या पहिल्या तीन स्पर्धकांना प्रत्येकी शंभर रुपयांची पुस्तके बक्षीस. **उत्तरे पाठवण्याची मुदत– २० डिसेंबर १९९९**

**आमचा पत्ता :** मेहता मराठी ग्रंथजगत १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०.

राहिलो आहे.

**वाढलेली अगतिकता**

आधुनिकीकरण आणि जागतिकीकरणही गुन्हेगारी जगताने इतक्या झपाट्याने आत्मसात केले आहे की, आता त्यांच्याशी सामना करण्यासाठी फक्त गुन्हा अन्वेषण व सुरक्षा दले पुरी पडणार नाहीत. गेली काही वर्षे मुंबईतील उद्योगपती आपल्या दक्षिण मुंबईतील कचेऱ्या मिळेल त्या भावात विकून टाकून पनवेल, पुणे, नाशिक येथे जागा का शोधू लागले आहेत याचे उत्तर कोणाला हवेच असेल, तर, ते तुलसियानी चेंबर्समध्ये झालेल्या हत्येमुळे मिळाले असेल. बिहारबद्दल पूर्वी असे बोलले जात असे की, काही प्रस्थापित गुंड बँकांच्या अधिकाऱ्यांकडे जात आणि थेट पैसे मागत. प्रथम ते कर्जरूपाने मागणी करीत आणि त्यासाठी काही कागदपत्रे वा तारण वगैरे मागितले तर पिस्तुल दाखवीत. बिहार-बंगालमध्ये रेल्वे स्थानकांवर बेधडक स्त्रियांच्या गळ्यातील सोन्याच्या साखळ्या वा प्रवाशांच्या हातांतील बॅगा खेचल्या जात आणि आरडाओरड करण्याचीही सोय नसे. हळूहळू मुंबईचा प्रवासही त्याच दिशेने चालू आहे. आम्ही वारंवार असे प्रतिपादन केले आहे की, हा प्रश्न केवळ गुन्हेगारी जगतापुरता मर्यादित नाही, तर तो मुंबई महानगराच्या आर्थिक-सामाजिक जीवनाच्या नियोजन-नियमनाचा प्रश्न आहे. मुंबईतील गिरणी कामगारांच्या संपानंतर या शहराची अवस्था अधिकाधिक भीषण होत गेली. उद्ध्वस्त झालेल्या गिरण्यांच्या जमिनी खुल्या बाजारपेठेत येणार, या शक्यतेनेच खरेदी-विक्रीतील समीकरणे बदलू लागली. ज्या कामगारांना जीवनातून उठवले गेले होते, त्यांची मुले गुन्हेगारी जगाकडे वळू लागली. प्रथम काँग्रेस पक्षाने या प्रश्नाकडे अक्षम्य दुर्लक्ष केले आणि नंतर या वाढत्या गुन्हेगारी-भ्रष्टाचाराला विटून लोकांनी सेना-भाजप युतीला निवडून दिले. हे त्यांच्या प्रेमातून झालेले मतदान नव्हते, तर अगतिकतेतून झालेले होते. ती अगतिकता कमी होण्याऐवजी गेल्या अडीच वर्षांत अधिकच वाढली आहे. आता मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी या गँगशी युद्धपातळीवर सामना करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. एका फटक्यात वीस ज्येष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या करून या खात्यात नवी तडफ आणायचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यांना त्यांच्या प्रयत्नात यश येवो अशा शुभेच्छा देऊन जर प्रश्न सुटायला मदत होणार असेल, तर आम्ही त्या देऊच; परंतु त्यांनी हे सुद्धा ध्यानात ठेवावे की, हा प्रश्न आता मुंबईचे अन्य मुख्य प्रश्न हाताळल्याखेरीज आटोक्यात येणार नाही.

(२२ ऑगस्ट, १९९७)

□

# आपले सौंदर्य

**अनु. मीना टाकळकर**

*या जगात आपले अस्तित्व दाखवणारी गोष्ट म्हणजे आपला देह. या देहाची उत्तम जपणूक करणे म्हणजे सर्वार्थाने आपल्या आयुष्याचे सार्थक करणे. उत्तम आरोग्य हे सर्वात मोठे समाधान. परंतु बहुसंख्य माणसे या देहाची हेळसांड करतात. चुकीच्या आहारविहारामुळे आपल्या शरीराला व्याधी-तक्रारींचे आगर बनवतात. या देहाचे सौंदर्य गमावून टाकतात.*

*निसर्गाने या शरीराच्या उत्तम संवर्धनासाठी अनेकविध वस्तूंची निर्मिती केलेली आहे. परंतु आपणाला त्याची कल्पनाही नसते.*

*'आपले सौंदर्य' हे पुस्तक वाचले तर आपण आपल्या देहाचे मंदिर कसे सुंदर सजवू शकतो याच्या अनेक बहुमोल टिप्स मिळतील. आंतरराष्ट्रीय सौंदर्यस्पर्धांमध्ये परीक्षक म्हणून अनेकदा काम केलेल्या श्रीमती ब्लॉसम कोचर यांनी आपल्या आयुष्यभराचा अनुभवांचा खजिनाच या पुस्तकात खुला केला आहे.*

*केसांची निगा (प्रकार, कोंडा, केस गळती, केस रंगविण्याची कला, केशरचना, लांब केसांची निगा, केसांचे कुरळेपण, शाम्पू), त्वचेची निगा (त्वचेची रचना, गुणधर्म, त्वचेची आर्द्रता टिकवणारे मॉइश्चरायझर, वयोमानाप्रमाणे त्वचेत होणारे बदल, त्वचेचे रंगरूप, मुरूमे, उघडी छिद्रे बुजवणे, घरगुती प्रसाधने, शरीरावरील फुगवट्यांची देखभाल, स्नानप्रकार), हातांची निगा (नखे, घामट हात, भेगा), पायांची निगा (कुरूपे, सुजलेला पाय, चिरा पडलेल्या टाचा), पौष्टिक अन्न आणि आहार, व्यायामाचे प्रकार, वर्षभरातील बदलत्या ऋतुमानाप्रमाणे घ्यावयाची काळजी, वयोमानाप्रमाणे बदलणारे आरोग्यविषयक प्रश्न अशा अनेक विषयांची चर्चा करून अत्यंत साधे सोपे उपाय या पुस्तकात सुचवण्यात आले आहेत.*

* *प्रौढ माणसाच्या त्वचेचे वजन तीन किलोग्रॅम असते.*
* *त्वचेचे क्षेत्रफळ १६ ते २० चौ. फूट असते.*
* *त्वचेच्या एक इंच चौकोनी भागात १२ दशलक्ष जिवंत पेशी, ६० तैलग्रंथी, ४०० घाम ग्रंथी असतात. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मज्जातंतूचे ४५ फूट लांबीचे धागे, १२०० संवेदन पेशी, १०० दाब बिंदू, ८०० मज्जातंतू असतात.*
* *तीव्र साबण, डिटर्जंट त्वचेला हानिकारक असते.*
* *चेहऱ्यावर लाली येण्यासाठी सुवासिक लिपस्टिक वापरल्याने त्वचेचा तजेलदारपणा ओसरत जातो.*
* *अल्कलाइनचे प्रमाण जादा असणारे क्रीम हानिकारत ठरते.*
* *तेलकट व कोरड्या या दोन्ही प्रकारच्या त्वचेसाठी दह्याने केलेला मसाज उपयुक्त ठरतो.*
* *ग्लासभर लिंबाचा रस घेतल्याने पुरेसे सी व्हिटॅमिन मिळते. त्वचा तुकतुकीत होते.*
* *काकडी, कांदा, मेथी यांचा आहार घेतला तर त्वचा नितळ राहते.*
* *पांढरा मुळा व गाजर यांचा रस यातील अ जीवनसत्त्वामुळे त्वचेचा पोत मुलायम होतो.*





# ऋतुमानाप्रमाणे त्वचेची निगा

आपली त्वचा सुंदर राहण्यासाठी सतत दक्ष राहावे लागते. कधीही याबाबत बेसावध राहून चालत नाही. उन्हाळ्यामध्ये प्रखर उन्हापासून त्वचेचे व केसांचे संपूर्ण रक्षण करण्याची काळजी घ्यावयाची असते. उन्हाळा जातो न जातो तोच तुमची त्वचा रखरखीत होते. तिच्यात ओलसरपणा राहत नाही. त्यासाठीही दक्षता घ्यावी लागतेच.

## हिवाळा

### त्वचेचा ओलसरपणा टिकवणे जरूर

हिवाळा येताना आपल्याबरोबर स्वतःच्या काही समस्या घेऊन येतो. थंडी वाढत जाते त्याप्रमाणे त्वचेच्या पृष्ठभागाखालील ग्रंथींची तुलनात्मक कार्यप्रवणता घटते. त्यामुळे त्वचा कोरडी पडते. हिवाळ्यातील बोचऱ्या थंडीच्या वाऱ्यामुळे त्वचेवर कोरडे लाल चट्टे पडतात.

आरामदायी घरातला शेकोटी किंवा हिटरचा वापर त्वचेला हानी पोहोचवतो. कोरडी हवा फक्त तुमच्या रंगरूपातील ओलसरपणा शोषून घेते. कोरडेपणावर मात करायची असेल तर साबणाचा अजिबात वापर न करणे हाच यावर उत्तम मार्ग आहे. बहुतेक साबण हे त्वचेला कोरडेपणा देणारे असतात. त्याच्याऐवजी सौम्य क्लेंझिंग (cleansing) लोशन किंवा क्लेंझिंग क्रीम वापरा. तुम्हाला जर साबणाचा वापर करून पाण्याने एकसारखा चेहरा धुण्याचा शौक असेल तर ग्लिसरिनयुक्त मॉइश्चरायझिंग (moisturising) सौम्य साबण निवडा. घरच्या घरी दुधाच्या सायीत चिमूटभर हळद पावडर घालून बनवलेले क्लेंझर हे सगळ्यात उत्तम होय.

त्वचेमध्ये ओलसरपणा निर्माण करणे ही दुसरी महत्त्वाची पायरी, हिवाळ्यातील वातावणामुळे त्वचेमधील ओलसरपणा कमी होतो. त्या ओलसरपणाचे इमोलिअंटस् (emollients) वापरूनच रक्षण करावे लागते. हे 'मॉइश्चरायझर' त्वचेच्या पृष्ठभागाखाली असलेले पाणी थोपवून ठेवते आणि बाहेरील वातावरणाचा प्रभाव रोखण्याचे काम करते. दिवसातून दोन वेळेस, सकाळी व झोपण्यापूर्वी, क्लेंझिग आणि टोनिंग केल्यानंतर इंमोलिअंटस लावण्याचा परिपाठ ठेवा.

उन्हाळ्यात वापरता त्यापेक्षा अधिक जास्त तीव्रतेचे मॉइश्चरायझर वापरा. त्वचा ओलसर असतानाच हे मॉइश्चराझर लावा. तुमच्या सगळ्या चेहऱ्याला एकासारखे लावा. वरच्या बाजूकडे आणि बाहेरच्या बाजूकडे क्रीमने मसाज करीत रहा.

एक चमचा दुधाची साय घ्या आणि त्यात ग्लिसरीन, एरंडेल तेल व गुलाबपाण्याचे काही थेंब मिसळा. ते चांगले एकजीव करा व संपूर्ण चेहऱ्याला, मानेला व हाताला रात्री झोपण्यापूर्वी लावा. रात्रभर तसेच ठेवून सकाळी पाण्याने धुवा आणि तोंडावर गार पाण्याचे शिंतोडे उडवा.

घरगुती बनावटीमध्ये तेल त्वचेत मिसळते. त्यातून एक संरक्षक कवच त्वचेच्या पृष्ठभागावर तयार होते आणि त्वचेवरील पेशींच्या आतील ओलसरपणा टिकवून ठेवते. बाहेरील वातावरणातील अपायकारक परिणामापासून संरक्षण करते.

'ॲस्ट्रिंजंटस्' (Astringents) असलेले, अल्कोहोल किंवा लोशन्स चेहऱ्याला लेप म्हणून वापरू नका.


त्वचेवरील ओलसरपणा टिकवून ठेवण्यासाठी आठवड्यातून दोन वेळेस बदाम, मध आणि चरबीयुक्त पदार्थांचा चेहऱ्याला लेप लावा. अर्धा तास तो ठेवा.

हा घरगुती लेप वापरून बघा. पाव कप दही, एक चमचा मध, एक चमचा दूध पावडर, दोन 'यीस्ट' गोळ्यांची पावडर एकत्र करा. हा लेप दहा मिनिटे चेहऱ्यावर लावून ठेवा. थंड पाण्याचे शिंतोडे उडवा.

उत्तम परिणाम साधण्यासाठी आठवड्यातून हे एकदा करा. 'हीटर'वर एक पातेलेभर पाणी ठेवा. त्यामुळे घरातील हवा दमटसर राहील घरात स्वच्छ हवा येण्यासाठी खिडकी थोडी उघडी ठेवा.

थंड हवेत जाण्यापूर्वी कमीत कमी अर्धा तास आधी तरी आंघोळ करू नका किंवा चेहरा धुऊ नका. त्वचेला पाणी आवडते. ते तुमच्या चेहऱ्याला ओलसरपणा आणून देते. थंड त्वचेला तडाखा बसून ती उलते.

रंगभूषा केलेल्या चेहऱ्याचेही बाहेरील थंडीपासून संरक्षण होते. 'मॉइश्चरायझर'चे 'फाउंडेशन' असल्यास अधिक फायदा होतो. ते थोड्याफार प्रमाणात 'मॉइश्चरायझर'सारखेच काम करते. त्यात त्वचेचे सौंदर्य खुलविण्यासाठी आणि उत्तम रंगरूपासाठी टोनिंगच्या रंगछटा मिसळलेल्या असतात. चेहऱ्यावरील रंगाचा असमतोल व गडद वर्तुळे झाकण्यासाठी फाउंडेशनच्या आधी कन्सीलर स्टिकचा वापर करा. चेहरा मुलायम दिसण्यासाठी ही स्टिक वापरणे उपयुक्त ठरते.





## ओठ

ओठाला त्याच्या स्वतःच्या अशा तेलग्रंथी नसतात. त्यामुळे थंड हवेमध्ये ओठ फुटण्याचा व ओठाला चिरा पडण्याचा धोका असतो. रोज रात्री झोपताना ओठाला व्हॅसलिन लावा. सकाळी वेदनाशामक मलम वापरून त्यांची काळजी घ्या. तुमच्या ओठाला लावले जाणारे वेदनाशामक मलम दोन प्रकारे वापरता येते. नुसती चमक येण्यासाठी आणि लिपस्टिक लावण्याआधी.

**त्वचेवरील ओलसरपणा टिकवून ठेवण्यासाठी आठवड्यातून दोन वेळेस बदाम, मध आणि चरबीयुक्त पदार्थांचा चेहऱ्याला लेप लावा. अर्धा तास तो ठेवा. हा घरगुती लेप वापरून बघा. पाव कप दही, एक चमचा मध, एक चमचा दूध पावडर, दोन 'यीस्ट' गोळ्यांची पावडर एकत्र करा. हा लेप दहा मिनिटे चेहऱ्यावर लावून ठेवा. थंड पाण्याचे शिंतोडे उडवा.**

फुटलेल्या ओठांवर लिपस्टिक लावू नका. त्यामुळे ओठ अधिकच कोरडे होतील. दिवसातून अनेक वेळा मॉइश्चरायझर लावा. नंतर त्यांच्या संरक्षणासाठी लिप ग्लॉस लावा. 'सनस्क्रीन' बरोबर 'लिप-बाम' वापरा.

चिरा पडलेल्या ओठांसाठी परिणामकारक घरगुती उपाय–

गुलाबाच्या पाकळ्या बारीक करून थोड्या लोण्यात मिसळा. ते लोणी रात्री झोपायच्या वेळेस ओठाला भरपूर प्रमाणात लावा. हे क्रीम ओठ मऊ ठेवण्यास मदत करते. ओठाला उबदार स्निग्ध रंगाचा हलकासा थर द्या.

## उन्हाळा

## (गरम आणि कोरडा)

कोरड्या उन्हाळ्यातील उष्णतेला सामोरे जाण्यासाठी तुम्ही स्वतः 'मॉइश्चरायझिंग पॅक' तयार करा आणि आठवड्यातून दोनदा वापरा.

पिकलेले केळे किंवा कलिंगड चांगले मळून एकजीव करा. एक चमचा दूध पावडर आणि पाव चमचा मधामध्ये ते एकत्र करा. स्वच्छ धुतलेल्या चेहऱ्यावर आणि मानेवर वीस मिनिटे तसेच ठेवा. थंड पाण्याने ते धुवा. उष्णता, अति धुणे आणि वाऱ्यामुळे कोरड्या झालेल्या त्वचेला करडा रंग आलेला असतो. त्यामुळे झालेल्या गडद त्वचेला हा पॅक चांगला आहे.

घरातच बाग तयार करा. घरात लावली जाणारी झाडे ही त्वचेचे विकार बरे करणे, घरातील वातावरण ओलसर ठेवणे आणि प्राणवायूचा ताजा पुरवठा करणे यासाठी उपयुक्त

असतात. ही रोपे मुळाशी पाणी धरून ठेवणारी, भरपूर पाणी लागणारी आणि लवकर वाढणारी हवीत. पुष्कळ मोठी पाने असलेले 'फर्न' (Fern), बेगॉनिअस (Begonias), बांबू, झेब्रा प्लान्ट आणि पॅपिरस सारखी रोपे लावणे अधिक श्रेयस्कर.

शरीरातील स्नायूंना वंगण देण्यासाठी भरपूर पाणी प्या.

**गुलाबाच्या पाकळ्या बारीक करून थोड्या लोण्यात मिसळा. ते लोणी रात्री झोपायच्या वेळेस ओठाला भरपूर प्रमाणात लावा. हे क्रीम ओठ मऊ ठेवण्यास मदत करते. ओठाला उबदार स्निग्ध रंगाचा हलकासा थर द्या.**

उन्हाळ्यात त्वचा खूप तेलकट होते. तरीही तीव्र साबणाने चेहरा खूप धुवू नका. त्याच्याऐवजी तीव्र तुरट पदार्थ (Astringent) आणि छिद्रे घासून काढण्यासाठी कमीत कमी कणयुक्त पदार्थाचा वापर करा.

टोमॅटोच्या एक चमचा रसात 'ओट' धान्याचे जाडेभरडे पीठ घालून त्याची 'पेस्ट' तयार करा. त्यात एक थेंब 'पेपरमिंट'च्या तेलाचा अर्क घाला. डोळे व तोंडाचा भाग सोडून ओलसर केलेल्या त्वचेला हे मिश्रण लावा. पाच ते दहा मिनिटे तसेच ठेवा. नंतर ओल्या कपड्याने किंवा स्पंजने पुसा आणि थंड पाण्याने धुवून टाका.

नको असलेला त्वचेचा चकाकीतपणा कमी करण्यासाठी उपयुक्त मिश्रण एक छोटा चमचा खाण्याचे मीठ पाण्याचा फवारा मारणाऱ्या बाटलीत भरा. हे मिश्रण चेहऱ्यावर शिंपडा व नंतर मऊ टॉवेलने चोळून काढा.

साल न काढलेल्या काकडीच्या किंवा बटाटाच्या चकत्या चेहऱ्यावर चोळल्यास चकचकीतपणा जातो आणि तो निरोगी दिसतो.

जलतरण करताना शरीराला व्यवस्थित ताण देण्यासाठी सुवासिक तेलाच्या अर्काचे काही थेंब व्हॅसलिनमध्ये मिसळून ते मिश्रण त्वचेला संरक्षक कवच म्हणून लावा.

पाण्यातील क्लोरिनपासून हे व्हॅसलिन त्वचेचे संरक्षण करते व त्वचेच्या ओलसरपणा टिकवून ठेवते. त्वचा पाण्यामध्ये राहील तेवढ्याच प्रमाणात त्वचेच्या पृष्ठभागावरील मृतपेशी त्वचेतील स्निग्धता शोषून घेतात. जितकी त्वचा कोरडी पडेल तितकी ती आकुंचितही पावते. त्वचेत ओलसरपणा टिकवून हा उत्तम उपाय आहे. सुवासिक फुलांच्या तेलाने त्वचेची दाहकता रोखली जाते.

त्वचा असंरक्षित असते तेव्हा ती काही मिनिटातच भाजण्याची भीती असते.

तुमच्या त्वचेचे संरक्षण करण्यासाठी 'सनस्क्रीन' (Sun screen) वापरा, ते सूर्यापासून निघालेल्या प्रखर किरणांपासून संरक्षण करेल.

खास करून तुमची त्वचा जर कोरडी किंवा नाजूक संवेदनक्षम असेल तर पॅरे



ॲमिनोबेनझॉइकेटेड् (Pare-aminobenzoicatied) आणि बेंझॉफेनोनेस (Benzophenones) असलेली अल्कोहोलरहित उत्पादने वापरा.

त्वचा कोणत्याही प्रकारची असली तरी सनस्क्रीन नेहमी 'मॉइश्चरायझर'च्या वरती मेकअपच्या आधी वापरा.

उन्हात थोडा वेळ जायचे असेल तर सनस्क्रीन म्हणून घरी बनवलेले चहाचे पाणी सगळ्यात उत्तम! 'मॉइश्चरायझर' करण्याआधी तोंडावर फवारणे खूपच चांगले.

कोणतेही 'सनस्क्रीन' सुरक्षिततेची हमी देत नाही. इतकेच काय सर्वात अधिक गुणकारी उत्पादने वापरूनही उत्सर्जन केलेल्या किरणांना त्वचा रोखू शकत नाही. ती त्वचेपर्यंत जाऊन पोचतात. संपूर्ण 'ब्लॉक'साठी सनब्लॉक (Sun Block) म्हणून झिंक ऑक्साईड (Zinc Oxide) किंवा टिटॅनियम डायॉक्साईड (Titanium Dioxide) वापरा. ते प्रकाशाला अडथळा आणते. ही मलमे चेहऱ्याला सुंदर लालसर तांबूस रंगछटा मिळवून देतात.

उन्हामुळे करपलेल्या त्वचेसाठी दोन ते चार तासांनी सुवासिक तेलाच्या अर्काचे थेंब घातलेले बर्फाचे पाणी लावा. त्वचेची दाहकता शमविण्यासाठी बर्फ घातलेले दूध व काकडीचा रस हा चांगला उपाय आहे.

एकसारखे उन्हात राहून त्वचा काळपट लाल निस्तेज होते. अशा त्वचेला चकचकीतपणा देण्यासाठी पुरेशा आंबट दह्यात एक चमचा 'ओट' धान्याचे जाडेभरडे पीठ घालून लेप तयार करा. द्राक्षाचा व काकडीचा रसही वापरता येईल. त्वचेवरील करपलेल्या भागाला हा लेप लावा. अर्धा तास तसाच ठेवा नंतर पाण्याचे धूवून 'मॉइश्चरायझर' लावा.

उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये उन्हात फिरल्यामुळे त्वचेवर पिंगटसर ठिपके व डाग पडतात. मंजिष्ठा (Manjistha) वनस्पती या पिवळी फुले येणाऱ्या औषधी वनस्पतीची पावडर पिंगटसर ठिपक्यांना व डागांना लावल्यास त्वचेवरील डाग कमी होतात.

## उन्हाळा (दमट आणि गरम)

त्वचा नेहमी स्वच्छ ठेवा. त्वचेवरील वरचा थर गळून पडण्यासाठी खरखरून घासणारे खालील स्क्रब Scrub क्रीम वापरा.

मुलतानी माती, डाळीचे पीठ आणि चंदन पावडर सम प्रमाणात एकत्र करा. ते हवाबंद डब्यात ठेवा. यातील एक चमचा मिश्रण पाण्यात टाकून लेप तयार करा. हा लेप त्वचेवरील ढलप्या व घाण काढून टाकेल.

ऋतुमानानुसार येणाऱ्या फळांचा वापर चेहऱ्याचा लेप देण्यासाठी करा. ती फळे

**उन्हाळ्यात त्वचा खूप तेलकट होते. तरीही तीव्र साबणाने चेहरा खूप धुवू नका. त्याच्याऐवजी तीव्र तुरट पदार्थ (ग्हाइ) आणि छिद्रे घासून काढण्यासाठी कमीत कमी कणयुक्त पदार्थांचा वापर करा. टोमॅटोच्या एक चमचा रसात 'ओट' धान्याचे जाडेभरडे पीठ घालून त्याची 'पेस्ट' तयार करा. त्यात एक थेंब 'पेपरमिंट'च्या तेलाचा अर्क घाला. डोळे व तोंडाचा भाग सोडून ओलसर केलेल्या त्वचेला हे मिश्रण लावा. पाच ते दहा मिनिटे तसेच ठेवा. नंतर ओल्या कपड्याने किंवा स्पंजने पुसा आणि थंड पाण्याने धुवून टाका.**

आर्थिकदृष्ट्या परवडणारी असतात. त्यात ओलसरपणाही अधिक असतो.

फळे कुस्करून किंवा यंत्रात पिळून त्यांचा गर काढा. गर काढल्यावर ते लगेच त्यातील जीवनसत्त्वाचे गुणधर्म नष्ट होण्याच्या आत ते लावा.

द्राक्षामध्ये साखर, जीवनसत्त्वे आणि खनिजे, क्षार भरपूर प्रमाणात असतात. डोक्याखालील व तोंडाच्या आजूबाजूला असलेल्या सुरकुत्यांनाही ते त्वचेमध्ये ओलसरपणा निर्माण करते. ते जंतुनाशक असून त्वचेचे पोषण करते.

त्वचेवरील काळ्या मोड्या (Black heads) आणि मोठे डाग तसेच पिवळसर पडलेली त्वचा यासाठी पपई उपयुक्त आहे.

काकडी त्वचेला थंडपणा देते आणि निस्तेज व तेलकट त्वचेला उजळपणा आणते.

एक चमचा गुलाबपाण्यात एका छोट्या काकडीचा रस मिसळा.

कलिंगडाचा रस चेहऱ्याला व मानेला लावल्यास त्वचा तजेलदार बनते.

नारळाचे पाणी त्वचेवर चोळल्यास त्वचा तजेलदार होते उजळते. उष्णता कमी होते.

वरील सर्व लेप/मलमे त्वचेवर १५ मिनिटे तरी ठेवा आणि नंतर थंड पाण्याने धुवून टाका. घामावाटे शरीरातील भरपूर पाणी बाहेर टाकले जाते. ते भरून काढण्यासाठी खूप पाणी प्या. आतल्या आत त्वचेचे पोषण करणे महत्त्वाचे आहे.

डोळ्यांना सुखद वाटण्यासाठी काकडीच्या चकत्या किंवा बर्फयुक्त गार दुधाच्या सुती घड्या ठेवा.

डोळ्याला कंड सुटणे, डोळे लाल होणे यासाठी थंडगार केलेल्या बटाट्याच्या चकत्या पापण्यांवर ठेवा व १० मिनिटे विश्रांती घ्या.

झोपण्याच्या वेळेस दोन्ही डोळ्यांमध्ये गुलाबपाण्याचे थेंब घालण्याने डोळे चमकदार बनतात.



**स्नान :**

त्वचेवरील छिद्रे आवळून घेण्यासाठी आंघोळ करताना एक कपभर ताकाचा वापर करा. याप्रमाणे आंघोळ केल्यास त्वचेचे पोषण होते. त्वचेला काही इजा झाली असल्यास ती बरी करते. दोन लहान चमचे मीठ, लहान चमचाभर बदाम तेल आणि अर्धा लहान चमचा माल्ट व्हिनिगर एकत्र करून आंघोळीच्या आधी अर्धा तास सर्व शरीराला लावा.

त्वचा काळपट लाल होऊ नये म्हणून बदाम तेल व माल्ट व्हिनिगर समप्रमाणात घेऊन त्याचे मिश्रण त्वचेला आंघोळीपूर्वी एक तास लावा.

उन्हामुळे भाजल्या गेलेल्या त्वचेसाठी डोक्यापासून ते पायाच्या बोटापर्यंत दह्याचा लेप वापरा. १० मिनिटे ते तसाच ठेवा व नंतर गार पाण्याने आंघोळ करा. (गार पाण्याचा वापर करून धुवून टाका). त्यामुळे झटपट आराम मिळतो.

विरळ कापडामध्ये बर्फाचे चौकोनी तुकडे (cubes) गुंडाळून नाडी (pulse) च्या बिंदूला म्हणजे मनगट व पायाच्या घोट्याच्या ठिकाणी घासा. यामुळे तुम्हाला लगेच उत्साह येईल व तुमचे बाह्यस्वरूप उठावदार बनेल.

फ्रीजमध्ये ठेवलेल्या थंडगार 'कोलन'ने मानेचा भाग आणि 'हेअर-लाईन' घासा.

उन्हामुळे पुरळ येऊ नये म्हणून घामट कपडे काढून टाका व लगेच आंघोळ करा. घामोळ्यांमुळे सुटणारी कंड धान्याच्या थंडगार खळीने (कांजी) व गार पाण्याने कमी होते. एक पॉईंट गॅलन पाण्यात अर्धा कप धान्याची खळ करा.

खूप व्यायाम करणे किंवा अति दमणे व अति घाम येणे यामुळे शरीरातील बाहेर पडलेले पातळ द्रव्य भरून काढण्यासाठी पाणी, साखर, क्षार व पोटॅशियम असलेले पातळ पदार्थ प्या. या कारणासाठी इलेक्ट्रॉल हे उत्तम पेय आहे.

## मान्सून - पावसाळी दिवस :

तेलकट त्वचा, उघडी छिद्रे, गळू, पुटकुळ्या आणि घामोळ्या इत्यादी त्वचेच्या समस्या पावसाळा आपल्याबरोबर घेऊन येतो.

शहरातील वाढत्या प्रदूषणामुळे दूषित झालेल्या वातावरणामुळे घाणीचे कण त्वचेला चिकटतात व त्वचा करड्या रंगाची निस्तेज होते. स्वच्छता राखल्यास ती ताजीतवानी दिसण्यास मदतच होते.

त्वचा स्वच्छ करण्यासाठी ही पावडर वापरून बघा–

| | | |
|---|---|---|
| चणा डाळीचे पीठ | – | १ मोठा चमचा |
| बेंगॉल डाळीचे पीठ | – | १ मोठा चमचा |
| मेथीची पावडर | – | १ मोठा चमचा |

या मिश्रणातून एक चमचा पावडर गुलाब पाण्यात मिसळून चेहऱ्याला दररोज लावा.

तुमची त्वचा चांगल्या स्वरूपात असेल किंवा किंचित कोरडी असेल तर सध्या वापरत असलेले मॉइश्चरायझर बदलण्याची कल्पना चांगली आहे. तेलकट त्वचेसाठी अगदी हलकेसे सौम्य स्वरूपाचे मॉइश्चरायझर बदल म्हणून उपयुक्त ठरू शकेल. ते तुम्हाला कमी त्रासदायक वाटेल.

तेलकट त्वचा व उघडी छिद्रे यांच्यावर उपाय म्हणून सौम्य साबणाने दिवसातून तीन वेळेस तुमचा चेहरा धुवा. कोमट पाण्याने साबणाचा प्रत्येक अंश नी अंश काढून टाकून थंड पाण्याने धुवा. तुरट पदार्थाचा (Astringent) वापर करा.

दररोज रात्री अर्ध्या लिंबाच्या रसात सैंधव मीठ घालून एक ग्लासभर पाणी प्या. उरलेल्या अर्ध्या लिंबामध्ये एक लहान चमचा मध व अंड्यातील पांढरा भाग मिसळून चेहऱ्याला लेप म्हणून लावा. सहा ते आठ आठवडे हे नियमित करा. तुमच्या त्वचेमध्ये लक्षणीय सुधारणा झालेली दिसली.

पावसाळी हवेत खूप प्रमाणात घाम येतो. हवेशीर वातावरणाचा शरीराशी कमी संबंध येतो. त्यामुळे विशेष करून छाती, पाठ, पोट आणि कपाळ या शरीराच्या भागावर मोहरीच्या दाण्याएवढ्या लाल पुटकुळ्या उमटतात. त्यामुळे खूप खाजवते.

घामोळ्या टाळण्यासाठी व त्या बऱ्या करण्यासाठी, बोरिक पावडर, चंदन पावडर व चेहऱ्याला लावायची टाल्कम पावडर हे सम प्रमाणात एकत्र करून आठवड्यातून दोन दिवस भरपूर प्रमाणात लावा.

पातळ पेस्ट होईपर्यंत मुलतानी माती पाण्यात विरघळू द्या. नंतर ती इजा झालेल्या भागाला लावा. लेप वाळल्यानंतर थंड पाण्याने आंघोळ करा.

आंघोळ करण्यापूर्वी (घामोळ्यांचा) परिणाम झालेल्या शरीराच्या भागावर दही लावल्यास घामोळ्यांपासून आराम मिळण्यास मदत होते.

ज्यांना घामोळ्यांचा खूप त्रास होतो अशा लोकांनी थंडगार पेये व पातळ पदार्थांचे सेवन वाढवणे गरजेचे आहे.

केसांच्या मुळाला अतिसूक्ष्म विषाणूंचा संसर्ग झाला तर गळू होते. केसांच्या आजूबाजूची जागा लाल होते व आग आग होते. कंड सुटतो. कधी वेदनाही होतात, कधी त्या ठिकाणी पू होतो.

गळूची पूर्ण वाढ होण्यापूर्वीच म्हणजे अगदी सुरुवातीपासून संसर्ग झालेल्या भागावर काळ्या जिऱ्याची पावडर पाण्यात मिसळून लावा.

चेहऱ्यावर संसर्गाने वारंवार उद्भवणाऱ्या पुळयांसाठी कडुनिंबाच्या झाडाच्या सालापासून बनवलेली पावडर पाण्यात मिसळून लावा. कडुनिंबाची पाने पाण्यात उकळून घ्या त्या



कोमट पाण्याने चेहरा स्वच्छ धुवा.

किसलेल्या कांद्यात चंदन पावडर मिसळा आणि ते मिश्रण चेहऱ्याला लावा. जखम झालेल्या (Septic) पुटकुळ्या साफ करण्यास व बऱ्या करण्यास ते मदत करते. काही आठवड्यातच त्वचा मऊ मुलायम करते.

**दररोज रात्री अर्ध्या लिंबाच्या रसात सैंधव मीठ घालून एक ग्लासभर पाणी प्या. उरलेल्या अर्ध्या लिंबामध्ये एक लहान चमचा मध व अंड्यातील पांढरा भाग मिसळून चेहऱ्याला लेप म्हणून लावा. सहा ते आठ आठवडे हे नियमित करा. तुमच्या त्वचेमध्ये लक्षणीय सुधारणा झालेली दिसली.**

## रंगभूषा

रंगभूषा का करावी याची तीन महत्त्वाची कारणे आहेत.

अ) आपण निसर्गतःच सुंदर आहोत असे भासविण्यासाठी रंगभूषा करणे याचा अर्थ असा नव्हे की तुम्ही कमीत कमी रंगभूषा करावी. किंबहुना तुम्ही सध्या जेवढी रंगभूषा करता त्यापेक्षा ती अधिक प्रमाणात करावी. याच्या मागची युक्ती हीच आहे की रंगभूषेच्या ज्या छटा आणि साधने तुम्ही निवडता त्यातूनच सुंदर असल्याचा भास निर्माण करता येतो. सुंदर चेहऱ्याची देणगी निसर्गतःच लाभली आहे असे भासवता येते.

ब) रंगभूषेमुळे चेहऱ्याचा चांगला भाग अधिक उठावदार करता येतो व वाईट भाग झाकून लपवता येतो.

क) तुमच्या त्वचेला अनुरूप अशी रंगभूषा निवडा. त्वचेचे बाह्य घटकांपासून संरक्षण करणारे संरक्षक कवच म्हणून ती काम करते.

आता आपण रंगभूषेच्या प्रक्रियेकडे पायरी पायरीने जाऊ यात.

रंगभूषा करण्यापूर्वी :

प्रथम– त्वचेची काटेकोरपणे स्वच्छता करा. क्लेंझिंग क्रीम लावा व पाण्यात भिजवलेल्या कापसाने ते काढून स्वच्छ करा.

दुसरी पायरी– कोरड्या त्वचेवर 'मॉइश्चरायझर' लावा आणि तेलकट त्वचेवर तुरट पदार्थ लावा. तुमच्या त्वचेचे पोत मिश्र स्वरूपाचे असल्यास कोरड्या भागावर मॉइश्चरायझर आणि तेलकट भागावर तुरट पदार्थ वापरा. आता तुमची त्वचा रंगभूषेसाठी सज्ज झाली आहे.

पाया/आधार (Foundation)–

रंग निवडण्यापूर्वी थोडासा रंग तुमच्या गालाला किंवा मनगटाच्या आतील भागावर लावा. तो तुमच्या त्वचेच्या रंगात मिसळून जायला हवा. एवढेच नव्हे तर तुमच्याजवळ गडद व हलक्या रंगाच्या छटा सुद्धा असायला हव्यात.

# जोशींची कुंडली

प्रिं. मनोहर जोशी आणि जगप्रसिद्ध जादूगार प्रो. पी. सी. सरकार यांच्यांत बरेच साम्य आहे. कोणत्याही परिस्थितीत, कोणालाही 'मॅनेज' करता येते, याबद्दल दोघांना दुर्दम्य आत्मविश्वास आहे. साखळदंडांनी हात-पाय बांधून, एखाद्या पेटाऱ्यात, अनेक कुलपे लावून जेरबंद केलेले प्रो. सरकार, हजारो प्रेक्षकांच्या समोर, डोळ्याचे पाते लवते न लवते, तोच स्वतःची सुटका करून घेतात आणि लोकांना दोन्ही हात जोडून अभिवादन करतात. प्रेक्षकांपैकीच कोणीतरी साखळदंड बांधलेले असतात आणि पेटाऱ्याला कुलपे लावून किल्ल्या स्वतःकडे ठेवलेल्या असतात. असे असूनही प्रो. सरकार पेटाऱ्यातून बाहेर येतात. हे पाहून टाळ्यांचा कडकडाट होतो. प्रिं. जोशी हे प्रो. सरकार यांच्याकडे प्रशिक्षण घेण्यासाठी गेले होते काय, ही माहिती काढण्यासाठी गृहमंत्री गोपीनाथ मुंडे यांनी काही 'आयबी'च्या अधिकाऱ्यांना सांगितले होते. ज्या दोन अधिकाऱ्यांना मुंडे यांनी या गुप्त मिशनवर पाठवले होते, त्या दोघांमध्ये कोणत्याच प्रकारचा सुसंवाद नव्हता. परंतु सध्या पोलिस खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये असेच वातावरण आहे, असे सांगितले जाते. म्हणजे काही अधिकारी मुंडेंना एक माहिती पुरवितात, तर दुसरे काही अधिकारी जोशींच्या कानात वेगळीच माहिती फुंकतात. याशिवाय काही गुप्त पोलिस थेट 'मातुःश्री'वर रिपोर्ट देतात. 'मातुःश्री'वरही बाळासाहेब ठाकरे, उद्धव ठाकरे आणि स्मिता ठाकरे यांना रिपोर्ट करणारे अधिकारी वेगवेगळे. त्यामुळे त्या एका बंगल्यातच एकमेकांवर नजर ठेवण्यासाठी आणखी एक गुप्त पोलिस विभाग आहे. गुप्त पोलिसांचा इतका सुळसुळाट मुंडे यांच्या उपराजवटीत चालू आहे की, नक्की कोणती माहिती खरी आणि कोणत्या अफवा, हे खुद्द पोलिस खात्यालाही समजेनासे झाले आहे. सेनेतल्याच प्रतिपक्षाला हुलकावणी देण्यासाठी त्यांच्यापैकीच एखाद्याने सोडलेली अफवाही एखाद्या वृत्तपत्रातून 'विश्वासू सूत्रां'चा हवाला देऊन प्रसिद्ध होते आणि त्यामुळे आणखीनच गोंधळात गोंधळ होऊन एकच संशयकल्लोळ सुरू होत असे. तर मुंडे यांच्या दोन गुप्त पोलिसांनी दिल्लीतील जादूगार सरकारशी संपर्क साधला आणि ते गेल्या आठवड्यात, धापा टाकत, मुंबईला येऊन धडकले. त्यांतल्या एकाने मुंडे यांना सांगितले की, शिवसेनेत आणखी एक 'लखोबा' छुपेपणाने वावरतो आहे. तो पुन्हा त्याच कपटी शरद पवारांबरोबर खलबते करीत आहे. लगेच कारवाई केली नाही तर सरकारला (म्हणजे महाराष्ट्रातील युती सरकारला) धोका आहे. ही माहिती मिळताच मुंडे अक्षरशः धावत 'मातुःश्री'वर जाऊन थडकले आणि त्यांनी बाळासाहेबांना रिपोर्ट सादर केला. 'लखोबा' हे नुसते नाव उच्चारले, तरी बाळासाहेब चवताळतात आणि त्यांचा तोल सुटतो. ते स्वाभाविक आहे. एका 'लखोबा'ने शिवसेनेत एवढा धुमाकूळ



घातला असेल, तर दोन वा तीन वा चारही लखोबा उजळ माथ्याने पक्षात फिरत असतील, तर– तोबा! तोबा! बाळासाहेबांनी लगेच 'सामना'चे कार्यकारी संपादक संजय राऊत यांना दौत आणि टाक घेऊन बोलावले. मुंडे यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे बाळासाहेबांनी 'मातुःश्री'वरून थेट 'वर्षा'वरच आर्‌डीएक्सचा मारा केला. आकस्मिकपणे झालेला हा बॉम्बहल्ला पाहून कधीही न डगमगणारे प्रिं. जोशी डगमगले. परंतु काहीही आणि कोणीही 'मॅनेज' करता येते, यावर त्यांचा विश्वास असल्यामुळे, त्यांनी लगेचच या हल्ल्यातून सुटका करण्याचे प्रयत्न सुरू केले. त्यांनी दिल्लीतील जादूगार सरकारवरच आपला जादूटोणा केला, वाजपेयी-अडवाणी सरकार स्थिर ठेवायचे असेल, तर जोशी-मुंडे सरकार अस्थिर करून चालणार नाही, असा दिल्लीहून निरोप येताच 'वर्षा'वरचा आर्‌डीएक्स हल्ला एकदम थांबला. तोपर्यंत मुंडे यांचा दुसरा गुप्त पोलिस मुंबईत येऊन थडकला होता. त्याने अशी बित्तंबातमी आणली होती की, मनोहर जोशी हे दिल्लीला केंद्रीय मंत्रिमंडळात आपली वर्णी लावू पाहत आहेत. त्यासाठी त्यांची भाजपमध्ये जायचीही तयारी आहे. जोशी भाजपमध्ये जाऊन केंद्रात गेले, तर आपल्याला मुख्यमंत्री होता येईल, या आशेने मुंडे यांनी पुन्हा 'मातुःश्री'कडे धाव घेतली. पण 'मातुःश्री'वर नारायण राणे आणि बाळासाहेब विखे पाटील यांच्या नावांची चर्चा चालू होती. मुंडे खाली मुंडी घालून परतले. परंतु विधानसभेत जोशी यांच्यावर चालू असलेले शरसंधान पाहून ते परत खुलले. तोपर्यंत जोशी कुटुंबीयांच्या खाजगी गुप्त पोलिसाने मुख्यमंत्र्यांना अशी खात्रीलायक माहिती पुरविली होती की, विरोधी पक्षाच्या सदस्यांकडे उन्मेषच्या विरोधात फायली गेल्या, त्या गृहमंत्र्यांकडूनच! ही परिस्थिती 'मॅनेज' करायला तशी कठीण होती; पण स्वतः आर्. आर्. पाटील आणि मधुकर पिचडच जोशी यांच्या मदतीला आले किंवा आणले गेले! साक्षात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनीच त्यांच्या 'सामना'मधून मनोहर जोशींबद्दल स्पष्ट शब्दांत अविश्वास व्यक्त केला होता. आर्. आर्. पाटील यांनी केलेल्या आरोपांना दुजोराही दिला होता. असे असूनही कॉंग्रेसवाल्यांनी मनोहर जोशींना जराही अडचणीत आणायचा प्रयत्न केला नाही. कोणत्याही प्रकारचा हंगामा विधानसभा वा विधान परिषदेत घातला नाही. मुख्यमंत्र्यांनी पिचड-पाटील यांना 'मॅनेज' केले की, थेट त्यांचे 'रिमोट कंट्रोल' शरद पवार यांनाच 'मॅनेज' केले, याबद्दल आता मुंडे यांचे पोलिस संशोधन करीत आहेत. अडवाणींची मदत घेऊन ते या प्रकरणी सीबीआयलाही लक्ष घालायला सांगत आहेत. तिकडे छगन भुजबळ जरासे संभ्रमित झाले आहेत. त्यांना काळजी पडली असावी की पवारांनी आणखी एक लखोबा कॉंग्रेसमध्ये आणला तर आपले काय होणार? याउलट, मुख्यमंत्र्यांच्या समोर वेगळीच समस्या आहे. आजवर त्यांनी वांद्र्यापासून दिल्लीपर्यंतचे सर्व वक्री असलेले ग्रह मॅनेज केले होते. पण आता मात्र खरेखुरे ग्रहच आपल्याविरुद्ध फिरले, अशी भीती त्यांना वाटू लागली आहे. खरे तर, कुंडलीतील ग्रहसुद्धा 'मॅनेज' करता यावेत, म्हणून त्यांनी ज्योतिषशास्त्र पारंगत कुटुंबात मुलीचा विवाह केला होता. म्हणूनच त्यांना १९९४ सालापासूनच खात्री होती की,

१९९५ साली आपण मुख्यमंत्री होणार! कुंडलीतले ग्रहही असे मॅनेज होऊ शकतात, हे पाहून त्यांचा विश्वास द्विगुणित झाला होता. पण आता मात्र राजकारण्यांप्रमाणेच ग्रहही फिरले असल्याचा साक्षात्कार त्यांना झाला आहे.

## वृश्चिक राशीचे भविष्य

मनोहरपंतांनी तीन वर्षे युती सरकार आणि त्यांच्या कुंडलीतील बहुतेक ग्रह सांभाळले. आता ते फिरले असतील, तर त्याला काहीतरी कारणे नक्कीच असणार, त्यांपैकी काही कारणांचा शोध आम्ही घेतला आहे. गेल्या महिन्यात लोकसभा निवडणुका झाल्या. तेव्हाच आम्ही त्यांना सांगितले होते की, युती सरकारला धोका आहे. सेना-भाजपच्या कारभारावर लोक नाराज आहेत. मुख्यमंत्री विनोद चांगला करतात, पण दिलेले आश्वासन पाळत नाहीत, असा लोकांचा अनुभव आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकींमध्ये चुटकीसरशी निर्णय होतात, पण बुनियादी प्रश्नांवर चर्चाही होत नाही. ही परिस्थिती सुधारली नाही, तर सोनिया गांधी आणि शरद पवार हे जोशींच्या कुंडलीत गोंधळ माजविणार; परंतु आमचा हा सल्ला मुख्यमंत्र्यांनी हव्या तितक्या गांभीर्याने घेतला नाही. जोशींच्या कुंडलीतील पहिल्या घरात आहेत बाळासाहेब ठाकरे, दुसऱ्यात आहेत गोपीनाथ मुंडे, तिसऱ्यात प्रमोद महाजन, चवथ्यात उद्धव-राज, पाचव्यात उन्मेष आणि आता राजू दादरकर, सहाव्या घरात नारायण राणे, सातव्यात शरद पवार आणि बाकी घरांमध्ये आहेत अवकाशात भटकणारे अपक्ष आमदार. या सर्वांपासून शांती लाभावी, म्हणून पंतांनी ग्रहशांती यज्ञ केले होते. आता यज्ञाच्याही पलीकडे जाऊन काहीतरी करावयास हवे. म्हणजे पत्रकार, दूरचित्रवाणी, इष्ट-मित्र परिवार यांच्यापेक्षा अधिक वेळ लोकांच्या प्रश्नांसाठी द्यावयास हवा. बाळासाहेब ठाकरे यांचीही तशीच अपेक्षा दिसते आहे. नाहीतर एप्रिल महिन्यात जोशींच्या कुंडलीत पुन्हा गोंधळ उडण्याची शक्यता संभवते. ज्योतिषशास्त्र हा आमचा विषय नाही; परंतु इतके जाणतो की, १७ एप्रिल रोजी शनी मेष राशीत प्रवेश करतो आहे. शनी असा कुठे घुसला की, उलथापालथी होतात, असे म्हणतात. हा शनी मेष राशीत अडीच वर्षे राहणार आहे. मनोहरपंत वृश्चिक राशीचे असल्यामुळे त्यांची साडेसाती काही वर्षांपूर्वी संपली असली, तरी नजीकचा काळ फारसा उत्साहवर्धक नाही, अशी हवा मंत्रालयात आहे. दिल्ली येथील सरकारभोवती शनीला असलेले सर्व उपग्रह आताच फिरू लागले आहेत. त्यामुळे जोशींच्या कुंडलीवरही परिणाम होऊ शकतात! 'कालनिर्णय'च्या दिवाळी अंकात सरांच्या वृश्चिक राशीचे वार्षिक भविष्य सांगताना जो उपदेश केला आहे, तो जोशींनाही लागू पडावा, असा आहे, 'आत्मविश्वासाने आणि खंबीरपणे आपली वाटचाल निश्चित करा.. रवि-शुक्राच्या पाठबळामुळे समोरच्याला नमवणे शक्य असले, तरी मदमस्त हत्तीसारखे वागू नका. अवसान गळाले की, शत्रू जोराने चालून येतो... लक्षात ठेवा, की दर्प, दंभ, लोभ याचा अतिरेकीपणा माणसाच्या विनाशाला कारण होतो.. (२७ मार्च, १९९८)

□